कृष्ण यजुर्वेदीय तैत्तिरीय संहिता

कांड १

प्रपाठक १.

१ हे पलाशशाखे, अन्न प्राप्त व्हावयासाठी मी तुला तोडतो. २ हे पलाशशाखे, बलनिष्पादक असा दुग्धादि रस प्राप्त व्हावा म्हणून मी तुझ्यावरून हात फिरवून तुला साफसूफ करतो. ३ हे वत्सांनो, तुम्ही आपल्या मातांच्या पासून दूर होऊन वाऱ्यासारखे यथेच्छ संचार करा व सायंकाळी पुन्हा आपल्या मातांच्या जवळ धावत परत या. ४ हे गाईंनो, सर्वप्रेरक असा सूर्यदेव अत्यंत श्रेष्ठ अशा यज्ञकर्मासाठी तुमच्या ठिकाणी दुग्धरूपी हविर्भाग निर्माण व्हावा म्हणून रानात चरावयास जाण्याची तुम्हाला प्रेरणा करो. हे गाईंनो, अवध्य, बलशाली, दुधाळ, संततियुक्त, गोचीड इत्यादि क्षुद्र व्याधींनी रहित व लाळ, तिळा इत्यादि मोठे रोग नसलेल्या तुम्ही आपल्या उदरात देवांना द्यावयाचा दुग्धरूपी हविर्भाग वाढवा. तुमचा अपहार करण्यास चोर समर्थ न होवो. त्याचप्रमाणे अत्यंत पापी असा वाघासारखा हिंसक प्राणीही तुमच्यावर झडप घालून तुम्हास खावयास समर्थ न होवो. रूद्रदेवाचे आयुध तुम्हाभोवती फिरत राहून तुमचे रक्षण करो. ५ हे गाईंनो, तुम्ही तुमचे पालन करणाऱ्या त्या यजमानाजवळ सतत टिकून रहा व पुष्कळ संततीने युक्त व्हा. ६ हे पलाशशाखे, तू यजमानाच्या पशूंचे रक्षण कर. (अनुवाक १).

१ हे गार्हपत्य, तू जणू काय यज्ञाचे साधनभूत धनच आहेस. २ दर्भ कापावयाच्या या अश्वपर्शु अथवा असिद नामक शस्त्राच्या ठिकाणी छपून असलेले राक्षस जाळून टाकले. त्याचप्रमाणे क्षुद्रजंतुरूपी शत्रूही जाळून खाक केले. ३ प्रजापालक अशा मनूने निर्मिलेली, कौशल्याने तीक्ष्ण धार लावलेली आणि स्वकर्मनिष्णात अशी ही अश्वपर्शु दर्भाच्या बेटासंमुख पूर्व दिशेस जात आहे. प्राचीन काळचे त्रिकालदर्शी विद्वान याज्ञिक पूर्व दिशेकडून दर्भ आणीत. देवांना प्रिय असलेले दर्भ या वेदीच्या ठिकाणी ठेवावेत. ४ हे दर्भसमूहा, मी तुला देवांच्या साठीच कापले आहे. तथापि एका वर्षात पुन्हा तू आताप्रमाणेच वाढणारा आहेस. ५ देवप्रिय अशा दर्भसमूहा, पेऱ्याच्या पाठीमागे कापून मी तुझी हिंसा करीत नाही. त्याचप्रमाणे तुझी ओळ सोडून मधेच आडवे तिडवे कापून मी तुझी हिंसा करीत नाही. ६ तुझे प्रत्येक पेरे पुन्हा वाढो. तुला मी कापणार असलो तरी देवांच्यासाठी तुला कापीत आहे, स्वतःच्या कार्यासाठी नाही. ७ देवप्रिय दर्भसमूहा तू शेकडो शाखांनी वृद्धिंगत हो.

८ आम्ही संततिरूपी हजारो शाखांनी वृद्धिंगत होऊ. ९ हे आधारकाष्ठा, पृथ्वीच्या संपर्कापासून तू या दर्भसमूहाचे रक्षण कर.१० हे दर्भमुष्टिसमूहा, बांधण्याच्या उत्कृष्ट पद्धतीने मी तुला बांधून घेतो.११ हे शुल्ब तू भूदेवीचा कमरपट्टा आहेस. १२ तू इंद्राणी देवीच्या कमरेची मेखला आहेस. १३ पूषादेव तुझ्या टोकांची गांठ बांधो. १४ तुझी ही गांठ अत्यंत घट्ट न होवो. १५इंद्राच्या बाहूंनी मी तुला उचलतो. १६ बृहस्पतीच्या मस्तकाने मी तुला वाहून नेतो. १७ विस्तीर्ण अशा अंतरिक्षातून चल. १८ तू देवांच्याकडे जात आहेस. (अनुवाक २).

१ हे पात्रांनो देवांच्या यजनासाठी अर्थात् देवांच्यासाठी केल्या जाणाऱ्या यज्ञकर्मासाठी तुम्ही शुद्ध व्हा. २ हे कुंभी, तू जणू काय वायूचे संचार-स्थान असे आकाशच आहेस. तू द्युलोकरूप आहेस. तू भूलोकरूप आहेस. त्याचप्रमाणे तू विश्वधारक आहेस. उत्कृष्ट अशा कांतीने तू दृढ हो. फुटू नकोस. ३ हे शाखापवित्र, शंभर धारांनी युक्त असे तू दुग्धांशांना शुद्ध करणारे आहेस. त्याचप्रमाणे सहस्त्रधारांनी युक्त असे तू दुधाच्या सर्व अंशांना शुद्ध करणारे आहेस. ४ कुंभीत ओतताना खाली सांडलेला सूक्ष्म दुग्धबिंदू अग्नीत समर्पण केला. मोठा बिंदूही अग्नीत हवन केला. अग्नीत पडलेला प्रत्येक दुग्धबिंदू श्रेष्ठ अशा 'नाक' नांवाच्या अग्निदेवाला आणि द्युलोक व भूलोकरूपी देवांना अर्पण असो. ५ हे दोग्ध्या, तू जिचे दूध काढलेस ती ही पहिली गाय पूर्णायुषी आहे. ६ दुसरी ही गाय विश्वव्यापी आहे. ७ ही तिसरी गाय सर्वकार्यकारी आहे. ८ हे उदकबिंदूंनो, सत्य अशा क्षालनशक्तीने व लहान लहान लाटांनी युक्त, अत्यंत मधुर व हर्षजनक असे तुम्ही दधिरूपी धनाचा लाभ व्हावा म्हणून या कुंभीत तापत असलेल्या दुधाशी मिसळून जा. ९ हे दुग्ध, दधिरूपी सोमरसाने मी तुला विरजण लावतो. या विरजणामुळे निष्पन्न होणारे दही इंद्राला प्रिय आहे. १० हे विष्णो, हे दधिरूपी हविर्द्रव्य तू रक्षण कर. (अनुवाक ३).

१ हे हस्तांनो, देवांच्यासाठी केल्या जाणाऱ्या यज्ञकर्माकरता धुऊन स्वच्छ केलेल्या तुम्हा उभयतांची योजना करण्याला मी समर्थ होईन. २ हे शूर्प, विश्वव्यापी अशा यज्ञासाठी मी तुला घेतो. ३ या शूर्पाच्या ठिकाणी छपून असणारे राक्षस जाळून भस्म केले. त्याचप्रमाणे क्षुद्र जंतुरूपी शत्रूही भाजून नाहीसे केले. ४ गाड्याच्या जुवाचे ठिकाणी (बैल जोडण्याच्या जागी) असणाऱ्या हे अग्ने तू हिंसक आहेस. पातकी अशा हिंसकाला तू मारून टाक. जो

आमचा द्वेष करतो त्याला मार व ज्याची आम्ही हिंसा करू इच्छितो त्याचीही तूं हिंसा कर. ५ हे शकटा तू अत्यंत शुद्ध व्रीहिसंज्ञक धान्याने पूर्ण भरलेला, देवांना अत्यंत प्रिय अशा हविर्द्रव्याचा उत्कृष्ट वाहक आणि जणू काय देवांना उत्कृष्ट रीतीने बोलावणारा आहेस. ६ यास्तव तुझ्यावर लादलेले व्रीहिरूपी हविर्द्रव्याचे पोते नीट धारण कर. खाली पडू देऊ नकोस. ७ हे व्रीहिसमूहा, सूर्याच्या नेत्राने मी तुला पाहतो. भिऊ नको, थरथर कापू नको, मी तुझी हिंसा करीत नाही. ८ हे परिणहद्वारा, मोकळा वारा या पोत्याच्या आंत बाहेर खेळावा म्हणून तू विस्तीर्ण हो. ९ साळीच्या भाताच्या रूपाने असलेल्या हे हविर्द्रव्या, सर्वप्रेरक अशा सविता देवाच्या प्रेरणेने, उभयता अश्विनीकुमारांच्या बाहूंनी व पूषादेवाच्या हातांनी अग्निदेवासाठी मी तुला या सुपात मापून घेतो. १० आणि अग्नी व सोम या दोघांच्यासाठी मी तुला मापून घेतो. ११ सुपात घेतलेले हे हविर्द्रव्य देवांच्यासाठी आणि पोत्यात उरलेले हे देवांच्यासह आमच्यासाठी. १२ हे हविर्द्रव्या आम्हाला धान्याची समृध्दी प्राप्त व्हावी म्हणून मी तुला उचलून घेतो. आम्हाला प्राप्त होणारी धान्यसमृध्दी आम्ही देवांना काही न देता आम्हीच तिचा उपभोग करावा म्हणून न होवो तर देवांना देण्यासाठीच होवो. १३ स्वर्गरूपी यज्ञप्रदेशाला मी न्याहाळून पाहतो. १४ स्वर्गप्रकाशक अशा या विश्वव्यापक अग्निदेवाला मी अवलोकन करतो आहे. १५ द्युलोक व भूलोक यांच्यापासून आमची घरे न डळमळता दृढ राहोत. १६ हे हविर्द्रव्या, विस्तीर्ण अशा अंतरिक्षातून मजबरोबर ये. १७ हे हविर्द्रव्या, भूदेवीच्या मांडीवर मी तुला ठेवतो. १८ हे अग्निदेवा, या हविर्द्रव्याचे रक्षण कर. (अनुवाक ४).

१ हे उदकांनो, सविता देव तुम्हाला उंच उडवून शुद्ध करो. २ छिद्ररहित अशा दर्भपवित्राने शुद्ध करो. ३ जगताच्या स्थितीला कारण असणाऱ्या सूर्याचे जणू किरण अशा दर्भांच्या पवित्राने तुम्हाला शुद्ध करो. ४ हे उदकदेवतांनो, यज्ञाची समाप्ती करण्याला समर्थ व प्रवाहरूपाने पुढे पुढे धावणाऱ्या तुम्ही हा यज्ञ शेवटास न्या. त्याचप्रमाणे यजमानाला स्वर्गलोकी नेऊन ठेवा. वृत्रासुराबरोबर झालेल्या युद्धात तुम्हाला इंद्राने आपल्याश्रया करून घेतल्या आणि त्याच वृत्रासुरयुद्धप्रसंगी तुम्हीही इंद्राला आपलेसे करून घेतलेत. तुम्ही मंत्रपूर्वक उदकाने प्रोक्षित झाल्या आहात. ५ हे व्रीहिकणांनो, अग्नीला प्रिय अशा तुम्हावर मी प्रोक्षण करतो. अग्नी व सोम या उभयतांना प्रिय अशा तुम्हावर मी प्रोक्षण करतो. ६ हे पात्रांनो, देवयजनरूप अर्थात् देवांच्यासाठी

केल्या जाणाऱ्या यज्ञकर्मासाठी तुम्ही शुद्ध व्हा. ७ या कृष्णाजिनाच्या ठिकाणी छपून राहिलेले राक्षस नष्ट केले त्याचप्रमाणे क्षुद्र कीटकरूप शत्रूंनाही नाहीसे केले. ८ हे कृष्णाजिना तू भूदेवतेचीच जणू त्वचा आहेस. ९ तुझा स्वीकार करून ही माझी त्वचा आहे असे भूदेवता समजो. १० हे उलूखला तू कुटल्या जाणाऱ्या व्रीहिकणांचा आधार आणि लाकडाचे बनविलेले आहेस. भूदेवीची त्वचा असलेले हे कृष्णाजिन तुझा स्वीकार करून हे माझेच आहे असे तुला समजो. ११ हे व्रीहिसमूहा तू जणू अग्नीची तनू आणि वाणीच्या प्रवृत्तीला कारणभूत आहेस. देवांना भक्षणासाठी मी तुला कांडावयासाठी या उखळात ओतून घेत आहे. १२ हे मुसळा तू लाकडाचे असून दगडासारखे कठिण आहेस. तू देवांच्यासाठी हे हविर्द्रव्य उत्कृष्ट रीतीने कांड. १३ हे पाषाणा या हविर्द्रव्यरूपी अन्नाची देवांच्याजवळ घोषणा कर. १४ या अन्नाच्या स्वादिष्ट रसाची घोषणा कर. १५ हे यज्ञपालांनो, तुम्ही सर्वजण हे हविर्द्रव्यरूपी अन्न उत्कृष्ट रसयुक्त आहे अशी देवांच्याजवळ घोषणा करा. १६ हे शूर्प, तू एक वर्षांत वाढणाऱ्या कळकाच्या सालींचे केलेले आहेस. १७ हे व्रीहिसमूहा, वाढलेल्या कळकाच्या सालींचे केलेले हे शूर्प तुला आपलासा समजो. १८ या व्रीहिसमूहात दडून बसलेले राक्षस हांकून लावले. त्याचप्रमाणे क्षुद्र कीटकरूपी शत्रूही हांकून लावले. १९ हे तूषसमूहा तू राक्षसांचा भाग आहेस. २० हे तंडुलांनो वायू तुम्हाला कणीकोंडयापासून वेगळे करो. २१ सोन्याची अंगठी हातात घातलेला सविता देव तुम्हाला निवडून घेवो.(अनुवाक ५).

१ या कृष्णाजिनाचे ठिकाणी असणारा मलरूपी राक्षस खाली जमिनीवर पाडला. तसेच कृमिकीटकरूपी शत्रूही खाली पाडले. २ हे कृष्णाजिना तू भूदेवीची त्वचा आहेस. ३ तुला भूदेवी आपलेसे समजो. ४ हे शम्ये तू द्युलोकाला धारण करणारी आहेस. तुझा स्वीकार करून भूदेवीची त्वचा असलेले हे कृष्णाजिन 'ही शम्या माझी आहे' असे समजते. ५ हे पेषणाधार शिले तू तांदुळ वाटण्याचे कार्याविषयी अभिज्ञ व पर्वतावरील पाषाणाची बनलेली आहेस. ६ हे उपले तू स्वकर्तव्य जाणणारी आणि पर्वताची जणू कन्याच आहेस. यास्तव पेषणाधारभूत शिला तुला स्वकीय समजो. ७ सर्वप्रेरक अशा सविता देवाच्या प्रेरणेने अश्विनीकुमारांच्या बाहूंनी व पूषादेवाच्या हातांनी मी तुला पाट्यावर घालतो. तू धान्य आहेस यास्तव तू देवांना तृप्त कर. ८ हे तंडुलसमूहा यजमानाच्या प्राणवायूची गती नीट राहण्यासाठी मी तुला वाटतो. ९त्याचा अपान वायू नीट चालावा म्हणून मी तुला वाटतो.

१० त्याचा व्यानवायू स्वकार्यक्षम रहावा म्हणून मी तुला वाटतो. ११ विस्तीर्ण अशा यज्ञकर्म परंपरेला अनुलक्षून यजमानाला दीर्घायुष्य प्राप्त होण्यासाठी मी तुला पाट्यावर वाटून ठेवतो. १२ सुवर्णाची अंगठी हातात घातलेली सविता देव तुला या कृष्णाजिनावर ओतून घेवो. (अनुवाक ६).

१ हे उपवेषा तू जळजळीत निखाऱ्यांची चाळवाचाळव केल्याने खराब न होण्याइतका कणखर आहेस. यस्तव पुरोडाशरूप अन्न आम्हाला दे. २ हे गार्हपत्य अग्ने, कच्चे अन्न खाणाऱ्या अग्नीला मारून टाक. त्याचप्रमाणे मांस खाणाऱ्या अग्नीला पुरता लांब घालीव. देवांचे यजन करणाऱ्या अग्नीला बोलाव. ३ कपालाच्या ठिकाणी असणारा राक्षस जाळून टाकला. तसेच शत्रूंनाही जाळून खाक केले. ४ हे कपाल, तू दृढ आहेस, यास्तव पृथ्वीला दृढ कर, यजमानाचे आयुष्य दृढ कर, त्याची प्रजा दृढ कर आणि या यजमानाच्या सजातीयांना सर्वतोपरी त्यांचे सभोवताली बशीव म्हणजे आज्ञाधारक कर. ५ हे कपाला तू आपल्या ठिकाणी असलेला भार धारण करणारे आहेस. यास्तव अंतरिक्षाला स्थिर कर. यजमानाच्या प्राणवायूला दृढ कर, त्याच्या अपानवायूला दृढ कर आणि या यजमानाच्या सजातीय लोकांना त्याचे सर्वतोपरी आज्ञाधारक कर. ६ हे कपाल, तूं धारणसमर्थ आहेस यासाठी द्युलोकाला अचल कर, यजमानाचे नेत्र दृढ कर, त्याचे कर्णेन्द्रिय दृढ कर आणि या यजमानाचे सजातीय असणाऱ्यांना त्याचे सेवक कर. ७ हे कपाल तू तुजवर ठेवल्या जाणाऱ्या पुरोडाशाला धारण करणारे आहेस. दिशांना दृढ कर, या यजमानाचे उत्पत्तिस्थान दृढ कर, त्याची संतती बळकट कर आणि या यजमानासाठी त्याच्या सजातीयांना त्याचे सर्वतोपरी आज्ञाधारक कर. ८ हे कपालांनो आपण व्यवस्थित मांडले गेलेले आहात म्हणून या यजमानाकरता प्रजा संपत्ती आणि त्याचे सजातीय यांना त्याच्या सभोवताली बसवा म्हणजे यजमानाला ते उपयोगी पडतील असे करा. ९ हे कपालांनो तुम्ही भृगु आणि अंगिरस या अग्नीला उत्पन्न करणाऱ्या ऋषींच्या तपाने चांगले तापून तयार व्हा. १० हे कपालांनो, यज्ञकर्मनिष्पादक अशा अध्वर्यूंनी प्रदीप्त अशा अग्नीवर जी कपाले एकमेकाशी जुळवून मांडली ती सर्वही कपाले यज्ञकर्माचा परिपोष करणाऱ्या यजमानाचे यजनरूप कर्म समाप्त झाल्यावर इंद्र व वायु हे दोघे एकमेकांपासून मोकळी करोत.(अनुवाक ७).

१ हे तंडुलपिष्ट, या पात्रीत तुला मी व्यवस्थित रीतीने ओततो. २ 'प्रणीता' नामक लाकडी पात्रात ठेवलेल्या हे उदकांनो, 'मदंती' नांवाच्या

तपेलीत असलेल्या कढत पाण्याशी तुम्ही चांगल्या प्रकारे मिसळून जा. ३ हे तंडुलपिष्टरूपी ओषधींनो, पूर्वोक्त दोन्ही प्रकारच्या उदकरसाशी तुम्ही अगदी एकरूप व्हा. स्वकार्यक्षमतारूप धनाने संपन्न व स्वभावत: मधुर अशा हे उदकांनो, तुम्ही आहाराच्या रूपाने मनुष्यमात्राच्या उदरात जाणाऱ्या व स्वभावत: रुचकर अशा पिष्टरूपी ओषधीशी एकजीव होऊन जा. ४ हे पिष्ट, यजमानाच्या ठिकाणी प्रजोत्पत्ती व्हावी म्हणून मी आपल्या हातांनी तुला खूप मळतो. ५ हे एका पिष्टविभागा, अग्निदेवासाठी मी तुला स्पर्श करतो. ६ हे दुसऱ्या पिष्टविभागा अग्नी व सोम या दोघांच्यासाठी मी तुला स्पर्श करतो. ७ हे पुरोडाश, तू जणू काय यज्ञरूपी पुरुषाचे मस्तकच आहेस. ८ हे पुरोडाश, तुला तापलेल्या कपालावर ठेवल्यामुळे तू तप्त झालेला व यजमानाला संपूर्ण आयुष्य देणारा आहेस. ९ हे पुरोडाश, तू पुष्कळ विस्तृत हो. तुझा यजमानही प्रजा इत्यादिकांनी विस्तृत होवो. १० हे पुरोडाश, तुझ्यावरून पाण्याचा हात फिरविल्याच्या योगाने तू सूक्ष्म त्वचा ग्रहण कर. म्हणजे तुझ्यावर बारिक पापुद्रा येऊ दे. ११ या पुरोडाशाला उपद्रव करणारा राक्षस दूर केला आणि शत्रूही दूर केले. १२ हे पुरोडाश, सविता देव अत्यंत उंच अशा द्युलोकात राहणाऱ्या 'नाक' नांवाच्या अग्नीवर तुला शिजवून परिपक्व करो. १३ तुझ्या शरीराला अग्नी दग्ध न करो. १४ हे गार्हपत्य अग्ने या पुरोडाशरूपी हविर्द्रव्याचे रक्षण कर. १५ हे पुरोडाश तू मंत्ररूपी ब्रह्माशी एकरूप हो. १६ पात्री विसळलेले हे उदक 'एकत' नांवाच्या राक्षसाला समर्पण असो. १७ 'द्वित' नामक राक्षसाला समर्पित होवो. १८ 'त्रित' राक्षसालाही समर्पण होवो. (अनुवाक ८).

१ हे स्फ्य, मी तुला उचलून घेतो. २ तू जणू काय इंद्राचा उजवा बाहू आहेस. ३ तू हजारो शत्रूंचा संहार करणारा आणि अत्यंत तेजस्वी अशी शेकडो आयुधे धारण करणारा आहेस. त्याचप्रमाणे प्रखर अशा प्रवाहाने अरण्यात वणव्याच्या रूपाने तीक्ष्ण अशी अग्निज्वाला उत्पन्न करणारा तू जणू वायूच आहेस. ४ देवांच्यासाठी केल्या जाणाऱ्या यज्ञकर्माला आधारभूत असणाऱ्या हे पृथिवी, तुझ्या ठिकाणी असणाऱ्या ओषधींचे मूळ मी खणून नाहिसे करीत नाही. ५ अशुद्ध अशा रज:कणरूपाने 'अररु' नांवाचा असुर जमीनीपासून दूर केला आहे. ६ हे रज:कणसमूहा, तू गाईंचे निवासस्थान असलेल्या गोठ्यात जा. ७ हे वेदे तुझ्या ठिकाणी द्युलोक पर्जन्यवृष्टी करो. ८ सर्वप्रेरक हे देवा, जो आमचा द्वेष करतो, ज्याचा आम्ही द्वेष करतो

त्याला येथून ज्यास्तीत ज्यास्त लांबच्या प्रदेशात नेऊन शेकडो फासांनी बांधून ठेव. मोकळा सोडू नको. ९ यज्ञकर्माला आधारभूत होणाऱ्या वेदिरूपी पृथ्वीपासून अशुद्ध रज:कणरूपी 'अररु' संज्ञक असुर दूर केला आहे. १० हे रज:कणसमूहा तू गाई बांधण्याचे ठिकाण असलेल्या गोठ्यात जा. ११ हे वेदि तुझ्यावर द्युलोक पाऊस पाडो. १२ सर्वप्रेरका हे सूर्यदेवा, जो आमचा द्वेष करतो व ज्याचा आम्ही द्वेष करतो त्याला येथून अधिकांतल्या अधिक दूर प्रदेशात ने. आणि शेकडो फासांनी त्याला बांधून ठेव. सोडू नकोस. १३ देवांचे यजन न करणारा 'अररु' पृथ्वीपासून दूर केला. १४ हे रज:कणसमूहा तू गाई बांधतात त्या ठिकाणी गोठ्यात जा. १५ हे वेदि तुझ्या ठिकाणी द्युलोक पर्जन्यवृष्टी करो. १६ हे सवितृदेवा, जो आमचा द्वेष करतो व ज्याचा आम्ही द्वेष करतो त्याला या ठिकाणापासून जास्तीत जास्त लांबच्या प्रदेशात नेऊन शेकडो फासांनी बांधून टाक. मोकळा सोडू नको. १७ हे रज:कणसमूह तुझ्या ठिकाणी एकजीव होऊन राहिलेला 'अररु' असुर स्वर्गलोकात न जावो. १८ हे वेदि 'गायत्री' छंदाच्या योगाने वसू नांवाचे देव तुझा स्वीकार करोत. १९ हे वेदि, त्रिष्टुप् छंदाच्या योगाने रुद्रदेव तुझा स्वीकार करोत. २० जगती छंदाच्या योगाने आदित्य तुझा स्वीकार करोत. २१ यज्ञरूपी सृष्टी निर्माण करणारे जणू ब्रह्मदेवच असे अध्वर्यु इत्यादि ऋत्विज सर्वप्रेरक अशा परमेश्वराच्या प्रेरणेने यज्ञकर्म करीत असतात. २२ हे वेदि तू मूर्तिमंत सत्य आहेस. २३ सत्याचे जणू घरच आहेस. २४ त्याचप्रमाणे सत्यरूपी सौंदर्याने नटलेली आहेस. २५ लहान मोठ्या स्वरांत मंत्र म्हणणारे ऋत्विज जिच्या संनिध वावरतात अशा हे वेदे, क्रूर अशा 'अररु' नांवाच्या असुराला दूर घालविण्यापूर्वी यावज्जीव दानशील असलेल्या प्राचीन कालच्या यज्ञकर्त्या यजमानांनी ज्या वेदिरूपी पृथ्वीला तिच्या ठिकाणी असणाऱ्या अमृतकिरणांसह उचलून चंद्राच्या ठिकाणी नेऊन ठेवली त्या पृथ्वीलाच मनात आणून म्हणजे तीच तू आहेस असे समजून आताचे यज्ञकर्ते यजमान तुझ्या ठिकाणी यज्ञयाग करतात. (अनुवाक ९).

१ या स्रुक् इत्यादि पात्रांच्या ठिकाणी असलेला मलरूपी राक्षस जाळून टाकलास त्याचप्रमाणे क्षुद्रकीटकरूपी शत्रूही भाजून नष्ट केले. २ हे स्रुवादि यज्ञपात्रांनो, गार्हपत्य अग्नीच्या तीक्ष्ण तेजाने मी तुम्हाला खूप तापवितो. ३ हे स्रुक्,गाईंच्या गोठ्याचा नाश न व्हावा म्हणून मी अन्नाने युक्त व वैऱ्यांचा नाश करणाऱ्या तुला झाडून स्वच्छ करतो. ४ हे जुहू, वाणी व

प्राण यांचा नाश माझ्या हातून होऊ नये म्हणून, ५ हे उपभृत, नेत्र व कर्णेन्द्रिय यांचा मी नाश करणार नाही. ६ हे ध्रुवे, संतती व संततीचे उत्पत्तिस्थान मी नष्ट करणार नाही असे मनात वागवून अन्नाने युक्त व शत्रूंचा संहार करणाऱ्या तुला मी दर्भाग्रांनी झाडून चांगली स्वच्छ करतो. ७ अग्नीच्या उपासनारूपी व्रताविषयी तत्पर होऊन आनंदित चित्त, पुत्रपौत्रादि संतती, सौभाग्य व उत्कृष्ट शरीर मला प्राप्त व्हावे अशी इच्छा करणाऱ्या यजमानपत्नीच्या कमरेला तिचे कल्याण व्हावे म्हणून तिला सुख होईल अशा रीतीने मी ही योक्त्रसंज्ञक मोळाची तिपेडी दोरी बांधतो. ८ हे अग्ने उत्कृष्ट संततीने युक्त व उत्कृष्ट पती असणाऱ्या व कोणाकडूनही तिरस्कृत न होणाऱ्या आम्ही वैऱ्यांचा नाश करणाऱ्या व कोणाकडूनही तिरस्कृत न होणाऱ्या तुझ्याजवळ बसत आहो. ९ उत्कृष्ट ज्ञानी अशा सविता देवाने जो हा वरुणाचा पाश माझ्या कमरेला बांधला आहे तो मी सोडून टाकते आणि ब्रह्मदेवाचे उत्पत्तिस्थान असलेल्या व पुण्यकर्माच्या योगाने प्राप्त होणाऱ्या स्वर्गलोकामध्ये पतीसहवर्तमान सुखाने कालक्रमणा करते. १० हे अग्ने मी दीर्घायुष्याशी एकरूप होऊन जाईन, उत्कृष्ट प्रजेशी निगडित होऊन जाईन, पातिव्रत्यरूपी तेजाने युक्त होऊन जाईन. पुन्हा पुन्हा पत्नी होऊन पतीशी एकजीव होऊन जाईन. माझ्या शरीराशी माझा जीवात्मा एकरूप होवून जावो. ११ हे आज्या तू मूळचे गाईंचे दूध आणि तृणादि ओषधींचा सारभूत रस आहेस. त्या कधीही क्षीण न होणाऱ्या तुला मी या वाटीत ओतून घेते. १२ हे आज्य तू गाईचे दूध व ओषधींचा रस आहेस. आम्हाला उत्कृष्ट संतती प्राप्त व्हावी म्हणून नाशरहित अशा नजरेने मी तुझे अवलोकन करते. १३ हे आज्या तू तेजस्वी आहेस. १४ तेजस्वी अशा आहवनीयाला अनुलक्षून मजबरोबर चल. १५ आहवनीय अग्नी तुझे तेज नष्ट न करो. १६ हे आज्या तू जणू काय अग्नीची जिव्हाच आहेस. देवांना सुख उत्पन्न करणारे आहेस. यास्तव तू त्या त्या आहुतींच्या प्रसंगी ते ते मंत्र म्हणून तुला सुचीत भरून घेण्याकरता पुरेसे हो. १७ हे आज्या तू कांतिमान आहेस. १८ प्रकाशयुक्त आहेस. १९ तेजस्वी आहेस. २० हे उदकांनो, सविता देव तुम्हाला पवित्र करो. २१छिद्ररहित अशा दर्भपवित्राने पवित्र करो. २२सर्वव्यापी अशा सूर्याच्या किरणांनी शुद्ध करो. २३ हे आज्या तू कांतिमान आहेस तुला कांतिमान अशा या सुचीत त्या त्या आहुतीच्या प्रसंगी ते ते मंत्र म्हणून आहुती देण्याला पुरेसे भरून घेतो. २४ हे आज्या, तू प्रकाशमान आहेस यास्तव प्रकाशमान अशा या सुचीचे ठिकाणी

त्या त्या आहुतीच्या वेळी ते ते मंत्र म्हणून आहुती देण्याला पुरे होईल इतके भरून घेतो. २५ तू दीप्तिमान आहेस. यासाठी दिप्तिमान अशा स्रुचीमध्ये त्या त्या आहुतींच्या वेळी ते ते मंत्र म्हणून आहुती देण्याला पुरेल इतके भरून घेतो.(अनुवाक १०).

१ हे इध्म, तू जणू काळवीट आहेस. अग्नीला अर्पण करण्यासाठी मी तुला उदकाने प्रोक्षण करतो. २ हे वेदि, तू देवांनी जाणलेली आहेस. तुझ्या ठिकाणी बर्हिसंज्ञक दर्भ आंथरण्याकरिता मी तुला प्रोक्षण करतो. ३ हे दर्भसमूहा तू बर्ही म्हणजे वेदीला आच्छादन करणारा आहेस. यास्तव तुझ्या ठिकाणी स्रुचा ठेवण्याकरिता मी तुला प्रोक्षण करतो. ४ हे बर्हि, द्युलोकस्वरूप अशा तुला मी उदकाने प्रोक्षण करतो. ५ अंतरिक्षलोकरूप असलेल्या तुला प्रोक्षण करतो. ६ भूलोकरूप अशा तुला मी प्रोक्षण करतो. ७ स्रुचीमध्ये असलेल्या हे उदका तू बर्हिरूपी आसनावर बसणाऱ्या पितरांना सपर्मण केले गेले आहेस. यास्तव त्यांच्या संतोषासाठी तू सरस हो. हे जलबिंदूंनो, तुम्ही अद्भुत् अशा रसरूपाने पृथ्वीत शिरा. ८ हे प्रस्तरा, तू व्यापनशील अशा यज्ञाचा धारक आहेस. ९ हे बर्हि, लोकरीप्रमाणे मऊ व देवांना सुखाने बसण्याचे स्थान अशा तुला या वेदीत आंथरतो. १० हे परिधे, तू जणू काय विश्वावसु नांवाचा गंधर्व आहेस. तू सर्व प्रकारच्या पीडेपासून यजमानाचे जणू काय रक्षण करण्यासाठी त्याच्याभोवती असलेला भक्कम तट असून स्तुत्य व अनेकांकडून स्तविलेला आहेस. ११ हे परिधे तू जणू इन्द्राचा उजवा बाहूच आहेस. त्याचप्रमाणे यजमानाच्या भोवती राहणारा संरक्षक, स्तुत्य व अनेकांनी स्तुती केलेला आहेस. १२ हे परिधे, मित्र व वरुण हे दोघे देव तुला आहवनीयाग्नीच्या उत्तर बाजूस स्थापन करोत. तू शाश्वत अशा कर्तव्यकर्माने यजमानाच्या भोवती राहण्यास योग्य संरक्षक, स्तुत्य व सर्वांनी स्तविला गेलेला आहेस. १३ हे आहवनीय अग्ने, पूर्व बाजूस कसल्याही प्रकारच्या हिंसेपासून सूर्य तुझे रक्षण करो. १४ ज्ञानवान अशा हे अग्निदेवा, ज्याच्या ठिकाणी केलेला होम सर्व प्रकारे समृध्दी प्राप्त होण्याला कारणीभूत होतो अशा तुला मी या यज्ञात प्रज्वलित करतो. १५ हे विधृतींनो, तुम्ही दोघी प्रजांचे नियंत्रण करणाऱ्या आहात. १६ हे प्रस्तर, वसू, रुद्र व आदित्य यांचे जणू घरच असलेल्या वेदीत बैस. १७ हे स्रुचि, तूं जुहू म्हणजे अग्नीच्या ठिकाणी हवन करणारी आहेस. १८ हे स्रुचि तूं आपल्या जवळ आज्यरूपी हविर्द्रव्य बाळगणारी आहेस. १९ हे

स्रुचि, तू एका जागी अचल राहणारी आहेस. प्रिय अशा घृताची (घृतभक्षक) या नांवाने युक्त होऊन तुला प्रिय अशा या वेदिरूपी घरात बैस. २० या स्रुचा पुण्यकर्माचे स्थान अशा या वेदीत ठेवल्या आहेत. हे विष्णो, त्यांचे रक्षण कर. यज्ञाचे रक्षण कर, यजमानाचे रक्षण कर, यज्ञाचे नियंत्रण करणाऱ्या अशा माझे रक्षण कर.(अनुवाक ११).

१ हे आहवनीय अग्ने तू सर्व भूतांचे उत्पत्तिस्थान आहेस. यागनिष्पादक अशा अनेक ज्वालांनी तू विस्तृत हो. तुला हा नमस्कार असो. २ हे जुहू माझ्याबरोबर ये. देवांचे यजन करण्यासाठी अग्नी तुला बोलावीत आहे. ३ हे उपभृत् मजबरोबर चल. देवांचे यजन करण्यासाठी सविता देव तुला बोलावीत आहे. ४ हे अग्नाविष्णू हो, मी तुम्हा दोघांना ओलांडून वेदीपलीकडे जात नाही. तुम्हाला पाय न लागता मला जाता यावे म्हणून तुम्ही एकमेकांपासून जरा दूर व्हा. मजवर रागावू नका. स्थानांचे नियंत्रण करणाऱ्या हे अग्नाविष्णू हो, मला वेदीपलीकडे जाण्याला स्थळ मोकळे करा. ५ हे भूप्रदेश तू यज्ञाधिपती विष्णूचे स्थान आहेस. या स्थानातूनच इंद्राने पराक्रम गाजविण्याची कार्ये केली. ६ इंद्रदेवतेला उद्देशून केला जाणारा, दीर्घ, हिंसारहित, नैऋत्य दिशेपासून आरंभ करून सरळ अशा धारेच्या रूपाने देवांना प्रिय असलेल्या ईशान्य दिशेस समाप्त केला जाणारा यजमानाचा हा आघारसंज्ञक यज्ञ त्याच्या अधिष्ठात्री देवतेला अर्पण असो. ७ हा आहवनीय अग्नी ज्वालांच्या योगाने मोठा भासत आहे. ८ हे आहवनीय अग्ने दुर्वर्तनापासून तू माझे रक्षण कर. सदाचरणाच्या ठिकाणी सर्वदा मला प्रवृत्त कर. ९ हे आघारशेष, तू यज्ञरूपी पुरूषाचे मस्तक आहेस. प्रकाशरूप असलेल्या तुझ्याशी प्रकाशरूप असलेले हे ध्रुवेतील आज्य मिसळून जावो.(अनुवाक १२).

१ अन्नाच्या उत्पादनाला कारणीभूत होणाऱ्या या जुहूला वर उचलण्याने मला इंद्र सर्वतोपरी उच्च स्थितीस नेवो. २ आणि उपभृत् नांवाच्या स्रुचीला खाली दाबल्याच्या योगाने इन्द्र माझ्या शत्रूंना अवनतीस पोचवो. ३ माझा उत्कर्ष आणि ४ शत्रूंचा अपकर्ष ५ परब्रह्म व देव यांनी वृद्धिंगत केला आहे. आता इंद्र व अग्नी हे दोघे माझ्या शत्रूंना स्थानभ्रष्ट करून परस्परविरुद्ध दिशेरा हाकून लावोत. ६ हे परिधे, वसूंच्या तृप्तीसाठी मी तुला तुपाने माखतो. ७ हे परिधे रुद्रांच्या संतोषासाठी मी तुला तुपाने माखतो. ८ हे परिधे आदित्यांना संतुष्ट करण्याकरिता मी तुला तुपाने माखतो. ९ प्रस्तराच्या टोकाला माखले गेलेले तूप चाटून १० पक्षी आकाशात निरनिराळ्या मार्गाने

उडून जावोत. ११ पुत्रपौत्रादि प्रजा व त्यांचे उत्पत्तिस्थान माझ्या हातून नष्ट न होवो. १२ हे प्रस्तरातील दर्भांनो, तुम्ही पर्जन्योत्पादक अशा वाऱ्यांचे जणू बिंदूच आहात. तुम्ही उदके आणि धान्ये वृद्धिंगत करा. हे प्रस्तर, तू द्युलोकाला जा आणि तेथून आमच्या करता पर्जन्यवृष्टी खाली पाठीव. १३ हे आहवनीय अग्ने तू आयुष्याचे रक्षण करणारा आहेस यास्तव माझे आयुष्य रक्षण कर. १४ हे अग्ने तू नेत्रांचा संरक्षक आहेस. माझ्या नेत्रेंद्रियाचे रक्षण कर. १५ हे पृथिवी, तू अचल आहेस. १६ हे अग्निदेवा, स्तवन केल्याने भक्ताला पावणारा तू जो परिधी आहवनीच्या पश्चिमेस स्थापन केलास तो हा तुला प्रिय असलेला परिधी तुझ्या स्वाधीन करतो. हा तुझ्यापासून केव्हाही दूर जाणार नाही. १७ हे परिधींनो, यज्ञाचे फलरूपी अन्न तुम्ही यजमानाच्या जवळ आणले आहे. १८ हे देवहो, तुम्ही हविर्भाग मिळावा अशी इच्छा करणारे, सर्वांच्याकडून पूजनीय असलेले, प्रस्तरावर आणि बर्हीवर बसणारे आणि स्रुचांमधून निथळल्या जाणाऱ्या आज्यरूपी हविर्भागाचे सेवन करणारे आहात. तुम्ही सर्वजण आम्ही केलेल्या स्तुतिरूपी वाणीची प्रशंसा करीत करीत या बर्हीवर बसा आणि आनंदित व्हा. १९ हे जुहू आणि हे उपभृत्, अविनाशी असे ज्यांचे गृह आहे अशा अग्नींच्या या शकटरूपी स्थानी यजमानाला सुख व्हावे म्हणून तुम्हाला मी ठेवतो. हे सुखसंपन्न स्रुचांनो, मला सुखात ठेवा. त्याचप्रमाणे यज्ञकर्मरूपी गाड्याची धुरा वाहणाऱ्या यजमान व पत्नी या दोघांना समाजात अग्रेसर करा व त्यांचे रक्षण करा. २० कोणाकडूनही अवध्य आणि केव्हाही थंड न होणाऱ्या हे अग्निदेवा, आज देवासंबंधी मजकडून घडणाऱ्या अपराधापासून माझे रक्षण कर. मला प्राप्त होणाऱ्या फलाच्या आड येणाऱ्या विघ्नापासून माझे रक्षण कर. अशास्त्र अशा कर्मानुष्ठानापासून रक्षण कर. अभक्ष्यभक्षणापासून माझे रक्षण कर. निषिध्द अशा आचरणापासून माझे रक्षण कर. आमचे अन्न विषरहित अर्थात् अमृताप्रमाणे कर, आम्हाला सुखाने झोंप येईल असे निर्भय स्थल आमच्यासाठी निर्माण कर. ही आहुती अग्नीला समर्पण असो. २१ जाण्यायेण्याच्या मार्गाचे ज्ञान असणाऱ्या देवांनो, जो मार्ग लक्षात ठेवून तुम्ही येथे आलात त्या मार्गानेच तुम्ही परत जा. मनाचे नियंत्रण करणाऱ्या हे देवा, आम्ही करीत असलेला हा यज्ञ देवांच्या ठिकाणी नेऊन पोहोचव. २२ ही आहुती सर्व देवांना समर्पण असो. ही आहुती वाग्देवतेला समर्पण असो. वाग्देवतेच्या सन्निध नेऊन पोहोचव. २३ वायुदेवाच्या सन्निध नेऊन ठेव. ही आहुती वायुदेवतेस सपर्मण असो.(अनुवाक १३).

१ हे इंद्राग्नीहो, तुम्हा उभयतांना बोलाविण्याची मी इच्छा करतो. हविर्द्रव्यरूपी अन्न समर्पण करून तुम्हा दोघांना बरोबरच संतुष्ट करावे असे मला वाटते. ज्या अर्थी तुम्ही दोघेही अन्न व धन आम्हाला देता, त्या अर्थी हविर्द्रव्यरूप अन्न देण्यासाठी मी बोलावीत आहे. २ हे इंद्राग्नीहो,विशेष आवडत्यां जावयाला सासरा किंवा त्याचा मेव्हणा पुष्कळशी देणगी देतो, त्यांच्यापेक्षाही तुम्ही आपल्या भक्तांना सढळ हाताने खूप देणगी देता अशी तुमची कीर्ती मी ऐकली आहे. यास्तव तुम्हा दोघांना सोमरसाप्रमाणेच असलेले पुरोडाशरूपी हविर्द्रव्य सपर्मण करीत असतानाच तुम्हाला संतोष होईल असे नवीन स्तोत्र रचीत आहे. ३ हे इंद्राग्निहो, लोकांना नेहमी त्रास देणाऱ्या लुटारूंच्या सत्तेखाली असणारी नव्वद शहरे तुम्ही दोघांनी एकदाच हल्ला केल्याबरोबर उध्वस्त केलीत. ४ वृत्रासुराचा वध करणाऱ्या हे इंद्राग्नीहो, तुमच्याकरिता आजच मी नवीन रचून तयार केलेले आणि निर्दोष असे स्तोत्र श्रवण करा. ज्या अर्थी मी तुम्हा दोघांना अगत्याने बोलावीत आहे त्या अर्थी तुमच्या अनुग्रहाची इच्छा करणाऱ्या यजमानाला तुम्ही आजच भरपूर अन्न द्या. ५ मार्गाचे नियंत्रण करणाऱ्या हे पूषा, अन्नाचा लाभ होण्याकरता केल्या जाणाऱ्या यज्ञकर्मासाठी तुला आम्ही रथाप्रमाणे नियोजित करीत आहोत. ६ अनेक प्रकारच्या मनोरथाने प्रेरित झालेला मी त्या त्या मार्गाचे पालन करणाऱ्या सुर्यदेवाला स्तुतिरूपी वाणीने सर्वतोपरी आपलासा केला आहे. तो सर्वांचे पोषण करणारा भगवान सूर्य आम्हाला मनस्तापशामक व चंद्राप्रमाणे आल्हादकारक कणसे असलेल्या ओषधी देवो. शिवाय निरनिराळ्या प्रसंगांतून पार पडण्यास अवश्य अशी विचारशक्ती आमच्या ठिकाणी निर्माण करो. ७ एखाद्या हितचिंतकाच्या साहाय्याने ज्याप्रमाणे अनेक वस्तू संपादन करता येतात त्याप्रमाणे क्षेत्रपालक देवाच्या प्रोत्साहनाने आम्ही गाई, घोडे आणि आम्हाला पोषक असे अन्न इत्यादि वस्तू सर्व ठिकाणी संपादन करू. ८ हे क्षेत्रपते, गाय दूध देते त्याप्रमाणे तू आम्हाला मधुर, पुन्हा पुन्हा पुरवठा होणारे, मधुररसस्रावक व घृताप्रमाणे अत्यंत शुद्ध असे अनेक पदार्थ दे. ९ हे अग्रे तू यज्ञकर्माचे फलरूपी धन आम्हास मिळावे म्हणून आम्हाला सन्मानाने ने. तू सर्व मार्ग जाणणारा आहेस. आमच्या कल्याणाच्या आड येणारे पाप आमच्यापासून दूर कर. नमस्कारपूर्वक अशा अनेक स्तोत्रांनी आम्ही तुझे पूजन करीत आहोत. १० जे यज्ञकर्म आम्ही करू शकू ते सतत करण्यासाठी आम्ही त्याच देवांचा मार्गावर पूर्णपणे आलो आहोत, पथिकृत नांवाच्या अग्नी आमच्या हातून घडलेल्या प्रमादांचे क्षमापन कसे होईल हे जाणतो. तोच आमच्यासाठी यजन

करतो. तो अग्नीच होता नामक ऋत्विज होऊन देवांना बोलावतो. तोच आमच्या हातून अंतरलेले यज्ञ परिपूर्ण करतो आणि तोच आमच्याकडून त्या त्या यज्ञांना युक्त अशा विशिष्ट काळांचा झालेला अतिक्रमही व्यवस्थित करून घेतो. ११ जे हविर्द्रव्य समर्पणयोग्य असेल ते अग्नीला भरपूर पुरेसे होवो. हे विभावसो, माझी म्हैस ज्याप्रमाणे मी दिलेले सरकी, पेंड अशा प्रकारचे खाद्य खाते आणि मला पुष्कळ दूध देऊन माझे पूजन करते त्याप्रमाणे यज्ञकर्माचे भरपूर फळ देऊन तू माझे पूजन कर. तुझ्या अनुग्रहापासून पुष्कळ द्रव्य मिळतेच. तुझ्याच कृपेने अनेक प्रकारची अन्नेही भरपूर प्राप्त होतात. १२ हे अग्ने, माझ्या अपराधांचा परिहार करण्यास नवीनच प्रवृत्त झालेला तू आम्हाला सुखकर अशा मार्गांनी म्हणजे यथाशास्त्र असे कर्म करण्यास आम्हास प्रवृत्त करून अशास्त्र कर्माचरणासारख्या सर्व खडतर पातकांतून पार ने. आम्हाला राहण्यासाठी एखादे मोठे शहर व आमच्या पुरते धान्य पिकविण्यासाठी विस्तीर्ण अशी जमीन तुझ्या कृपेने आम्हाला प्राप्त होवो. आमच्या लहानमोठ्या सर्व मुलांना तू सुखप्रद हो. १३ हे अग्ने आम्हा सारख्या मनुष्यांच्या सन्निध येऊन तू त्याच्या व्रतांचे पालन करणारा देव आहेस आणि सर्व यज्ञांमध्ये तू सर्वतोपरी स्तुत्य आहेस. १४ हे देवहो, ज्ञानसंपन्न अशा तुम्हा संबंधी आम्ही करावयाची जी कर्तव्ये अत्यंत अज्ञानी असे आम्ही करीत नाही ती सर्व कर्तव्ये तो विद्वान अग्नी पूर्ण करून घेवो. शिवाय, ज्या ज्या ऋतूत देवांना हविर्भाग समर्पण करावयाचे असतात त्या त्या ऋतूत ते देऊन त्यांना संतुष्ट करो.(अनुवाक १४).

प्रपाठक २

१ जीवन, दीर्घायुष्य व शरीरकांती त्याला प्राप्त व्हावी म्हणून ही उदके या यजमानाचे मस्तक भिजवून ओले करोत. २ हे दर्भरूपी ओषधे या यजमानाच्या मस्तकाचे रक्षण कर. ३ हे स्वधिते, मस्तकभागाला कापू देऊ नकोस. ४ देवसमुदायात प्रसिद्ध असलेला नापितच असा मी यजमानाच्या मस्तकावरील केसांचे वपन करतो. ५ पुढे करावयाची असलेली कर्मे मी आता निर्विघ्नपणे करू शकेन. ६ ही उदके, माता आपल्या मुलांना स्नान घालून स्वच्छ करतात त्याप्रमाणे आम्हाला स्नान घालून शुद्ध करोत. पर्जन्यधारांच्या रूपाने असणारी उदके आपल्या बिंदुसमूहाने मला शुद्ध करोत. माझ्या शरीराच्या ठिकाणी असलेले मलरूपी पाप धुऊन काढोत. ७ शरीराने स्वच्छ व मनाने

अत्यंत पवित्र झालेला मी आता उदकप्रवाहातून वर येतो. ८ हे वस्त्र, तू जणू काय सोमदेवाचे शरीरच आहेस. माझ्या शरीराचे रक्षण कर. ९ हे नवनीत, तू मूळचे गाईचे दूधच आहेस. १० तू कांती धारण करणारे आहेस. म्हणून माझ्या शरीरावर कांती उत्पन्न कर. ११ हे अजन, तू जणू वृत्रासुराच्या डोळ्यांतील बाहुली आहेस. त्याचप्रमाणे तू नेत्रांचे रक्षण करणारे आहेस. म्हणून नेत्रेंद्रियाचे रक्षण कर. १२ हे यजमान ज्ञानांचा पालक असलेला मनरूपी देव तुला शुद्ध करो. १३ शब्दांचे नियंत्रण करणारी सरस्वती तुला पवित्र करो. १४ प्रेरक असा सवितादेव छिद्ररहित अशा दर्भपवित्राने, व जगन्निवास सूर्याचे जणू किरणच अशा दर्भांनी तुला शुद्ध करो. १५ शुद्ध वस्तूचे पालन करणाऱ्या हे देवा, पवित्र अशा तुझ्या दर्भरूपी पवित्राने ज्या यज्ञकर्मासाठी मी स्वत:ला शुद्ध करीत आहे, ते यज्ञकर्म करण्यास मी आता समर्थ होईन. १६ हे देवहो, तुमच्यासाठी केल्या जाणाऱ्या या यज्ञात सत्यनिष्ठेने अनुष्ठानतत्पर असणारे आम्ही आलो आहों. यज्ञबद्ध अशा हे देवांनो, ज्या अर्थी हा यज्ञाचा उद्योग आरंभितानाच तुम्हाला बोलावीत आहोत, त्या अर्थी आम्हास येथे आलेच पाहिजे. १७ हे इंद्राग्नी, हे द्यावापृथिवि, हे उदकदेवतांनो आणि हे ओषधिदेवतांनो तुम्ही या आहवनीय अग्नीकडे लक्ष द्या. हे आहवनीय अग्ने, तू दीक्षेसंबंधी स्वीकारल्या गेलेल्या नियमांचा अधिपती आहेस. यास्तव येथे असणाऱ्या माझे तू रक्षण कर. (अनुवाक १).

१ यज्ञ करण्याचा माझा मानसिक संकल्प पूर्ण करण्याकरिता निर्विघ्नपणे प्रेरणा करणाऱ्या अग्नीला ही आहुती अर्पण असो. २ यज्ञाचे फल व तो करण्याचे साधन यासंबंधी असणारी माझी धारणाशक्ती सिद्धीस नेण्यासाठी माझ्या मनाचा अभिमानी असलेल्या अग्नीला ही आहुती अर्पण असो. ३ माझी दीक्षा म्हणजे मी धारण केलेले व्रतनियम पूर्णतेस जावेत म्हणून माझे शरीर व तप यांचा अधिष्ठाता असलेल्या अग्नीला ही आहुती समर्पण असो. ४ माझी मंत्रोच्चारणशक्ती स्वकार्यक्षम व्हावयासाठी माझ्या वाणीचा पोषक असणाऱ्या अग्नीला ही आहुती अर्पण असो. ५ हे उदकदेवतांनों, तुम्ही अत्यंत प्रभूत व अखिल जगाला धान्याचा पुरवठा करून सुखविणाऱ्या आहात, यास्तव तुम्ही वृद्धिंगत व्हा. द्युलोक व भूलोक वृद्धिंगत होवोत. विस्तीर्ण असे अंतरिक्ष वृद्धिंगत होवो. बृहस्पती आमच्या हविर्भागाने तृप्त होऊन वृद्धिंगत

होवो. ही आहुती सर्व देवतांना अर्पण असो. ६ अखिल जगाचे नियंत्रण करणाऱ्या परमेश्वराचे, मरणशील असणारा यजमान सख्य संपादन करतो. हे विश्वात्मक देवा, तू आपल्या उपासकाला धन देतोस. यावरून, यज्ञकार्याला पोषक असे धन तू द्यावेस अशी अपेक्षा करतो. ७ कृष्णाजिनावर असणाऱ्या शुभ्र व कृष्णवर्ण केशरेषांनो, तुम्ही जणू काय, ऋचा व साम यांची दोन चित्रेच आहात. चित्ररूप अशा तुम्हाला मी स्पर्श करतो. या यज्ञाचा शेवटचा मंत्र उच्चारला जाईपर्यंत तुम्ही उभयता माझे रक्षण करा. ८ हे वरुणदेव, 'अग्निष्टोम' यज्ञविषयक बुद्धीचे तुझ्या जवळून शिक्षण घेणाऱ्या या यजमानाचा समृद्ध असा हा यज्ञ त्याला प्रसंगविशेषी योग्य तो उपदेश करून पूर्णतेस ने. आम्ही देखील ज्या नावेच्या योगाने यज्ञकार्यात येणाऱ्या विघ्नरूपी सर्व पातकांतून तरून पार जाण्यासाठी सुखाने तरून जाण्यास समर्थ अशा या कृष्णाजिनरुपी नावेवर आरूढ होत आहोत. ९ हे मेखले, तू अंगिरसाच्याशी संबंध असणारी अन्नरसरूप व लोकरीसारखी मऊ आहेस. यास्तव अन्नरस मला प्राप्त करून दे. माझे रक्षण कर. मला पीडा करू नकोस. १० हे वस्त्रा, तू विष्णूला सुखप्रद आहेस. यजमानाला सुख दे. मलाही सुख दे. ११ हे वस्त्रा, नक्षत्रांच्या प्रकाशापासून माझे रक्षण कर. १२ हे कृष्णविषाणा, तू जणू इंद्राचे जन्मस्थान आहेस. माझी हिंसा करू नको. १३ हे लोष्टा, उत्कृष्ट धान्य पिकेल अशी जमीन तयार व्हावी म्हणून या हरणाच्या शिंगाने तुला खणून काढतो. १४ हे मस्तका, उत्कृष्ट फलसंपन्न अशा ओषधी प्राप्त होण्यासाठी मी तुला हरणाच्या शिंगाने खाजवितो. १५ हे दंडा, स्वकर्तव्य बजावण्यासाठी तू खडा उभा राहणारा आहेस. उंबराच्या लाकडाचा बनविलेला तू जणू देवाचा आहेस. मैत्रावरुण नामक ऋत्विजाच्या हातात ताठ उभा राहिलेला तू यज्ञातला शेवटचा मंत्र उच्चारला जाईपर्यंत माझे रक्षण कर. १६ मनाने मी यज्ञाच्या संमुख जाईन. १७ द्युलोक व पृथ्वी यांच्या ठिकाणी असलेल्या यज्ञासंमुख जाईन. १८ अंतरिक्षात असलेल्या यज्ञाच्या संमुख जाईन. १९ वायुदेवाच्या अनुग्रहाने स्वाहाकारप्रचुर असा यज्ञ मी आरंभितो. (अनुवाक २).

१ आमची मनकामना पूर्ण व्हावी म्हणून आम्ही सुखकर, विद्याध्ययनजन्य तेज देणारी व यज्ञनिर्वाहक अशी दैवविषयक बुध्दी संपादन करीत आहोत. ती अंगीकृत कार्यातून उत्कृष्टपणे पार पाडणारी बुद्धी आम्हाला

वश होवो. २ मनापासूनच उत्पन्न झालेले, मनानेच सर्व कार्यात युक्त होणारे, स्वकार्यदक्ष आणि सृष्टिकर्ता प्रजापती ज्यांचा पिता आहे असे जे देव आहेत, ते केवळ दुग्धपान करून अनुष्ठानात तत्पर होणाऱ्या आम्हाला पावोत. ते आमचे रक्षण करोत. त्यांना नमस्कार असो. त्यांनाच ही आहुती समर्पण असो. ३ हे अग्ने, तू चांगला जागा रहा. तुझ्या भरवशावर आम्ही निर्भयपणे झोपतो. यास्तव आमचे रक्षण कर आणि आमचे कल्याणकारक कर्तृत्व करण्यासाठी पुन्हा जागृत होण्याविषयी सामर्थ्य दे. ४ हे अग्ने, तू आम्ही स्वीकारलेल्या व्रतांचा पालक आहेस. हे देवा सर्व यज्ञांमध्ये तू स्तुत्य आहेस. ५ हे सर्व देव सर्व बाजूंनी माझे रक्षण करण्याकरतां माझ्या भोवती राहोत. ६ पूषा आम्हाला द्यावयाच्या धनासह आणि सोम वस्त्रांसह येवो. ७ बैल, गाई इत्यादि पशुसमुदायाचा प्रेरक सविता देव आम्हाला पशू देणारा होऊन येवो. ८ हे सोमा, आम्हाला अपेक्षित असेल इतके आम्हाला दे. माझी पूर्ती होईल इतके मला पुरवून शिवाय आणखीही पुष्कळ घेऊन ये. ९ तू रूपे आहेस, माझ्या भोगास योग्य हो. १० तू वस्त्र आहेस. माझ्या उपभोगास योग्य हो. ११ तू गाय आहेस, माझ्या उपभोगास योग्य हो. १२ तू घोडा आहेस तर मला बसणाच्या उपयोगी हो. १३ तू बकरा आहेस माझ्या उपभोगास योग्य हो. १४ तू मेंढा आहेस, माझ्या उपभोगास योग्य हो. १५ हे मृत पशो तुला मी वायूला देतो. १६ पाण्यात पडून मेलेल्या हे पशो मी तुला वरुणाला देतो. १७ विशीर्ण झालेल्या वा खडयात पडलेल्या हे पशो तुला मी निर्ऋती म्हणजे मृत्युदेवतेला देतो १८ वाघाने झडप घालून मारलेल्या हे पशो मी तुला रुद्राला देतो. १९ हे देदीप्यमान उदकांनो, पाण्यात बुडू न देणाऱ्या हे अग्निदेवा, जो तुमच्या लाटांचा समुदाय, साळीच्या भातासारखे हविर्द्रव्य उत्पन्न करणारा, इंद्रियांना शक्ती देणारा व हर्षप्रद आहे, त्याला मी तुडवून पलीकडे जात नाही. मधून मधून जमीनीचे जे घट्ट उंचवटे पुलासारखे आहेत त्यांवरून चालत पलीकडे जाईन. २० हे रथा, अग्निहोत्रासारखी नित्यकर्मे करावयास प्रशस्त अशा स्थलापेक्षा सोमयाग करण्याला योग्य अशा अधिक प्रशस्त स्थलाकडे तू चल. बृहस्पती तुझ्या अग्रभागी चालो. आता येथून पुढे जाता जाता जेथे भूमीचा अत्यंत उत्कृष्ट असा भाग असेल तेथे तू आपला वेग कमी करून थांब. रथाभिमानी अशा हे आदित्य देवा, पीडा देणाऱ्या शत्रूंना तू दूर कर. २१ पूर्वी देवांनी

पृथ्वीवरील ज्या देवयजन स्थलाचा दीर्घकाळ उपभोग केला त्याच या देवयजन स्थलात आता आम्ही येऊन पोचलो आहो. ऋचा, साम, व यजु मंत्र याच्या योगाने यज्ञानुष्ठानातून पार पडणारे आम्ही धनसमृध्दीने व पुष्टिकारक अशा अन्नाने आनंदित होऊ. (अनुवाक ३).

१ उत्कृष्ट कांती असलेल्या हे सुवर्णा, ही जुहू जणू तुझी तनूच आहे. व तिच्यात असलेले हे आज्य जणू तुझे तेज आहे. यास्तव या जुहूशी तू संलग्र हो. २ हे सोमक्रयिणी धेनो, तू वेगवान आहेस. मनाने नियमित आहेस. व्यायनशील अशा यज्ञाची आवडती आहेस. अशा प्रकारच्या सफल प्रेरणा करणाऱ्या तुझ्या प्रेरणेने मी आपल्या वाणीचे नियंत्रण करू शकेन. ही आहुती वाग्रूपी सोमक्रयणीला अर्पण असो. ३ हे आज्य तू कांतिमान्. आहेस. ४ तू अविनाशी असे सर्व देवांचे हविर्द्रव्य आहेस. ५ माझे चक्षुरिंद्रिय सूर्याचाच अंश आहे. माझ्या डोळ्यातील बाहुली अग्नीच्या अंशाने बनलेली आहे. हे सूर्या तू ज्या अर्थी 'एतश' नांवाचे घोडे जोडलेल्या रथात बसून येतोस व हे अग्रे तू देदीप्यमान अशा तेजाने तळपतोस त्या अर्थी आमच्या कार्यात विघ्न करणाऱ्या राक्षसांचे भय निवारण व्हावे म्हणून तुम्हा दोघांच्या जवळ आलो आहे. ६ हे सोमक्रयिणी, तू चेतनारूप आहेस, तू संकल्पविकल्परूप मन आहेस. तू निश्चयरूप बुध्दी आहेस, तू स्वकार्यकुशल आहेस. तू यज्ञाशी संबंध असणारी आहेस, व तू क्षत्रियजात्यभिमानी आहेस. आणि कधी दैन्यवाणी न दिसणारी आहेस. दोन मस्तके असलेली तू सोम विकत आणण्याकरिता सुखाने पूर्वेस जाणारी व तेथून सुखाने पश्चिमेस आमच्या जवळ परत येणारी हो. ७ मित्र तुझ्या पुढच्या उजव्या पायाचे ठिकाणी दोरी बांधो. ८ पूषा रस्त्यातून जात असलेल्या तुझे रक्षण करो. यज्ञाचा अध्यक्ष असलेल्या इंद्राला समर्पण करण्यासाठी अवश्य असलेला वल्लीरूप सोम विकत घेण्याचे साधन, अर्थात् त्याचे मूल्य म्हणून नियोजित झालेल्या तुला तुझी माता अनुमोदन देवो. पिता अनुमती देवो. तुझा भाऊ संमती देवो. आपल्या सवंगड्यांसह तुझा मित्र तुला अनुमति देवो. सर्वसंमत झालेली जणू देवताच अशी तू इंद्रासाठी वल्लीरूप सोमदेवाकडे जा व त्याला- देवाला- घेऊन परत ये. ९ रुद्र तुला मित्राप्रमाणे सुखप्रद अशा मार्गाने आमच्याकडे माघारा परतवो. आणि त्यामुळे तुला सुख होवो. सोमाचा जणू

मित्रच अशी तू पुष्कळ धन बरोबर घेऊन आमच्याकडे परत ये. (अनुवाक ४).

१ हे सोमक्रयणि, तू वसुरुप आहेस. २ रूद्रस्वरूप आहेस. ३ अदितिरूप आहेस. ४ आदित्यरूप आहेस. ५ तू कांतिमान चंद्र आहेस. ६ आल्हादकारक सुवर्ण आहेस. ७ हे सोमक्रयणि, बृहस्पती तुला या सौख्यकर प्रदेशात रमवो व रुद्र तुला वसूंच्या सह परत माघारी आणो. ८ हे घृता, पृथ्वीचा शिरोभागच अशा या सोमक्रयणीने घृतयुक्त असे आपले सातवे पाऊल टाकलेल्या देवांचे यजन करण्याच्या ठिकाणी मी तुला सिंचन करतो. ९ या जागी असलेला प्रत्येक राक्षस मारून टाकला. ही पहा मी आता राक्षसाची मान विच्छिन्न करतो. जो आमचा द्वेष करतो व ज्याचा आम्ही द्वेष करतो त्याची देखील मी ही मान छाटून टाकतो. १० मज अध्वर्यूचे ठिकाणी घृतमिश्र असे हे मृत्कणरूपी धन असो. ११ तुज यजमानाचे ठिकाणी मृत्कणरूपी धन असो. १२ तुझ्या पत्नीजवळ हे घृतमिश्र मृत्कणरूपी धन असो. १३ हे देवि, देवी उर्वशीसह तू हिला नीट न्याहाळून पहा. देवाचा अनुग्रह संपादिलेली अमोघवीर्य व पतीच्याही ठिकाणी अमोघ वीर्य धारण करणारी अशा तुझ्याशी मी संगती करते. तुझ्या कृपावलोकनाने मी शूर असा पुत्र संपादन करीन. १४ मी धन व समृध्दी यांच्याशी केव्हाही नियुक्त होणार नाही. (अनुवाक ५).

१ हे सोम, तुझा एक लहान तुकडा दुसऱ्या लहान तुकड्याशी जुळवितो. तुझे एक पेर दुसऱ्या पेऱ्याशी जुळवितो. तुझा सुवास यजमानाची कामना सफल करो. तुझा रस देवांना हर्षप्रद व अविनाशी होवो. २ हे सोमा, तू अमात्य आहेस. अर्थात् यजमान व देवता यांच्याबरोबर राहत असतोस. ३ द्युलोक व भूलोकरूपी आपल्या दोन्ही हातांना प्रेरणा करणारा, वेदार्थ जाणणाऱ्या याज्ञिकांच्या यज्ञांचा प्रवर्तक, सर्व कार्यांत सफल होणारी अशी प्रेरणा करणारा, रत्नांचे धारण करणारा, सर्वांना सर्वतोपरी प्रिय व सर्वांना माननीय अशा सविता देवाचे मी पूजन करतो. ज्याची कांती अपरिमित उंच जाऊन गगनमंडलातील सर्व वस्तूंना प्रकाशित करीत आहे तो द्युलोकात राहणारा व उत्कृष्ट कार्यकुशल असा सवितादेव कृपा करून मजजवळ येवो

आणि आपल्या हातात सोन्याची अंगठी घालून वल्लीरूप सोम मोजून घेवो. ४ हे सोम, प्रजांच्यासाठी तुला या वस्त्रावर एकत्र जमा करतो. ५ हे सोम, प्राणांच्या करता मी तुला वस्त्रात बांधून घेतो. ६ हे सोमा, व्यानवायूसाठी मी तुझे बंधन शिथिल करून तुला थोडा मोकळा करतो. ७ हे सोमा, सर्व लोकांना अनुसरून तू श्वासोच्छ्वास कर व तुला अनुसरून सर्व लोक श्वासोच्छ्वास करोत. (अनुवाक ६).

६ हे सोमविक्रयिन् बलप्रद, प्रभूतरसयुक्त, इंद्रियांना स्वकार्यक्षम करणारा व पापरूपी शत्रूंचा नाश करणारा असा हा तुझा वल्लीरूप सोम मी तुझ्या पासून विकत घेतो. २ हे सोमविक्रयिन्, तेजस्वी, चंद्राप्रमाणे सौख्यजनक व अविनाशी असा तुजजवळचा सोम, तेजस्वी, चंद्राप्रमाणे आल्हादकारक व अविनाशी असे सुवर्ण तुला देऊन मी विकत घेतो. ३ तुला दिलेली गाय परत आमच्याकडे येवो व आल्हादकारक असे सुवर्ण आमच्या जवळच राहो. ४ हे शेळी, तू पुण्याचे शरीर आहेस. आणि जणू काय प्रजापतीचीच मूर्ती आहेस. पोषणयोग्य अशा हजारो लोकांचे पोषण करणारा अशा, तुझाच संबंधी असलेल्या शेवटच्या पशूची किंमत देऊन मी सोम विकत घेत आहे. ५ हे शेळी, मी तुझा बंधू आहे. ६ आणि ही काळी लोकर सोमविक्रयीच्या ठिकाणी राहो. ७ हे सोम, यजमानरूपी मित्राचे पोषण करणारा तू मित्राप्रमाणे प्रिय होऊन ये. ८ मांडीवर बसावयाची इच्छा करणारा व सुखस्वरूप असा तू मांडीवर बसावास अशी इच्छा करणारा व सुखकर अशा यजमानरूपी इंद्राच्या उजव्या मांडीवर बैस. ९ हे स्वान, हे भ्राज, हे अंघारे, हे बंभारे, हे हस्त, हे सुहस्त आणि हे कृशानो, सोमवल्लीची किंमत म्हणून तुम्हाला देण्यासाठी जे हे पदार्थ तुमच्या समोर ठेवले आहेत त्यांचे रक्षण करा. तुम्हास शत्रू पीडा न देवोत. (अनुवाक ७).

१ देवांना अनुलक्षून दीर्घायुष्य व रोगरहित जीवन, यांनी युक्त, तसेच ओषधींचा आणि पर्जन्याचा सारभूत रस व बलिष्ठ अशा वल्लीरूप सोमासह मी उठून उभा राहत आहे. २ हे सोमा विस्तीर्ण अशा आकाशाला अनुलक्षून मज बरोबर ये. ३ हे कृष्णाजिना, तू भूदेवीचे स्थान आहेस. ४ हे सोमा, तू या कधीही दैन्यवाणी नसणाऱ्या भूदेवीच्या स्थानावर येऊन बैस.

५ श्रेष्ठ अशा या सोमराजाने द्युलोक वरच्यावर सावरून धरला. अंतरिक्षाची विस्तीर्णता व पृथ्वीचे गुरुत्व मापले, स्वतःच्या तेजाने शोभणाऱ्या या सोमराजाने सर्व भुवने व्यापून टाकली. येथवर वर्णिलेले सर्व पराक्रम म्हणजे सर्वव्यापकत्वामुळे वरुण हे नांव मिळविलेल्या सोमराजाची नियमाने चालणारी नित्य कृत्येच होत. ६ सर्वांना आवरणभूत अशा वरुणाने म्हणजे सोमरूपी परमेश्वराने वनामध्ये असलेल्या वृक्षामध्ये अंतर निर्माण केले. त्याचप्रमाणे अश्वांच्या ठिकाणी वीर्य, अवध्य अशा गाईंच्या ठिकाणी दूध, हृदयांच्या ठिकाणी यज्ञ करण्याची इच्छा, लोकांच्या ठिकाणी अन्न पचविणारा जठराग्री, द्युलोकात सूर्य आणि असंख्य पाषाणांनी युक्त अशा पर्वतांच्यावर वल्लीरूप सोम स्थापन केला. ७ सर्व लोकांना दिसावे म्हणून किरणे त्या उपजत ज्ञानी अशा सूर्य देवाला वर उचलून धरतात. ८ हे बैलांनो, जुवाचा भार सहन करणारे, गाडी वाहून नेण्यात पटाईत म्हणून सर्वत्र वाखाणले गेलेले, गाडीत बसलेल्या सोमराजाला त्रास न देणारे आणि कृषिद्वारा अन्न पिकविणारे तुम्ही या गाड्याजवळ या. ९ हे शम्ये, निवारण करावयास योग्य अशा बैलाचे तू निवारण करणारी आहेस. १० हे शम्ये तू रस्ता सोडून जाणाऱ्या बैलाला आवरून धरणारी आहेस. ११ हे वस्त्रा, वरुणाचा जणू फासच अशा तुला मी या बैलाच्या गळ्या भोंवती घातला (अनुवाक ८).

१ भूमीवर निवास करणाऱ्या आम्हा भूतांचा पालक असणाऱ्या हे सोमदेवा, यज्ञमंडपात असलेल्या प्राग्वंश, हविर्धान इत्यादि सर्व स्थलांकडे लक्ष देऊन सत्वर चल. वाटेत उपद्रव देणारा चोरांचा नायक तुला न ओळखो. त्या नायकाच्या टोळीतील चोरही तुला न ओळखोत. लांडगे आणि वधरूपी पातकाची सर्वदा इच्छा करणारे सिंहव्याघ्रादि हिंसक पशूही तुला न ओळखोत. तुझा अपहार करण्याला टपलेला विश्वावसु गंधर्वही तुझ्यावर नजर न टाको. हे सोमा, तू ससाण्यासारखा होऊन तू आमच्या यजमानाच्या यज्ञमंडपरूपी गृहात देवसदृश अशा ऋत्विजांनी सुसज्ज केलेल्या प्राग्वंश नामक स्थलात येऊन पोच. तू यजमानाला यज्ञानुष्ठानरूप कल्याण प्राप्त करून देणारा आहेस. २ ज्या मार्गाने गेले असता कोणत्याही प्रकारचे शत्रू कोठेही आढळणार नाहीत आणि ठिकठिकाणी द्रव्यही पण मिळत जाईल अशा प्रकारच्या चालावयास सुखकर आणि पापरहित अशा मार्गावर आम्ही येऊन पोहोचलो

आहोत. ३ सर्वांना मित्राप्रमाणे प्रिय आणि आपल्या किरणांनी सर्व जगाला व्यापणाऱ्या भगवान् सूर्याला नमस्कार असो. हे ऋत्विज हो, खरोखरच फलप्रद होणारे यज्ञानुष्ठान करून महान् श्रेष्ठ अशा त्या सूर्यदेवाप्रीत्यर्थ सेवा करा आणि दूर अंतरावरून दिसणारा, देवत्वाने अवतीर्ण झालेला, दिवसाचे चिन्ह होऊन राहिलेला आणि द्युलोकाला पुत्रवत् प्रिय अशा त्या भगवान् सूर्यनारायणाला त्याचे स्तवन करून आळवा. ४ हे शम्ये तू निवारण करण्यास योग्य अशा बैलाचे निवारण करणारी आहेस. ५ हे शम्ये, तू भलत्याच रस्त्याने जाऊ लागणाऱ्या बैलाला आवरून धरणारी आहेस. ६ हे वस्त्रा वरुणाचाच जणू फास अशा तुला मी या बैलाच्या मानेपासून मोकळा केला. (अनुवाक ९).

१ हे हविर्द्रव्य, तू अग्नीचा जणू सत्कारच आहेस विष्णु हे नांव धारण करणाऱ्या सोमराजाला प्रिय अशा तुला मी या सुपात ओतून घेतो. २ हे हविर्द्रव्य, तू सोम देवाचा सत्कारच आहेस. 'विष्णु'नामधारी सोमराजाला प्रिय अशा तुला मी सुपात ओतून घेतो. ३ हे हविर्द्रव्य, तू अतिथिनामक सोमराजाच्या अनुचराचे आतिथ्यच आहेस. विष्णू नांव धारण करणाऱ्या सोमराजाला प्रिय अशा तुला मी या सुपात ओतून घेतो. ४ हे हविर्द्रव्य, धनसमृध्दी प्राप्त करून देणाऱ्या अग्निनामक सोमराजाच्या अनुचरासाठी तुला मी या सुपात ओतून घेतो. तसेच विष्णू हे नांव धारण करणाऱ्या सोमराजाला प्रिय अशा तुला मी सुपात ओतून घेतो. ५ हे हविर्द्रव्य, श्येन नांवाच्या सोमाचे पोषण करणाऱ्या अनुचराच्या सत्काराकरिता तुला ओतून घेतो, व विष्णू हे नांव धारण करणाऱ्या सोमराजाला प्रिय अशा तुला मी या सुपात ओतून घेतो. ६ हे सोम, तुझ्या प्रातःसवन इत्यादि ज्या ज्या ठिकाणी यज्ञपरुषाला तृप्त करण्यासाठी अध्वर्यू ऋत्विज हविर्द्रव्याच्या योगाने यजन करतात त्या त्या तुझ्या सर्व ठिकाणी तू येऊन पोहोचला आहेस असे होवो. हे सोमदेवा, यजमानाच्या गृहाची अभिवृध्दी करणारा, यज्ञानुष्ठानातून आम्हाला शेवटपर्यंत तारणारा, उत्कृष्ट वीर व वीरांची हत्या न करता त्यांचे पालन करणारा इत्यादि नांवे असलेला असा तू मंडपरूपी सर्व गृहात संचार कर. ७ हे कृष्णाजिन, तू अदितीचे स्थान आहेस. ८ हे सोम तू अदितीचे स्थान असलेल्या या कृष्णाजिनावर बैस. ९ तू यज्ञरूप व्रत धारण करणारा

व व्यापकत्वामुळे वरुणासारखा आहेस. १० हे सोम, तू वरुणाचा संबंधी आहेस. सुखमिश्र अशा वरुणादि देवांच्या सख्यापासून व त्या देवांच्यासाठी कराव्या लागणाऱ्या कर्तव्यापासून आम्ही पराङ्.मुख होणार नाही. ११ हे आज्य, नि:श्वासरूपाने बाहेर जाऊन पुन्हा परत येणाऱ्या प्राणाकरिता तुला या पात्रांत ओतून घेवो. १२ अनेक विषयांचे ठिकाणी गुंतून राहणाऱ्या मना-करिता तुला या पात्रात ओतून घेवो. १३ जठराग्नीसाठी तुला या पात्रात ओतून घेतो. १४ शक्तिमान पुरुषाच्या ठिकाणी असलेल्या सामर्थ्याकरता तुला या पात्रात ओतून घेतो. १५ शक्तिमान पुरुषांच्या ठिकाणी असणाऱ्या ओजाच्या सारासाठी तुला मी या पात्रात ओतून घेतो. १६ हे तानूनप्त्र नांवाच्या आज्य द्रव्या, तू पूर्वी केव्हांही कोणाकडूनही तिरस्कृत केले गेले नाहीस व यापुढेही कोणाकडून तिरस्कृत केले जाणार नाहीस. तू देवांचे ओज, परस्परांच्या विरोधरूपी हिंसेपासून आमचे रक्षण करणारे व हिंसेचा विषयच न होणारे आहेस. १७ दीक्षणीय इष्टीचा अधिपती असलेला देव माझ्या या दीक्षेला अनुमती देवो. ' उपसत् ' इष्टिरूपी तपाचा अधिपती माझ्या तपाला अनुमती देवो. मी अत्यंत सरळपणाने 'तानूनप्त्र', संज्ञक आज्याला स्पर्श करणाऱ्या रूपाने सत्यपणाला प्राप्त झालो आहे. खरेपणाने वागण्याची मी शपथ घेतली आहे. हे ' तानूनप्त्र ' यज्ञकर्मरूपी सन्मार्गावर मला स्थापन कर (अनुवाक १०).

१ हे सोमदेवा, तुझा जो एखादा लहान तुकडा सुकून जाईल व एखादा लहान तुकडा नाहीसा होईल, तो सर्व उणेपणा आम्ही तुजवर सिंचन करीत असलेल्या उदकाने सोमरसरूपी एकच धन जाणणाऱ्या इंद्रासाठी भरून काढ. तुझा नाहीसा झालेला सर्व अंश पुन्हा वाढीव. इंद्र तुला संवर्धित करो, व तू इंद्राला संवर्धित कर. ऋत्विजांना धनाने आणि धारणाशक्तीने संवर्धित कर. हे सोमदेवा तुझे कल्याण असो. तुझ्या प्रसादाने आम्ही वल्लीरूप सोम कुटण्याच्या अनुष्ठानापर्यंत आलो आहोत. २ आपल्या दयालुत्वाने आपल्या भक्ताचे कल्याण व्हावे अशी इच्छा करणारा असा तो द्युलोक व पृथ्वी यांचा अभिमानी एकच देव आहे. भक्तकल्याणेच्छू अशा हे देवा, यज्ञाविषयीच सर्वदा बोलत राहणाऱ्या आम्हाला धन आणि अन्न प्राप्त व्हावे, म्हणून निश्चित फलरूप होणारा यज्ञ दे. द्युलोकाला नमस्कार असो. भूदेवीला नमस्कार असो.

३ हे व्रतपते अग्निदेवा, तू सर्व व्रतांचा व्रतपती आहेस. माझे जे शरीर आहे, ते मी तुझ्या ठिकाणी समर्मण केले आहे. आणि तुझे जे हे शरीर आहे, ते मी आपल्या ठिकाणी स्थापन केले आहे. यामुळेच हे व्रतपते अग्निदेवा आपण दोघेही व्रताचरण करणारे झालो आहोत. यास्तव, आपण दोघे बरोबरच व्रताचरण करू. ४ हे अग्ने, तुझी जी क्रूर अशी तनू आहे, त्या तनूने आमचे रक्षण कर. क्रूर अशा तुझ्या तनूला ही आहुती समर्पण असो. ५ हे अग्ने, तुझे जे लोहमय, रौप्यमय, सुवर्णमय असे वृध्दतम व दुर्गम अशा ठिकाणी राहणारे शरीर आहे, त्याच्या योगाने, अन्नांच्या अभावी मी भुकेने तडफडत आहे, मी दुःखाने गांजलो आहे, अशा प्रकारची उग्र भाषणे आणि तुझा सूड उगवीन, तुला ठार करीन अशा तऱ्हेची दुसऱ्याला चीड आणणारी भाषणे करण्याचे मी बंद केले आहे. (अनुवाक ११).

१ हे उत्तरवेदे, तू मला अग्निरूपी वित्त प्राप्त करून देणारी आहेस. २ हे उत्तरवेदे, तू मला तीक्ष्ण अशा प्रज्वलित अग्नीच्या तेजाची प्राप्ती करून देणारी आहेस. ३ अग्नीच्या लाभाची इच्छा करणाऱ्या मला रक्षण कर. ४ अग्नीचा लाभ न झाल्यामुळे भयभीत होणाऱ्या मला रक्षण कर. ५ नभ नांवाचा अग्नी मी ओळखला. ६ विराटपुरुषाच्या अंगाचा सारभूत रसच अशा हे अग्ने, ७ जो तू या 'चात्वाल' नामक स्थलातील मृतिकारूपी पृथ्वीवर राहतोस, ८ तो तू आयुष्प्रद अशा 'नभ' या नांवाला धारण करून ये. ९ तुझे जे अतिरस्करणीय व यज्ञसंबद्ध असे 'नभ' नांव आहे, त्या नांवानेच मी तुला उत्तरवेदीच्या ठिकाणी स्थापन करतो. १० हे अंगिरा अग्निदेवा, ११ जो तू चात्वाल-मृत्तिकारूपी पृथ्वीच्या दुसऱ्या भागी राहतोस, १२ पृथ्वीच्या तिसऱ्या भागी राहतोस, १३ तो तू आयुष्प्रद असे नांव धारण करून ये. १४ तुझे जे कोणाकडून तिरस्कृत न झालेले व यज्ञसंबद्ध असे नांव आहे, त्या 'नभ' नांवानेच मी तुला उत्तरवेदीच्या ठिकाणी स्थापन करतो. १५ हे उत्तरवेदे, तू सिंहीणीचे रूप धारण करणारी व महनीय आहेस. १६ तू पुष्कळ विस्तीर्ण हो. १७ यज्ञाधिपती देव तुला पुष्कळ विस्तीर्ण करो. १८ तू बळकट आहेस. १९ देवांच्या करिता तू शुद्ध हो. २० देवांच्या करिता तू सुशोभित हो. २१ हे उत्तरवेदे 'इंद्र' या शब्दाने ज्याच्या नांवाचा घोष केला जातो, तो देवांचा राजा आठ वसूंच्या सह

पूर्व बाजूने तुला रक्षण करो. २२ मनाप्रमाणे शीघ्रगती असणारा यम पितरांच्या सह दक्षिण बाजूने तुला रक्षण करो. २३ अत्यंत बुद्धिमान असा वरुण अकरा रुद्रांच्यासह पश्चिम बाजूने तुला रक्षण करो. २४ जगाची उत्पत्ती, स्थिती व लय ही सर्व कार्ये करणारा परमेश्वर बारा आदित्यांसह उत्तर बाजूने तुला रक्षण करो. २५ हे उत्तर वेदे, तू सिंहरूप धारण करणारी व वैऱ्यांचा घात करणारी आहेस. तुला ही आहुती अर्पण असो. २६ तू सिंहरूपधारिणी व उत्कृष्ट अशी पुत्रभृत्यादि प्रजा प्राप्त करून देणारी आहेस. २७ तू सिंहरूप धारण करणारी व भरपूर धन देणारी आहेस. तू सिंहरूपधारिणी व भूलोकी प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी आहेस. २९ तू सिंहरूप धारण करणारी आहेस. देवांची इच्छा करणाऱ्या यजमानाकरिता तू देवांना घेऊन ये. तुला ही आहुती समर्पण असो. ३० हे स्रुचे, चिरंतन अशा देवांच्यासाठी मी तुला वर उचलतो. ३१ हे परिधे तू यजमानाला संपूर्ण आयुष्य देणारा आहेस. तू पृथ्वीला दृढ कर. ३२ हे परिधे तू एकाच ठिकाणी अचल राहणारा आहेस. तू अंतरिक्षाला दृढ कर. ३३ हे परिधे, तू अक्षय टिकणाऱ्या स्थली राहणारा आहेस. तू द्युलोकाला दृढ कर. ३४ हे संभारसमूह, तू अग्नीचे प्रकाशन करणारा व पूरक आहेस. (अनुवाक १२).

१ वेदाध्ययन केलेल्या व वेदार्थ जाणणाऱ्या ब्राह्मणाचे (यजमानाचे) हवनकार्य करणारे ब्राह्मण म्हणजे ऋत्विज प्रथम आपले मन इतर गोष्टींच्या चिंतनात न गुंतविता यज्ञाचे चिंतनाविषयी एकाग्र करतात आणि नंतर आपली सर्व इंद्रिये यज्ञविषयक निरनिराळ्या कार्याकडे नियोजित करतात. तथापि हे ब्राह्मणाचे मनोनियमनादि सामर्थ्य सर्व मार्ग जाणणारा अर्थात् सर्वज्ञ असा एक परमात्माच निर्माण करतो. आणि म्हणूनच सर्वांचा प्रेरक व सर्वांच्या अंतर्यामी निवास करणाऱ्या त्या देवाची स्तुती महनीय आहे. २ हे अक्षदेव यज्ञगृहांच्या ठिकाणी श्रवणीय असा चांगला शब्द करणारा होऊन आसमंतातील सर्व प्रदेशांत श्रेयस्कर अशा शब्दांचा उच्चार कर. ३ देवांना श्रुत असलेल्या हे अक्षांनो, देवांच्या समुदायात हा यजमान तुमचे यजन करीत आहे अशी तुम्ही घोषणा करा. ज्याच्यावर अवलंबून आम्ही सर्व कुटुंबीय आपला जीवनक्रम चालवू आणि जो अनेक लोकांना वश करणारा होईल असा कार्यकर्ता पुत्र आमच्या ठिकाणी जन्मास येवो. ४ भगवान विष्णूने त्रिविक्रमावतार धारण

केला आणि अखिल विश्वाचे विभाजन करून त्याचे आक्रमण केले. त्याने भूमी, अंतरिक्ष आणि द्युलोक या तीन ठिकाणी आपले एक एक पाऊल ठेवले. या विष्णूच्या त्रैलोक्यरूपी रज:कणांनी व्यापृत झालेल्या पावलांत अखिल विश्व अंतर्भूत झाले आहे. ५ मनुष्यमात्राला यश प्राप्त व्हावे म्हणून हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही अन्न व दुधाळ गाई यांनी संपन्न आणि नाना प्रकारच्या उत्कृष्ट खाद्य पदार्थांनी युक्त अशा व्हा. हे प्रसिद्धच आहे की, भगवान विष्णूने पूर्वी एकत्र असलेले हे द्युलोक व पृथ्वी विभक्त करून ठेवले. त्याचप्रमाणे आपल्या तेजस्वी किरणांनी पृथ्वीला सर्व बाजूंनी धारण केले. ६ हे शकटांनो, देवांच्यासाठी चालू असलेल्या या यज्ञाला निर्भयपणे पार पाडणारे तुम्ही हा यज्ञ वर स्वर्गलोकी असणाऱ्या देवांच्यापर्यंत नेऊन पोचवा. कुटिल अशा असुरांकडे पोचवू नका. हे शकटांनो, पृथ्वीचे जणू शरीरच अशा या यज्ञभूमीवर उत्तरवेदीच्या पश्चिमेस तुमच्याकरिता नियोजित केलेल्या या ठिकाणी तुम्ही खेळत रहा. ८ हे विष्णो, द्युलोकापासून, पृथ्वीवरून, महीलोकातून अथवा अंतरिक्षातून आणलेल्या अनेक धनसमूहांनी तू आपल्या दोन्ही हातांच्या मुठीभर आणि हे विष्णो तू आपल्या उजव्या व डाव्या दोन्ही हातांनी ते सोने, मोती हिरे इत्यादि अनेक प्रकारचे धन अनेकवार आम्हाला दे. ९ ज्याने पृथ्वीवरील रज:कणांची मोजणी केली, ज्याने अत्यंत उंचावर असलेल्या आणि देवांचे निवासस्थान अशा द्युलोकाला तो खाली पडणार नाही अशा प्रकारे वरच्यावर थोपवून धरले, इतकेच नव्हे तर जो विश्वाचे आक्रमण करतांना अग्नी, वायु व सूर्य यांच्या रूपाने पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्यु या तिन्ही लोकांवर एक एक पाऊल टाकून चालला आणि अनेक महात्म्यांनी ज्याचे गुण गायिले आहेत अशा त्या भगवान विष्णूचे कोणकोणते पराक्रम मी वर्णन करावेत? १० हे रराटी नांवाच्या दर्भमाले तू जणू हविर्धानमंडपरूपी विष्णूचे ललाटच आहेस. ११ हे छदि, तूं हविर्धानरूपी विष्णूचा पृष्ठभाग आहेस. १२ हे रराटीच्या अग्रांनो, तुम्ही जणू हविर्धानमंडपरूपी विष्णूच्या मुखाचे दोन ओठच आहात. १३ हे रज्जू तू विष्णू या संज्ञेने पवित्र झालेल्या ह्या हविर्धान मंडपाला शिवण्याची सुई आहेस. १४ हे ग्रंथि तू 'विष्णु' नांवाला प्राप्त झालेल्या हविर्धान मंडपाला डळमळू न देता स्थिर ठेवणारी आहेस. १५ हे मंडपा, तू विष्णूच्या अधिष्ठानाखाली राहणारा आहेस. यास्तव, विष्णूच्या प्रीतीसाठी मी तुला स्पर्श करतो (अनुवाक १३).

१ हे अग्ने हरिणांना पकडण्याकरिता पारध्याने पसरलेल्या विस्तीर्ण जाळ्याप्रमाणे राक्षसांचा निरोध करावयासाठी तू आपले प्रचंड सैन्य अगोदर पसरून ठेव आणि नंतर आपल्या प्रधानासह हत्तीवर बसलेला एखादा राजा आपल्या शत्रूवर चालून जातो त्याप्रमाणे तू राक्षसांवर चालून जा. आपल्या बचावासाठी त्वरेने पळ काढीत असलेल्या अफाट शत्रुसैन्याचा पाठलाग करून त्याचा फन्ना उडवीत उडवीत उरल्या सुरल्या सेनेवर धाऊन जाणारा आहेस. अत्यंत तीक्ष्ण अशा बाणांनी राक्षसांच्यावर मारा कर. २ हे अग्ने, तुझ्या ज्या मोठाल्या ठिणग्या अत्यंत वेगाने चोहीकडे उडत असतात त्या ठिणग्यांनी अत्यंत देदीप्यमान असा तू मोठ्या धारिष्ट्याने राक्षसांच्यावर वर्षाव कर. तुझ्या ठिकाणी हवन केलेल्या हविर्द्रव्याच्या योगाने तू एकसारखा तळपत रहा. आणि अत्यंत संतप्त व लांबवर उडणाऱ्या ठिणग्यांचा व मोठमोठाल्या ज्वालांचा, सर्व राक्षस जळून खाक होतील असा त्यांच्यावर चारी बाजूंनी लोट सोड. ३ जो विचित्र रीतीने घात करणारा आमचा वैरी असलेला राक्षस आमच्यापासून दूर असेल व जो आमच्यापासून जवळच्या अंतरावर असेल त्याच्यावर झपाट्याने तू आपला पाश टाक. कोणाकडूनही दबला न जाणारा तू या प्रजेचा पालक हो. त्रास देणारा कोणताही राक्षस तुझ्या जवळ येण्याचे धाडस न करो. ४ हे अग्ने, तू ऊठ व शत्रूवर सर्वबाजूंनी आपल्या ज्वाळा पसर. तीक्ष्ण असे आयुध धारण करणाऱ्या हे अग्निदेवा, तू शत्रूना जाळून खाक कर. हे देदीप्यमान अग्ने जो आमचे शत्रुत्व करीत असेल त्याला जमिनीवर पालथा घालून एखाद्या शुष्क काष्ठाप्रमाणे जाळून टाक. ५ हे अग्ने, तू युद्धाला उद्युक्त होऊन उभा रहा. आमच्यावर चाल करून येणाऱ्या शत्रूवर तू उलट चाल करून चोप दे. तू आपले दिव्य पराक्रम आता प्रकट कर. आम्हाला त्रास देणाऱ्या आमच्या शत्रूंच्या स्थिर अशा पराक्रमांचे पारडे जेणे करून खाली बसेल असे हलके कर. वारंवार ठोक दिलेल्या व अजून ठोकावयाचे राहिलेल्या अशा सर्व शत्रूंना तू मारून ठार कर. ६ हे अत्यंत तरुण अग्ने जो यजमान स्वगृही जाण्यास निघालेल्या अत्यंत श्रेष्ठ अशा तुला हविर्द्रव्यरूपी अन्न समर्पण करतो तोच तुझी अनुग्रहबुद्धी जाणतो. ईश्वररूपी असा तू नानाप्रकारची धने, विमल यशे आणि प्रशस्त अशी घरे नीट लक्षात आण, आणि या यजमानाला सर्व दिवस चांगले येतील अशा प्रकारे त्याला सर्वत्र प्रकाशित कर. सारांश, पूर्वोक्त धनादिक

त्याला मिळवून देऊन त्याची चोहीकडे प्रसिद्धी कर. ७ हे अग्ने, जो यजमान स्वतःच्या आयुष्यात स्वतःच्या घरी राहून प्रत्येक दिवशी कराव्या लागणाऱ्या हविर्द्रव्याने तुला संतुष्ट करण्याची इच्छा करील, व जो नाना प्रकारच्या श्रवणीय अशा स्तोत्रांनी तुला आळविण्याची इच्छा करील तोच यजमान उत्कृष्ट भाग्यवान आणि उदार असा दाता होईल. या यजमानाच्या सर्वच इष्टी सुदिनाप्रमाणे सौख्यकर असोत. ८ हे अग्ने, तुझ्या अनुग्रहबुद्धीचे मी आपल्या मनाने पूजन करतो. अलीकडे मी नवीनच तयार केलेली, घोषवती अशी जी ही स्तुतिरूपी वाणी वरचेवर सर्वत्र प्रसार पावली आहे, ती तुझ्या ठिकाणी उत्तम प्रकारे विलीन होवो. तुझ्या कृपेने आम्ही सुंदरशा अश्वांनी व उत्कृष्ट अशा रथानी युक्त होऊन तुझी सेवा करीत राहू. तू दिवसानुदिवस आमच्या ठिकाणी अनेक प्रकारची सामर्थ्ये धारण कर. ९ हे अग्ने इहलोकी कल्याणेच्छू असा पुरुष रात्रंदिवस प्रदीप्त अशा तुझी स्वतःच्या कल्याणासाठी दररोज अनेक प्रकारे पूजा करीत असतो. यास्तव, सर्व लोकांमध्ये अनेक प्रकारची धने जवळ बाळगून तुझ्या अनुग्रहानेच प्रतिष्ठित झालेले आम्ही सुखाने कालक्रमणा करीत व आनंदित मनाने तुलाच भजत राहू. १० हे अग्ने, तुझ्या प्रसादाने उत्कृष्ट अश्व व उत्तम सुवर्ण यांनी युक्त असा जो यजमान हविर्द्रव्यरूपी धनाने भरलेल्या रथासह तुझ्याजवळ येतो त्याचे तू संरक्षण करणारा होतोस व जो यजमान तुझा सत्कार दररोज प्रीतिपुरःसर करतो त्याच्या तू मित्राप्रमाणे आधीन होतोस. ११ हे अग्ने, तुझ्याशी असलेल्या बंधुत्वाच्या नात्यामुळे मोठमोठ्या असुरांना नुसत्या कडक शब्दांनीच त्यांच्यावर काहीतरी ठपका ठेऊन मी त्यांना नाहीसे करीन. तुझ्याशी माझे बंधुत्वाचे नाते कसे आहे, हे गोतमासारख्या अधिकारसंपन्न व मला विद्या शिकविणाऱ्या माझ्या पित्यापासून मला समजले आहे. हे देवांना बोलावणाऱ्या अत्यंत तरुण, यज्ञनिष्पादक व मनाचे संयमन केलेल्या अग्निदेवा, तू आमच्या आत्मीय असलेल्या वेदाधीत पुरुषाच्या भाषणाचे रहस्य जाणतोस. १२ कधीही मूर्च्छित न होणाऱ्या अग्निदेवा, सत्यस्वरूप, पातकापासून तारणारे, सुखाने सेवन करण्यास योग्य, उन्मत्त नसलेले, अहिंसक, श्रमरहित व पालनकर्ते व एकाच वेळी प्रवृत्त होणारे तुझे ते प्रकाशकिरण यज्ञभूमीत राहून आमचे पालन करोत. १३ हे अग्ने, पालन करणारे असे जे तुझे किरण आहेत, त्यांनी आंधळा असलेल्या ममता नामक एका स्त्रीच्या पुत्राला पाहताक्षणीच अंधत्वरूपी पातकापासून

त्याचे रक्षण केले. हे सर्वज्ञा, तू सत्कर्मकारी अशा त्या किरणांचे रक्षण कर. तुझे शत्रू असलेले राक्षस त्या किरणांना पराभूत करण्याची इच्छा करीत असले तरी ते केव्हाही पराभूत न होवोत. १४ हे अग्ने, तुझ्या कृपेने सर्व मिळून यज्ञानुष्ठान पार पाडणारे व सुरक्षित असे आम्ही तुझ्याच प्रेरणेने अन्न सेवन करु. हे सत्यविस्तारका, प्रशंसा करण्यास योग्य असे आम्हाला प्रंशसनीय असे ऐहिक व पारलौकिक हे दोन्ही पुरुषार्थ आम्हाला प्राप्त करून दे. भक्तांना न लाजविणाऱ्या हे अग्ने, साधनभूत असे अनुष्ठान आमचेकडून करवूनच पूर्वोक्त दोन्ही पुरुषार्थ आम्हाला प्राप्त करव. १५ हे अग्ने या सामिधेनी संज्ञक ऋचेने आम्ही तुझी सेवा करतो. आम्ही पठन करीत असलेले तुझे स्तोत्र तू गोड करून घे. अप्रशस्त अशा राक्षसांना जाळून टाक. मित्राप्रमाणे उपकारक अशा तेजाने युक्त असणाऱ्या अग्निदेवा, वैऱ्यांनी केलेल्या द्रोह व निंदेपासून आणि निंद्य अशा अनुष्ठानदोषापासून तू आमचे रक्षण कर. १६ राक्षसांचा नाश करणाऱ्या व अन्नवान अशा अग्नीला मी आपल्या समोर प्रज्वलित करतो. जगन्मित्र व ज्वालारूपाने अत्यंत विस्तीर्ण होणाऱ्या अग्निदेवाला मी शरण जातो. अनेक यज्ञांच्या योगाने प्रज्वलित झालेला आणि म्हणूनच प्रखर असा तो अग्निदेव हिंसक अशा राक्षसांच्या पासून आमचे रक्षण करो. तोच दिवसा व तोच रात्रीच्या वेळी आमचे रक्षण करो. १७ हा अग्नी मोठ्या प्रकाशाने तळपतो. सर्व प्रकारच्या माहात्म्यांनी युक्त होऊन प्रकट होतो. आसुरी व दुस्तर अशा मायांचा नाश करतो. राक्षसांचा नाश करण्याकरिता तो आपली ज्वालारूपी दोन शिंगे तीक्ष्ण करतो. १८ तीक्ष्णत्वरूप आयुधाने युक्त व पुरोडाशाच्या आहुतीने फुरफुरणारे असे या अग्नीचे किरण वर द्युलोकात जाऊन पोहोचोत. या अग्नीचे प्रकाशमान किरण आम्हाला हर्ष व्हावा म्हणूनच शत्रूंचा नाश करतात. असुरांच्याकडून चोहोकडून केले जाणारे उपद्रव आम्हाला केव्हांही बाधत नाहीत (अनुवाक १४).

प्रपाठक ३

१ हे अग्ने, सर्वप्रेरक अशा सविता देवाच्या प्रेरणेने, अश्विनी कुमारांच्या बाहूंनी आणि पूषादेवाच्या हातांनी मी तुला उचलून घेतो. तू जरी जमीन खणण्याची कुदळ आहेस तरी शत्रुरहित आहेस. २ या ठिकाणी असलेला राक्षस मारला त्याचप्रमाणे येथे असलेले शत्रूही ठार केले. जो आमचा द्वेष

करतो त्या राक्षसाची ही पहा मी मान कापली. त्याचप्रमाणे ज्याचा आम्ही द्वेष करतो त्याचीही ही पाहा मान कापली. ३ हे औदुंबरी, द्युलोकरूप असे हे तुझे अग्र उदकाने धुऊन तुला मी शुद्ध करतो. ४ अंतरिक्षरूप असे तुझे मध्य उदकाने धुऊन मी तुला स्वच्छ करतो. ५ पृथ्वीरूप असे तुझे मूळ पाण्याने धुऊन काढून मी तुला शुद्ध करतो. ६ पितरांचे बसावयाचे हे स्थान या उदकसिंचनाने शुद्ध होवो. ७ हे धान्या ! तू इतर धान्यात न मिसळणारा सतू आहेस. आमचा द्वेष करणाऱ्या राक्षसांना आमच्यापासून दूर कर व शत्रूंनाही दूर कर. ८ हे दर्भसमूहा तू जणू पितरांना बसावयाचे आसनच आहेस. ९ हे औदुंबरी उंच असलेल्या द्युलोकाला वरच्यावर थोपवून धर अंतरिक्षाला व्यापून टाक आणि पृथ्वीला दृढ कर. १० मित्र व वरुण या दोघांच्या दृढ अशा धारणशक्तीने द्युतान नांवाचा मरुत्पुत्र तुला या खळग्यात पुरो. ११ ब्राह्मणांना ब्राह्मण्य, क्षत्रियांना क्षात्रतेज व यज्ञकर्त्या यजमानाला धन व पुष्टीकारक अन्न देणाऱ्या तुझ्या भोवती बारीक माती घालतो. १२ हे दंड, ब्राह्मणांचे ब्राह्मण्य, क्षत्रियांचे बल, यजमानाची प्रजा आणि त्याचे धन व अन्न स्थिर कर. १३ हे सदोमंडपा तू इंद्राचे बसावयाचे स्थान आहेस व सर्व लोकांच्यावर छाया करणारा आहेस. १४ सदोमंडपा तू जणू काय स्तुतीने आळविण्याला योग्य असा इंद्रच आहेस. स्तोत्र व शस्त्ररूप असे आमचे बोल तुझ्या भोवती कड्याप्रमाणे वेढून राहोत. १५ हे रज्जू तू इंद्राची सुईच आहेस. १६ हे ग्रंथी तू इंद्रासन्निध स्थिर राहणारा आहेस. १७ हे सदोमंडपा तू इंद्राशी संबंध असलेला आहेस. इंद्राच्या संतोषासाठी मी तुला स्पर्श करतो. (अनुवाक १).

१ हे उपरवहो, तुम्ही राक्षसांचा नाश करणारे आणि विरोधकांचा नाश करण्यासाठी जुन्या फडक्यात हाडे, नखे, केस बांधून ते गाठोडे म्हणजे भारलेले चेटुक कोणी भुईत पुरून ठेवलेले असते, त्या चेटकाचा नाश करणारे आहात, विष्णु देवतेशी संबद्ध असलेल्या तुम्हाला मी खणून तयार करतो. २ हे उपरवांनो, विद्या, संपत्ती इत्यादिकांनी आमच्या बरोबरीचा असलेल्या कोणी येथे जे चेटुक पुरून ठेवले असेल ते मी उकरून काढतो. ३ त्याचप्रमाणे जो आमच्या बरोबरीचा नाही त्याने जे पुरले असेल ते देखील चेटूक मी उकरून काढतो. ४ जो आमच्या बरोबरीचा असून आणि जो आमच्या बरोबरीचा नसून आमच्याशी शत्रूसारखे वागतो त्याला हा पहा मी पायाखाली

तुडवितो. ५ गायत्रीछंदाभिमानी देवांनो चेटूक खाली दडपले. ६ हे अध्वर्यो, येथे काय आहे? ७ अध्यर्युः येथे कल्याण आहे. ८ यजमानः ते आपणा दोघांचे असो. ९ हे उपरव, तू अनेक प्रकारे शोभणारा व प्रच्छन्न अशा शत्रूचा नाश करणारा आहेस. १० तू उत्तम शोभणारा व उघडपणे वैर करणाऱ्याचा नाश करणारा आहेस. ११ तू स्वतेजाने सुशोभित असलेला आणि रस्त्यावर उभे राहून भांडणतंटे करणाऱ्याचा नाश करणारा आहेस. १२ हे उपरवा तू सर्व जगात शोभणारा व आमचा सर्वस्वी नाश करणाऱ्या शत्रुपक्षीय सर्व सैनिकांचा नाश करणारा आहेस. १३ हे उपरवांनो, राक्षसांचा नाश करणारे आणि शत्रूने केलेल्या चेटुकाचा नाश करणारे तुम्ही आहात. १४ विष्णुदेवतेशी संबध्द असणाऱ्या तुम्हाला खणतो. १५ राक्षसांचा नाश करणाऱ्या, चेटकाचा विध्वंस करणाऱ्या व विष्णुदेवतेशी संबध्द असलेल्या तुम्हा उपरवांना मी उदकाने प्रोक्षण करतो. १६ राक्षसांचा नाश व चेटुकाचा विध्वंस करणाऱ्या उपरवांनो, विष्णुसंबध्द अशा तुमच्या ठिकाणी मी पाणी ओततो. १७ हे धान्या, तू इतर धान्यात मिसळला न जाणारा सातू आहेस. शत्रूंना दूर कर व आम्हाला काहीही दान न देणाऱ्यांनाही आमच्यापासून दूर कर. १८ राक्षसविध्वंसक व चेटुकाचा नाश करणाऱ्या व विष्णुदेवतेच्या अधिष्ठानाखाली असलेल्या उपरव्यांच्या बुडाशी मी दर्भ पसरतो. १९ राक्षस-विनाशी, चेटुकविध्वंसक आणि विष्णूशी संबंध असलेल्या उपरव्यांच्यावर मी आज्याची आहुती देतो. २० हे अधिषवण फलकांनो, राक्षसांचा नाश करणाऱ्या, चेटुकविध्वंसक आणि विष्णुसंबध्द अशा तुम्हा दोघांना मी उपरव्यांच्या वर घट्ट बसवितो. २१ राक्षसनाशक, चेटुकविध्वंसक आणि विष्णुसंबंधी अशा तुम्हा भोंवती मी बारीक माती पसरतो. २२ राक्षसांचा नाश करणाऱ्या चेटुकविध्वंसक आणि विष्णुसंबध्द अशा अधिषवण फलकांच्या भोवती मी दर्भ पसरतो. २३ राक्षसविनाशक, चेटुकविध्वंसक आणि विष्णुदेवतेशी संबध्द असलेल्या अधिषवण फलकांना मी मंत्रपठणपूर्वक स्पर्श करतो. २४ हे पाषाण तू, सामर्थ्याने मोठा असून तुझ्या बरोबर असलेल्या इतर पाषाणांहूनही तू मोठा आहेस. इंद्राच्या संतोषासाठी तू मोठ्याने आवाज कर. (अनुवाक २).

१ हे आग्नीध्रीय, तू जणू काय अनेक रूपांनी प्रकट होणारा व हविर्द्रव्ये वाहून नेणारा अग्नीच आहेस. २ हे होत्रीय, तू जणू हविर्द्रव्ये वाहून नेणारा अग्नीच आहेस. ३ हे मैत्रावरुणीय तू जणू काय सूर्य व वरुणच आहेस.

४ हे ब्राह्मणाच्छंसीय तू जणू सर्वज्ञ असा 'तुथ' नामक अग्नीच आहेस. ५ हे पोत्रीयं, तू जणू काय सुंदरसा कवीच आहेस. ६ हे नेष्ट्रीय तू जणू काय सोमरक्षक असा 'अंघारि' आणि 'बंभारि' नांवाचा गंधर्वच आहेस. ७ हे अच्छावाकीय तू जणू 'अवस्यु' आणि 'दुवस्वान' नांवाचा वायूच आहेस. ८ हे मार्जालीय तू जणू पात्रे स्वच्छ करणारा अग्नीच आणि भांडी विसळलेले पाणी टाकण्याचे स्थान आहेस. ९ हे आहवनीय, तू उत्कृष्ट शोभणारा अग्नीच आहेस. १० हे आस्ताव तू 'स्तोत्र' गान करणाऱ्या सामगायकांच्या भोवती बसण्यास योग्य आणि पवित्र आहेस. ११ हे चात्वाल, तू हरिणाचे शिंग टाकून देण्यासाठी यजमानाने जलदीने येऊन पोचण्याचे स्थान व आकाशासारखा पोकळ आहेस. १२ हे शामित्र, तू राक्षसांनी प्रवेश करण्यास अशक्य असे पशूंची अंगे शिजविण्याचे स्थान आहेस. १३ हे औदुंबरि, तू अमृताप्रमाणे गोड असे सामगान करणाऱ्या उद्गात्याचे बसावयाचे स्थान असून स्वर्गलोक- प्रकाशक आहेस. १४ हे ब्रह्मसदना, तू ब्रह्मा नामक ऋत्विजांकडून निरनिराळ्या कर्मां संबंधी 'आज्ञा' रूपी प्रकाश जेथे पाडला जातो ते स्थान आहेस. स्वर्गसदृश असे स्थान आहेस १५ हे शालापुरवीय, तू 'अहिर्बुध्न' नांवाचा देवच आहेस. हे अग्ने, क्रुर अशा तुझ्या सैन्याकडून माझे राक्षसांपासून रक्षण कर. यज्ञकर्माचे फल देऊन माझे मनोरथ पूर्ण कर. माझी हिंसा करू नको. (अनुवाक ३).

१ हे सोम, तू शरीरावर आघात करून जीव घेणारे राक्षस, आमचा द्वेष करणारे लोक आणि आमच्याशी विरोध करणाऱ्या इतर लोकांनी आमच्यावर फेकलेले मंत्र व चेटुके यांचे नियंत्रण करून व आम्हाला सुरक्षित जागी ठेवून आमचे पालन करणारा आहेस आणि म्हणूनच तूच काय ते आमचे भरपूर बल आहेस. तुला ही आज्याहुती समर्पण असो. २ आमच्यावर प्रेम करणारा व राक्षसांना दिसू नये म्हणून सूक्ष्म रूप धारण करणारा तू, मी आहुतीरूपाने अर्पण केलेल्या आज्याचे प्राशन कर. तुला ही आहुती समर्पण असो. ३ हा अग्नी आमचे कल्याण करो. हा शत्रूंना ठार करीत करीतच पुढे जातो. हा आनंदाने उल्लसित होऊन शत्रूंना जिंको. ज्या युद्धात अन्नाची खूप लूट मिळते त्या युद्धात हा आमच्यासाठी भरपूर अन्न लुटून आणो. ४ व्यापकत्वामुळे विष्णुरूप असलेल्या हे आहवनीय अग्ने,

शत्रुसैन्यात तू खूप पराक्रम गाजीव. आम्हाला राहण्यासाठी विस्तृत असे घर, व भरपूर द्रव्य इत्यादि संपादन कर. घृताने प्रज्वलित होणाऱ्या हे अग्ने, तू आहुतिरूपाने दिलेले घृत यथेच्छ प्राशन कर आणि यज्ञकर्त्या यजमानाला सर्वप्रकारे वृद्धिंगत कर. ५ सर्व मार्गांचे ज्ञान असलेला सोम जो निघतो, तो यज्ञाचे जणू उत्पत्तिस्थान आणि अनेक प्रकारे भूषविलेल्या देवांना बसावयास योग्य अशा हविर्धान मंडपात येऊन पोहोचतो. ६ हे कृष्णाजिना, तू अदितिदेवीचे स्थान आहेस. ७ हे सोमराजा, तू या अदितीचे स्थान असलेल्या कृष्णाजिनावर बैस. ८ हे देदीप्यमान सूर्यनारायणा, हा सोमराजा आता इंद्रसहित अशा तुम्हा देवांच्या स्वाधीन केला आहे. त्याचे रक्षण करा. तुम्हाला कोणीही उपद्रव न देवो. ९ हे सोमा, तू देव होऊन देवांच्या ठिकाणी आता येऊन पोचला आहेस. १० हा मीदेखील मनुष्य होऊन प्रजा, धन व भरपूर अन्न यांच्या सह आपल्या मनुष्यांमध्ये याच वेळी प्राप्त झालो आहे. ११ देवांना नमस्कार असो. १२ पितरांनाही नमस्कार असो. १३ हा मी आता वरुणाच्या पाशापासून मुक्त झालो आहे. १४ स्वर्गलोकाकडे मी न्याहाळून पाहतो. १५ विश्वव्यापक अशा अग्निप्रकाशालाही नीट अवलोकन करतो. १६ हे व्रतपालका अग्निदेवा, तू सर्व व्रतांचा आधिपती आहेस. जे माझे शरीर तुझ्या ठिकाणी स्थित झाले होते ते हे आता माझ्या ठिकाणी स्थित होवो. आणि जे तुझे शरीर माझ्या ठिकाणी निविष्ट झाले होते ते हे आता तुझ्या ठिकाणी निविष्ट होवो. हे व्रतपते, व्रताचरण करणाऱ्या आपणा दोघांची व्रते पूर्ववत् ज्याच्या त्याच्या ठिकाणी होवोत (अनुवाक ४).

१ हे यूपयोग्य वृक्षा, तुझ्याखेरीज यूपस्तंभ करण्यास योग्य परंतु असावीत तशी लक्षणे नसलेले कित्येक वृक्ष मी ओलांडून आलो आहे आणि 'यूप' करण्यास अयोग्य अशा वृक्षांच्या जवळही मी गेलो नाही. उत्कृष्ट अशा लक्षणांनी युक्त अशा वृक्षामध्येही जवळच्या प्रदेशात असलेल्या आणि निकृष्ट अशा कसल्याही लक्षणांच्या पासून दूर असलेल्या, अर्थात् अवलक्षणे नसलेल्या अशा तुला मी मिळविला आहे. हे वृक्षा, सुलक्षण व विष्णुसंबध्द असलेल्या तुला देवांच्यासाठी केल्या जाणाऱ्या यज्ञात 'यूप'- स्तंभ करण्याचे ठरवून मी तुझी सेवा करीत आहे. २ हे वृक्षा, सर्वप्रेरक असा सविता देव तुला

मधुर घृताने माखतो. ३ हे दर्भरूपी ओषधे, या वृक्षाचे रक्षण कर. ४ स्वधितिसंज्ञका, हे शासना, या वृक्षाची हिंसा करू नकोस. ५ हे छिन्न वृक्षा, तू तुटून खाली पडते वेळी आपल्या शेंड्याने द्युलोकाला विदारण करू नको. मध्य भागाने आकाशाला दुखावू नको. सरळ रीतीने नीट जमिनीवर आडवा पड. ६ बुडख्याच्या रूपाने आधारित असलेल्या हे वृक्षा, शेकडो शाखांनी युक्त असा तू पुन्हा वाढीस लाग. ७ आम्हीही संततिरूप हजारो शाखांनी वाढीस लागू. ८ अत्यंत तीक्ष्ण अशी धार असलेली स्वधिति म्हणजे ही कुऱ्हाड तू अत्यंत सुंदर दिसावास म्हणून तुझ्या ठिकाणी आडव्या तिडव्या असलेल्या फांद्या तोडून टाकून तुला उत्कृष्ट अशा यूपत्वाला प्राप्त करीत आहे. यास्तव योग्य अशा छाटाछाटीला तू भिऊ नको. ९ हे यूपा, यज्ञकार्याच्या द्वारा यजमानाला उत्कृष्ट असे पुत्रपौत्र देणारा तू छेदनदुःखरहित असा हो आणि यजमानाला यज्ञनिमित्ताने पुष्कळ धने मिळवून दे. (अनुवाक ५).

१ हे यूपा, पृथ्वीरूप असे तुझे मूळ मी धुऊन स्वच्छ करतो. २ अंतरिक्षरूपी तुझ्या मध्यभागाला मी प्रोक्षण करतो. ३ द्युलोकस्वरूप अशा तुझ्या अग्रभागाला मी उदकाने प्रोक्षण करून शुध्द करतो. ४ पितरांचे बसावयाचे हे स्थल शुध्द होवो. ५ हे धान्य, तू इतर धान्यात न मिसळणारा 'सातू' आहेस. आमचा द्वेष करणारांना दूर कर आणि दानरहित अशा दुष्टांनाही आमच्यापासून दूर कर. ६ हे दर्भसमूहा तू पितरांना बसावयाचे जणू आसनच आहेस. ७ हे यूपशकल, तू यूपाला सरळ व भक्कमपणाने उभा ठेवण्यास योग्य असून यूपाचे पालन करणारांमध्ये अग्रेसर आहेस. यास्तव, यूप जेव्हा तुझ्यावर उभा राहील तेव्हा तू त्याच्याकडे नीट लक्ष दे. त्याची जाणीव ठेव ८ हे चषाल, सवितादेव तुला मधुर अशा घृताने माखून काढो. सुफलित अशा ओषधी वनस्पतींच्या अभिवृध्दीसाठी मी तुला यूपस्तंभाच्या शेंडयात अडकवितो. १० हे यूपा, तू अत्यंत उंच अशा द्युलोकाला वरच्यावर स्तंभित कर. अंतरिक्षाला व्यापून टाक व आपल्या बुडख्याने पृथ्वीला घट्ट कर. ११ हे यूपाभिमानी विष्णो, तुझ्या ज्या ज्या ठिकाणी जाणारे लोक अत्यंत दीप्तिमंत आणि अपायरहित होतात, त्या त्या तुझ्या ठिकाणी जाण्याची मी इच्छा करीत आहे. कारण अशा ठिकाणीच महात्म्यांनी अत्यंत गुण गायिलेल्या

व महान श्रेष्ठ अशा तुज विष्णूचे ते परमवंद्य पाऊल शोभत असते. १२ हे लोक हो, तुम्ही या सूर्यरूपी भगवान् विष्णूचीसृष्टि स्थितिलयरूप अद्भुत कर्मे अवलोकन करा. ज्या कर्मांच्या योगाने त्याने वैदिक व लौकिक कर्मे निर्माण केली असा तो भगवान विष्णू इंद्राचा योग्य असा मित्र आहे. १३ दिव्य अशा आकाशभर पसरलेला जणू नेत्रच असे ते भगवान विष्णूचे परम वंदनीय 'पद' वेदांत पारंगत असे विद्वान लोक सर्वदा पाहत असतात. १४ हे यूपा, ब्राह्मणांना ब्राह्मण्य, क्षत्रियांना बल, यजमानाला उत्कृष्ट अशी पुत्रपौत्रादि प्रजा भरपूर देणाऱ्या तुझ्याभोवती मी बारीक माती घालतो. १५ हे दंड, तू ब्राह्मणांचे ब्राह्मण्य दृढ कर, क्षत्रियांचे बल दृढ कर, यजमानाची प्रजा दृढ कर, तू त्याची धनसमृद्धी दृढ कर. १६ हे यूपा, तू आपल्या भोवती मोळाच्या दोरीने वेष्टित झालेला आहेस. देवसंबंधी अशा मरूद्गणादि प्रजा तुझ्या भोवती वेढा घालून बसोत. धन, पुष्टिकारक अन्न आणि आप्त स्वकीय मनुष्ये यजमानाला वेढून बसलेली असोत. १७ हे स्वरो, यूपाच्या अंतरिक्षरूप अशा मध्यभागी वेष्टिलेल्या दोरीच्या पदरात तुला खोचून ठेवतो. (अनुवाक ६).

१ हे दर्भा, देवांना समर्पण करावयाच्या पशुरूपी अन्नाची इच्छा करणाऱ्या यजमानाकरिता तुला उचलून घेतो. २ हे प्लक्षशाखे तू पशूजवळ देवांना बोलावून आणावयास जाणारी आहेस. ३ यज्ञानुष्ठाननिर्वाहक व हवन केल्यानंतर उरलेल्या पश्वंगांची प्राप्ती अग्निषोमादि देवांना त्यांच्या प्रजेला व हविर्द्रव्यावशेष भक्षण करण्याची इच्छा करणाऱ्या अग्नींना होवो. हे बृहस्पते, पशूच्या ठिकाणी असलेली हृदयादि अंगरूपी हविर्द्रव्ये पुष्ट कर. हे पशो, हवन करण्यास योग्य अशी तुझी हृदयादि अंगे स्वादिष्ट होवोत. त्वष्ट्र नामका हे देवा, पशुरूपी हविर्द्रव्य रमणीय कर. क्षीरादिधनसंपन्न पशू हो, यजमानाच्या घरी क्रीडा करीत रहा. ४ हे शकलू, तू अग्नी उत्पन्न करणारे आहेस. ५ हे दर्भांनो, तुम्ही रेताचे सिंचन करणारे आहात. ६ हे अधरारणे, तू जणू उर्वशीच आहेस. ७ हे उत्तरारणे, तू जणू काय पुरूरवाच आहेस. ८ हे अरणिद्वय, मातापितृस्थानीय असलेले तू यज्ञाचे जणू आयुष्यच आहेस. ९ हे अरणींनो, घृताने माखलेल्या तुम्ही, सिंचन होणाऱ्या रेताचे पोषण करा. १० अग्निदेवा 'गायत्र' छंदाला

अनुसरून तू उत्पन्न हो. ११ 'त्रिष्टुप' छंदाला अनुसरून उत्पन्न हो. १२ 'जगती' छंदाला अनुसरून उत्पन्न हो. १३ जन्मजात ज्ञानसंपन्न अग्निदेवांनो, तुम्ही आमच्या विषयी समान अर्थात् अनुकूल मनोवृत्ती असलेले, समान अशा निवासस्थली राहणारे व निष्पापचित्त असे व्हा. यज्ञाचा नाश करू नका व यज्ञपती अशा यजमानाचाही नाश करू नका. आज चालू असलेल्या यज्ञकर्मामध्ये आमच्या ठिकाणी शांतचित्त व्हा. १४ ऋत्विजांचा जणू पुत्र व विशेषत्वाने शोभणारा हा मंथनोत्पादित अग्नी आहवनीय अग्नीत प्रविष्ट होऊन हविर्द्रव्य भक्षण करतो. हे मथिताग्ने, तुला 'स्वाहा' असा उच्चार करून मंत्राने आहुती देतो. देवांचे भागधेय व्यर्थ जाऊ देऊ नकोस. (अनुवाक ७).

१ हे रज्जू, तुला उचलून घेतो. २ देवांचे हविर्द्रव्य असलेल्या हे पशो, यज्ञाची सिध्दी होण्याकरिता तुला रज्जूच्या फासाने चांगला बांधतो. ३ मनुष्याकडून होणाऱ्या उपद्रवांना धैर्याने तोंड दे. ४ उदके व नानाप्रकारची तृणे यांच्या पासूनच पर्यायाने उत्पन्न झालेल्या तुला मी उदक व दर्भरूपी तृण यांनी प्रोक्षण करतो. ५ तू उदकांचे प्राशन करणारा आहेस. ६ हे उदकदेवतांनो, स्वभावत: रुचकर असूनही देवतांच्या करिता हविर्द्रव्य म्हणून अर्पण करण्याला योग्य अशा या पशूला आणखी रुचकर करा. ७ हे पशो, तुझा प्राणवायू बाह्य वायूशी मिळून जावो. ८ तुझी हृदयादि अंगे विशिष्ट अशा भागांच्याशी उत्तम रीतीने मिळून जावोत. ९ यज्ञपती यजमान फलप्रद अशा आशीर्वादाशी सुसंगत होवो. १० हे स्वरुस्वधीतींनो घृतानें माखलेल्या तुम्ही पशूचे रक्षण करा. ११ धनवंत अशा पश्वावयवहो, यजमानाला प्रियत्वाने धारण करणारे व्हा. १२ विस्तीर्ण अशा पार्श्विंद्रियसमुदाया, पशूचे अभिमानी देव असलेले प्राणवायू, व जीवात्मा यांच्यासह हवी दे. या पशूचा देवशरीराशी संयोग कर. हे अतिविस्तीर्ण इंद्रियसमुदाया, विस्तीर्ण अशा यज्ञाचे ठिकाणी यज्ञपती अशा यजमानाला स्थापन कर. १३ हे दर्भतृण, पृथ्वीच्या स्पर्शापासून पशूचे रक्षण कर. १४ सर्वव्यापी अशा किरणांनी युक्त असलेल्या भगवान् सूर्यनारायणा, तुला नमस्कार असो. १५ हे पत्नि, शत्रुरहित अशी तू सर्व वस्तूंनी परिपूर्ण अशा स्थानांतून प्रजा व भरपूर धन यांच्या सह चल. १६ हे उदकदेवतांनो, आमच्या पवित्रतेची इच्छा करणाऱ्या व स्वत: पवित्र

असणाऱ्या तुम्ही देवांना यागप्रदेशात पोचवा. आम्ही तुमच्या कडून वेढले गेलेले व पवित्र होऊन तुम्हाला वेढणारे झालो आहोत. (अनुवाक ८).

१ हे पशो, तुझे वागिंद्रिय परलोकी तुला प्राप्त होणाऱ्या देवशरीराचे ठिकाणी सुखाने वृद्धिंगत होवो. २ तुझा प्राण वृद्धिंगत होवो. ३ तुझे नेत्रेंद्रिय वृद्धिंगत होवो. ४ तुझे कर्णेंद्रिय वृद्धिंगत होवो. ५ तुझ्या प्राणांना, नेत्रेंद्रियाला व कर्णेंद्रियाला जे दुःख पोचले, तुझे तोंड दाबून तुझा श्वास कोंडण्यासारखे जे क्रूरकर्म आम्ही केले आणि तुझ्या शरीराची चीरफाड करण्यासाठी जे कौर्य करणे आम्हाला प्राप्त झाले ते सर्व शांत होवो. तुझे ते प्राण इत्यादि सारे या उदकाने शुद्ध होवो. ६ देवशरीराचे ठिकाणी नाभी वृद्धिंगत होवो ७ तुझे गुदद्वार वृद्धिंगत होवो. ८ पाय शुद्ध होवोत. उदकांना, ओषधींना व पृथ्वीला सुख होवो. ९ अहोरात्रांना सुख होवो. १० हे दर्भरूपी ओषधे, या पशूचे रक्षण कर. ११ स्वधितिसंज्ञक शस्त्रा, या पशूची हिंसा करू नको. १२ रक्ताने माखलेल्या हे दर्भा तू राक्षसांचा भाग आहेस. हे पहा मी राक्षसाला अधम अंधारात नेऊन टाकतो. जो आमचा द्वेष करतो त्याला व ज्याचा आम्ही द्वेष करतो त्याला मी अधम अंधारात नेऊन टाकतो. १३ हे वपे अन्नाकरिता मी तुला वर उकरून काढतो. १४ द्यावापृथ्वी सारख्या हे वपाश्रपणींनो घृतासारख्या या वपेने तुम्ही आपले स्वरूप आच्छादित करा. १५ यजमानाला पराक्रमी पुत्रपौत्रादि देणारा असा हा वपाभाग छिन्न असूनही मंत्र सामर्थ्यामुळे अच्छिन्न असा आहे. हा यजमानाला धने देवो. १६ हे वपे विस्तीर्ण अशा अंतरिक्षातून चल. १७ हे वायुदेवा, वपेतून गळणारे आज्यबिंदू प्राशन कर. १८ हे वपाश्रपणी हो, तुम्हाला अग्नीत समर्पण केल्यानंतर तुम्ही 'उर्ध्वनभस्' नांवाच्या मरुत्पुत्राजवळ जा. (अनुवाक ९).

१. हे हृदय, तुझे मन देवांच्या मनाशी मिळून जावो. त्यांच्या प्राणाशी तुझा प्राण मिळून जावो. हविर्द्रव्य असलेला तू देवांना प्रिय व घृताने युक्त व्हावास म्हणून तुजवर तूप ओततो. २ इंद्र ज्याची देवता आहे असा पशूचा प्राण हृदयादि अंगा अंगाचे ठिकाणी नीट रीतीने स्थापन होवो, त्याचप्रमाणे इंद्रदेवतात्मक 'अपान' ही विशेषत्वाने स्थापन होवो. हे त्वष्ट्र देवा, तुझ्या अनुग्रहाने बहुत असलेला पश्वंगसमुदाय परस्पराशी सुसंगत होवो. हे हृदयादि अवयव हो, सांप्रत विकृत रूप झालेले तुम्ही हविर्द्रव्यत्वाच्या योगाने मूळच्या

उत्कृष्ट रूपाला प्राप्त व्हा. हे पशो, देवांच्या ठिकाणी जाणाऱ्या तुला त्यांनाही स्वर्गलोक प्राप्त व्हावयासाठी तुझे सहकारी मित्र व मातापितरे अनुमोदन देवोत ३ हे वसे, तू आश्रयणीय म्हणजे स्वीकार करण्याला योग्य आहेस. आहवनीय अग्नी तुझा स्वीकार करो. उदकेही तुझ्या ठिकाणी नीट मिळून जावोत. वायू व सूर्य यांच्या गती करिता आणि उदके व ओषधी यांची वाढ होण्यासाठी मी तुला झांकून ठेवतो. ४ घृत प्राशन करणाऱ्या देवहो, घृत प्या. वसा पिणाऱ्या देवांनो तुम्ही वसा प्या. हे पशो, तू अंतरिक्षाचे म्हणजे तेथे राहणाऱ्या देवांचे हविर्द्रव्य आहेस. यास्तव, अंतरिक्षस्थ देवसमुदायाला मी तुला अर्पण करतो. ५ पूर्व ६ दक्षिण ७ पश्चिम ८ उत्तर ९ अधर आणि उर्ध्व दिशेला ही आहुती अर्पण असो. १० सर्व दिशांना ही आहुती समर्पण असो. दिशांना नमस्कार असो. (अनुवाक १०).

१ हे गुदकांडावयवरूपी हविर्द्रव्या, तू समुद्राला तृप्त करावयास जा. ही आहुती समुद्राला समर्पण असो. २ तू अंतरिक्षाला संतुष्ट करावयास जा. ही आहुती अंतरिक्षाला समर्पित होवो. ३ तू सर्वप्रेरक अशा सविता देवाला तृप्त करण्यासाठी जा. ही आहुती सविता देवाला अर्पण असो. ४ तू अहोरात्रींना तृप्त करावयास जा. अहोरात्रींना ही आहुती समर्पण असो. ५ तू मित्रावरुणांना संतुष्ट करण्यास जा. मित्रावरुणांना ही आहुती समर्पण असो. ६ तू सोमाला संतुष्ट करावयास जा. सोमाला ही आहुती समर्पण असो. ७ तू यज्ञाला तृप्त करावयास जा. यज्ञाला ही आहुती अर्पण असो. ८ तू गायत्र्यादि छंदांना तृप्त करण्यासाठी जा. गायत्र्यादि छंदांना ही आहुती अर्पण असो. ९ तू द्यावापृथिवींना संतुष्ट करावयास जा. द्यावापृथिवींना ही आहुती समर्पण असो. १० तू देदीप्यमान अशा नभोमंडलाला तृप्त करावयासाठी जा. नभोमंडलाला ही आहुती समर्पण असो. ११ प्राणीमात्राच्या जठरात राहणाऱ्या वैश्वानर अग्नीला तृप्त करावयास तू जा. वैश्वानर अग्नीला ही आहुती अर्पण असो. १२ हे गुदकांडलेपा, उदकांपासून ओषधी उत्पन्न होण्यासाठी मी तुला दर्भाच्या ठिकाणी चोपडतो. १३ हे समुद्रादि देवतासमूहा, माझ्या हर्षपूर्ण हृदयाच्या ठिकाणी तू आपले मन दे. तुझ्या प्रसादाने उत्तम शरीर, कांतिमान असे रूप, गुणवान् पुत्र व भाग्यशाली नातू मी संपादन करीन. १४ हे हृदयशूला, तू शोकरूप आहेस. यास्तव जो आमच्याशी द्वेष करतो

व आम्ही ज्याचा द्वेष करतो त्याच्याजवळ जा आणि त्याला शोकाकुल कर. १५ हे वरुणराजा, जे जे स्थान आमच्या द्वेष्ट्याकडून अथवा द्वेष्याकडून आम्हाला शोकप्रद असेल त्या त्या स्थानापासून आम्हाला मुक्त कर. हे उदकांनो, हे अवध्यहो, हे वरुण, आमच्या इष्टप्राप्तीसाठी व अनिष्टाचा परिहार व्हावा म्हणून तुम्हासारख्या महान श्रेष्ठ अशा देवांना प्रत्यक्ष त्या त्या नांवाने हांका मारण्याचे जे उपमर्दकारक वर्तन करून आम्हाला व तुम्हाला त्रास दिला तत्संबंधी पापापासून, हे वरुणा, तू आम्हाला मुक्त कर. (अनुवाक ११).

१ ही आम्ही भरून घेत असलेली 'वसतीवरी' संज्ञक उदके हविर्द्रव्य संपन्न होवोत. इंद्रदेव हविर्द्रव्यसंपन्न होवो. यज्ञ देखील हविर्द्रव्यसंपन्न होत्साना विशेषत्वाने चालू राहो. सूर्यही हविर्द्रव्यसंपन्न असो. २ वसतीवरी संज्ञक उदकांनो, अविनाशी असे गृह असलेल्या आहवनीय अग्नीच्या सन्निध अशा ठिकाणी तुम्हाला स्थापन करतो. प्राणिमात्राच्या सुखासाठीच प्रवृत्त होणाऱ्या व स्वतःच सुखसंपन्न असलेल्या तुम्ही यजमानाला सुखाच्या ठिकाणीच ठेवा. ३ तुम्ही इंद्र व अग्नी यांचा भाग आहात. ४ तुम्ही मित्र व वरुण यांचा भाग आहात. ५ तुम्ही सर्व देवांना भाग आहात. राक्षसांचे निवारण करण्यासाठी यज्ञामध्ये सावध रहा. (अनुवाक १२).

१ हे सोमराजा, सहृदय मनुष्ये, प्रेमळ अंतःकरणाचे पितर आणि द्युलोकात राहणारा सूर्य यांच्या तृप्तीसाठी मी तुला जवळ आणून ठेवतो. तू या यज्ञाची उन्नती कर. आणि द्युलोकात राहणाऱ्या देवांच्या ठिकाणी आमची निमंत्रणात्मक स्तोत्रे नेऊन पोहोचव. हे सोमराजा, ये. गाड्यातून खाली उतर. भिऊ नको व थरथर कापू नको. तुला मी पीडा करीत नाही. तू प्रजांच्या जवळ ये. प्रजा तुझ्याजवळ येवोत. २ आज्याहुतीने प्रज्वलित झालेला अग्नी माझे आव्हान म्हणजे निमंत्रण ऐको. विद्यासंपन्न उदकदेवताही ऐकोत. हे सोमकुटावयाच्या बत्यांनो, तुम्हीसुद्धा विद्वान होत्साते यज्ञाने पठन केले जाणारे मंत्र ऐका. सविता देव माझे आव्हान श्रवण करो. ३ देवतारूपी उदकांनो आणि 'अपांनपात्' नांवाच्या अग्निदेवा, हविर्द्रव्याला पात्र, इंद्रियांना टवटवी आणणारा व मनाला आल्हादकारक असा जो ऊर्मी आहे त्याला म्हणजे देदीप्यमान अशा लाटांच्या प्रवाहाला, ज्यांचे तुम्ही हविर्भाग आहात

अशा सोमपान करणाऱ्या देवांना अर्पण करण्यासाठी देवांच्या ठिकाणी स्थापन करा. ४ हे आज्य, उदकांमध्ये तुझे हवन केले असल्यामुळे तू उदकांतून बाहेर काढून टाकण्याला पात्र आहेस. उदकांच्या ठिकाणी अनिष्टरूप असलेल्या तुला मी बाहेर काढून टाकतो. ५ हे उदकांनो, समुद्राप्रमाणे असणाऱ्या तुमची उणीव पडू नये म्हणून आज तुम्हाला पुन: मी 'एकधना' संज्ञक कलशात भरून घेतो. ६ हे अग्निदेवा, ज्या मनुष्याला युद्धामध्ये तू रक्षण करतोस आणि हविर्द्रव्यरूपी अन्न ग्रहण करण्यासाठी ज्याच्याजवळ जातोस तो मनुष्य शाश्वत अशा धनरूपी अन्नांचा पालक होतो. (अनुवाक १३).

१ हे अग्निदेवा, भयानक शरीर धारण केलेला, शत्रूंचे निर्दालन करणारा व द्युलोकाचा जणू मूर्तिमंत उत्साह असा तूच खरोखर मरुद्गणांचे बल आहेस. यास्तव तू त्यांच्याशी संयुक्त होऊन त्यांच्या सैन्याचे नियमन कर. सुखाला प्राप्त झालेला तू वायुवेगाने धावणारे व अरुणासारख्या तांबूस वर्णाचे घोडे जोडलेल्या रथात बसून जातोस. आणि उपासकाचे पोषण करणारा तू केव्हा तर एकटाच हविर्द्रव्याने तुझी पूजा करणाऱ्या यजमानांच्याकडे जातोस. २ हे ऋत्विग् यजमान हो, शत्रूने अचानक केलेल्या हल्यापासून बेसावध अशा स्थितीत तुम्हाला मरण येण्यापूर्वीच तुमचे रक्षण व्हावयासाठी तुम्ही यज्ञाचा राजा, शत्रूंना अत्यंत क्रूर, फल देण्यासाठी भक्तांना आपल्या जवळ हाक मारणाऱ्या, स्वर्गलोकी व इहलोकी निश्चित कर्मफल देणाऱ्या व सुवर्णासारखे मनोहर रूप असलेल्या अग्निदेवाला वश करून घ्या ३ देवांना बोलावणारा, मानवी होत्यापेक्षा अतीशय यजन करणारा, नित्य तरुण असलेला, बुद्धिमान, सत्याची चाड बाळगणारा, मनुष्यांचे पोषण करणारा आणि त्यांच्या उदरांमध्ये जठराग्निरूपाने प्रदीप्त होणारा असा अग्निदेव मातेप्रमाणे असलेल्या वेदीजवळच सुगंधाने दरवळत असलेल्या स्थानी म्हणजे आहवनीय अग्नीच्या ठिकाणी येऊन बसला. ४ ह्या अग्निदेवाने आज आमची आम्ही देवांना दिलेली भक्षणीय अशी पुरोडाशाहुती रुचकर केली. आणि म्हणूनच यज्ञाच्या जिव्हास्थानी असलेल्या व रक्षणीय अशा अग्निदेवतेला आम्ही प्राप्त करू शकलो. पुरोडाश, आज्य इत्यादिकांच्या योगाने सुगंधयुक्त असा तो अग्नी आमच्या आयुष्याचे रक्षण करीतच येवो. आज आमची देवांना दिली जाणारी आहुती यथासांग करो. ५ हा अग्नी आम्हाला दाहक अशा वस्तूंना चाटून नष्ट करीत व पुष्पलते

प्रमाणे आम्हाला सुखप्रद अशा वस्तूंना व्यक्त करीत आणि द्युलोकातील मेघाप्रमाणे गर्जना करीत येवो. कारण, नुकताच उत्पन्न झालेला व आताच्या आताच प्रदीप्त केला गेलेला हा अग्नी अनेक वस्तूंनी भरलेल्या या जगाला लोकांच्या नजरेस आणीत आहे आणि द्युलोक व पृथ्वी यांच्यामध्ये देदीप्यमान अशा किरणजाळाने स्वत: प्रकाशमान होऊन आसमंतातील सर्व प्रदेश प्रकाशित करीत आहे. ६ अत्यंत श्रेष्ठ व देवांना बोलावणाऱ्या हे अग्निदेवा, रात्री आणि दिवसा यज्ञाला योग्य अशी अनेक हविर्द्रव्ये तुझ्या ठिकाणी येत असतात. तुझा अनुग्रह होण्यापूर्वी ज्या ठिकाणी अळलेल्या वस्त्राप्रमाणे सर्व वस्तू नि:सार झालेल्या दिसतात त्याच वस्तू सर्वांना पावन करणाऱ्या तुज अग्नीचे ठिकाणी अनुगृहीत झाल्यानंतर पुन: सौभाग्याला प्राप्त होतात. म्हणजे सुंदर दिसू लागतात. ७ अत्यंत अन्न सेवन करणाऱ्या हे अग्निदेवा, वेदिरूपी उत्कृष्ट भूमीने युक्त अशा सर्वच प्रजा निरनिराळ्या कामनांनी प्रेरित होऊन कामनापूर्ती करणाऱ्या तुझ्या सुप्रसन्नतेसाठी कोणत्यातरी नियमाचा स्वीकार करीत असतात. ८ हे अग्निदेवा, तुझ्या संरक्षणाखाली असलेले आम्ही जो धारण करू तो मनोरथ सफल करून घेऊ आणि हे धनवंता, तुझ्या पासून उत्कृष्ट पराक्रमी अशा पुत्रासह धन संपादन करू. शिवाय अन्नाची इच्छा करणारे आम्ही अन्न सर्व दिशांतून संपादन करू. जरारहित अशा हे अग्निदेवा, तुझ्या अनुग्रहाने अक्षय असे यश मिळवू. ९ अभक्तांना अत्यंत दूर करणारा, ऋत्वजांनी संरक्षण करण्यास योग्य, आणि आहुती मिळवावयच्या जागी अर्थात् यज्ञभूमीच्या जागी वास करणाऱ्या हे अग्निदेवा, अत्यंत प्रशस्त कांतियुक्त, अनेकांना स्पृहणीय वाटणारे असे मणिमुक्तादि धन आम्हाला देण्यासाठी घेऊन ये. १० सर्वांना शुद्ध करणारा व अनेक नांवानी व्यक्त होणारा जो अग्निदेव पुष्कळ व विस्तृत अशी पुरोडाशादि हविर्द्रव्ये भक्षण करण्याकरिता प्रत्येक दिवशी यजमानाच्या घरी जातो, तोच अग्नी देदीत्यमान, कर्मफलांचा विस्तार करणारा, सुप्रकाशित अशा यज्ञभूमीत बसलेला, जरारहित व स्तुती करणाऱ्या अनेक देवांनी वेष्टित आणि वैऱ्यांचा अत्यंत वियोग करणारा असतो. ११ हे यजमान, श्रेष्ठ असा हा अग्नी तुला संपूर्ण आयुष्य देवो. अपमृत्यूने घेरलेला तुझा प्राण या अग्नीच्या अनुग्रहाने पुन: तुझ्या देहात परत येवो. तुला झालेल्या रोगाचा मी नाश करतो. १२ हविर्द्रव्याचे जो सेवन करतो घृतानेच ज्याच्या हवनाचा उपक्रम व समाप्ती केली जाते आणि घृतामध्येच

जो जन्म पावतो अशा हे अग्निदेवा, तू यजमानाला आयुष्यप्रद होऊन ये. मधुर व सुंदर असे गाईचे तूप पिऊन पिता पुत्राचे रक्षण करतो त्या प्रमाणे तू या यजमानाचे सर्वतोपरी रक्षण कर. १३ अनेक प्रकारच्या यजमानरूपी प्रजा असलेल्या व जन्मताच ज्ञानसंपन्न अशा अग्निदेवा, प्रत्येक दिवशी यजमानाच्या घरी हविर्द्रव्य सेवनासाठी जाणाऱ्या तुझ्यासाठी तुला प्रिय होईल असे स्तोत्र मी नवीन तयार करतो. १४ अग्निदेव प्रथम द्युलोकात सूर्यरूपाने उत्पन्न झाला. आमच्या मनुष्यलोकावर जन्मजात ज्ञानी असा तो अग्नी सर्वपरिचित अशा स्वरूपाने दुसऱ्या जन्मास प्राप्त झाला. समुद्राच्या उदकात वडवानल रूपाने त्याने तिसरा जन्म घेतला. तिनही जन्मांमध्ये आपले उपासक असलेल्या यजमानांच्यावर अनुग्रह करण्याविषयी मनोवृत्ती बाळगणारा असा जो अग्निदेव त्याला कल्याणेच्छू यजमान दररोज प्रज्वलित करून आणि स्वत: आपल्या चित्ताचे स्वत:चे ठिकाणी संयमन करून म्हातारपण येईपर्यंत त्याची सेवा करीत असतो. १५ सर्वांना शुद्ध करणाऱ्या, स्वत: शुद्ध व सर्ववंद्य अशा अग्निदेवा, आज्य इत्यादि हविर्द्रव्यांनी तुला आहुती दिल्या असतांना तू मोठाल्या ज्वालांनी युक्त होऊन तळपतोस. १६ इतरांच्याकडून अतिरस्करणीय अशा जीवनाचा आश्रय करण्याची इच्छा धरून दर्शनीय व सुवर्णासारखा कांतिमान असलेला अग्नी मोठ्या दीप्तीने प्रकाशतो. ज्या अर्थी या अग्नीला द्युलोकस्थ देवसमुदायाने उत्कृष्टवीर्यसंपन्न होऊन जन्म दिला आहे, त्या अर्थी तो अग्नी हविर्द्रव्यरूपी अन्नांच्या योगाने अमर झाला हे युक्तच आहे. १७ जे तेज अभीष्ट सिद्धीसाठी यजमानाचे पालन करणाऱ्या अग्नीला सर्व बाजूंनी व्यापून राहिलेले असते आणि जे शुद्ध बीज मातापितरांकडून निषिक्त होत असते त्या तेजाने व बीजाने द्युलोकस्थ अग्नी बलवान्, अनिंद्य, तरुण आणि आपले मन आपल्या स्वाधीन ठेवणारा असा पुरुष उत्पन्न करतो. त्याचप्रमाणे विरोधक अशा पातकाचा नाश करतो. १८ हे अग्ने, तो यजमान अत्यंत तेजस्वी अशा मनाने तुझ्याकडून रक्षण केला जातो. आणि हे अग्ने, उत्कृष्ट अशा पुत्रपौत्रादिकांनी युक्त, धनप्राप्तीची इच्छा करणाऱ्या व मनुष्यसमाजात श्रेष्ठ अशा यजमानाला तू धने दे. तुझ्या अनुग्रहाने प्रभुत्व प्राप्त झाले म्हणजे आम्ही अत्यंत प्रभूत अशा यागानुष्ठानाने व उत्कृष्ट स्तुतिवचनांनी समृद्ध होऊ. १९ हे अग्निदेवा, आमच्या यशाचा नाश करावयास टपलेल्या आमच्या वैऱ्याला बलात्काराने धरून आणून माझ्या स्वाधीन कर आणि त्याचे धनही

हरण करून आण, जो तू आमच्या प्रतिपक्षाकडील सर्व सैनिकांना अन्नासंबंधी चालू असलेल्या संग्रामात आमच्या सन्निध राहून सर्वतोपरी पराभूत करतोस तो तू. २० हे बलशाली अग्निदेवा, ते शत्रुसेनेचा पराभव करण्यास पुरेसे धन घेऊन ये. ज्या अर्थी तू सत्यस्वरूप, अद्भुतपराक्रमी आहेस त्या अर्थी तूच पुष्कळ गाईंनी युक्त अशा अन्नाचाही दाता आहेस. २१ हविर्द्रव्य असे बैलाचे मांसरूप अन्न सेवन करणारा, त्याचप्रमाणे वांझ गाईचे मांसरूप अन्न भक्षण करणारा आणि सोमरसयुक्त अशा 'पृष्ठ' संज्ञक स्तोत्रांनी स्तविला जाणारा आणि अन्ननिष्पादक असा जो अग्निदेव त्याला संतुष्ट करण्यासाठी अनेक स्तुतिवचनांनी आम्ही त्याची सेवा करतो. २२ पुत्राप्रमाणे इच्छिलेले कार्य करणाऱ्या अग्ने, तू मूर्तिमंत वाग्देवता आहेस, हे प्रसिद्धच आहे. भक्षण केलेले अन्न पचविण्यासाठी जठराग्निरूपाने त्याचे ठिकाणी राहणाऱ्या या अग्नीने जन्मताक्षणीच आमच्यासाठी घर व अन्न निर्माण केले. हे रस देणाऱ्या अग्निदेवा, अनेकगुणसंपन्न असा तू आम्हाला दुग्धादि रस दे. राजाप्रमाणे शत्रूवर विजय मिळव हिंसादिदोषरहित यजमानाच्या जवळ त्याच्यावर अनुग्रह करण्यासाठी तू राहत असतोस. २३ हे अग्निदेवा, आमची आयुष्ये जेणेकरून वाढतील अशा प्रकारे तू शुद्ध करतोस. आम्हाला क्षीरादि रस आणि अन्न चोहोबाजूंनी पाठवून दे. शत्रूंना आमच्यापासून दूर करून त्यांच्याकडून आम्हास होणारा उपद्रव नष्ट कर. २४ हे अग्निदेवा, तू सत्कार्य करणारा आहेस. यास्तव माझ्या ठिकाणी वेदाध्ययन, जन्मतेज व उत्कृष्ट सामर्थ्य वृद्धिंगत कर. त्याचप्रमाणे माझ्या ठिकाणी पुष्टी आणि धन धारण कर. २५ सर्वांना पवित्र करणाऱ्या हे अग्निदेवा, दीप्तिमान व सुंदर अशा ज्वालारूपी वाणीने तू देवांना बोलाव आणि त्यांचे यजन कर. २६ सर्वशोधका अग्निदेवा, प्रकाशमान असा तू आमच्याकरिता देवांना बोलावून आणि आमचा यज्ञ व तत्संबंधी हविर्द्रव्य देवांच्याजवळ नेऊन पोहोचव. २७ अग्निदेव स्वभावतःच अत्यंत शुद्ध असे आचरण करणारा आहे. ब्राह्मणांचा अभिमानी असल्यामुळे अधिक शुद्ध झाला आहे. आणि विद्वानांचा अभिमान धारण करीत असल्यामुळे तर अत्यंत शुद्ध झाला आहे. आणि म्हणून त्याचे ठिकाणी हवन केल्यानंतर तो दीप्तिमान होऊन शोभत असतो. २८ हे अग्निदेवा, शुद्ध असे तुझे किरण प्रकाशमान होऊन वर जात असतात. आणि तुझी पूजा करणारे हे देवतारूपाला प्राप्त होतात. (अनुवाक १४).

प्रपाठक ४.

१ हे सोम कुटावयास उपयोगी पडणाऱ्या 'उपांशुसवन' नांवाच्या बत्त्या, तुला मी उचलून घेतो. २ तू यज्ञाचा निष्पादक असा दृढ पाषाण आहेस. यास्तव, या बत्त्याला देवांच्यासाठी मोठा कर. उत्कृष्ट व वज्रासारखा कठिण अशा तुझ्या योगाने इंद्रदेवासाठी उत्तम कुटलेला, स्वादिष्ट, दुधासारखा चवदार आणि बुद्धिप्रद असा सोमरस मी तयार करतो. ३ हे सोमा, मेघांचे विदारण करणाऱ्या इंद्राकरता मी तुला मोजून घेतो. ४ वृत्रासुराचा वध करणाऱ्या इंद्राकरिता मी तुला मापून घेतो. ५ पापनाशक इंद्रदेवासाठी मी तुला मापतो. ६ आदित्यासह इंद्रासाठी मी तुला मोजून घेतो. ७ सर्व देवांच्यासह असणाऱ्या इंद्रदेवासाठी मी तुला मोजून घेतो. ८ हे उदकदेवतांनो तुम्ही कोणतेही कार्य त्वरित करणाऱ्या, वृत्रासुराचा नाश करणाऱ्या, अन्नसंपादनासाठी उद्युक्त असणाऱ्या सोमाचे पालन करणाऱ्या व देदीप्यमान अशा देवांच्या ठिकाणी हा यज्ञ स्थापन करा. अध्वर्यूची सूचना दिल्यानंतर तुम्ही सोमरसाचे प्राशन करा. अध्वर्यूच सूचना मिळाल्यानंतर सोमदेवही तुमचे पालन करो. ९ हे सोमदेवा, तुझा द्युलोकात जो प्रकाश आहे त्याच प्रकाशाने या यजमानाला धनाने समृद्ध व विस्तीर्ण अशा गृहाने संपन्न कर, आणि यज्ञाचे फल देणाऱ्या इंद्रदेवाला 'हा यजमान तुझ्या भक्तांमध्ये श्रेष्ठ आहे' असे सांग. १० हे अधिषवण नामक फलकांनो, तुम्ही एकमेकांपासून हलणार नाही अशा घट्ट बसलेल्या आहांतच पण तुमच्यावर सोम कुटला जाऊ लागल्यावरही तुम्ही न हलता घट्ट बसा. सोमरसाला धारण करा. माझ्या ठिकाणी बल स्थापन करा. मी तुम्हाला पीडा करीत नाही व तुम्हीही मला पीडा देऊ नका. ११ हे सोमा, पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण या सर्व दिशा तुझ्याकडे धावत येवोत. मातेप्रमाणे आमचे पालन करणाऱ्या हे सोमदेवा, ठेचल्या जाणाऱ्या प्रत्येक अंशातून रसरूपाने बाहेर ये. १२ हे सोमदेवा, तुझे जे शत्रूंनीही तिरस्कृत न केलेले व जागरूक असे नांव आहे, त्या नांवाचे धारण करणाऱ्या हे सोमा, जागरूकनामधारी अशा तुज सोमाला वल्लीरूप सोमाचे हे तुकडे समर्पण असोत. (अनुवाक १).

१ हे अन्नदात्या सोमदेवा, सर्वांचे पालन करणाऱ्या देवासाठी तू मंत्ररूपी वाणीने शुद्ध हो. रसरूपाने वर्षाव करण्यास समर्थ असा तू पूर्वी अरण्यात

असतांना सूर्यकिरणांनी शुद्ध झालेला आहेस. आणि आता वर्षाव करण्यास समर्थ अशा वल्लीरूप सोमाच्या दोन तुकडयांच्या योगाने आणखी शुद्ध हो. २ हे सोम, देवत्वाला प्राप्त झालेला तू सोमपान करणाऱ्या देवांच्या शुद्धीला कारणभूत आहेस. ज्या देवांचा तू भाग आहेस त्या देवांच्यासाठीच मी तुला या पात्रात भरून घेतो. ३ हे 'उपांशु' ग्रहा, तू मजकडून भरून घेतला गेला आहेस. ४ आमच्याकरिता मधुर अशी अन्ने निर्माण कर पुढे प्राप्त होणाऱ्या देवजन्मात व सध्याच्या मनुष्यजन्मात आमच्या ठिकाणी असलेल्या सर्व इंद्रियांच्या हिताकरिता तुला मी ग्रहण करतो. ५ हे उपांशु ग्रहा, प्राणरूप असलेल्या तुला मन व्यापून राहो. ६ विस्तीर्ण अशा आकाशातून मजबरोबर ये. ७ शरीराचे ठिकाणी सुस्थित अशा हे प्राणरूपग्रहा, बाहेरचा जणू प्राणच अशा सूर्याला मी तुझी आहुती समर्पण करतो. ८ हे लेपा, मरीचींचे पालन करणाऱ्या सूर्यकिरणरूपी देवांच्या तृप्तीसाठी मी तुला परिधीस चोपडतो. ९ हे रिक्तग्रह हे तुझे बसावंयाचे स्थान आहे. प्राणदेवतेच्या संतोषासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक २).

१ हे सोमरसा, तू 'अंतर्याम' संज्ञक लाकडी पात्रात भरून घेतला गेला आहेस. हे धनवान इंद्रदेवा, हे पात्र आमच्या शत्रूच्या डोळ्याआड गुप्त राहील असे कर. त्यातील सोमरसाचे रक्षण कर. आमच्या धनांचे रक्षण कर. उत्कृष्ट अन्ने आम्हास दे. तुझ्या अनुग्रहामुळे आकाश आणि पृथ्वी यांचे मी अन्तर्धान करतो. विस्तीर्ण अन्तरिक्षाचेही अन्तर्धान करतो. हे धनवान इंद्रदेवा, द्युलोकाच्या अलीकडे व पलीकडे असणाऱ्या सर्व देवांच्या सहवर्तमान असा तू या 'अंतर्याम' ग्रहाचे ठिकाणी स्वतःच्या आत्म्याला व इतर देवांच्या आत्म्यांना संतुष्ट कर. २ हे 'अंतर्याम' ग्रहा, तू मजकडून भरून घेतला गेला आहेस. आमच्यासाठी रुचकर व स्वादिष्ट अशी अन्ने निर्माण कर. ३ पुढे प्राप्त होणाऱ्या देवजन्मात आमच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व इंद्रियांच्या हिताकरिता मी तुझे ग्रहण करतो. ४ हे अंतर्याम ग्रहा, अपानरूप असलेल्या तुला मन व्यापून राहो. ५ विस्तीर्ण अशा अंतरिक्षातून मजबरोबर ये. ६ शरीराच्या ठिकाणी सुस्थित असणाऱ्या हे अपानरूप ग्रहा, बाहेरचा जणू प्राणच अशा सूर्याला मी तुला समर्पण करतो. ७ हे हुतावशिष्ट लेपा, मरीचींचे पालन करणाऱ्या सूर्यकिरणरूपी देवांच्या तृप्तीसाठी मी तुला या परिधीस

चोपडतो. ८ हे रिकाम्या ग्रहपात्रा, हे तुझे स्थान आहे. अपान देवतेच्या संतोषासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ३).

१ हे वायो, तू येथे ये आणि 'ग्रह' संज्ञक पात्रांना अलंकृत कर. शुद्ध केलेल्या सोमरसाचे पान करणाऱ्या हे वायुदेवा, तू आमच्या जवळ ये. हे विश्वव्यापका, तुझे वाहन असलेले घोडे हजार आहेत. तुझे सोमरसरूपी अन्न हर्षजनक आहे. यास्तव तुझ्याजवळ मी आलो आहे. हे देवा, ज्याअर्थी सोमरसाचे प्रथम पान करावे असे तुझ्या मनात आहे, त्या अर्थी सोमरस घेऊनच मी तुजजवळ आलो आहे. २ हे सोमरसा, पृथ्वीपासून परंपरेने निर्माण झालेल्या 'ऐंद्रवायव' नामक लाकडी पात्रात तू भरून घेतला गेला आहेस. वायुदेवतेसाठी मी तुला आणखी भरून घेतो. ३ हे इंद्रवायूहो, हे सोमवल्लीचे तुकडे चांगले कुटले आहेत, व त्यांचा रस काढला आहे. ज्या अर्थी सोमरस तुमचीच इच्छा करीत आहे त्या अर्थी या सोमरसाचे पान करण्याच्या निमित्ताने तुम्ही आमच्या जवळ या. ४ हे सोमरसा तू लाकडी पात्रात भरून घेतला गेला आहेस. इंद्र व वायू या दोघा देवांना संतुष्ट करण्यासाठी मी तुला भरून घेत आहे. ५ हे ऐंद्रवायव ग्रहा, हे तुझे निवासस्थान आहे. परस्परांवर सारखेच प्रेम करणाऱ्या इंद्र व वायू या दोघा देवांच्यासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ४).

१ सत्याची वाढ करणाऱ्या मित्रावरुणहो, तुमच्याकरिता हा सोम कुटून तयार केला आहे. यास्तव या यज्ञात माझे निमंत्रण तुम्ही श्रवण करा. २ हे सोमरसा तू लाकडाच्या बनविलेल्या 'मैत्रावरुण' संज्ञक ग्रहपात्रात भरून घेतला गेला आहेस. मित्र व वरुण या दोन देवांच्या करिता मी तुला भरून घेत आहे. ३ हे मैत्रावरुण ग्रहा, हे तुझे स्थान आहे. सत्याची इच्छा करणाऱ्या मित्र व वरुण या दोघांच्यासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ५).

१ हे अश्विनीकुमार हो, तुमची मधुर आणि प्रियवचनयुक्त अशी जी वाणी आहे, त्या वाणीने यज्ञावर सिंचन करा. म्हणजे तुम्ही आपल्या मधुरवाणीने यज्ञानुष्ठानाचे निष्पादन करा. २ हे सोमरसा, तू लाकडाच्या बनविलेल्या 'आश्विन' पात्रात भरून घेतला जात आहेस अश्विनीकुमारांच्यासाठी मी तुला भरून घेतो. ३ हे आश्विन ग्रहा, हे तुझे निवासस्थान आहे. माधुर्याची जणू मूर्तीच अशा अश्विनीकुमारांच्या तृप्तीसाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ६).

१ हे अश्विनीकुमार हो, तुम्ही प्रातःकालीच या यजमानाशी संयुक्त होऊन इतर यजमानांच्याशी फटकून रहा. या सोमरसाचे पान करण्याकरिता तुम्ही दोघे येथे या. २ हे सोमरसा तू 'आश्विन' नामक लाकडी पात्रात भरून घेतला गेला आहेस. उभयता अश्विनीकुमारांच्यासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे आश्विन ग्रहा, हे तुझे राहण्याचे ठिकाण आहे. अश्विनीकुमारांच्यासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ७).

१ गर्भ जाराने वेष्टित असतो त्याप्रमाणे विद्युत्प्रकाशाने वेष्टित असा हा सुंदर इंद्रदेव द्युलोकव्याप्त अशा शुष्क भूप्रदेशावर सूर्याच्या ठिकाणी गर्भभूत असलेल्या उदकांचा वर्षाव करतो. यज्ञकर्मात नियुक्त झालेले ऋत्विज सूर्यकिरणे व उदक यांच्या संगमाचे ठिकाणी त्या इंद्ररूपी तान्ह्या बालकाला मंत्रसहित अशा आहुतींनी आळवीत असतात. २ हे सोमरसा, तू लाकडाच्या बनविलेल्या 'शुक्र' संज्ञक पात्रात भरून घेतला गेला आहेस. शुक्रपुत्र शंडाच्या तृप्तीसाठी मी तुला भरून घेतो. हे शुक्रग्रहा, 'खर' नांवाचा ओटा हे तुझे निवासस्थान आहे. शंडनामक असुर पुरोहिताच्या संतोषासाठी मी तुला येथे ठेवतो. तू येथे राहून यजमानाच्या कर्मशौर्याचे रक्षण कर. (अनुवाक ८).

१ भृगु इत्यादि प्राचीन ऋषी, आमचे पितृपितामहादि पूर्वज, गतकालीन यज्ञकर्ते यजमान आणि आताचे यजमान यांनी ज्याप्रमाणे स्तुती केली त्याचप्रमाणे आम्ही त्या इंद्राची स्तुती करीत आहोत. हे इंद्रा, जो तू आम्हाला प्रतिकूल व वर्जनीय अशा आळस, अश्रद्धा इत्यादिकांचा नाश करतोस आणि यज्ञक्रियांमध्ये जलद व उत्कृष्ट अशा अनुष्ठानाने इतर यजमानांना जिंकून, जो यजमान अधिक योग्यता संपादन करतो त्याला तू सोमपानाने व प्रशंसेने वाढवितोस. या यज्ञक्रियांमध्ये आम्ही तुज इंद्राची स्तुती करीत असतो. २ हे सोमग्रहा, तू 'मंथि' नामक लाकडी पात्रात भरून घेतला जात आहेस. 'मर्क' नांवाच्या असुर पुरोहितासाठी तुझे मी ग्रहण करतो. ३ हे मंथिग्रहा, 'खर' नांवाचा हा ओटा म्हणजे तुझे निवासस्थान होय. या ठिकाणी बसून तू यजमानाच्या प्रजेचे रक्षण कर. (अनुवाक ९).

१ हे देवहो, जे तुम्ही आपल्या महिम्याने द्युलोकात अकराजण राहत असता, पृथ्वीवर अकराजण राहत असता आणि अन्तरिक्षात राहणारे जे तुम्ही अकराजण आहात त्या सर्व देवांनो, तुम्ही या यज्ञाचे प्रेमाने सेवन करा. २ हे सोमरसा, पृथ्वीपासून पर्यायाने निर्माण झालेल्या या धातुमय स्थालीत तू भरून घेतला गेला आहेस. 'आग्रयण' या नांवाने तू ओळखला

जात आहेस. यजमानाला श्रेष्ठत्व प्राप्त करून देणारा तू यज्ञाला सुखपर्यवसायी कर आणि यजमानालाही संतुष्ट कर. सकाळी, दुपारी व सायंकाळी चालणाऱ्या अनुष्ठानाचे तू सर्व बाजूंनी रक्षण कर. विष्णू तुझे पालन करो. व तू इंद्रियशक्तींना स्वकार्यक्षम करून यजमानाच्या प्रजेचे पालन कर. ३ हे आग्रयण ग्रहा रवरनामक ओटा हे तुझे स्थान आहे. सर्व देवांच्यासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक १०).

१ अकरा अकरांच्या तीन गटांनी राहणारे, अर्थात तीस आणि तीन मिळून तेहतीस देव शत्रूंचा नाश करून त्यांच्या स्त्रियांना रडावयास लावणारे आहेत. त्यापैकी काही द्युलोकात व काही पृथ्वीवर राहतात. आणि उरलेले अकरा देव अंतरिक्षात राहतात. तीनही स्थानात राहणारे ते देव कुटून तयार केलेला सोमरस तृतीय सवनामध्ये म्हणजे सायंकाळी चालणाऱ्या अनुष्ठानात सेवन करोत. २ हे सोमरसा तू पृथ्वीपासून पर्यायाने निर्माण झालेल्या धातुमय थालीत भरुन घेतला गेला असून 'आग्रयण' हे नांव तू धारण केले आहेस. यजमानाला श्रेष्ठता प्राप्त करून देणारा तू यज्ञाला सुखजनक कर आणि यजमानालाही सुखी कर. सकाळी, दुपारी व सायंकाळी चालू राहणाऱ्या 'सवन' संज्ञक अनुष्ठानाचे तू सर्व बाजूंनी संरक्षण कर. यज्ञाचा अधिष्ठाता भगवान विष्णू तुझे पालन करो. इंद्रियांना सामर्थ्य देऊन यजमानाच्या प्रजेचे तू संरक्षण कर. ३ हे आग्रयण ग्रहा, 'रवर' नांवाचा ओटा म्हणजे तुझे निवासस्थानच आहे. सर्व देवांच्या तृप्तीसाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ११).

१ हे सोमरसा, तू पृथ्वीमध्येच निर्माण झालेल्या धातूपासून बनविलेल्या स्थालीत भरून घेतला गेला आहेस. 'बृहत्'सामप्रिय, सोमरूपी अन्नाची आवड असलेला व 'शस्त्र' संज्ञक मंत्र पठणाची इच्छा मनात असणाऱ्या इंद्रासाठी मी तुझे ग्रहण करीत आहे. हे इंद्रा, जे तुझे महनीय असे सोमरसरूपी अन्न आहे, त्याचे पान करण्यासाठीच मी तुला प्रार्थना करीत आहे. हे सोमरसा, यज्ञाचा अधिष्ठाता असलेल्या भगवान विष्णूसाठीच मी तुला घेत आहे. २ हे उक्थ ग्रहा 'रवर' नांचाचा ओटा म्हणजे तुझे निवासस्थानच होय. यास्तव 'उक्थ' नांवाच्या शस्त्राची म्हणजे विशिष्ट अशा मंत्रपठणाची आवड असणाऱ्या इंद्रासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक १२).

१ द्युलोकाचे जणू मस्तकच अशा उंच ठिकाणी सूर्यरूपाने तळपत

राहून द्युलोकाला प्रकाशित करणारा, पृथ्वीच्या पाठीवर केव्हाही न थांबता दहन, पचन व प्रकाश यांच्या द्वारा सर्वदा सर्वांवर अनुग्रह करीत राहणारा, जठराग्निरूपाने सर्वांच्या उदरात राहून अन्न पचविणारा, यज्ञासाठी आहवनीय इत्यादि रूपाने उत्पन्न होणारा, परावरदर्शी, स्वतःच्या ऐश्वर्याने प्रकाशित होणारा आणि गृहस्थांच्या घरचा सन्मान्य अतिथी अशा अग्नीचे आम्ही स्तवन करतो. स्तवनीय अशा अग्नीच्या मुखाचे ठिकाणी हवन करण्याकरिता देवांनी ग्रहचमसरूप पात्र निर्माण केले. २ हे सोमरसा, तू पृथ्वीवरच उत्पन्न झालेल्या या धातुमय स्थालीत भरून घेतला गेला आहेस. वैश्वानर नामक अग्नीसाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे ग्रह तू 'ध्रुव' हे नांव धारण केलेला आहेस. तू एकाच जागी स्थिर राहणारा आहेस. एकाच जागी स्थिर राहणाऱ्या पात्रांमध्ये तू अधिक स्थिर राहणारा व न पाझरणाऱ्या इतर पात्रांमध्ये मुळीच न पाझरणारा आहेस. ४ हे तुझे निवासस्थान आहे. वैश्वानर नांवाच्या अग्नीसाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक १३).

१ हे सोमरसा, तू पृथ्वीपासून उत्पन्न झालेल्या लाकडी 'ऋतुग्रह' पात्रात भरून घेतला गेलेला आणि चैत्र. २ वैशाख ३ ज्येष्ठ ४ आषाढ ५ श्रावण ६ भाद्रपद ७ आश्विन ८ कार्तिक ९ मार्गशीर्ष १० पौष ११ माघ १२ आणि फाल्गुन मासरूप आहेस. १३ संक्रान्तिरहित असा क्षयमासही जणू तूच आहेस. १४ दोन संक्रांती असलेल्या 'अंहस्पति' नांवाच्या महिन्यासाठी मी तुझे ग्रहण करतो. (अनुवाक १४).

१ हे इंद्राग्नी हो, स्तुतींनी युक्त व स्वर्गस्थ देवांनाही प्रार्थनीय अशा या कुटून तयार केलेल्या सोमरसाजवळ या आणि बुद्धिपुरःसर प्रार्थना केलेले तुम्ही या सोमरसातील आपापल्या अंशाचे प्राशन करा. २ हे सोमरसा, तू 'द्विदेवत्य' नांवाच्या लाकडी पात्रात भरून घेतला गेला आहेस. इंद्र व अग्नी या दोघा देवांच्या करता मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक १५).

१ हे देवहो, जे तुम्ही आपल्या महिम्याने द्युलोकात अकरा जण राहत असता, पृथ्वीवर अकरा जण राहत असता आणि अंतरिक्षात राहणारे जे तुम्ही अकरा जण आहात, त्या सर्व देवांनो, तुम्ही या यज्ञाचे प्रेमाने सेवन करा. २ हे सोमरसा, पृथ्वीपासूनच पर्यायाने निर्माण झालेल्या या धातुमय स्थालीत तू भरून घेतला गेला आहेस. 'आग्रयण' या नांवाने तू ओळखला जात आहेस. यजमानाला श्रेष्ठत्व प्राप्त करून देणारा तू यज्ञाला

सुखपर्यवयायी कर. आणि यजमानालाही संतुष्ट कर. सकाळी दुपारी व सायंकाळी चालणाऱ्या अनुष्ठानाचे तू सर्व बाजूंनी रक्षण कर. विष्णू तुला पालन करो, व तू इंद्रियशक्तींना स्वकार्यक्षम करून यजमानाच्या प्रजेचे पालन कर. ३ हे आग्रयण मी तुझे ग्रहण करीत आहे. हे द्विदेवत्य ग्रहा हे तुझे स्थान आहे, इंद्राग्नींच्यासाठीं मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक १६).

१ मरुद्गणांसह असणारा, पर्जन्यवृष्टी करणारा, उपासकांच्या मन:कामना वाढविणारा, शत्रूंच्याकडूनही आनंदित, द्युलोकवासी, दुष्टांचे शासन करणारा, जगत्पालनाचा भार सहन करणारा, उपासकाच्या रक्षणाविषयी तत्पर, नवीन उपस्थित होणाऱ्या शत्रूच्या नाशाविषयी अत्यंत उग्र आणि बलप्रद अशा त्या इंद्राला आम्ही येथे बोलावतो. २ हे सोमरसा तू उपयाम म्हणजे पृथ्वीवर निर्माण झालेल्या वृक्षाच्या लाकडाच्या पात्रात भरून घेतला गेला आहेस. मरुद्गणांसह असलेल्या इंद्रासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे 'मरूत्वतीय' ग्रहा, हे तुझे निवासस्थान आहे. मरुद्गणांसह इंद्रासाठी तुला मी येथे ठेवतो. (अनुवाक १७).

१ मरुद्गणांसह असणाऱ्या हे इंद्रदेवा, जसा 'शर्याति' राजाच्या यज्ञात कुटून तयार केलेल्या सोमरसाचा अंश तू प्राशन केलास तसाच ह्या यज्ञात हा सोमरसाचा अंश तू प्राशन कर. हे शूरा, तुझ्या आज्ञेने उत्कृष्ट यज्ञ करणारे प्राचीन विद्वान तुला सुखविण्यासाठीच तुझी प्रामुख्याने सेवा करीत तशीच आम्ही करीत आहोत. २ हे सोमरसा, तू 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. मरुद्गणांसह इंद्रासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे मरूत्वतीय ग्रहा, हे तुझे निवासस्थल आहे. मरुद्गणांसह इंद्रासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक १८).

१ हे इंद्रदेवा, मरुद्गणांनीयुक्त व पर्जन्यवृष्टी करणारा तू क्रीडा करण्यासाठी प्रत्येक सवनात हविर्द्रव्यरूपी अन्नाबरोबर सोमरसाचे पान कर. आनंद व्हावा म्हणून मधुर अशा सोमरसाचे सार तू आपल्या उदरात साठीव. तू यजमानाला प्राप्त होणाऱ्या स्वर्गाचा व कुटून तयार केलेल्या सोमरसांचा राजा आहेस. २ हे सोमरसा, तू उपयाम शब्दाने उपलक्षित अशा लाकडी पात्रात भरून घेतला गेला आहेस. मरुद्गणांसह इंद्रासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे मरुत्वतीय ग्रहा, हे तुझे स्थान आहे. मरुद्गणांसह इंद्राकरिता मी तुला येथे ठेवीत आहे. (अनुवाक १९).

१ बलाने अत्यंत मोठा व पर्जन्याप्रमाणे वृष्टी करणारा जो इंद्र तो वत्सरूप अशा यजमानाच्या स्तुतींनी वृद्धिंगत होवो. २ हे सोमरसा, तू 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. महेंद्रदेवासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे महेंद्र ग्रहा, हे तुझे स्थान आहे. महेंद्रासाठी मी तुला या ठिकाणी ठेवतो. (अनुवाक २०).

१ महान प्रभावशाली असूनही सामान्य मनुष्याप्रमाणे उपासकाने बोलावताच येणारा हा इंद्र मनुष्यांना इच्छित असे भोग देणारा, आणि प्रकृतिरूप व विकृतिरूप अशा दोन प्रकारच्या सोमयागांनी वृद्धिंगत होणारा, बलांनी अनुपम असून आम्ही दिलेल्या हविर्द्रव्यांनी वृद्धिंगत झालेला आहे. सामर्थ्य प्राप्त व्हावे म्हणून यज्ञकर्त्या यजमानांनी त्याला दिलेल्या हविर्द्रव्यांच्या योगाने तो यशाने विपुल, बलाने विस्तृत, आणि उत्कृष्ट कर्तृत्वशाली झाला आहे. २ हे सोमरसा, तू उपयाम पात्रात भरून घेतला गेला आहेस. महेंद्रासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे महेंद्रग्रहा, तुझे हे निवासस्थान आहे. महेंद्राकरिता तुला मी येथे ठेवतो. (अनुवाक २१).

१ हे इंद्र शब्दोपलक्षित आदित्य देवा, तू आपल्या उपासकांवर केव्हाही रुष्ट होऊन त्यास पीडा देत नाहीस. इतकेच नव्हे तर तुला हवी प्रदान करणाऱ्या उपासकाला फल देण्यासाठी तू त्याच्या अगदी सन्निध जातोस. हे धनवान आदित्य देवा, प्रकाशमान अशा तुज देवाला देण्यात येणारे हविर्द्रव्य पुन्हा पुन्हा तुझ्याजवळ येत असते. २ हे सोमरसा तू 'उपयाम' शब्दोपलक्षित अशा पात्रात भरून घेतला गेला आहेस. बारा आदित्यांच्या साठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे आदित्यदेवा, उपासकावर उपकार करण्यात तू केव्हाही प्रमाद करीत नाहीस. इतकेच नव्हे तर त्याच्या चालू आणि पुढे येणाऱ्या अशा दोन्ही जन्मात त्याचे तू अत्यंत प्रेमाने पालन करतोस. 'तृतीयसवन' हे तुझे आहे. त्या सवनात तुझ्या इंद्रियशक्तींची वाढ करणारे अमृतासमान दही द्युलोकसमान अशा हविर्धान मंडपात अभिमुखतेने आणून ठेवलेले आहे. ४ यज्ञपुरुष देवांच्या ठिकाणी सुख उत्पन्न करतो. हे आदित्यहो, तुम्ही आम्हाला सुख देणारे व्हा. तुमची अनुग्रहबुद्धी अर्वाचीन अशा उपासकांवर उपकार करण्यास प्रवृत्त होऊन आमच्याकडे वळो. जी तुमची अनुग्रहबुद्धी आमच्या पापाचा नाश करते ती अनुग्रहबुद्धी आम्ही केलेली सेवा पूर्णपणे जाणणारी होवो. ५ विशिष्ट स्थळी राहणाऱ्या 'विवस्वन्' नांवाच्या आदित्य देवा, हा तुला पिण्याला योग्य असा सोमरस आहे. त्याच्या दर्शनाने तू

हर्षित हो आणि त्याच्या प्राशनाने तृप्त हो. तुला तृप्त करणारे आम्ही देखील तृप्त होऊ. ६ हे सोमरसा, द्युलोकातून होणाऱ्या पर्जन्यवृष्टीला कारणभूत अशा या दह्याशी तुला मिसळतो. (अनुवाक २२).

१ सर्वप्रेरका हे सवित्या, आम्ही आज केलेल्या सत्कर्माचे आजच आम्हाला उपभोग्य असे फल दे. उद्या करू त्या कर्माचे उद्या व परवापासून दररोज करू त्या कर्माचे परवापासून दररोज उपभोगास योग्य असे फल देत जा. हे देवा 'उपभोगास योग्य अशा स्वर्गलोकाच्या ठिकाणी दीर्घकाळ आमचे वास्तव्य व्हावे' अशा श्रद्धायुक्त बुद्धीने आम्ही आचरणीय अशा यज्ञकर्माचे अनुष्ठान आमच्याकडून होवो. २ हे सोमरसा, तू उपयाम पात्रात भरून घेतला गेला आहेस. सवितादेवासाठी मी तुझे ग्रहण करतो. (अनुवाक २३).

१ हे देवा सवित्या, तू हिंसारहित व आमचे पालन करणाऱ्या अशा मंगलकारक अनुग्रहांनी आमच्या घराचे सर्वतोपरी रक्षण कर. सुवर्णाप्रमाणे रमणीय व आमच्या हिताचे भाषण करणाऱ्या जिव्हेने युक्त असा तू सुखाने जावयास योग्य असा स्वर्गलोक मिळावा म्हणून नवीनच आरंभिलेल्या या यज्ञकर्माचे रक्षण कर. विचित्रपणे आमचा घात करणारा कोणीही शत्रू आमच्यावर घाला घालण्यास समर्थ न होवो. २ हे सोमा तू उपयाम पात्रात भरून घेतला गेला आहेस. सवितृदेवासाठी मी तुझे ग्रहण करतो. (अनुवाक २४).

१ आमचे रक्षण होण्याकरता आम्हास देण्यासाठी हातात सुवर्ण घेतलेल्या सवितादेवाला आम्ही जवळ बोलावीत आहोत. तो सवितादेव आम्हाला योग्य असे स्थान जाणणारा आहे. २ हे सोमरसा, तू 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. सवितृदेवासाठी मी तुझे ग्रहण करतो. (अनुवाक २५).

१ हे वैश्वदेवग्रहा, तू उत्कृष्ट नांवाचा आणि उत्तम स्थली राहणारा आहेस. 'शस्त्र' पठणात स्तविल्या जाणाऱ्या तुज ग्रहाला मोठा नमस्कार असो. हे तुझे स्थान आहे. सर्व देवांच्या तृप्तीसाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक २६).

१ इंद्रियसामर्थ्याने संपन्न अशा हे सोमदेवा, तुझ्या संबंधी मोठया यज्ञाचा पालक असलेल्या यजमानाने कुटून तयार केलेल्या सोमरसाला 'पत्नीवत्' देवात्मक ग्रहात मी भरून घेतो.२ 'पत्नीवत्' नामका हे अग्निदेवा,त्वष्टा देवासह तू सोमरसाचे पान कर. ही आहुती तुला अर्पण असो.(अनुवाक २७).

१ हे सोमा, तू हिरव्या रंगाचा, रथाला हिरवे घोडे जोडणाऱ्या इंद्र देवाच्या अधिष्ठानाखाली राहणारा, इंद्राबरोबर हिरवे घोडे जोडलेल्या रथात बसणारा, इंद्राशी एकरूप असल्यामुळे इंद्राच्या हातातील वज्राला पोषक असणारा आणि यज्ञाच्या द्वारे यजमानाकडे अन्न पाठविणारा आहेस. हे देवा, इष्ट अशा मंत्राने अभिमंत्रित, विशिष्टसंख्यात्मक अशा स्तोत्रांनी स्तविलेल्या, निरनिराळ्या शस्त्रांनी. म्हणजे विशिष्ट प्रकारच्या मंत्रपठनांनी प्रशंसिलेल्या तुला अर्पण करण्यासाठी मी इंद्रदेवतात्मक 'हरिवंता' नांवाचा ग्रह भरून घेतो. २ हे धानाहो, तुम्ही इंद्रदेवाचा रथ ओढणाऱ्या हिरव्या घोडयांच्या रंगाप्रमाणे हिरव्या रंगाच्या असल्याने 'हरी' या संज्ञेला पात्र झालेल्या व सोमरसाशी संमिश्र झालेल्या आहात. ३ हे धानारूपी हविर्द्रव्य इंद्राला समर्पण असो. (अनुवाक २८).

१ हे अग्निदेवा, तू भक्तजनांचे आयुष्य वाढवितोस. आम्हाला भरपूर अन्न व बल दे. आमच्या वैऱ्यांना ते आमच्यापासून नेहमी दूर राहतील अशा प्रकारे त्रास दे.२ हे सोमरसा, तू 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. तेजस्वी अशा अग्निदेवासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे अतिग्राह्य ग्रहा हे तुझे स्थान आहे. तेजस्वी असणाऱ्या अग्नीसाठी मी तुला येथे ठेवतो.(अनुवाक २९).

१ हे इंद्रा,कुटून तयार केलेल्या सोमरसाचे पान केल्यानंतर बल युक्त असा तू उठून उभा राहताना आनंदाच्या भरात आपले ओठ चाळवून मिटक्या मार.२ हे सोमरसा तू उपयाम पात्रात भरून घेतला गेला आहेस. बलशाली अशा इंद्रासाठी मी तुझे ग्रहण करतो.३ हे 'अतिग्राह्य' ग्रहा, हे तुझे निवासस्थान आहे. बलसंपन्न इंद्रासाठी मी तुला येथे ठेवतो.(अनुवाक ३०).

१ हे भगवन् सूर्यनारायणा, तू अंधकारातून पलीकडे नेणारा, सर्व प्राण्यांनी दर्शन करण्याला योग्य, आणि सर्व लोकांत प्रकाश करणारा आहेस. तू सर्व जग देदीप्यमान होईल अशा रीतीने प्रकाशित करतोस. २ हे सोमरसा, तू उपयाम पात्रात भरून घेतला गेला आहेस. कांतियुक्त अशा सूर्यदेवासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे अतिग्राह्य ग्रहा, हे तुझे राहण्याचे ठिकाण आहे. कांतिमान अशा सूर्यदेवासाठी मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ३१).

१ हे हर्षयुक्त अशा सोमदेवा, आमचे रक्षण करणाऱ्या अशा सर्वप्रकारच्या शक्तींनी तू वृद्धिंगत हो. आमच्या संरक्षणाविषयी तू अत्यंत कीर्तियुक्त हो.

(अनुवाक ३२).

१ जे लोक प्रभातकाळ निर्माण करणाऱ्या उष:कालदेवतेला इतरांच्या पुष्कळ अगोदर पाहतात ते लोक त्या देवतेला प्राप्त होतात. ती देवता आम्हाला देखील सत्वर प्रत्यक्ष पाहण्याला योग्य अशी झाली आहे. जे लोक रात्र संपण्याचे वेळी तिला पाहतात ते देखील त्या उष:कालदेवतेला प्राप्त होतात. (अनुवाक ३३).

१ हे इष्टके, प्रकाशमान अशा तुला मी येथे ठेवतो. २ हे इष्टके, प्रकाश करणाऱ्या तुला मी येथे स्थापन करतो. ३ हे इष्टके, प्रकाशकाला जाणणाऱ्या तुला मी येथे ठेवतो. ४ हे इष्टके, शांत अशा तेजाने युक्त असलेल्या तुला मी येथे ठेवतो. ५ हे इष्टके, रखरखित लाल दिसणाऱ्या तुला मी येथे ठेवतो. ६ तयार होत असताना विशिष्ट असा आवाज करणाऱ्या तुला मी येथे स्थापन करतो. ७ देदीप्यमान अशा तुला मी येथे ठेवतो. ८ सुंदर दिसणाऱ्या तुला मी येथे ठेवतो. ९ निरंतर टिकणाऱ्या तुला मी येथे ठेवतो. १० मोठ्या प्रकाशाने युक्त अशा तुला येथे ठेवतो. ११ आपली ओळख पटवून देणाऱ्या तुला मी येथे ठेवतो. १२ स्वकर्म करण्याविषयी जागृत राहणाऱ्या तुला मी येथे ठेवतो. (अनुवाक ३४).

१ प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. २ सर्वकाळ प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. ३ विविध प्रकारचा प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. ४ उत्तम प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. ५ उच्च प्रतीचा प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. ६ हलक्या प्रतीचा प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. ७ पायाशुद्ध प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो ८ शोकजनक प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. ९ इतरांना तापदायक असा प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. १० स्वत:ला तापदायक प्रयत्न करणाऱ्या देवाला ही आहुती अर्पण असो. ११ ब्रह्महत्येच्या देवतेला ही आहुती अर्पण असो. १२ विश्वात्मक परमात्म्याला ही आहुती अर्पण असो (अनुवाक ३५).

१ संतान नांवाच्या पशूच्या अवयवाने 'चिंतन करणाऱ्या' देवाला मी संतुष्ट करतो. २ यक्न नांवाच्या अवयवाने 'भव' देवाला संतुष्ट करतो. ३ तनिम नामक अवयवाने 'रूद्र' देवाला मी संतोषित करतो. ४ स्थूल

हृदयाने मी 'पशुपति' देवाला संतुष्ट करतो. ५ सूक्ष्म हृदयाने मी 'अग्नि' देवाला संतुष्ट करतो. ६ रक्ताने मी 'रुद्र' देवाला संतुष्ट करतो. ७ मतस्न नामक दोन अवयवांनी 'शर्व' देवाला संतुष्ट करतो. ८ अंत:पार्श्व नामक अवयवाने महादेवाला संतोषित करतो. ९ त्याचप्रमाणे शिंगी व निकोश्या या नांवाच्या दोन अवयवांनी ओशिष्ठहन नामक देवाला मी संतोषित करतो. (अनुवाक ३६).

१ हे वृत्रासुरनाशक इंद्रदेवा, तुझे हिरवे घोडे तुझ्या रथाला मंत्र म्हणून जोडले आहेत. यास्तव तू रथात बैस. हा सोम कुटावयाचा दगडी बत्ता ठक्, ठक् अशा आपल्या मधुर ध्वनीने तुझे मन उत्तम प्रकारे कुटून तयार झालेल्या सोमरसाकडे वळव. २ हे सोमरसा तू 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. सोळाव्या स्तोत्राने व शस्त्राते स्तविल्या व प्रशंसिल्या जाणाऱ्या इंद्रासाठी मी तुझे ग्रहण करतो ३ हे षोडशिग्रहा, हे तुझे स्थान आहे. 'षोडशिन्' या शब्दाने उपलक्षित होणाऱ्या इंद्राकरिता मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ३७).

१ मंत्रांनी केल्या गेलेल्या स्तुती व मनुष्यांनी केलेला यज्ञ यांच्या सन्निध येऊन पोचण्याकरिता कोणाकडूनही ज्याच्या बलाचा तिरस्कार झालेला नाही अशा इंद्रालाच हिरव्या रंगाचे घोडे रथातून वाहून आणतात. २ हे सोमरसा तू 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. 'षोडशिन्' संज्ञक इंद्राच्यासाठी मी तुझे ग्रहण करीत आहे. ३ हे षोडशिग्रहा हे तुझे स्थान आहे. 'षोडशिन्' संज्ञक इंद्राकरिता मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक ३८).

१ अत्यंत बलशाली अशा हे इंद्रदेवा, तुझ्यासाठी सोम कुटून त्याचा रस काढला आहे. हे धैर्यशीला, इकडे ये. किरणांनी आकर्षित केलेले उदक सूर्याला व्यापून राहते त्याप्रमाणे इंद्रियशक्ती तुला व्यापून राहोत. २ हे सोमरसा तू 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. 'षोडशिन्' नामक इंद्राकरिता मी तुझे ग्रहण करतो. ३ हे षोडशिग्रहा, हे तुझे निवासस्थल आहे. 'षोडशिन्' इंद्रासाठी मी तुलां येथे ठेवतो. (अनुवाक ३९).

१ हे इंद्रा, प्राणिमात्राच्या भोवती पसरून राहिलेली ही अत्यंत विस्तीर्ण भूदेवी तुला आपल्या मांडीवर घेवो. हे देवी भूमाते या इंद्राला तू सुखप्रद व उत्कृष्ट असे निवासस्थान देणारी हो. त्याचप्रमाणे या यजमानासाठी अतिविस्तृत होऊन तू त्याला सुख दे. २ हे सोमा उपयाम पात्रात तू भरून घेतला

...ला आहेस. षोडशिन् इंद्राकरिता मी तुझे ग्रहण करतो. ३ हे षोडशिग्रहा हे तुझे ...धारास्थान आहे. षोडशिन् इंद्रासाठी मी तुला येथें ठेवतो. (अनुवाक ४०).

१ अत्यंत श्रेष्ठ व वज्राप्रमाणे कठिण असे बाहू असलेला आणि सोळाव्या स्तोत्राने स्तविला जाणारा इंद्रदेव आम्हाला सुख देवो. धनवान असा तो इंद्रदेव आमचे कल्याण करो. आणि जो आमचा द्वेष करतो त्या पापी मनुष्याला ठार करो. २ हे सोमरसा, तू 'उपयाम' संज्ञक पात्रात भरून घेतला गेला आहेस. 'षोडशिन्' इंद्रासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे षोडशिग्रहा, तुझे हे स्थान आहे. 'षोडशिन्' संज्ञक इंद्राकरिता तुला मी येथे ठेवतो. (अनुवाक ४१).

१ हे वृत्रासुरनाशका, शूर इंद्रदेवा, प्रीतियुक्त मरुतांच्या योगाने 'सगण' म्हणजे समुदायासहवर्तमान असणारा तू यजमानाची भक्ती जाणून त्याने दिलेल्या सोमरसाचे पान कर. आम्हाला मारावयास टपलेल्या शत्रूंना तू मारून टाक. इतर वैऱ्यांना आमच्यापासून दूर करून ठेव. आणि नंतर आम्हाला सर्वतोपरी निर्भय कर. २ हे सोमरसा, तू उपयाम संज्ञक पात्रात भरून घेतला गेला आहेस. षोडशिन् इंद्रासाठी मी तुझे ग्रहण करतो. ३ हे षोडशिग्रहा हे तुझे स्थान आहे. षोडशिन् संज्ञक इंद्राकरिता तुला मी येथे ठेवतो. (अनुवाक ४२).

१ सर्व जगाला सूर्य दृष्टी पडावा म्हणूनच किरणरूपी घोडे त्या जन्मजात ज्ञानी अशा देदीप्यमान सूर्याला अत्यंत उंच अशा उदयाचलावर वाहून आणीत असतात. २ मित्र, वरुण व अग्नी यांचा अर्थात उपलक्षणाने त्रैलोक्यातील प्राणिमात्राचा जणू नेत्रच आणि अत्यंत आश्चर्यकारक, अनेक रंगांनी युक्त व जणू काय किरणांचे एकत्र झालेले सैन्यच असे हे आदित्यमंडल उदयास आले आहे. या मंडलाच्या ठिकाणी असणारा भगवान सूर्यनारायण स्थावर व जंगम अशा सर्व जगाचा आत्माच असून त्याने द्युलोक, पृथ्वी व अंतरिक्ष व्यापून टाकले आहे. ३ हे अग्निदेवा धनाची प्राप्ती होईल अशा प्रकारे तू आम्हाला चांगल्या मार्गाने ने. हे प्रकाशरूपा अग्निदेवा तू सर्व मार्ग जाणणारा आहेस. निंद्य असे पातक आमच्या पासून दूर कर. तुला पुष्कळ वेळा आम्ही नमस्कारपूर्वक स्तुतिवचनांनी आळवीत आहोत. ४ हे हिरण्य, तू प्रथम आकाशात जा, आणि नंतर तेथून स्वर्गलोकाला जाऊन पोच. ५

हे दक्षिणारूपी गाईंनो, सुवर्णासारख्या सुंदर अशा रूपाने वेदीच्या दक्षिणबाजूस उभ्या असलेल्या तुमचे ते मनोहर रूप पाहूनच मी तुमच्या समोर येत आहे. ६ अत्यंत उंच अशा स्वर्गलोकावर सर्वज्ञ असा अधिष्ठित झालेला 'तुथ' नामक देव तुमची विभागणी करो. ७ हे अग्निदेवा, दक्षिणाद्रव्याच्या रूपाने असणाऱ्या ह्या गाई हेच तुझे धन या सोमभागात येऊन पोचले आहे. ते शांत अशा तुझ्या मार्गाने घेऊन जा. हे दक्षिणारूपी गाईंनो, सुवर्णाप्रमाणे आल्हाददायक अशा तुम्ही सुखकर अशा यज्ञभूमीतील मार्गाने नेल्या जात असतांना सत्यफल देणाऱ्या देवाने तुमची जसजशी विभागणी केली असेल ती न बिघडेल अशा पद्धतीने अर्थात् सत्यमार्गाला अनुसरून जा. ८ आजच्या यज्ञाच्या दिवशी वेदार्थ जाणणारा वेदार्थज्ञाचाच पुत्र, पित्यानेच उत्कृष्ट शिक्षण दिलेला, पित्याकडूनच उत्कृष्ट शिक्षण दिलेल्या पवित्र स्त्रीचा पुत्र आणि अन्य धातूंहून श्रेष्ठ असे उत्तम सुवर्ण हेच दक्षिणाद्रव्य ज्याला देणे योग्य असा अत्रि गोत्रात उत्पन्न झालेला ब्राह्मण या ठिकाणी आलेला आहे. व त्याला मी सुवर्णरूप दक्षिणाद्रव्य देऊन संतुष्ट करीत आहे. ९ हे यजमान, स्वर्गलोकाला नीट न्याहाळून पहा व अंतरिक्षाला नीट न्याहाळून बघ. सभामंडपात बसलेल्या विद्वान ब्राह्मणांच्यासह स्वर्गलोकप्राप्तीचा प्रयत्न कर. १० हे दक्षिणारूपी गाईंनो, आमच्याकडून दिल्या गेलेल्या तुम्ही देवसदृश अशा या ऋत्विजांच्याकडे जा. मधुर अशा दुग्धाने संपन्न होऊन परलोकामध्ये तुमचे दान करणाऱ्या यजमानाच्याजवळ रूपांतराने निराळेच रूप धारण करून रहा. आता आम्हाला सोडून देव जातात त्याच मार्गाने जा आणि पुण्यकर्म करणारांनाच प्राप्त होणाऱ्या स्वर्गलोकाच्या ठिकाणी रहा. ते स्वर्गलोकरूपी स्थान आमच्याकरिताच सर्व प्रकारच्या भोग्यपदार्थांनी व सुखसोयींनी सजवून ठेवलेले आहे. (अनुवाक ४३).

१ दानशील धाता, सविता, महाशंखादि नऊ निधींचा पालक प्रजापती, अग्नी, त्वष्टा आणि विष्णू हे सहा देव आमचा यज्ञ सेवन करोत. या सहा देवांचा समुदाय यजमानाच्या प्रजेशी उत्तम रीतीने रममाण होऊन यजमानासाठी धनाचा भरपूर साठा करो. २ हे इंद्रदेवा तू अनुग्रहयुक्त मनाने आम्हाला गाईंच्याशी संयुक्त कर. विद्वान अशा होतृप्रमुख ऋत्विजांच्याशी संयुक्त कर. हे धनवान इंद्रा आम्हाला क्षेमाशी संयुक्त कर. वेदार्थज्ञानासह देवांच्यासाठी जे कर्म केले जात असते, त्याच्याशी संयुक्त कर. यज्ञामध्ये यजन करण्यास योग्य अशा देवांच्या अनुग्रहबुद्धीशी आम्हाला संयुक्त कर. ३ आम्ही देवांच्या अनुग्रहाने बल व ते प्राप्त करून देणाऱ्या क्षीरादिरसांनी समृद्ध झालो आहोत.

उत्तम शरीरांनी युक्त झालो आहोत. श्रध्दाळू अशा मनाने युक्त झालो आहोत. या यज्ञामध्ये त्वष्टा देव आम्हाला अपेक्षित असे धन प्राप्त करवो. आणि आमची शरीरे व त्यांच्या ठिकाणी जे पाप असेल तेही धुऊन टाको. ४ हे अग्निदेवा, ज्या अर्थी आज या यज्ञभूमीचे ठिकाणी चालू असलेल्या ह्या यज्ञात आम्ही तुला 'होता' म्हणून नियोजित करीत आहोत. त्या अर्थी हा यज्ञ सर्वप्रकारे समृध्द होईल अशा प्रकारे तू यजन करशील आणि तू आमची समृध्दी कशी होईल हे नीट जाणून तिच्या आड येणाऱ्या विघ्नांनाही शांत करशील. यास्तव आमची तुजविषयीची भक्ती नीट लक्षात घेऊन तू या यज्ञाच्या सन्निध ये. ५ हे देव हो, तुम्ही संतोषित होऊन ह्या यज्ञातील तीनही सवनांच्या प्रसंगी जेव्हा आलात तेव्हांच आम्ही तुमचे स्थान तुमच्या स्वाधीन केले आहे. तुम्ही सर्वजण पुरोडाशादि हविर्द्रव्यांचे भक्षण केले आहेच. सोमरसाचे प्राशनही केले आहे. आमच्या सुखनिवासाला कारणभूत होणाऱ्या हे देवहो, तुम्ही आमच्या ठिकाणी धनांचा पुष्कळ संचय करा. ६ हे अग्निदेवा, हविर्द्रव्यांची इच्छा करणाऱ्या ज्या देवांना तू बोलावले आहेस, त्यांना आता त्यांच्या निवासस्थली पाठव. हे देव हो, हविर्द्रव्ये रथादिकांतून वाहून नेणारे व आमचे पोषण करीत असलेले तुम्ही जगाच्या स्थितीला कारणभूत अशा आदित्याजवळ प्रथम जाऊन पोहोचा आणि नंतर तेथून स्वर्गलोकाला जा. ७ हे यज्ञा, तू यज्ञपती यज्ञ नांवाच्या विष्णूकडे रहावयास जा. फल देण्यासाठी यज्ञपती अशा यजमानाकडे जा. स्वतःच्या उत्पत्तिस्थानी म्हणजे वायूच्या वहनशक्तीच्या ठिकाणी जा. ही आहुती तुला समर्पण असो. ८ हे यज्ञपती देवा, हा तुझ्याचसाठी केला जात असलेला यज्ञ अनेक स्तोत्रांनी युक्त व कर्मकुशल अशा ऋत्विजांनी युक्त असा आहे. ही आहुती तुला अर्पण असो. ९ सर्व मार्ग जाणणाऱ्या हे देवांनो, तुम्ही ज्या मार्गाने यज्ञासाठी येथे आला तो मार्ग नीट ध्यानात ठेवून यज्ञ समाप्त झाल्यावर त्याच मार्गाने स्वस्थानी परत जा. मनोवृत्तींचे नियमन करणाऱ्या हे परमेश्वरा तू आमचा हा यज्ञ हविर्द्रव्य भक्षण करणाऱ्या देवांच्या ठिकाणी प्रथम स्थापन कर. नंतर मंत्ररूप वाग्देवतेच्या ठिकाणी स्थापन कर. आणि शेवटी यज्ञक्रियांच्या ठिकाणी आम्हाला प्रवृत्त करणाऱ्या वायुदेवाच्या ठिकाणी स्थापन कर. (अनुवाक ४४).

१ वरुण राजानेच सूर्याच्या मागोमाग जाण्यासाठी ज्या अर्थी अधांतरी अशा आकाशात विस्तीर्ण असा मार्ग तयार केला, त्या अर्थी आम्हाला देखील पाऊल टाकण्यासाठी, शत्रुनिंदक व शत्रूच्या हृदयांचा अचुक वेध

करणारा असा तो वरुण, प्रतिबंध न करता मार्ग करून देवो. २ हे वरुणराजा, आमचा उपद्रव निवारण करणाऱ्या तुझ्याजवळ शेकडो हजारो औषधी आहेत. यास्तव तुझी अनुग्रहबुद्धी आमच्या ठिकाणी विपुल अर्थात निरंतर टिकणारी व आदरयुक्त असो. हे वरुणराजा आमचा द्वेष करणारांना पीडा दे. यज्ञाचा विघात करणाऱ्या 'निर्ऋति' नामक राक्षसीला ती पुन: केव्हाही दिसणार नाही अशा दूर ठिकाणी घालवून दे. आम्ही केलेले पाप आमच्यापासून मुक्त कर. ३ वरुणाचा पाश म्हणजे बारीक तंतूच्या आकाराचा बंधनकारक जीव पायाखाली तुडविला. ४ अग्नीचे मुख उदकात प्रविष्ट झाले आहे. उदकात बुडू न देणाऱ्या हे 'अपांनपात्' नामक अग्निदेवा, त्या त्या घरी असुरांनी यज्ञाला केलेले विघ्न निवारण करून व यज्ञाचे पालन करून प्रज्वलनसाधन अशा घृताला जवळ कर. तुझी जिव्हा घृतप्राशन करण्याला उद्युक्त होवो. ५ हे जुहू, तुझे बिलरूपी हृदय समुद्रासारख्या या उदकात प्रविष्ट होवो. औषरूपी म्हणजे सोमवल्लीच्या चोथ्याच्या रूपाने असणाऱ्या ओषधी तुझ्या ठिकाणी प्रविष्ट होवोत. उदकेही प्रविष्ट होवोत. हे यज्ञपालका यजमाना हविर्द्रव्यांच्या योगाने देवतांना तृप्त करून यज्ञसंबंधी सूक्तवाक व 'नमोवाक' संज्ञक मंत्रांची फळे आम्ही तुझ्या ठिकाणी स्थापन करतो. ६ 'अवभृत' नामक यज्ञकर्माच्या अभिमानी असणाऱ्या हे वरुणराजा, राक्षसांना भेडसावण्यासाठी तू फार मोठा आवाज केला आहेस. तू आमच्या रक्षणासाठी गुप्त रूपाने आमच्याभोवती वागणारा आहेस. राक्षसांना भेडसावण्याकरिता भयंकर आवाज करणाऱ्या वरुणदेवा, आमच्याकडून देवांचा अपराध होणारे जे पाप घडले असेल ते त्या देवांच्यासह तू राहन करून टाक. ऋत्विजांसंबधी जे पातक आम्ही केले असेल ते ऋत्विजांसह तू नाहीसे कर. हे देवा, याहीपेक्षा रवडतर पातक आम्ही केले आहे. तर त्यापासून देखील आमचे रक्षण कर. ७ आम्हाला उदके आणि ओषधी सन्मित्राप्रमाणे उपकारक होवोत. आणि जो आमचा द्वेष करतो आणि आम्ही ज्याचा द्वेष करतो, त्या मनुष्याला देखील त्या वैऱ्याप्रमाणे उपद्रव देणाऱ्या होवोत. ८ हे उदकदेवतांनो, हा वरुण म्हणजे जणू काय तुमच्या उदरात राहणारा गर्भच होय. यास्तव तुमच्या संतोषासाठी त्या वरुणाला आम्ही हविर्द्रव्यांनी संतुष्ट व उत्तमप्रकारे पुष्ट असा केला आहे. तो वरुण आमच्याविषयी 'हे फार चांगले अनुष्ठान केलेले आहेत' अशी देवांच्या ठिकाणी प्रशंसा करो. ९ वरुणाचा पाश दूर केला. १० वरुणाचा पाश नष्ट केला. ११ हे समित्, तू समृध्दीला कारणभूत आहेस आणि म्हणूनच आम्ही समृद्धीला प्राप्त झालो आहोत. १२ हे समिधे तू इंधनसाधन आहेस.

१३ कांतीचे साधन आहेस. माझ्या ठिकाणी कांती उत्पन्न कर. १४ उदकासंनिध येऊन मी अवभृतसंज्ञक कर्माचे अनुष्ठान केले आहे. त्या अनुष्ठानाच्या रसाशी म्हणजे फलाशी मी संयुक्त झालो आहे. हे अग्निदेवा, तुझ्या कृपेने क्षीरादिरससमृद्धीने युक्त असा मी तुजजवळ आलो आहे. त्या मला तू बलसंयुक्त कर. (अनुवाक ४५).

१ जन्मजात ज्ञानसंपन्न अशा हे अग्निदेवा, सामान्य मनुष्य असा मी, तुझ्या गुणांचे कथन करण्याचा स्वभावच असलेल्या मनाने तुला, तू अमर आहेस, हे जाणूनच बोलावीत आहे. आमचे ठिकाणी आमच्या पुत्रपौत्रादिरूपी प्रजेने मिळविलेले यश स्थापन कर. हे अग्ने तुझ्या प्रसादाने आम्हीही अमरत्वाला प्राप्त होऊ. २ हे सर्वज्ञा अग्निदेवा, तू सत्कर्म करणाऱ्या ज्या यजमानाला सुखकर असे स्थान प्राप्त करून देतोस तो यजमान अश्वादिपशू, पुत्रपौत्रादि प्रजा, शूर योध्दे, व गाई इत्यादिकांनी युक्त असे धन उत्तम प्रकारे संपादन करतो. ३ हे बलपुत्रा इंद्रदेवा, भोगेच्छेने युक्त अशा आम्हाकडून केल्या गेलेल्या स्तुती तुझ्या ठिकाणी उत्तम प्रकारे राहत असतात. हे इंद्रा, त्यांपैकी कोणतीही स्तुती तुला अतिशयोक्तीची वाटणार नाही. ४ सोमयागात पठन केल्या जाणाऱ्या त्या त्या शस्त्रसंज्ञक मंत्राच्या ठिकाणी सोम इंद्राला हर्षवीत असतो. बरोबरीच्या यजमानात अधिकत्वाने कर्मकुशल असलेले आणि इंद्राचे जणू पुत्रच असलेले यजमान इंद्रालाच जेथे बोलावले जाते अशा प्रत्येक यज्ञाच्या ठिकाणी पितृस्थानीय अशा धनवान इंद्राला बोलावीत असतात. ज्या अर्थी बोलावून आणलेला इंद्र यज्ञ विरोधी अशा असुरांना पीडा करून हाकून लावतो त्या अर्थी पुत्र आपल्या पित्याला बोलावतात त्याप्रमाणे यज्ञकर्ते यजमान स्वतःच्या यज्ञाच्या रक्षणासाठी इंद्राला बोलावतात. ५ सर्व जगाला जाणणाऱ्या हे अग्निदेवा, दुग्धादिरसाशी आम्हास संयुक्त कर. यज्ञभूमीत येणाऱ्या राक्षसांना ठार

करणारा आणि शरीराच्या ठिकाणी उभ्दवणाऱ्या रोगांचा नाश करणारा असा तू विशेष प्रकारच्या कांतीने प्रकाशतोस. ६ उदकासंनिध येऊन 'अवभृत' संज्ञक कर्माचे अनुष्ठान मी केले आहे. व त्या अनुष्ठानाच्या फलरूपी रसाशी मी संयुक्त झालो आहे. हे अग्निदेवा तुझ्या कृपेने क्षीरादिरससमृध्दीने युक्त असा मी येथे तुजजवळ आलो आहे. त्या मला तू बलसंयुक्त कर. ७ हे अग्रे, ज्या अर्थी तू लोकांची सुखाने वस्ती करणारा, धनांचा पालक व प्रजायुक्त असा आहेस, त्या अर्थी आम्हीही तुझ्या अनुग्रहबुद्धीच्या ठिकाणी संलग्न होऊन राहू. ८ हे देदीप्यमान अग्निदेवा, यज्ञांच्या ठिकाणी धनांमध्ये श्रेष्ठ अशा धनांचा अधिपती असणाऱ्या तुला मी सर्वतोपरी संतुष्ट करतो. अन्नाची इच्छा करणारे आम्ही तुझ्या प्रसादाने शत्रूच्या गोटातून अन्न जिंकून आणू. आम्हास विरोध करणाऱ्या मनुष्यांच्या सैन्याचा पराभव करण्यास आम्ही समर्थ होऊ. ९ हे अग्रे, उपासकाला भरपूर अन्न देणाऱ्या व स्तोत्रांनी स्तविला गेलेल्या अशा तुला यज्ञकर्ते यजमान अभिवृध्दीला प्राप्त करतात. म्हणजे तुझी कीर्ती वाढवितात. आता वर्णिलेल्या गुणांनी युक्त असा तू आम्हाला उत्कृष्ट असे सामर्थ्य दे. १० हा अग्री आमच्याकरिता नोकरचाकरांचा वर्ग संपादन करो. हा अग्री वैऱ्यांची मस्तके विदारण करीत करीत आमच्यापुढे जावो. हा अग्री शत्रूवर हल्ला करून त्यांच्यावर जय मिळवो. हा अग्री, स्वकीयांना अन्नदान करण्यासाठी शत्रुपक्षाकडील अन्न लुटून आणो. ११ अरणींचे मंथन करून उत्पन्न केलेल्या अग्रीच्या संयोगाने पूर्वीचा अग्री अधिकच प्रकाशतो. तो अग्री यजमानाच्या घराचा पालक, तरुण, हविर्द्रव्ये देवांकडे वाहून नेणारा व 'जुहु' रूपी मुखाने युक्त असा असतो. १२ हे अग्निदेवा, मंथनोत्पादित अग्रीच्या संयोगाने तू प्रज्वलित होतोस. देवांमधला तू ब्राह्मण होऊन मंथनोत्पादित अग्निरूपी ब्राह्मणाच्या संयोगाने अधिकतेने तळपतोस. सन्मार्गवर्ती असा तू मित्राप्रमाणे प्रिय होऊन मंथनोत्पादित अग्निरूपी प्रियमित्राच्या संयोगाने विशेष प्रज्वलित होतोस. १३ हे अग्रे तुझ्या शुभ्र ज्वाला वर उफाळून येतात. १४ प्रखर प्रकाशाने तू शोभून दिसतोस. (अनुवाक ४६).

प्रपाठक ५

देव व असुर यांनी परस्परांशी युद्ध केले. त्यात देवांनी विजय संपादन केला. तेव्हा असुरांच्यापासून लुटून आणलेले सोने, मोती, हिरे इत्यादि बहुमोल धन सुरक्षित रहावे म्हणून त्यांनी अग्नीजवळ 'ठेव' म्हणून ठेवले. दैवक्शात पुढे कधी असुरांना जय मिळाला आणि आपण जिंकलो गेलो तर त्या आपत्तीच्या काळात अग्नीजवळ ठेव म्हणून ठेवलेले धन आपल्याला उपयोगी पडेल असा देवांच्या मनातील आशय होता. परंतु देवांनी विश्वासाने ठेव म्हणून ठेवलेल्या त्या धनाचा अपहार करावा अशी अग्नीला इच्छा झाली. आणि ते धन घेऊन अग्नी दूर प्रदेशात पळून गेला. कालांतराने देवांनी असुरांच्यावर पूर्णपणे विजय मिळविला आणि ते निर्भय झाले. नंतर अग्नीजवळ ठेवलेले धन परत घ्यावे असे त्यांना वाटले व अग्नीपाशी त्या धनाची मागणी करण्याचा त्यांनी बेत केला. इतक्यात अग्नी आपण ठेवलेले धन घेऊन पळून गेल्याचे त्यांना समजले. देवांनी मोठ्या प्रयासाने अग्नीचा शोध करून त्याला गाठला. आणि आपले धन परत देण्याविषयी त्याचेजवळ मागणी केली. परंतु तो दाद देईना. तेव्हा बलात्कार केल्याखेरीज हा धन देणार नाही असे समजून देवांनी अग्नीशी धक्काबुक्की सुरू केली. तेव्हा अग्नी रडू लागला. ज्या अर्थी अग्नीने रुदन केले त्या अर्थी त्याला 'रूद्र' म्हणजे 'रडणारा' असे नांव प्राप्त झाले. 'रुदन' करणे हेच त्या अग्निरूपी रुद्राचे 'रुद्रत्व' होय. अग्नी रडत असतांना त्याच्या नेत्रातून भूमीवर जे अश्रुबिंदू पडले, त्यांच्यापासून 'रजत' म्हणजे 'रुपे' या नावाचे द्रव्य उत्पन्न झाले. अग्नीच्या दुःखाश्रूपासून 'रुपे' उत्पन्न झाले असल्यामुळे ते दक्षिणा म्हणून देण्यास अयोग्य आहे. जो कोणी यजमान अग्नीच्या दुःखाश्रूपासून निर्माण झालेले 'रुपे' यज्ञात दक्षिणा म्हणून ऋत्विजांना देईल त्याच्या घरात एका वर्षाच्या आतच रडारडी होण्यासारखे काहीतरी दुःखकारक निमित्त उत्पन्न होईल. यास्तव यज्ञामध्ये केव्हाही दक्षिणाद्रव्य म्हणून 'रुपे' देऊ नये. अग्नी देवांना म्हणाला तुमच्याकडून मी काहीतरी विशिष्ट असा भाग आधी मिळवीन तेव्हाच तुमचे धन परत देईन. अग्नीचे हे म्हणणे देवांनी मान्य केले आणि, 'पुनराधेय' या नांवाचे कर्म हाच केवळ तुझ्या एकाट्याचा विशिष्ट भाग असे समज, असे म्हणून 'पुनराधेय' कर्माचा भाग त्यांनी अग्नीला दिला. तेव्हा अग्नीने देवांचे धन देवांना परत दिले. विशिष्ट भाग मिळाल्यामुळे संतुष्ट झालेला अग्नी असे म्हणाला की, जो यजमान मीच ज्याची देवता आहे असे पुरोडाशरूपी हविर्द्रव्य तयार करून पुन्हा मज अग्नीचे स्थापन करील

तो सर्वप्रकारे समृध्द होईल. पूषानामक देवाने 'पुनराधेय' नामक कर्म करून त्या अग्नीला पुन्हा स्थापन केला व त्या योगाने तो पशुसंपत्तीने समृध्द झाला. आणि म्हणूनच सर्व पशू पूषादेवाचे आहेत असे लोक म्हणत असतात. 'त्वष्टा' देवाने 'पुनराधेय' विधीने अग्नीला पुन्हा स्थापन केला व त्या योगाने तो देखील पशुसंपत्तीने समृद्ध झाला. आणि तेव्हापासून सर्व पशू त्वष्टृदेवतात्मक आहेत असे लोक म्हणू लागले. मनूने त्या अग्नीची पुनराधेय विधीने स्थापना केली. व त्या योगाने तो प्रजारूप संपत्तीने समृद्ध झाला. आणि म्हणूनच सर्व मानवी प्रजा मनूच्या आहेत, असे लोक बोलतात. धाता देवाने पुनराधेय विधी करून त्या अग्नीची पुन्हा स्थापना केली. व तीमुळे तो सर्व प्रकारे समृद्ध झाला. 'संवत्सर' म्हणजे एक वर्षाचा काल हाच 'धाता' होय. यास्तव जो कोणी पुनराधेय विधीने अग्नीची पुन: स्थापना करतो त्याचे ठिकाणी एका संवत्सरात प्रजा, पशू इत्यादि उत्पन्न होतात. अशा प्रकारचे पुनराधेय विधीचे समृध्दिरूप फल जो जाणतो तो देखील निश्चयाने समृध्द होतो. कोणी पुनराधेय विधीच्या योगाने पूषा इत्यादिकांच्याशी अग्नीचे बंधुत्वाचे नाते असत्याचे जाणतो तो बंधुमान होतो. आधानविधीने प्रथम स्थापन केलेला अग्नी विशिष्ट असा भाग आपणास मिळावा अशी इच्छा धरून यजमानाच्या प्रजेला व पशूंना विशेष उपद्रव करू लागतो. यास्तव उद्वासनेष्टी करून त्या अग्नीचे उद्वासन म्हणजे विसर्जन करावे. आणि पुनराधेय विधीने त्या अग्नीचे पुन्हा आधान म्हणजे स्थापना करावी. असे केले असता तो अग्नी यजमानाला भाग्याने समृद्ध करतो. शिवाय पुनराधेय विधीने अग्नीची पुन:स्थापना करणे हीच प्रथमस्थापित अग्नीने केलेल्या उपद्रवाची जणू शांती होय. गेलेले धन ज्यांच्या अनुग्रहाने परत मिळते, त्या देवतांचे नांव 'पुनर्वसू' असे आहे. पुनराधेय विधीने अग्नीची स्थापना करावयाची ती पुनर्वसू नक्षत्र असेल त्या दिवशी करावी. पुनर्वसू नांवाचे जे नक्षत्र आहे तेच पुनराधेय विधीला योग्य असे आहे. स्वकीय अशा नक्षत्रात्मक देवतेच्या ठिकाणी अग्नीला पुन्हा स्थापन केल्याच्या योगाने यजमान वेदाध्ययनजन्य कांतीने युक्त होतो. या ज्ञीयकाष्ठांनी प्रज्वलित केलेल्या अग्नीची स्थापना केली तर ती नि:सार होते. अशा प्रकारची नि:सारता न व्हावी म्हणून दर्भांनी प्रज्वलित केलेल्या अग्नीची कुंडामध्ये स्थापना करावी. अशाप्रकारे दर्भांनी प्रज्वलित केलेल्या अग्नीची स्थापना केली असता उदके व ओषधी यांच्यापासूनच आकर्षित केलेल्या अग्नीला स्थापन केल्यासारखे होते. पुनराधेय विधीने अग्नीची स्थापना केल्यानन्तर जी इष्टी करावयाची तीमध्ये पांच कपालांच्या समूहावर पुरोडाश भाजून तयार करावा. हेमंत व शिशिर हे दोन्ही मिळून एकच ऋतू मानला म्हणजे संवत्सराचे

पांचच ऋतू होतात. यास्तव ऋतूंच्याशी संख्यासाम्य असलेल्या पांच कपालांच्या समूहावर तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन केले असता पांच ऋतूंच्या पासूनच अग्रीला आकर्षित करून त्याचे आधान म्हणजे स्थापन केल्याप्रमाणे होते. (अनुवाक १).

आधानविधीने स्थापन केलेल्या अग्रीचे जो उद्वासन करतो तो जणू काय आपला यज्ञ व पशू यांचा नाशच करतो. यास्तव पुनराधेय विधीने पुन्हा अग्री स्थापन करून त्या इष्टीमध्ये पांच कपालांच्या गटावर पुरोडाश भाजावा आणि त्याचे यजन करावे. धाना, करंभ, परिवाप, पुरोडाश व आमिक्षा या पांच द्रव्यांनी यज्ञ परिपूर्ण होत असल्याने यज्ञ हा पंक्तिरूप आहे, पशूही पंक्तिरूप आहेत. यास्तव पांच कपालांच्या समूहावर पुरोडाश भाजून त्याचे यजन केल्याच्या योगाने तो यजमान यज्ञ व पशू यांचे पुन्हा संपादन करतो. देवसमुदायात अग्री हा 'वीर' आहे. यास्तव अग्रीचे जो उद्वासन करतो तो जणू काय वीराचा वधच करतो. प्राचीनकाली सत्याची चाड बाळगणारे ब्राह्मण अग्निरूपी वीराची हत्या करणाराचे अन्न सेवन करीत नसत, पुर्वोक्त इष्टीमध्ये 'पंक्ती' छंदात्मक 'याज्या' व 'पुरोनुवाक्या' उपयोगात आणाव्यात. कारण यज्ञ हा पांक्त म्हणजे पंक्तिरूप आहे. पुरुष हा देखील दोन हात, दोन पाय व मस्तक या पांच अवयवांनी युक्त असल्याने पंक्तिरूप आहे. यास्तव 'पंक्ति' छंदात्मक याज्या पुरोनुवाक्या उपयोगात आणल्याच्या योगाने देवांमधील वीर असलेल्या अग्रीला उत्सर्जनरूप वधापासून दूर करून त्याची पुन्हा स्थापना केल्यासारखे होते. प्रधानदेवता व स्विष्टकृत् यांच्या यजनप्रसंगी नियोजित केल्या जाणाऱ्या याज्या पुरोनुवाक्यात्मक चार ऋचा 'शताक्षरा' असतात. म्हणजे चारी ऋचांची एकंदर अक्षरे शंभर होतात. पुरुष हा शंभर वर्षांच्या आयुष्यमर्यादेने आणि नाडीरूप शंभर इंद्रियांनी युक्त असतो. यास्तव शंभर अक्षरे भरणाऱ्या याज्यापुरोनुवाक्यात्मक चार ऋचांचा उपयोग केल्याने तो यजमान शंभर वर्षांची आयुर्मर्यादा व नाडीरूप अशी शंभर इंद्रिये यांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. स्थापन केलेला अग्री समृद्ध होत नाही असे जे घडते, त्याचे कारण मिळालेला भाग त्याला पुरेसा होत नाही. व तो काहीतरी अधिक भाग आपणास मिळावा अशी तीव्र इच्छा करीत असतो. यास्तव 'पुनराधेय' सबंधी करावयाच्या इष्टीतील प्रयाज, आज्यभाग इत्यादि जी अंगे त्यांच्या याज्यामंत्राचे ठिकाणी 'अग्रि' शब्दाची विशिष्ट रीतीने योजना करावी. अशा प्रकारे जर पुनराधेयांग इष्टीतील सर्व यजन 'आग्नेय' म्हणजे 'अग्रि' शब्दाची विशिष्ट योजना करून होईल तर तीच त्या अग्रीची

समृध्दी होय. आधानविधीने प्रथम स्थापन केलेल्या अग्नीचे जो उद्वासन करतो, त्या यजमानाची वाणी त्याच्या घरच्या स्त्रिया व कामासाठी ठेवलेल्या शूद्रांच्या वाणीशी एकरूप होते. म्हणजे त्याच्या भाषेतील प्रौढपणा नष्ट होऊन तीमध्ये अडाणीपणा उत्पन्न होतो. आणि अशा प्रकारच्या हीन भाषेला अनुसरून पूर्वी सुसंस्कृत अशा भाषेमुळे इतर सामान्य लोकांपेक्षा उत्कर्षाचा धनी असलेला तो यजमान श्रेष्ठत्वापासून पराभूत होतो. यास्तव 'पुनराधेय' संबंधी इष्टीतील प्रयाजमंत्राच्या ठिकाणी 'अग्नि' शब्दाच्या निरनिराळ्या विभक्तींची योजना करावी. अशाप्रकारची योजना यजमानाची वाणी पूर्ववत् प्रौढ होण्याला व त्याचा पराभव नष्ट होऊन पूर्ववत उत्कर्ष प्राप्त होण्याला कारणीभूत होते. आता सांगितल्याप्रमाणे विभक्तीची योजना अवश्य करावी म्हणजे ती त्या पुनराधेय रूप कर्माला समृध्द करते. पुनराधेयांग इष्टीतील प्रधान देवतेचे यजन 'उपांशु' म्हणजे हलक्या स्वरात व याज्यापुरोनुवाक्यांचा अस्पष्ट असा उच्चार करून करावे. असे केले म्हणजे ज्याप्रमाणे श्रेष्ठ असे धन संपादन केलेला माणूस ते गुप्त ठेवतो, लोकांना समजू देत नाही, त्याप्रमाणेच 'पुनराधेय' रूपी धन गुप्त राखल्यासारखे होते. 'स्विष्टकृत्' संज्ञक अग्नीचे यजन मात्र उच्च स्वरात याज्यापुरोनुवाक्या म्हणून करावे. असे केले असता ज्याप्रमाणे श्रेष्ठ असे धन संपादन केलेला मनुष्य स्वतःच्या प्रसिध्दीची इच्छा करतो त्याप्रमाणे पुनराधेयरूपी श्रेष्ठ धन मिळविलेल्या यजमानाने स्वतःच्या प्रसिध्दीची आकांक्षा धारण केल्यासारखे होते. पूर्वी सांगितल्याप्रमाणे अग्नी या शब्दाच्या विभक्तींचा उच्चार करून पठित केलेल्या प्रयाज मंत्राने 'वषट्कार' करावा म्हणजे प्रयाजसंबंधी देवतांचे यजन करावे. असे केल्याच्या योगाने हीन वाणीमुळे प्राप्त झालेल्या पराभवापासून मुक्त झालेल्या त्या यजमानाला निर्वाहासाठी स्वतःच्या घरातून बाहेर पडण्याचा प्रसंग येत नाही. पुरोडाश हा जणू यजमान असून 'पुनरूर्जा' व 'सह रय्या', या दोन मंत्रांनी दिल्या जाणाऱ्या दोन आज्याहुती म्हणजे जणू काय पशुरूप आहेत. यास्तव, पुरोडाशाचे यजन करण्यापूर्वी एक व नंतर दुसरी अशाप्रकारे दोन आहुती जर दिल्या गेल्या तर तो पुरोडाश याग यजमानाला मागे व पुढे पशूंनी वेढून टाकतो. म्हणजे तो यजमान पशुसंपत्तीने सर्वतोपरी समृध्द होतो. पूर्वी केलेल्या आधानप्रसंगी 'सर्पराज्ञी' इत्यादि संज्ञा असलेल्या मंत्राचे पठन केलेलेच आहे व 'संभार' संज्ञक पदार्थांचे संपादनही केलेलेच आहे. यास्तव पुनराधेय प्रसंगी पूर्वोक्त मंत्र पठन करू नयेत, व संभाराचे संपादनही करू नये, असे कोणी म्हणत असतात. पण त्यांच्या या म्हणण्याचा आदर करू नये तर पुनराधेय प्रसंगी देखील

संभारांचे संपादन व पूर्वोक मंत्राचे पठन अवश्य करावेच, म्हणजे त्रे पुनराधेयरूपी यज्ञाच्या समृध्दीला कारणभूत होते. 'पुनराधान' रूप कर्माची समृध्दी होण्यासाठी एकदा मोडून पुन्हा नीट केलेला रथ, एकदा फाटून पुन्हा शिवून तयार केलेले वस्त्र, दुर्बलतेमुळे ओझे वाहण्यास असमर्थ झालेला परंतु खावयास नीटनेटके घालून पुन्हा पुष्ट केलेला बैल या वस्तू दक्षिणा म्हणून ऋत्विजांना द्याव्यात. प्रथम केलेल्या अग्न्याधानात 'अग्रिहोत्र' होम अमंत्रक द्यावा, असे सांगितले आहे. त्या ठिकाणी पुनराधेय प्रसंगी 'सप्त ते अग्ने समिध्द' या मंत्राने 'अग्रिहोत्र' होम द्यावा. म्हणजे त्या योगाने 'पुनराधेय' विधीचा अधिष्ठाता असलेल्या अग्निदेवाचे जे अंग म्हणजे करावयाचे कर्मरूप अंग जेथे जेथे विसरले गेले असेल त्या त्या ठिकाणाहून ते ते अंग पुन्हा अग्नीला संपादन करून दिल्यासारखे होते. जो कोणी आधानविधीने स्थापन केलेल्या अग्नीचे उद्वासन म्हणजे त्याग करतो तो देवांमध्ये वीर म्हणून गणल्या जाणाऱ्या अग्नीची जणू काय हत्याच करतो. त्यामुळे त्या यजमानाला; सावकार ऋणकोला छळतो त्याप्रमाणे वरूण छळत असतो. यास्तव पूर्वोक्त अग्रिहोत्र होमानंतर अग्नी व वरूण या दोन देवांना अनुलक्षून अकरा कपालांच्या गटावर भाजून तयार केलेला 'अग्निवारुण' संज्ञक पुरोडाशाचे यजन जिच्यामध्ये केले जाते अशी 'अनुनिर्वात्या' नांवाची इष्टी करावी. म्हणजे ज्या अग्नीची हत्या घडली तो अग्नी व त्या हत्येबद्दल सावकार ऋणकऱ्याला छळतो त्याप्रमाणे यजमानाचा छळ करणारा वरुण हे दोन्ही देव त्यांना योग्य असा हविर्भाग दिला गेल्याच्या योगाने संतुष्ट होतात व यजमान कसल्याही संकटात सापडत नाही. (अनुवाक २).

१ हे गार्हपत्य प्रदेशा, विस्ताराने तू पृथ्वीरूप, श्रेष्ठत्वाने द्युलोकरूप आणि महत्त्वाने अंतरिक्षरूप आहेस. अखंडित अशा हे भूदेवि, तुझ्या मांडीवर यजमानाला सेवनीय असे अन्न मिळावे म्हणून हविर्द्रव्यरूप अन्नाचे भोजन करणाऱ्या गार्हपत्य अग्नीला मी स्थापन करतो. २ हा गार्हपत्य अग्नी आदित्यरूपाने गमन करणारा व शुभ्रवर्ण असा असून त्याने जगाचे आक्रमण केले आहे. तो स्वर्गरूपी पित्यापर्यंत झपाट्याने जाऊन पोचला. आणि आता पुन्हा पृथ्वीरूपी मातेजवळ येऊन पोचला आहे. ३ या आदित्यरूप गार्हपत्याग्नीचे तेज मुहूर्तरूपाने तीस विभागांनी विशेषत्वाने असते. शिवाय वेदातील स्तुतिरूपी वाणी पक्ष्याप्रमाणे आकाशात संचार करणाऱ्या या आदित्याचा आश्रय करून राहिली आहे. हे गार्हपत्य तुला प्रतिकूल असे जे उद्वासनरूप कृत्य आम्ही केले ते तू मनातून काढून टाक. देदीप्यमान अशा तुझ्या ज्वालांनी आमचे

हविर्द्रव्य देवांना नेऊन पोचीव. ४ या गार्हपत्यरूपी आदित्याची कांती उच्छ्वासाप्रमाणे उदय पावते व निःश्वासाप्रमाणे अस्तास पावत असते. व अशाप्रकारे द्युलोक व पृथ्वी यांच्यामध्ये संचार करिते. महान अशा मंडलाच्या ठिकाणी राहणाऱ्या आदित्याने यजमानांच्यासाठी स्वर्गलोक प्रकाशित केला आहे. आदित्यरूपाने स्तविलेल्या हे गार्हपत्या, तुला मी या कुंडात स्थापन करतो. ५ हे दक्षिणाग्ने, क्रोधवश झालेला मी त्या रागाच्या आवेशाने तुझे जे उद्वासन केले, तुला नाहीसा केला, समृध्दीच्या अभावी दारिद्र्याने गांजून गेलेल्या मी तुझा जो त्याग करण्यास प्रवृत्त झालो, ते सर्व आता हे अग्निदेवा तुझ्या कृपेने सुपरिणामीच होवो. आम्ही तुला प्रज्वलित करीत आहो. ६ हे आहवनीय, मजकडून क्रोधाच्या आवेशात परित्यक्त झालेल्या तुझे जे तेज पृथ्वीत शिरून विरून गेले, ते आदित्य, विश्वेदेव व अष्टवसू उत्तम प्रकारे परत आणोत. ७ मजकडून घडलेल्या उद्वासनरूप अपराधाचा परिहार करण्यासाठी सन्माननीय अशी अग्नीची ज्वाला हव्यरूपी आज्याचे सेवन करो. आणि विच्छिन्न झालेल्या यज्ञाला पुन्हा सुसंघटित करो. बृहस्पती आमचा हा यज्ञ विस्तृत करो. सर्व देव या कर्माचे ठिकाणी तृप्त होवोत. ८ हे अग्ने तुझ्या समिधा सात प्रकारच्या आहेत. तुझ्या ज्वालारूपी जिव्हा सात आहेत. तुझ्या समिधा संपादन करण्याचे मंत्र सात आहेत. तुझी राहावयाची आवडती स्थाने सात आहेत. सात होते तुझ्याकरिता 'वौषट्' असे म्हणत असतात आणि सात प्रकारच्या सोमयागांनी यजमान तुझे यजन करीत असतात. आहवनीय इत्यादि सातही स्थाने तू घृताने सर्वस्वी भरून टाक. हे अग्ने, तू क्षीरादि रसासह पुन्हा परत येथे ये, अन्न व आयुष्य यांच्यासह पुन्हा परत ये. आणि आमच्या हातून पुन्हा पुन्हा घडणाऱ्या सर्व अपराधांपासून आमचे सर्वस्वी रक्षण कर. १० हे अग्ने धनासह पुन्हा परत येथे ये. सर्व जगाकडून जिचे सेवन केले जाते अशा वृष्टिधारेने सर्व तृणधान्यादिकांवर सिंचन कर. ११ लेक, सलेक, व सुलेक या नांवाचे ते आदित्य संतुष्ट होऊन आम्ही समर्पिलेल्या आज्याचे पान करोत. १२ केत, सकेत आणि सुकेत अशी नांवे असलेले ते आदित्य संतोषित होऊन आम्ही अर्पिलेले आज्य प्राशन करोत. १३ विवस्वान्, अदिति व देवजूति या नांवाचे ते सर्व आदित्य संतुष्ट होऊन आम्ही त्यांना अर्पण केलेले आज्य सेवन करोत. (अनुवाक ३).

'भूमिर्भूम्ना' इत्यादि चार ऋचा म्हणून गार्हपत्याग्नीचे आधान म्हणजे स्थापन करावे. असे केल्याने पहिल्या मंत्रात असलेल्या 'अन्नाद्याय' या पदाप्रमाणे अन्ना प्राप्तीची इच्छा धरूनच गार्हपत्याचे आधान केल्यासारखे होते.

जरा प्राप्त झालेल्या सर्पांनी तिचा प्रतिकार कसा होईल याविषयी विचार केला तेव्हा 'कद्रूचा' पुत्र 'कसर्णीर' याने आपल्या ज्ञानदृष्टीने 'भूमिर्भूम्ना' इत्यादि मंत्राचा संच अवलोकन केला आणि त्या मंत्रांच्या सामर्थ्याने ते सर्व सर्प जीर्ण झालेली आपल्या शरीराची कात टिकून कोमल अशा त्वचेने म्हणजे कांतीने युक्त झाले. भूमी ही सर्पाची राणी आहे. 'भूमिर्भूम्ना' इत्यादि चार ऋचा तिच्या संबंधाच्या आहेत. यास्तव त्या 'सर्पराज्ञी' संज्ञक ऋचांनी गार्हपत्य अग्नीचे स्थापन करावे. असे केल्याने जरारहित व पुन्हा नव्याप्रमाणे केलेल्या गार्हपत्याला स्थापन केल्यासारखे होते. शिवाय तो अधिक पवित्रही होतो. पृथ्वीला भक्षणीय असे अन्न मिळेनासे झाले तेव्हा तिने 'भूमिर्भूम्ना' हा मंत्र आपल्या ज्ञानदृष्टीने पाहिला. तेव्हा त्या मंत्राच्या प्रभावापासून तिला सेवनीय असे अन्न मिळू लागले. यास्तव 'सर्पराज्ञीया' अशी संज्ञा असलेल्या ऋचांनी जर गार्हपत्याचे आधान केले तर ते पहिल्या मंत्रात उच्चारलेल्या 'अन्नाद्य' या पदास अनुसरून यजमानाला भक्षणीय अशा अन्नाची प्राप्ती होण्याला कारणभूत होते. व त्याच मंत्रात असलेल्या 'उपस्थे ते देवि' या शब्दांना अनुसरून भूदेवीच्या मांडीवरच बसविलेल्या गार्हपत्याचीच जणू स्थापना केल्यासारखे होते. 'यत् त्वा क्रुध्द:' हा मंत्र 'दक्षिणाग्नीचे' आधान करतेवेळी म्हणावा. या मंत्रात मी क्रोधाच्या आवेशात विनाकारण तुझे उद्वासन केले, पण ते सर्व आता सुपरिणामी होवो इत्यादि भावार्थ आहे. अर्थात् या मंत्राचे पठन म्हणजे ते एखादा माणूस रागाच्या आवेशात विनाकारण ताडन केलेल्या लहान मुलाला पश्चातापपूर्वक गोड शब्द बोलून त्याचे सांत्वन करतो त्याप्रमाणे उद्वासनरूप अपराधावर पांघरूण घालून गोडीगुलाबीच्या शब्दांनी अग्नीचे जणू सांत्वनच केल्यासारखे होते. 'पुनस्त्वोद्दीपयामासि' असे जे म्हटले जाते, त्या योगाने, अग्नीला पुन्हा प्रज्वलित केल्यासारखे होते. 'यत्ते मन्युपरोप्तस्य' हा मंत्र म्हणावा म्हणजे आदित्य प्रभृति देवतांच्याकडून यजमानाने अग्नीला परत आणल्यासारखे होते. जो अग्नीचे उद्वासन करतो त्याचा यज्ञ विच्छिन्न होतो. यास्तव 'बृहस्पतिवती' म्हणजे 'बृहस्पति' या पदाने युक्त असलेली 'मनोज्योति:' ही ऋचा म्हणून अग्नीचे 'उपस्थान' करावे. कारण बृहस्पती हा देवांमधील ब्राह्मण आहे. यास्तव पूर्वोक्त ऋचेने उपस्थान केल्याने देवांमधील ब्राह्मणाकडून यज्ञाला सुसंघटित केल्यासारखे होते 'विच्छिन्नं यज्ञं समिमं दधातु' असे जे म्हटले जाते ते यजमानाची यज्ञपरंपरा कायम राहण्यास कारणभूत होते. 'विश्वेदेवा इह मादयंताम्' असे जे म्हटले जाते त्या योगाने यज्ञाला पुन्हा सुसंघटित करून त्याविषयी देवांना जणू कथन केल्यासारखे होते.

'सप्त ते अग्ने' या मंत्राचे अग्निहोत्र होम करिताना पठण केले जाते. त्या योगाने सात सात असे म्हणून निर्दिष्ट केलेले सर्व पदार्थ व सात प्रकारची अग्नीची आवडती स्वरूपे या सर्वांचेच जणू काय संपादन केल्यासारखे होते. 'पुनरूर्जा' व 'सह रय्या' या दोन मंत्रांनी अनुक्रमे 'पुरोडाश' यजनापूर्वी आणि नंतर आज्याहुती द्याव्यात म्हणजे त्यायोगाने अग्निदेव यजमानाला दुग्धादिरस व धन यांनी मागे व पुढे निश्चयाने वेढून टाकतो. सारांश, अग्नीच्या कृपेने यजमान क्षीरादि रस व धन यांनी सर्वतोपरी समृध्द होतो. आधान व पुनराधान या दोहोंचेही अनुष्ठान करून आदित्य हे इहलोकातून स्वर्गलोकी गेले. पण ते त्या ठिकाणी तहानेने अगदी व्याकुळ झाले. तेव्हा आपल्याला प्राप्त झालेली समृध्दी अपुरी आहे असे त्यांना वाटले आणि ते आदित्य परत या भूलोकी आले आणि पुन्हा अग्न्याधान करून त्यांनी 'लेक: सलेक:' इत्यादि मंत्रांनी आज्याचा होम केला. तेव्हा ते पूर्णपणे समृद्ध होऊन स्वर्गलोकी गेले. यासाठी जो कोणी यजमान 'पुनराधेया' नंतर अग्नीचे आधान (स्थापन) करून 'लेक: सलेक:' इत्यादि मंत्रांनी आज्याचा होम करील तो यजमान आदित्यांनी ज्या प्रकारची समृध्दी संपादन केली त्या प्रकारची समृध्दी संपादन करील. (अनुवाक ४).

१ यज्ञाच्याजवळ येऊन पोचलेले आम्ही आमच्यावर असलेल्या अनुग्रहामुळे दूरच्या अंतरावरूनही आमचे भाषण ऐकणाऱ्या अग्नीला संतोष व्हावा म्हणून मंत्राचा उच्चार करतो. २ या अग्नीच्या पुरातन व अनुकूल अशा दीप्तिरूपी गाईची केव्हाही न लाजणारे ऋत्विज धार काढून, भरपूर धन देणारे व यज्ञकर्माला प्रवृत्त करणारे पांढरे व स्वच्छ असे ज्योतिरूप दूध काढतात. ३ आदित्यरूपाने तळपत असलेला हा अग्नी द्युलोकाचे अत्यंत उंच असे जणू मस्तकच आहे. पृथ्वीचा पालक असलेला हा अग्नी उदकांच्या सारभूत रसांपासून उत्पन्न झालेल्या स्थावर जंगम शरीरांना सुख देतो. म्हणजे व्रीहियवादि धान्यांची समृध्दी करतो. ४ देवांना बोलावणारा, अत्यंत यजनशील यज्ञांमध्ये स्तवनीय आणि अप्नवान् व भृगु नांवाच्या मुनींनी अरण्यात असलेल्या आपआपल्या आश्रमांच्या ठिकाणी समीपवर्ती अशा त्या त्या प्रजांच्या अभ्युदयासाठी ज्या आश्चर्यजनक व व्यापक अशा अग्नीला विशेषत: प्रज्वलित केला तोच हा अग्नी ह्या ठिकाणी यज्ञकर्माचा प्रधानभूत देव म्हणून धारण करण्याविषयी यत्न करणाऱ्या आम्ही यजमानांनी धारण केला आहे. ५ हे इंद्राग्नी हो, तुम्हा दोघांना प्रमुखत्वाने बोलावण्याची मी इच्छा करीत आहे. तुम्हा दोघांना हविर्द्रव्यरूपी अन्नाने संतुष्ट करावे असे मला वाटते. तुम्ही दोघेही अन्न

व क्षीरादि रस देणारे आहात. त्या अर्थी अन्नाचा लाभ आम्हाला व्हावा म्हणून तुम्हा दोघांना मी बोलावीत आहे. ६ हे अग्ने, हा आहवनीय प्रदेश तुझे जन्मस्थान असून याच ठिकाणी सर्व ऋतूत तुझ्यासाठी हवन केले जाते. ज्या आहवनीय प्रदेशापासून उद्भू होऊन तू प्रकाशतोस ते स्थान आपलेपणाने लक्षात घेऊन या ठिकाणी आरोहण कर. आणि नंतर आमच्या धनाची वाढ कर. ७ हे अग्ने, तू आमच्या आयुष्यांना शुद्ध अर्थात् निर्दोष करतोस. आम्हाला अन्न आणि दुग्धादि रस आणून दे. आमच्या शत्रूंच्या सेनेला लांब नेऊन तिला पीडा उत्पन्न कर. ८ हे अग्ने, शुभ अशी कर्मे करणारा तू पुष्टी आणि धन माझ्या ठिकाणी धारण करणारा होऊन मला ब्रह्मतेज व उत्कृष्ट सामर्थ्य प्राप्त करून दे. ९ हे सर्वांना पवित्र करणाऱ्या अग्निदेवा, देदीप्यमान व सुंदर अशा ज्यालारूपी जिव्हेने तू देवांना बोलाव आणि त्यांचे यजन कर. १० हे सर्वशोधका अग्निदेवा, प्रकाशमान असा तू आमच्यासाठी देवांना बोलावून आण. आमचा यज्ञ व तत्संबंधी हविर्द्रव्य त्यांच्याजवळ घेऊन जा. ११ अग्नी हा स्वाभाविकच अत्यंत शुद्ध आचरण करणारा आहे. ब्राह्मणांचा अभिमानी असल्यामुळे तो अधिकच शुद्ध झाला आहे. आम्ही त्याचे ठिकाणी हवन केल्यानंतर तर अधिकच शुद्ध होऊन प्रकाशतो. १२ हे अग्ने, तुझे शुद्ध व शुभ्रवर्ण किरण प्रकाशमान होऊन वर जात असतात. तुझे अर्चन करणारे तुझ्या ज्योतींच्या ठिकाणी विलीन होऊन जातात. १३ हे अग्निदेवा, तू आयुष्य देणारा आहेस यास्तव मला आयुष्य दे. अग्निदेवा, तू कांती देणारा आहेस, तर माझ्या शरीराच्या ठिकाणी कांती निर्माण कर. हे अग्निदेवा, तू शरीराचे संरक्षण करणारा आहेस यास्तव माझ्या शरीराचे संरक्षण कर. हे अग्निदेवा, माझ्या शरीराचे ठिकाणी जे काही उणे असेल ते मजवर कृपा करून पूर्ण कर. १४ हे रात्रिदेवते तुझ्या शेवटाला आम्ही सुखाने प्राप्त होऊ. १५ हे अग्निदेवा, अन्ननिष्पादक, कीर्तिप्रद, कोणाकडूनही तिरस्कृत न होणारा, अत्यंत उंच अशा स्वर्गलोकावर जाण्याविषयी आमचा विरोध करणारांचा नाश करणारा अशा तुला समिधांनी प्रज्वलित करणारे, अन्नाने संपन्न, कीर्तिमंत आणि उत्कृष्ट पुत्रादिकांनी युक्त असे आम्ही, शंभर हेमंत ऋतू उलटून जातील इतक्या दीर्घकालपर्यंत देदीप्यमान होऊन लोकांमध्ये उत्तम प्रख्यात होऊ. १६ हे अग्निदेवा, तू सूर्याच्या तेजाशी पूर्णपणे एकजीव झाला आहेस, ऋषींनी केलेल्या स्तवनांशी अगदी गढून गेला आहेस. अत्यंत प्रिय अशा आहवनीय प्रदेशरूपी स्थानाशी तू उत्तम प्रकारे संलग्न झाला आहेस. अग्निदेवा, तू सूर्यासारखा तेजस्वी आहेस. मला

आयुष्य, उत्कृष्ट शरीरकांती आणि उत्तम प्रजा यांनी संयुक्त कर (अनुवाक ५).

१ मी पुत्रपौत्रादि मानवी प्रजा आणि गाईची प्रजा उत्तम प्रकारे पाहतो. मानवी व पशुसंबंधी असलेल्या सर्व प्रजा आमच्या घरी असोत. २ हे गोमहिष्यादि पशूहो, यथेच्छ उदकपान केलेले तुम्हीच जणू उदकरूप आहात. तुम्ही प्यालेल्या उदकांचे सारच असे दूध मी भक्षण करीन. तुम्ही पूजनीय आहात. तुमचे पूज्य म्हणजे सर्वांना आदरणीय असे दूध मी भक्षण करीन. तुम्ही बलरूपच आहात. तुमचे बलोत्पादक दूध मी भक्षण करीन. तुम्ही रसरूप आहात. तुमचा स्वादिष्ट रसच असे दूध मी भक्षण करीन. ३ हे दुग्धरूप धनाने युक्त अशा पशूंनो, या अग्निहोत्रशाळेच्या ठिकाणी आनंदाने क्रीडा करा. या गोठ्यात, या घरात व या तुमच्या जन्मस्थानात तुम्ही आनंदाने खेळत रहा. तुम्ही येथेच सतत रहा. येथून बाहेर जाऊ नका. अपत्यपरंपरेने वृद्धिंगत व्हा. ४ हे वत्स, तू आपल्या आईच्याशी संयुक्त आहेस. आपल्या आईचे स्तनपान करण्यासाठी डाव्या उजव्या बाजूला धावण्याने नाना रूपांनी भासणारा तू क्षीरादि रसाच्या निमित्ताने माझ्या जवळ ये. पुष्कळ पशूंच्या माझ्या धनीपणाच्या निमित्ताने तू माझ्याजवळ ये. धन व पुष्टी यांच्या निमित्ताने तू माझ्याजवळ ये. हे पशूंनो माझ्या ठिकाणी तुमचे दुग्धादिरसरूपी धन साठून राहो. ५ हे अग्ने, सांजसकाळ बुध्दिपुररूसर नमस्कार करणारे आम्ही दररोज तुझ्याजवळ येत असतो. ६ यज्ञामध्ये राजाप्रमाणे शोभणारा गाईचा पालक, सत्याचा प्रकाशक व स्वत:च्या अग्निहोत्र शाळेत वृद्धिंगत होणारा अशा तुज अग्नीसन्निध आम्ही येत असतो. ७ हे अग्ने पूर्वोक्त गुणांनी युक्त असा तू, बाप मुलाकडे प्रेमाने येऊन पोचतो त्याप्रमाणे तू मन:पूर्वक प्रेमाने मजकडे येणारा हो आणि माझ्या कल्याणासाठी माझ्या सहवासात राहणारा हो. ८ हे अग्ने, तू आमचा निकटवर्ती हो आणि आमचे संरक्षण करणारा, शांत झालेला तू आमच्या घरी सर्वदा आमच्या सान्निध्यात राहणारा हो. ९ हे अग्निदेवा, तू अत्यंत शुद्ध व देदीप्यमान असा आहेस. आमच्या मुलाबाळांना व इष्टमित्रांना सुख मिळावे म्हणून पूर्वोक्त गुणांनी युक्त अशा तुझ्या सन्निध आम्ही आलो आहोत. १० धनवान असा हा अग्नी, वसुरुद्रादि देवही ज्याची कीर्ती आदरपूर्वक श्रवण करतात असा आहे. हे अग्ने तू आमच्याकडे मुख करून आमच्याजवळ येऊन पोहोच आणि अत्यंत प्रकाशमान असा तू आम्हाला धन दे. ११ आमच्या घरी राहणाऱ्या हे पशूंनो,

दुग्धादि रसांच्या निमित्ताने तुमच्याकडे मी अवलोकन करीन व तुम्हीही दुग्धादि रसांच्या निमित्ताने मजकडे पहा. धन आणि पुष्टी यांच्या निमित्ताने मी तुम्हाला अवलोकन करीन व तुम्हीही धन व पुष्टी यांच्या निमित्ताने मला अवलोकन करा. हे गाईनो, तुम्ही मधुर असे घृत निर्माण करणाऱ्या आहात. आम्हाला सुखकर अन्नयुक्त व आनंदित असलेल्या तुम्ही मजजवळ नेहमी रहा. हजार संख्येने तुमची वाढ होईल अशाप्रकारे मी तुम्हाला पोशीन. तुमचे दुग्धादिरसरूप धन माझ्या ठिकाणी संचित होवो. १२ जो आमच्या बुद्धींना प्रेरणा करतो त्या सवितादेवाचे अत्यंत श्रेष्ठ असे जे तेज त्याचे आम्ही ध्यान करतो. १३ हे ब्रह्मणस्पते अग्रे, तू 'उशिक' नांवाच्या स्त्रीपासून जन्मलेल्या 'कक्षीवान' नामक पुत्राला ज्याप्रमाणे तू कर्मप्रवर्तक ऋषी बनविलेस त्याचप्रमाणे मलाही सोमयागांच्या अनुष्ठानाचा उपदेष्टा कर. १४ परमऐश्वर्ययुक्त अशा हे अग्निदेवा, तू केव्हाही आम्हाला उपद्रव देणारा नाहीस. तुला हवी प्रदान करणाऱ्या यजमानाच्या कल्याणासाठी तू त्याच्या अत्यंत सन्निध येतोस. हे धनवान अग्निदेवा, तुला आम्ही दिलेले हविर्द्रव्याचे दान पुन्हा फलरूपाने आमच्याजवळ परत येते. १५ हे बलवंता अग्निदेवा, रचिलेले मनोरथ पूर्ण करणारा, ब्राह्मणांचा अभिमानी, शत्रूंचा पराभव करीत असलेल्यांच्या सारखाच आकार धारण करणारा आणि इतरांचा नाश करण्याच्याच उद्योगात असलेल्या राक्षसांचा नाश करणारा, अशा तुज अग्निदेवाचे आम्ही प्रत्येक दिवशी सर्वतोपरी ध्यान करीत असतो. १६ हे गृहपालका अग्निदेवा, गृहाचा अधिपती अशा तुज देवाच्या अनुग्रहाने मी उत्तम प्रकारचा गृहपती होईन व गृहपती अशा मजकडून पूजित झालेला तू उत्कृष्ट असा गृहपती हो. शंभर हिवाळे उलटून जातील इतक्या दीर्घ काळपर्यंत मी पुढे उत्पन्न होणाऱ्या पुत्रसंततीच्या कल्याणासाठी ब्रह्मतेजाने युक्त अर्थात् आयुष्य, आरोग्य, व ऐश्वर्य यांच्या वृद्धिरूप असणाऱ्या तुजजवळ त्या आशीर्वादाची याचना करतो. त्याचप्रमाणे आज विद्यमान असलेल्या, देवदत्तादि नांवे असलेल्या पुत्रांच्या कल्याणासाठीही ब्रह्मतेजाने संपन्न म्हणजे आताच वर्णिर्णलेल्या गुणांनी युक्त अशा त्या तुझ्या आशीर्वादाची तुजपाशी मी याचना करतो. (अनुवाक ६).

ज्यामध्ये 'साम' नसते असा यज्ञ खरोखर 'यज्ञ' या संज्ञेस पात्रच होत नाही. तो 'अयज्ञ'च होय यास्तव 'उपाप्रयन्तो अध्वरं' इत्यादि मंत्रसंघाचे पठण करावे. म्हणजे 'अग्निहोत्र'रूप यज्ञाचे ठिकाणी 'स्तोमा' ची म्हणजे 'साम' संघाचीच जणू काय योजना केल्यासारखे होते. पहिल्याच मंत्रात 'उप' असा शब्द उच्चारला जातो. त्याच्या योगाने यजमानसुध्दा प्रजा व

पशू यांच्यासह भूलोकाप्रत प्राप्त होतो. 'अस्य प्रत्नामनुद्युतं' हा मंत्र म्हणावा. या मंत्रात 'प्रत्न' हा शब्द आला आहे. 'प्रत्न' शब्दाचा अर्थ स्वर्गलोक असाच आहे. यास्तव 'प्रत्न'शब्दघटित असा मन्त्र म्हटला म्हणजे यजमान जणू काय स्वर्ग लोकावर आरूढ झाल्यासारखे होते. 'अग्निर्मूर्धा दिवः ककुत्' ह्या मंत्राचे पठन करावे. या मंत्रात 'मूर्धा' हे पद आहे. मूर्धा म्हणजे मस्तक हे सर्व अवयवांमध्ये श्रेष्ठ आहे. यास्तव मूर्धा शब्दाने युक्त असा हा मंत्र म्हटला असता अग्निदेव त्या यजमानाला त्याच्या बरोबरीच्या लोकांमध्ये जणू मस्तकाप्रमाणे श्रेष्ठ करतो. म्हणजे तो यजमान काही काळ देवलोकात वास करतो व तेथून पुन्हा परत येऊन या मनुष्य लोकात निश्चितपणे प्रतिष्ठित होतो. नंतर 'अयमिह प्रथमोधायि धातृभिः' या मंत्राचे पठण करावे. या मंत्राच्या पहिल्याच चरणात 'प्रथम' हा शब्द असून तो 'मुख्य' या अर्थाचा सूचक आहे. अर्थात् या मंत्राच्या पठनाने अग्नी त्या यजमानाला समाजामध्ये 'मुख्य' च करतो. मग 'उभावामिंद्राग्नी आहुवध्यै' हा मंत्र म्हणावा. या मंत्रात 'इन्द्र' व 'अग्नी' हे दोन शब्द आहेत. इन्द्र हा बलाचा अभिमानी व अग्नी हा तेजाचा अभिमानी देव आहे. यास्तव या मंत्राच्या पठनाने यजमानाला इन्द्र व अग्नी यांच्या अनुग्रहाने बल व तेज यांची प्राप्ती होते. नंतर 'अयं ते योनिर्ऋत्वियः' हा मंत्र म्हणावा. या मंत्राच्या शेवटी 'रयि' असे पद आहे व त्या पदाने 'पशू' हेच रयि म्हणजे धन आहे असे सूचित होत आहे. यासाठी या मंत्राचे पठन केले असता यजमान पशुरूपी धनांना संपादन करतो. एवं च, 'उप प्रयंतो अध्वरं' येथून 'अयं ते योनि' या ऋचेच्या अखेर सहा ऋचा होतात. या सहा ऋचांनी अग्नीचे उपस्थान करावे. कारण वर्षाचे ऋतू सहा आहेत. अर्थात् या सहा ऋचांनी उपस्थान केले असता यजमान सहा ऋतूंच्याच ठिकाणी जणू प्रतिष्ठित होतो. नंतर पुढे असलेल्या 'संपश्यामि प्रजा अहं' इत्यादि सहा ऋचांनी उपस्थान करावे. म्हणजे एकंदर बारा ऋचा होतात. 'संवत्सर' हा बारा महिन्यांचा असतो. अर्थात् बारा महिन्यांच्याशी संख्या साम्य असलेल्या ऋचांनी उपस्थान केले असता यजमान संवत्सराचेच ठिकाणी प्रतिष्ठित होतो. एक एक वर्ष जसे जसे उलटते तसे तसे माणूस घोडा किंवा गाय या सर्वांना ज्याप्रमाणे जरा प्राप्त होते त्याचप्रमाणे स्थापन केलेला अग्नी देखील एक एक वर्ष उलटल्याने जरेला प्राप्त होत असतो. यास्तव प्रत्येक संवत्सराच्या समाप्तीनंतर एकवार 'अग्निपावमानी' म्हणजे अग्नी व पवमान या दोन देवतांसंबंधी असलेल्या सहा ऋचांनी उपस्थान करावे. म्हणजे त्या योगाने यजमानाने अग्नीला जरारहित

व नूतन केल्यासारखे होते व तो ताजातवाना झालेला अग्नी यजमानालाही पवित्र करतो. 'अयमिह प्रथमो धायि धातृभिः' या मंत्राच्या योगाने या अग्नीचा यजमानाशी जो संबंध येतो तो अनुग्राह्यअनुग्राहकरूपी असतो. 'उतारे बाधस्व दुच्छुनाम्' या मंत्राने येणाऱ्या संबंधाला 'दभ' म्हणतात. त्याच्या योगाने दाहादि उपद्रवांचे निवारण होते. 'अथा नो वर्धया रयिम्' या मंत्राच्या योगाने धनादिकांची याचना केली जाते. तसेच ज्याप्रमाणे एखादा दरिद्री मनुष्य धनिकाला स्वतःच्या हितासाठी काही तरी उपहारवस्तू अर्पण करतो त्याप्रमाणे 'मंत्र वोचे माग्नये' हा मंत्र यजमान अग्नीला नमस्कारपूर्वक अर्पण करतो. हे अग्निदेवा तू आयुष्य देणारा आहेस. मला आयुष्य दे. असे यजमान म्हणतो अग्नी त्याला आयुष्य देतो. हे अग्ने, तू तेज देणारा आहेस, मला तेज दे, असे यजमान म्हणतो. अग्नी त्याला तेज देतो. हे अग्ने तू माझ्या शरीराचे संरक्षण करणारा आहेस. माझ्या शरीराचे रक्षण कर, असे यजमान म्हणतो. त्याप्रमाणे अग्निदेव त्याच्या शरीराचे रक्षण करतो. हे अग्निदेवा माझ्या शरीराच्या ठिकाणी जे काही उणे असेल ते मजवर कृपा करून पूर्ण कर, तसेच माझ्या पुत्रादि प्रजा व पशू यांच्या ठिकाणी जे काही उणे असेल ते तू पूर्ण कर असे यजमान म्हणतो 'चित्रावसो स्वस्ति ते पारमशीय' या मंत्राने यजमान रात्रिदेवतेची प्रार्थना करतो. नक्षत्रादिरूपी चित्र स्पष्टपणे तीत दिसून येते म्हणून रात्रीला चित्रावसू म्हणतात. हेमंत ऋतूत रात्री मोठ्या असल्याने रात्र सरून प्रभात काल येणार नाही, अशा भीतीने पूर्वी ब्राह्मणांनी रात्रीदेवतेची 'चित्रावसो' या मंत्राने प्रार्थना केली. तेणे करून त्यांना प्रभातकाळाची प्राप्ती झाली. यजमानालाही त्याप्रमाणे या मंत्राच्या प्रार्थनेने प्रभातकाळाची प्राप्ती होते. 'इंधानास्त्वा शतं हिमा' या मंत्राने यजमान अग्निदेवतेचे उपस्थान करतो. त्यायोगे पुरुष शंभरवर्षांची आयुर्मर्यादा असलेला व नाडीरूप शंभर इंद्रिये असणारा असा होतो. वरील मंत्राच्या योगाने यजमान शंभर वर्षांची आयुर्मर्यादा व नाडीरूप शंभर इंद्रिये यांच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. अंतर्बाह्य प्रज्वलित आणि सच्छिद्र अशी लोखंडी स्थूणा म्हणजे सूर्मी, या सूर्मीच्या म्हणजे शतघ्नीनामक शस्त्राच्या एकाच प्रहाराने शेकडो शूरांचा विनाश केला जातो. ही ऋचा या सूर्मीसारखीच होय. या शतघ्नीसमान ऋचेने एकच आघात करून असुरांतील शेकडो शूरांची देव हिंसा करतात. म्हणून जेणे करून आपला विनाश न होता समृध्दीच होईल अशा तऱ्हेने, अशा उद्देशाने समिधेचे आधान करून, शतघ्नीस्वरूप या ऋचेला जणू वज्रच बनवून शत्रूवर यजमान या ऋचेचा आघात करतो. 'सं त्वमग्ने सूर्यस्य' हा मंत्र म्हणून,

तू सूर्यासारखा तेजस्वी आहेस, मलाही त्या तेजाने संयुक्त कर, अशी प्रार्थना यजमान अग्नीला करतो. 'त्वमग्ने सूर्यचर्चा असि' हा मंत्रभाग प्रथम उच्चारून नंतर 'सं मामायुषा' हा मंत्र विभाग नंतर म्हणतो आणि त्या योगे आयुष्यादिकांच्या समृध्दीची मी आशा करतो, अशी यजमान अग्नीला प्रार्थना करतो. (अनुवाक ७).

'संपश्यामि प्रजा अहं' या ऋचेने अग्नीचे 'उपस्थान' करावे. या ऋङ्.मंत्रात 'इडप्रजस:' असा शब्द असून तो गोमहिष्यादि ग्राम्य पशूंचा उपलक्षक आहे. यास्तव या ऋङ्.मंत्राने उपस्थान केल्याच्या योगाने यजमानाने जितके काही ग्राम्य पशू आहेत, त्या सर्वांचेच जणू संपादन केल्यासारखे होते. 'अंभस्थाम्भो वो भक्षीय' हा मंत्रभाग पठण करावा. कारण गाई ह्या उदकरूप आहेत. नंतर 'मह:स्थ महो वो भक्षीय' हा मंत्रभाग पठण करावा. कारण गाई ह्या महनीय म्हणजे पूजनीय आहेत. मग 'सह:स्थ सहो वो भक्षीय' असे म्हणावे. कारण गाई ह्या बलसंपन्न आहेत. नंतर 'ऊर्ज:स्थ ऊर्जं वो भक्षीय' हा मंत्रभाग पठण करावा कारण गाई ह्या दुग्धरूप रसाने संपन्न आहेत. यापुढे 'रेवती रमध्वं' हा मन्त्र म्हणावा. पशू हेच रेवती म्हणजे क्षीरादिरसरूप धनाने युक्त आहेत. यास्तव या मंत्राच्या पठणाने यजमानाने पशूंनाच आपल्या सन्निध खेळत ठेवल्यासारखे होते. या मंत्राच्या शेवटी 'इहैव स्तेतो माडप गात' हा भाग पठण करावा. म्हणजे त्या योगाने यजमान जणू काय त्या गाईंना त्या आपल्या घरीच अखंड राहतील, आपल्या घरातून बाहेर न जातील अशा करतो. कोणी एखादा यजमान 'इष्टकाचित्' म्हणजे विशिष्ट अशा आकृतीने विटांची मांडणी करून त्यावर अग्नीची मांडणी किंवा स्थापन करतो. तर दुसरा एखादा यजमान 'पशुचित्' म्हणजे गाई म्हशी इत्यादि पशूंची विशिष्ट आकृतीने मांडणी म्हणजे त्यांना बांधून ठेवण्याची रचना करून त्यांच्या सान्निध्यात अग्नीची स्थापना करणारा असतो. यास्तव 'संहितासि विश्वरूपी' या मंत्राने होमधेनूच्या वासराला स्पर्श करावा. म्हणजे त्या योगे यजमानाने जणू काय त्या वासराला अग्नीच्या जवळ धारण केल्यासारखे होते व तो अग्नी त्या यजमानाला 'पशुचित्' करतो. जो यजमान आहवनीयाग्नीचे उपस्थान करतो तो इहलोकापासून च्युत होतो. यास्तव आहवनीयाच्या उपस्थानानंतर गार्हपत्याग्नीचे उपस्थान करावे. म्हणजे तो यजमानास या लोकात प्रतिष्ठित होतो. शिवाय स्वत:च्या प्रतिष्ठेकरता गार्हपत्याग्नीला गोड बोलून खूष केल्यासारखे होते. नंतर 'उप त्वाग्ने दिवे दिवे' इत्यादि गायत्री छंदातील तीन ऋङ्.मंत्रांनी उपस्थान करावे. गायत्री ही तेजोरूप आहे. यास्तव गायत्री

छंदातील ऋचांनी उपरस्थान केल्याच्या योगाने यजमानाने स्वतःच्या ठिकाणी तेज धारण केल्यासारखे होते. शिवाय आता जे 'तृच' म्हणजे तीन ऋचांचा संघ सांगितला त्या संघाने केलेले उपस्थान प्राप्त झालेल्या तेजाचे सातत्य राहण्याला, अर्थात् ते सतत टिकून राहण्याला कारणभूत होते. गार्हपत्याग्नीला अनुलक्षून द्विपाद मानववीर उत्पन्न होत असतात. ही गोष्ट जाणणारा जो यजमान 'द्विपदा' छंदात्मक अशा 'अग्ने त्वं नो अंतमः' इत्यादि तीन ऋचांनी गार्हपत्याचे उपस्थान करतो त्याला अत्यंत पराक्रमी असा वीर पुत्र होतो. नंतर 'ऊर्जा वः पश्याम्यूर्जामापश्यत' या मंत्राने उपस्थान करावे म्हणजे त्या योगाने या मंत्रातील 'ऊर्जामापश्यत' म्हणजे क्षीरादिरसांसह मला अवलोकन करा', या वाक्याचा उच्चार करून त्यात सूचित केलेल्या आशीर्वादाचीच अग्नीजवळ यजमानाने याचना केल्यासारखे होते. नंतर 'तत्सवितुर्वरेण्यं' ही ऋचा म्हणावी. या ऋचेत 'सवितुः' म्हणजे प्रेरणा करणाऱ्या देवाचे, असे पद आहे. अर्थात् या सवितृशब्दोच्चारित अशा ऋचेने उपस्थान केल्याने ते यजमानाला स्वकर्तव्याची प्रेरणा करण्याला कारणभूत होते. मग 'सोमानं स्वरणं' ही ऋचा म्हणावी. हिच्यामधील 'सोमानं' या पदोच्चारामुळे यजमानाने सोमपानच संपादन केल्याप्रमाणे होते. त्याचप्रमाणे याच ऋङ्.मंत्रामध्ये 'ब्रह्मणस्पते' या शब्दाचा जो उच्चार केला जातो, त्यामुळे यजमानाने स्वतःच्या ठिकाणी ब्रह्मतेजाचे जणू संपादन केल्यासारखे होते. यानंतर 'कदाचन स्तरीरसि' ही ऋचा म्हणावी. या ऋचेचे मर्म जाणून अग्न्युपस्थान करणाऱ्या यजमानाला, चोरविंचूकाट्यादिकांच्या उपद्रवात रात्र काढण्याचा प्रसंग न येता, तो सुखकर अशा रात्रीत राहिल्यासारखे होते.'पुढे परि त्वाग्ने पुरं वयं' हा मंत्र पठण करावा. या मंत्रात 'परिधीमहि' असे म्हटले जात असल्यामुळे यजमानाने जणू काय हविर्द्रव्य कुंडाच्या बाहेर पडू नये म्हणून अग्नीच्या (कुंडा) भोवती परिधीच घातल्यासारखे होते. या नंतर 'अग्ने गृहपते' हा मंत्र म्हणावा. म्हणजे या मंत्रात व्यक्त झाल्याप्रमाणे यजमानाने आपल्या आकांक्षा अग्निदेवाजवळ बोलून दाखविल्याप्रमाणे होते. 'शतं हिमा' असे शब्द या मंत्रात उच्चारले जातात. यांच्या योगाने शंभर हेमंत ऋतू उलटून जाईपर्यंत तुला प्रज्वलित करीत राहीन, असेच अग्नीला उद्देशून यजमानाने बोलल्यासारखे होते. नंतर पुत्राचे नांव घ्यावे. त्यायोगाने जणू काय त्या पुत्राला सेवनीय अशा अन्नाचे भक्षण करणाराच केल्यासारखे होते. ज्याला पुत्र झालेला नाही त्या यजमानाने 'तन्तवे ज्योतिष्मतीं' असे म्हणून त्या आशीर्वादाची याचना करावी म्हणजे त्याला तेजस्वी व ब्रह्मवर्चसी असा पुत्र उत्पन्न होतो. ज्याला पुत्रसंतती झालेली आहे, त्याने अमुष्मै ज्योतिष्मतीं असे म्हणून, अर्थात् जितके पुत्र असतील त्यांतील प्रत्येक पुत्राच्या नांवाचा उच्चार करून त्या आशीर्वचनाची

अग्निदेवाजवळ याचना करावी. म्हणजे त्यायोगे यजमानाने आपल्या प्रत्येक पुत्राचे ठिकाणी तेज व ब्रह्मवर्चस् यांचे धारण केल्यासारखे होते. (अनुवाक ८).

आहवनीयादि तीनही अग्नींच्या ठिकाणी दररोज सांज सकाळ 'अग्निहोत्र' संज्ञक होम करावा. यजमानाचे स्वकीय असे जे काही हविर्द्रव्य अग्नीच्या ठिकाणी हुत झालेले असते, ते नाहीसे न होता त्या यजमानाचे स्वकीय होऊनच राहत असते. अग्नी हा जणू प्रजोत्पादक अशी योनीच आहे. यास्तव स्त्रीच्या योनीमध्ये पुरूषाने सिंचित केलेले रेत नष्ट न होता कायम राहते, त्याचप्रमाणे प्रजोत्पादक अशा अग्निरूपी योनीमध्ये यजमान जे हविर्द्रव्यरूपी रेत सिंचित करतो ते नष्ट न होता तसेच कायम राहते. ऐन उन्हाळ्याच्या काळी वणव्याच्या रूपाने अग्नी आपल्या सन्निध असलेल्या वनस्पती जाळतो. तथापि त्या वनस्पती पावसाळ्यात पहिल्यापेक्षा अधिकतेने पुन्हा उत्पन्न होतात. अर्थात् अग्नी हा प्रजोत्पादक अशी योनीच आहे, असे जे विधान केले आहे, ते युक्तच आहे. 'अग्निहोत्र' संबंधी सायंकाळी हवन करावे. त्या योगाने हविर्द्रव्यरूपी असे ते रेतच सिंचित केल्यासारखे होते व प्रात:काली जे हवन केले जाते त्या योगाने ते हविर्द्रव्यरूपी रेत पुन्हा उत्पन्न होते. लौकिक व्यवहारात असे दिसून येते की स्त्रीच्या योनीत पुरुषाने सिंचित केलेले रेत जर विश्वकर्म्याने विकृत केले नाही तर प्रजोत्पात्ती होतच नाही. तो सृष्टिकर्ता विश्वकर्मा जितक्या रूपांना उद्देशून ते रेत विकृत करील म्हणजे त्याचे निरनिराळे भाग करील, तितकीच रूपे धारण करून ते रेत पुन्हा उत्पन्न होत असते. 'अग्निहोत्र' होम करणारा यजमान देवांनी अनुगृहीत असा त्वष्टा म्हणजे जणू विश्वकर्माच आहे. तो पुष्कळ ऋचांनी अग्नीचे उपस्थान करतो. त्या योगाने तो जणू काय अग्निरूपी योनीच्या ठिकाणी सिंचित केलेल्या हविर्द्रव्यरूपी रेताचीच विविध अशी रूपे निर्माण करतो. अशाप्रकारे 'अग्निहोत्र' होम व तत्संबंधी उपस्थान यांचे माहात्म्य जो जाणतो तो प्रजेच्या रूपाने उत्पन्न होतोच. शिवाय तो दिवसानुदिवस धनादिकांनी वृद्धिंगत होतो. दिवस देवांचा होता आणि रात्र असुरांच्या मालकीची होती. संपादन करून ठेवलेले व पुढे संपादन करण्यास योग्य असे जे काही देवांचे पशुरूपी धन होते त्या सर्वच धनाचा अपहार करून ते असुर काळोख्या रात्रीत कोठेतरी निघून गेले. तेव्हा ते देव 'आम्ही आता पशुहीन झालो' अशा प्रकारचा खेद करू लागले. बराच विचार केल्यावर त्यांनी असे पाहिले की, अग्नी हा रात्री विशेष प्रकाशतो, अर्थात् रात्र ही अग्नीच्या मालकीची आहे व पशूही 'आग्नेय' म्हणजे अग्नीच्याच मालकीचे आहेत. यास्तव ह्या अग्नीचेच

आपण स्तवन करावे. आपण स्तविलेला तो अग्नीच आमचे पशू पुन्हा आम्हाला प्राप्त करून देईल. शेवटी त्या देवांनी पूर्वोक्त प्रकारे उपस्थानपूर्वक अग्नीचे स्तवन केले. देवांच्यापासून स्तविल्या गेलेल्या त्या अग्नीने रात्रीचा शेवट होऊन आता दिवस उगवणार, इतक्या अवधीत देवांचे पशू देवांना परत आणून दिले. अशाप्रकारे पशूंची प्राप्ती झाल्यानंतर देवांनी पुष्कळ भोग भोगले. एवं च, अग्न्युपस्थानाचे हे माहात्म्य जाणून जो अग्नीचे उपस्थान करतो, तो पशुसंपत्तीने युक्त होतो. सुप्रसिद्ध असा आदित्य या भूलोकातून वर स्वर्गलोकी गेला. पण तेथे गेल्यावर पुन्हा या भूलोकाचा तो ध्यास करू लागला व त्याप्रमाणे तो पुन्हा या भूलोकी येऊन पोचल्यावर त्याला मृत्यूचे भय वाटू लागले. हा भूलोक म्हणजे मृत्यूने घेरल्या सारखाच आहे असे त्याने पाहिले. तेव्हा त्याने विचार केला की मी अग्नीचे स्तवन करीन, मजकडून स्तविला गेलेला तो अग्नी मला स्वर्गलोकी नेऊन पोचवील. आदित्याने त्याप्रमाणे अग्नीचे उपस्थानपूर्वक स्तवन केले. त्याने स्तविल्या गेलेल्या अग्नीनेही त्या आदित्याला स्वर्गलोकाला नेऊन पोचविले. याप्रमाणे अग्न्युपस्थानाचे माहात्म्य जाणणारा जो यजमान अग्नीचे उपस्थान करतो तो संपूर्ण आयुष्याच्या उपभोगाला प्राप्त होऊन शेवटी स्वर्गलोकाला जातो. जो यजमान आहवनीय व गार्हपत्य ह्या दोन्ही अग्नींचे उपस्थान करतो, तो जणू काय त्या दोघांनाही वश करून घेतो. ज्याप्रमाणे एखादा सामान्य मनुष्य 'मी विद्यादिकांनी श्रेष्ठ होऊन उच्च अशा स्थानावर आरूढ होईन' अशी इच्छा करतो, त्याचप्रमाणे यजमान अग्न्युपस्थानाच्या योगाने मी उच्च स्थानाला प्राप्त होईन अशी इच्छा करतो. अग्नीचे उपस्थान रात्रीच्या वेळी दिल्या जाणाऱ्या होमानंतरच करावे. प्रातः—कालच्या होमाच्या वेळी मुळीच उपस्थान करू नये. कारण रात्री अवश्य करावयाची ती सर्व कर्मानुष्ठाने संमिश्र होतात. अंधारामुळे कोणी कसे अनुष्ठान केले हे दृष्टीस पडेनासे होते. 'श्रेयान्' म्हणजे यथाशास्त्र केले जाणारे कल्याणप्रद आणि 'पापीयान्' म्हणजे शास्त्रबाह्य, श्रेयाचा नाश करणारे या दोन्ही प्रकारची अनुष्ठाने यांची खिचडी झालेली असते. बरी वाईट दोन्ही प्रकारची कर्मे परस्परात संमिश्र होऊन राहिलेली असतात. अग्नी हा मूर्तिमंत प्रकाश असून रात्र ही तमोरूप म्हणजे अंधकारयुक्त आहे. अर्थात् यास्तव रात्रीच्या होमानंतर जर अग्नीचे उपस्थान केले तर त्या अग्नीच्या उज्वल प्रकाशाने रात्रीच्या अंधकारामुळे अनुष्ठानाविषयी उत्पन्न होणाऱ्या संमिश्रतेच्या भ्रमातून यजमान तरला जातो. काही विद्वान याज्ञिक अग्नी हा उपस्थेय म्हणजे उपस्थान करण्यास योग्य आहे किंवा उपस्थान करण्यास योग्य नाही? असा प्रश्न

उपस्थित करून असे म्हणतात की, जो कोणी दरिद्री माणूस जांभूळ, केळे, पेरू, असे एखादे फळ दररोज राजाला भेट म्हणून देत जाऊन धन, जमीन अशा काही तरी वस्तूची याचना प्रत्येक दिवशी ह्याच्याजवळ करील, तर त्याने राजाला पीडा दिल्यासारखे होईल. उपस्थान म्हणजे याचनाच आहे, हे तद्विषयक मंत्रार्थावरून स्पष्टच आहे. अर्थात् महाप्रभाववान अशा देवांच्याजवळ दररोज याचना करण्यास कोणता मनुष्य पात्र आहे? यास्तव अग्नी हा केव्हाही उपस्थानयोग्य नाही. पण याच्या उलट दुसऱ्या काही विद्वानांचे मत आहे. ते म्हणतात की, आपल्याला जे काही अपेक्षित असेल ते सर्व मिळावे म्हणून याचना करण्यासाठीच प्रजापतीप्रमाणे असलेल्या सर्वदेवतात्मक अग्नीचे यजमान हविर्द्रव्याने यजन करीत असतो. लोकव्यवहारही असा आहे की, राजाची मनोवृत्ती आपणास अनुकूल आहे किंवा प्रतिकूल आहे हे लक्षात न घेता एखादा माणूस जर त्याची एकसारखी दे दे म्हणून याचना करील तर तो अपराध होईल. पण प्रशंसा करून अथवा त्याला रुचेल असे विनोदी भाषण करून त्याला संतुष्ट केल्यानंतर जर त्याचेपाशी एखाद्याने याचना केली तर खूष झालेला तो राजा त्या याचकाला त्याच्या अपेक्षेपेक्षाही अधिक देतो. यजमान जे अग्नीचे उपस्थाम करतो ते म्हणजे हविर्द्रव्याने अग्निदेवाला प्रथम संतुष्ट केल्यावरच केलेली याचना होय. यास्तव रात्री व प्रात:काळी होम दिल्यानंतर अग्नी हा यजमानाने उपस्थान करण्यास योग्य आहे. सृष्टिकर्त्या प्रजापतीने पशू उत्पन्न केले पण उत्पन्न होताक्षणीच दिवस व रात्र यांच्या अभिमानी देवतांनी ते पशू झाकून टाकले. प्रजापतीच्या नजरेआड केले. पादबद्ध अशा छंदोमंत्रांनी म्हणजे ऋचांनी अर्थात् त्यांचे पठण करून जेव्हा प्रजापतीने त्यांचा शोध केला तेव्हा ते पशू त्याला सापडले. यास्तव छंदात्मक ऋचांनी जर यजमान अग्नीचे उपस्थान करील, तर ते हरविलेली वस्तू शोधण्याला उपयुक्त होईल. एवं च, जो यजमान प्रत्येक दिवशी अग्नीचे उपस्थान करतो त्याच्या त्या उपस्थानकृत्यात उपस्थात्याची प्रार्थना आणि उपस्थेयाची स्तुती विद्यमान असल्याने कोणतीच त्रुटी नसते. किंबहुना प्रत्यही हे उपस्थान करणेच योग्य असते. जो यजमान पश्चिमेस मुख करून अग्नीचे उपस्थान करतो त्याला अग्नी प्रतिकूल होऊन दहन करतो. जो यजमान पूर्वेस मुख करून अग्नीचे उपस्थान करतो, तो प्रजा व पशू यांनी वियुक्त होतो.म्हणजे त्याची प्रजा व पशू नष्ट होतात. यास्तव किंचित् तिरपे म्हणजे पूर्णपणे पाश्चेमाभिमुख नव्हे व पूर्वाभिमुखही नव्हे असे उभे राहून अग्नीचे उपस्थान करावे, म्हणजे अग्नी त्याला भाजत नाही.

व तो प्रजा व पशू यांनी वियुक्तही होत नाही. (अनुवाक ९).

१ उत्पन्न झालेल्या सर्व जगाला जाणणाऱ्या हे अग्निदेवा, आई व बाप या दोघांनी मी जन्मल्यानंतर माझे जे नांव ठेवले ते माझे प्रथमचे नांव मी प्रवासातून परत येईपर्यंत तू धारण कर आणि हे अग्ने मीं तुझे नांव धारण करीन. २ जन्मताच ज्ञानसंपन्न असलेल्या हे अग्निदेवा, माझे नांव आणि तुझे नांव अशी जी दोन नांवे बदलून आपापली वस्त्रे एकमेकांनी बदलून नेसावी त्याप्रमाणे आपण दोघांनी आजपर्यंत वापरली पण आता यापुढे ती नांवे आपण दोघेही पूर्वीप्रमाणे बदलून तुझे 'वन्ही' इत्यादि नांव तू व माझे देवदत्त इत्यादि नांव मी अशाप्रकारे धारण करू. असे केल्याच्या योगाने माझ्या आयुष्याला वृध्दी व जीवनक्रमाला धनादि संपत्तीमुळे प्रशस्तता प्राप्त होईल. ३ कोणाकडून ताडित न झालेल्या तुज अग्नीला नमस्कार असो. कोणाकडूनही तिरस्कृत न झालेल्या तुला नमस्कार असो. उत्तमप्रकारे सतत शोभून राहणाऱ्या तुला नमस्कार असो. हा अग्निदेव शत्रूंना अजिंक्य-अगणित अन्नाने युक्त,जगज्जेता, व स्वतः अत्यंत सहनशील व उच्च प्रतीचा संगीतकलाकुशल आहे. ४ तुलाच 'पिता' मानणारे, तुलाच आहुती देणारे व तुला उद्देशूनच विशेषतः ज्यांचे वाचन असते, असे यजमान देवांना संतुष्ट करीत असतात. हे अग्ने, मला दीर्घायुष्याने संयुक्त कर. गाई, म्हशी इत्यादि पशूंच्या धनीपणाने संयुक्त कर. आणि उत्कृष्ट हितकारक अशा पुरुषार्थाच्या ठिकाणी मला तत्पर करून ठेव. ५ हा अग्निदेव अत्यंत श्रेष्ठ आहे. हा अत्यंत भाग्यवान आहे. व हा हजारोंच्या संख्येने दान करणारांमध्ये अत्यंत श्रेष्ठ असा उदार दाता आहे. ह्याच्या अनुग्रहाने या यजमानाला उत्कृष्ट सामर्थ्य प्राप्त होवो. ६ माननीय अशी अग्नीची ज्वाला हवन केलेल्या आज्याचे सेवन करो. आणि विच्छिन्न झालेल्या या यज्ञाला पुन्हा सुसंघटित करो. इतर यजमानांनी उषःकाली ज्या आहुती दिल्या व सूर्यास्तकाळी ज्या आहुती दिल्या आणि ज्या मजकडून दिल्या गेल्या नाहीत त्या सर्व आहुती घृतरूपी हविर्द्रव्याने मी उत्तम रीतीने पूर्ण करून घेतो. ७ ओषधी सारभूत अशा रसाने युक्त असतात. लतांच्यापासून जो रस म्हणजे चीक निघतो तो सारभूत असतो. उदकांमध्ये जे सार असते व दुधामध्ये जे सार असते त्या सर्व प्रकारच्या साराने हे इंद्रा, तू मला संयुक्त कर. ८ 'हे व्रतपालका अग्निदेवा' मी तुझ्यासंबंधी व्रताचे आचरण करीन. तेच मी करू शकेन. आणि तेच मला समृध्दिकारक होवो. ९ देवांना बोलावून आणणाऱ्या त्या अग्निदेवाला मी येथे बोलावितो. ज्यांना उद्देशून मला यजन करावयाचे आहे, त्या यजनीय

अशा देवांना मी येथे बोलावितो. माझ्या बोलावण्याचा आदर करून आनंदित झालेले ते, देव येथे येवोत आणि नंतर ते सर्व देव माझ्या या हविर्द्रव्याचे भक्षण करोत. १० हे यज्ञा, सर्वज्ञ असा प्रजापती तुला योग्य करतो. आताही तोच तुला योग्य करो. ११ ब्रह्म्याप्रमाणे ज्ञानसंपन्न व यज्ञाचे पोषक अशा ऋत्विजांनी जी कपाले अग्नीच्या सन्निध एकमेकांशी जुळवून मांडली ती सर्वच कपाले यज्ञ समाप्त झाल्यानंतर इंद्र व वायू परस्परांपासून मोकळी करोत. १२ अत्यंत कढत झालेला हा कपालांचा संघ बाह्य दृष्टीने जरी परस्परापासून भिन्न झाला आहे असे दिसत असले तरी तो तत्त्वत: अभिन्नच आहे. कारण तो पुरोडाशाच्या द्वारा यज्ञाला जीवन देणारा आहे. दुसऱ्याला जो जीवन देतो तो स्वत: भग्न कसा होईल? इतकेच की तो कपालसंघ जेथून ज्या मातीतून उत्पन्न झाला, तेथेच त्या मातीतच तो पुन्हा विलीन झाला. याचप्रमाणे इध्मा, वेदी व परिधी ही सारी आता नष्ट झाल्यासारखी दिसत असली तरी ती तत्त्वत: यज्ञपुरुषाला अनुसरून आपआपली कर्तव्ये करीतच आहेत. १३ 'प्रजापतिर्मनसांऽधोऽच्छेत' इत्यादि तेहतीस मंत्ररूपी तंतूंनी जे ऋत्विज यज्ञरूपी वस्त्र विणून तयार करतात आणि जे ह्या यज्ञाला हविर्द्रव्यरूपी अन्नाने अनुष्ठित करतात त्यांच्या कर्मामध्ये जर काही विसरले असेल अथवा दुसरे काही वैगुण्य राहिले असेल तर ते सारे मी सुसंबध्द करीत आहे, सर्वांगपरिपूर्ण असा हा यज्ञ देवांना प्राप्त होवो. (अनुवाक १०).

१ सर्व मनुष्यांवर उपकार करणारा अग्निदेव आमच्या रक्षणाच्या साधनासह लांबच्या प्रदेशातून सुद्धा एकदम आमच्याजवळ येऊन पोचण्याइतके उड्डाण करून आमच्याजवळ सत्वर येऊन पोहचो. २ सत्याने युक्त, अभीष्ट फलाला प्रकाशित करणाऱ्या यज्ञाचा पालक व निरंतर देदीप्यमान अशा वैश्वानर नामक अग्नीच्या सन्निध आम्ही येऊन पोचलो आहो. ३ बुद्धिमान अशा कोणी एका यजमानाने शुभ कर्माविषयी प्रेरित झालेल्या बुद्धीने केलेल्या वैश्वानर अग्निसंबंधी यज्ञक्रियांच्या पासून फार मोठे फल संपादन केले. हा अग्निदेव भरपूर रेताने युक्त अशा पृथिवी व द्युलोकरूपी दोघां मातापितरांना लोकपूज्य करूनच स्वत: उत्पन्न झाला आहे. ४ हा अग्नी आदित्यरूपाने द्युलोकाला स्पर्श करून राहिला असून दाह, पाक, व प्रकाश इत्यादि कार्य करणारा होऊन पृथ्वीला स्पर्श करून राहिला आहे. त्याचप्रमाणे फळांना परिपक्व करणारा होऊन सर्व ओषधी, वनस्पतींनाही तो स्पर्श करून राहिला आहे. अशा प्रकारे जो वैश्वानर नामक अग्नी स्वत:च्या बलाने सर्वत्र स्पर्श करून

राहिला आहे, तो आम्हाला दिवसा व तोच रात्री देखील अम्हाला पापापासून रक्षण करो. ५ हे अग्ने, अन्नसंपादक व आसमंतात सर्व बाजूंना गमन करणारा तू ज्या अर्थी, पशूंचा पालक, गाई, म्हशी इत्यादि पशूंची लोकांना साहजिकच ओळख पटवित असतो, त्याप्रमाणे उत्पन्न होताक्षणीच आपल्या तेजाने सर्व भुवनांची ओळख पटवितोस, त्याअर्थी हे वैश्वानर अग्ने, ब्रह्मरूप असणाऱ्या या कर्माकडे जाण्यासाठीही मार्ग हुडकून काढ. अहो अग्निमहाराज, तुम्ही अनेक प्रकारच्या श्रेयस्कर मार्गांनी सर्वदा आमचे रक्षण करा. ६ हे अग्ने तू अत्यंत देदीप्यमान होऊन उत्पन्न होता क्षणीच द्युलोक व पृथ्वी यांना आपल्या प्रकाशाने सर्वतोपरी व्यापून राहिला आहेस. उत्पन्न झालेल्या सर्व जगाला जाणणाऱ्या हे अग्निदेवा, सर्व मानवांचे हित करणारा तू आपल्या महत्त्वाने देवसदृश अशा ऋत्विजांना त्यांच्यावर येणाऱ्या मिथ्या आरोपरूपी पापापासून मुक्त केले आहेस. ७ हे अग्निदेवा, कोणालाही नमून न वागणाऱ्या, जरारहित आणि अभंग अशा सामर्थ्याने युक्त अशा आमच्या पालनकर्त्या पुरुषाला तू धनवंत अशा लोकांमध्ये इंद्राप्रमाणे ऐश्वर्यवान कर. हे अग्निदेवा तुझ्याकडून होणाऱ्या रक्षणांच्या योगाने आम्हीही शेकडो, हजारो प्रकारचे अन्न शत्रूच्या गोटातून जिंकून आणू. ८ आम्ही सर्व मनुष्यांचे पालन करणाऱ्या वैश्वानर अग्नीच्या अनुग्रहबुद्धीच्या आश्रयाखाली राहू. कारण सर्वतोपरी श्रीमान असा हा वैश्वानर अग्नी सर्व भुवनांचा राजा होऊन त्यांना प्रकाशित करीत असतो. येथे उत्पन्न होता क्षणीच ह्याने हे सर्व विश्व विशेष प्रख्यातीस आणले आहे. हा वैश्वानर अग्नी दिवसा सूर्याशी एकरूप होऊन राहत असतो. ९ हे वरुण देवा, तुझ्यासंबंधी आमच्याकडून घडणारे पाप आम्ही तुला घातलेल्या नमस्कारांनी शमन करू, त्याचप्रमाणे तुला अर्पण केलेल्या यज्ञसंबंधी हविर्द्रव्यांच्या योगाने शमन करू, शत्रुनिवारणसमर्था हे वरुणदेवा, उल्लसित चित्ताने शोभून राहणाऱ्या हे वरुणराजा, आमच्यावर अनुग्रह करण्यासाठी येथे राहून आम्हाकडून केली जाणारी पातके शिथिल कर. १० हे वरुणा, आमच्या मस्तकाला जो तू फास घातला आहेस तो वरच्यावरच काढून घे. खाली पायांना जो फास घातला आहेस तो खालच्या खालीच मोकळा कर आणि मध्येच कंबरेला जो फास घातला आहेस तो तेथल्या तेथेच अगदी सैल करून टाक. नंतर हे सूर्यसदृश वरुणदेवा आम्ही निष्पाप होऊन तुझ्या आराधनरूप व्रताच्या ठिकाणी अखंड तत्पर राहण्याला योग्य होऊ. ११ जयशाली, व्यापक व अन्नवान दह्याची आवड असणाऱ्या 'दधिक्रावा' नामक देवाला प्रसन्न करण्यासाठी मी हे यज्ञकर्म केले आहे. तो देव आमचे

मुख कर्पूरसदृश सुगंधोत्पादक वस्तू आम्हास खावयास देऊन सुगंधित करो. आणि आमची आयुष्ये वाढवो. १२ हा शेकडो हजारो संख्येने धन देणारा, अन्नवान आणि कर्मभूमीचे ठिकाणी जाणारा दधिक्रा नामक देव, सूर्य आपल्या किरणांनी आकर्षित केलेल्या उदकांचा वर्षाऋतूत भूमीवर विस्तार करतो त्याप्रमाणे आपल्या बलाने पांच वर्णांनी विभागलेल्या मनुष्यांच्या ठिकाणी उदकांचा विस्तार करतो. तो 'दधिक्रा' संज्ञक देव मधुर अशी ही आमची स्तुतिवचने मान्य करून घेवो. १३ अग्नी हा जणू काय द्युलोकाचे मस्तक आहे. १४ हे मरुद्गणहो, ज्या अर्थी आम्ही सुखाची इच्छा करून द्युलोकापासून तुम्हाला येथे बोलावीत आहो, त्या अर्थी तुम्ही अगत्याने आमच्याजवळ या. १५ हे मरुद्गणहो तुमचे भजन करणाऱ्याला देण्यासाठी तुम्ही जी सुखे संपादन करून ठेवली आहेत, ती त्रैलोक्यातील सर्व सुखे तुम्हाला हविर्द्रव्ये अर्पण करणाराला तुम्ही त्याच्या अपेक्षेपेक्षा अधिक देता. यास्तव ती सर्व सुखे आम्हाला द्या. त्याचप्रमाणे आम्हाला धन आणि पराक्रमी पुत्र द्या. १६ अखंडनीय अशी अदितीदेवी आमचे शत्रूपासून रक्षण करो. अदितीदेवी आम्हाला सुख देवो. त्याचप्रमाणे अदितीदेवी आम्हाला पापापासून रक्षण करो. १७ महनीय, सत्कर्म करणाऱ्या पुरुषांचे मातेप्रमाणे रक्षण करणारी, सत्याचे पालन करणारी, पुष्कळ राजांनी पालन केलेली, सर्वदा जराराहित, विस्तीर्ण गती असलेली, उत्कृष्ट सुखाने युक्त, स्वकर्तव्याचे ठिकाणी सुखाने प्रवृत्त होणारी, अशा जी अदिती देवी तिलाच आम्ही आमच्या संरक्षणासाठी उत्कृष्ट रीतीने बोलावीत आहो. १८ उत्कृष्ट प्रकारे तारणारी , विस्तीर्ण, प्रकाशमान, चिरकाल टिकणारी, उत्कृष्ट सुखांनी युक्त, उत्कृष्ट कर्मांचे ठिकाणी सुखाने प्रवृत्त होणारी, शत्रूंच्यापासून उत्तम प्रकारे रक्षण करणारी, पापरहित आणि कोठेही छिद्र नसलेली जणू देवनिर्मित नावच अशा या अखंडनीय भूमीवर आम्ही आरूढ झालो आहोत. १९ चोरांच्यापासून रक्षण करणाऱ्या शेकडो आयुधांनी सज्ञ, 'स्फ्य' सारख्या आकाराच्या शेकडो वल्ह्यांनी युक्त आणि कोठेही न फुटलेली आणि इच्छित फलाच्या पलीकडे नेण्यास समर्थ अशा देवनिर्मित नावेप्रमाणे असलेल्या भूमीवर मी येऊन पोचलो आहे. (अनुवाक ११).

प्रपाठक ६

१ पात्राबाहेर सांडलेल्या हे आज्यद्रव्या, बृहस्पतीने प्रेरणा केलेला मी प्रजा, आयुष्य व धन यजमानासाठी संपादन करीन. तुला मंत्र म्हणून मी

पुन्हा पात्रामध्ये नीट रीतीने सिंचित करतो. चालू असलेल्या कर्मानुष्ठानात तुझी हेळसांड केल्याच्या पापाने यजमान पीडित न होवो. २ हे आज्य तू अग्नीच्या ज्वलनाला आधार पोचविणारे आहेस. तू सज्ञनाचे कर्म आहेस. तू यजमानऋत्विजकरुपी सज्ञनांकडून 'तानूनप्त्र' संज्ञक आज्याला केल्या जाणाऱ्या स्पर्शरूपी सत्कर्माचा अध्यक्ष आहेस. तू मुख्य हविर्द्रव्य आहेस. तू सर्व मनुष्यांचे आहेस. तू सर्व देवांचे आहेस. तू 'उत्पवन' संस्काराने उद्दीपित बलयुक्त आहेस, तू सत्य अशा बलाने युक्त आहेस. तू शत्रूचा पराभव करण्यास समर्थ आहेस. तू शत्रूचा पराभव करण्यातच गर्क होणारा आहेस. तू आमच्याशी उघडपणे वैर करणाऱ्या शत्रूंचा पराभव कर. तू शत्रुसेनेचा पराभव कर. तू सैन्याची जमवाजमव करणाऱ्या शत्रूंनाही पराभूत कर. तू अनेक प्रकारच्या सामर्थ्याने संपन्न आहेस. तू मला यज्ञाच्या द्वारा सुखी कर. तू लौकिक आज्याच्या पेक्षा सुसंस्कृत असे आज्य आहेस. यज्ञाचे सत्य म्हणजे निश्चित असे फळ देणारे आहेस. तू सत्य अशा आयुष्याने युक्त आहेस. तू सत्य अशा बलाने संपन्न आहेस. तू सत्यरूप आहेस अशा दृष्टीनेच मी तुला अवलोकन करीत आहे. सत्यस्वरूप अशा तुज आज्याचे मी भक्षण करीन. ३ हे आज्य, शरीरातील पंचप्राणरूपी वायूंना स्वकार्यक्षम करण्यासाठी समाजधारण कुशल अशा तुला मी ग्रहण करतो. ४ पांच ऋतूंना स्वकार्यक्षम करण्याकरिता जगध्दारण कुशल अशा तुझे मी ग्रहण करतो. ५ पूर्व इत्यादि चार व उर्ध्व मिळून होणाऱ्या पांच दिशांचे नियंत्रण करण्यासाठी जगध्दारण कुशल अशा तुज आज्याला मी ग्रहण करतो. ६ देव, मनुष्य, असुर, राक्षस व गंधर्व या पांच प्रकारच्या जनांचे नियंत्रण करण्याकरता जगध्दारण कुशल अशा तुझे मी ग्रहण करतो. ७ पांच मुखे एकत्र जोडलेल्या स्थालीत शिजविलेल्या पांच प्रकारच्या चरूंचे नियंत्रण करण्याकरिता जगद्धारणकुशल अशा तुझे मी ग्रहण करतो. ८ ब्राह्मण जातीच्या ब्रह्मवर्चसरूप तेजाचे नियंत्रण करण्याकरता जगध्दारणकुशल अशा तुझे मी ग्रहण करतो. ९ क्षत्रियजातीच्या युध्दसामर्थ्याचे नियंत्रण करण्याकरिता जगध्दारण कुशल अशा तुझे मी ग्रहण करतो. १० वैश्यजातीच्या कृषिवाणिज्यादि कर्माचे नियंत्रण करण्याकरिता जगध्दारण कुशल अशा तुज आज्यद्रव्याचे मी ग्रहण करतो. ११ सर्वांच्या ठिकाणी आपापल्या कर्तृत्वाचे सामर्थ्य निर्माण करण्यासाठी मी तुला ग्रहण करतो. १२, सर्वांना उत्कृष्ट प्रजा प्राप्त व्हावी म्हणून मी तुला ग्रहण करतो. १३ भरपूर धन सर्वांना मिळावे म्हणून तुझे मी ग्रहण करतो. १४ ऐकलेले व पठन केलेले वाङ्.मय सर्वांच्या ठिकाणी टिकून

रहावे म्हणून तुझे मी ग्रहण करतो. १५ हे आज्य तू आमच्या कल्याणाला कारणभूत हो. देवांना प्रिय असे हविर्द्रव्य हो. यजमानाला आशीर्वादरूप हो. देवांना तृप्त करणाऱ्या तुला देवतांच्या तृप्तीसाठीच मी ग्रहण करतो. १६ हविर्द्रव्याचा भाग सेवन करणाऱ्या ज्या देवांना तुझी जितकी इच्छा असेल तितकी इच्छा पूर्ण करण्यासाठी तुला मी ग्रहण करतो. (अनुवाक १).

१ हे मध्यमपरिधी, तू स्थिर आहेस. तुझ्या अनुग्रहाने मी देखील माझ्या जातीतील लोकांमध्ये स्थिर राक्षसांचा नाश करण्याविषयी ज्ञान असलेला व धन संपादन केलेला असा होईन. २ हे दक्षिण परिधी, तू राक्षसींना मारण्याचे कामी फार उग्र आहेस. तुझे अनुमंत्रण केल्याचा योगाने मीही माझ्या जातीच्या मनुष्यांत माझ्याविरुध्द कोणी एक अक्षर बोलणार नाही, अशा प्रकारचा उग्र राक्षसांच्या नाशाविषयी अभिज्ञ व द्रव्यसंचय केलेला असा होईन. ३ हे उत्तरपरिधी, तू राक्षसांचा पराभव करणारा आहेस. तुझ्या अनुमंत्रणाने मी देखील माझ्या ज्ञातीत उत्पन्न होणाऱ्या वैऱ्याचा पराभव करणारा, राक्षसांचा नाश करण्याविषयी पक्का माहितगार आणि धनाचा सांठा जवळ बाळगणारा असा होईन. ४ उपजत ज्ञानसंपन्न असलेल्या अग्निदेवा, देवांना योग्य अशा मंत्राने या यज्ञकर्मात हविर्द्रव्य वाहून नेण्यासाठी तुला मी नियुक्त करीत आहे. ५ सर्वज्ञ अशा हे अग्निदेवा, तुला देण्यासाठी पूजाद्रव्ये घेऊन येणारे व तुला समिधांनी प्रज्वलित करणारे आम्ही उत्कृष्ट अपत्यांनी आणि उत्तम नोकराचाकरांनी युक्त होऊन चिरकाल जिवंत राहू. ६ हे अग्निदेवा, ह्या माझ्या यज्ञासंबंधी जे काही बर्हि इत्यादि नाहीसे होईल अथवा राक्षस वगैरे कोणी नष्ट करतील अथवा आज्यापैकीही जो काही अंश भूमीवर सांडेल त्या नष्ट झालेल्या वस्तूने किंवा सांडलेल्या आज्याच्या अंशाने हे सर्वव्यापका अग्निदेवा मी शत्रूला मारीन. जो कोणी वैरी मारणे मला अशक्य होईल, त्याला मी निर्ऋतिनामक पापदेवतेच्या मांडीवर नेऊन ठेवीन. ७ हा हवि भूलोकरूप आहे. ८ हा हविपदार्थ अंतरिक्षलोकरुप आहे. ९ हे हविर्द्रव्य स्वर्गलोकरूप आहे. १० गमनादिगुणाने युक्त, देवांनी व मनूने प्रदीप्त केलेला व हर्षजनक अशा ज्वालारूप जिव्हेने युक्त अशा हे अग्निदेवा, यजमानाचे कार्य करण्यासाठी तू आपले बल प्रकट करणारा हो. त्याचप्रमाणे शत्रूंचा नाश करण्यासाठी त्यांचे बल अवमानित करणारा हो. ११ देवांना बोलावणाऱ्या हे अग्निदेवा, अमर अशा तुझ्या मस्तकाचे ठिकाणी यजमानाला धन, पुष्टी, आणि उत्कृष्ट प्रजा प्राप्त होण्यासाठी घृतादिक द्रव्याची धार पाडीन. १२ हे स्त्रौवाघार, तू मनोरूप व प्रजापतिसंबध्द आहेस. प्रजापतिनिर्मित यज्ञ

व त्याला साधनभूत असे मन यांच्यासह माझ्या ठिकाणी प्रविष्ट हो. १३ हे सुच्याधार, तू इंद्राने व्याकरणशुद्ध केलेली व वैऱ्यांचा नाश करणारी वाणी आहेस. इंद्राने व्याकृत केलेली वाणी व चक्षुरादि इंद्रियशक्ती यांच्यासह तू माझ्या ठिकाणी समाविष्ट हो. १४ ऋतूंमधील 'वसंत' नामक देवाला मी संतुष्ट करतो. तो संतुष्ट होऊन मला संतुष्ट करो. १५ 'ऋतु' संज्ञक देवापैकी 'ग्रीष्म' संज्ञक देवाला मी संतुष्ट करतो. तो संतोषित होऊन मला संतोषित करो. १६ ऋतूंच्या पैकी 'वर्षा' नांवाच्या देवतांना मी संतुष्ट करतो. त्या संतुष्ट होऊन मला संतुष्ट करोत. १७ ऋतूंमधील 'शरद' नांवाच्या देवतेला मी संतुष्ट करतो. ती संतुष्ट होऊन मला संतुष्ट करो. १८ ऋतूंमध्ये असलेल्या 'हेमंत व शिशिर' नामक दोघा देवांना मी संतोषित करतो. ते दोघे संतोषित होऊन मला संतोषित करोत. १९ अग्नी व सोम या दोघा देवांना अध्वर्यूच्या हस्ते दिलेल्या समंत्रक आहुतीने मी यजमान उत्कृष्ट नेत्रेंद्रिय संपन्न होईन. २० अग्नीला अध्वर्यूकडून दिल्या गेलेल्या समंत्रक आहूतीने मी सेवनीय असे अन्न भक्षण करणारा होईन. २१ उपांशु यागाचा अधिपती असलेल्या हे देवा, तू आम्ही ज्याचा द्वेष करतो त्याचा नाश करणारा आहेस. तुझ्या कृपेने मी शत्रूकडून केव्हाही न मारला जाणारा होईन. इतकेच नव्हे तर माझ्या (अमुक) नांवाच्या शत्रूला मी मारीन. २२ अग्नी व सोम यांना अध्वर्युद्वारा दिलेल्या समंत्रक आहुतीच्या योगाने वैऱ्याचा नाश करणारा होईन. २३ इंद्र व अग्नी यांना अध्वर्यूकडून दिलेल्या समंत्रक आहुतीने मी इंद्रियशक्तीने युक्त व खावयास योग्य असे अन्न खाणारा होईन. २४ इंद्रदेवाला अध्वर्युद्वारा दिलेल्या समंत्रक आहुतीच्या प्रभावाने मी इंद्रियसामर्थ्याने संपन्न होईन. २५ 'महेन्द्र' नामक देवाला अध्वर्यूच्या हस्ते समर्पण केलेल्या आहुतीच्या योगाने मी जयशाली होऊन विद्या, ऐश्वर्य इत्यादिकांनी महत्त्वाला प्राप्त होईन. २६ स्विष्टकृत् नामक अग्नीला अध्वर्यूकडून दिलेल्या आहुतीच्या योगाने मी दीर्घायुषी आणि सर्वांगपूर्ण अशा यज्ञाच्या योगाने मी प्रतिष्ठेला प्राप्त होईन. (अनुवाक २).

१ अग्निदेव मंत्रवैकल्यामुळे अथवा कर्मवैकल्यामुळे प्राप्त होणाऱ्या अनिष्ट फळापासून माझे रक्षण करो. त्याचप्रमाणे प्रेरक सवितादेव पापकर्माची चटक लागलेल्या असुरादिकांच्या उपद्रवापासून माझे रक्षण करो. २ जो कोणी राक्षसादिक मला जवळच्या प्रदेशात राहून पीडा करीत असेल अथवा दूरच्या प्रदेशात राहून माझ्याशी शत्रुत्व करण्याचे इच्छित असेल, त्याला या माझ्या यजमानभागाच्या सेवनाने मी जिंकू शकेन. ३ दर्शनीय अशा सुंदर रूपाने

युक्त, घृताची वृष्टी करणारी व पांढऱ्या शुभ्र वर्णाची अशा गाईचे स्वरूप धारण करणाऱ्या हे इडे ये. शास्त्रानुसार बांधलेल्या ह्या यज्ञग्रहांच्या ठिकाणी माझ्याकडे लक्ष देऊन व मला अनुव्रत म्हणजे मी करीत असलेल्या या यज्ञरूप व्रताविषयी अनुकूल अशी मनोवृत्ती धारण करून ये. इडेच्या ठिकाणी असणाऱ्या हे गुणविशेषांनो, तुम्ही आमच्या मस्तकांना प्रेमाने हुंगून ती शुध्द करा. हे इडे, ये. अदिते, ये. सरस्वती, ये. तू रन्ती म्हणजे आनंदी आहेस, रमती म्हणजे आनंदविणारी आहेस, सूनरी म्हणजे सद्वर्तनी स्त्री आहेस. सेवनीय अशा हे इडे तुझ्या प्रीतीला मी प्राप्त होईन. आमच्याकडे येण्याविषयी आमच्याकडून अनुज्ञा मिळालेल्या इडादेवते, तुझ्या अनुज्ञेला मी प्राप्त होईन. या यज्ञासंबंधी जी फळप्राप्तिविषयक याचना मी केली ती मजविषयी सत्य होवो. तुजविषयी अनादररहित अशा मंत्राने मी यज्ञाचे ते फळ मिळवू शकेन. एखादा माणूस शिडीची एक एक पायरी क्रमाने चढून वर जातो त्याप्रमाणे माझा यज्ञ अनुष्ठानरूपी पायऱ्या क्रमाक्रमाने चढून द्युलोकावर आरोहण करो. माझा हा यज्ञ द्युलोकामध्ये जेथे हविर्भाग घेणारे देव राहत असतात, त्या स्वर्गसंज्ञक विशिष्ट प्रदेशात जावो. त्याचप्रमाणे माझा यज्ञ स्वर्गाचे ठिकाणी गेल्यावर तेथल्या सभेत बसलेले देव ज्या मार्गाने भोजनशालेत हविर्द्रव्य सेवन करण्यासाठी जातात त्याच मार्गाने जाऊन देवांना प्राप्त होवो. अर्थात् तत्संबंधी हवी देव सेवन करोत. या यज्ञाने संतुष्ट झालेला इंद्र आमच्या ठिकाणी इंद्रियसामर्थ्य धारण करो. यज्ञाची साधनभूत अशी धने आणि पुढे करावयाचे असलेले यज्ञ हे देखील आमचा आश्रय करोत. आमच्या ठिकाणी यज्ञफलरूपी आशीर्वाद असोत. आतापर्यंत वर्णित केलेल्या गुणांनी युक्त अशी तू आम्हाला प्रिय, मन:पूर्वक शत्रूंचा नाश करणारी आणि धनाने युक्त अशी हो. ४ हे अवान्तर इडे, तू प्रीतिरूप आहेस. आमच्यावर प्रीती कर. आमच्याकडून तू सेविली गेली आहेस. तुझ्या प्रीतीला आम्ही प्राप्त झाले पाहिजे. ५ मननीय आणि प्रकाशमान असा हा अग्नी आहुतिरूपाने अर्पण केलेले आज्य सेवन करो. आणि विच्छिन्न झालेल्या या यज्ञाला पुन्हा सुसंघटित करो. बृहस्पती आमच्या या यज्ञाला विस्तीर्ण करो. आणि सर्व देव या यज्ञात तृप्त होवोत. ६ ब्रध्नसंज्ञका हे यज्ञपुरुषा आम्हाला व ऋत्विजांना तू संतोषित कर. ऋत्विजांना व इतर सत्पात्रांना धन देणाऱ्या मला धनाची वाण केव्हा न पडो. इतकेच नव्हे तर ते वाढतच राहो. याग करणाऱ्या मज यजमानाचे यज्ञकरण सामर्थ्य केव्हाही क्षीण न होता पुन्हा पुन्हा वृद्धिंगत होत जावो. ७ हे अन्वाहार्यसंज्ञक चरो, तू प्रजापतीचा भाग आहेस. बलवान आणि

दुधासारखा रुचकर असा तू माझ्या प्राण व अपान या दोन वायूंचे रक्षण कर. म्हणजे त्यांना स्वकार्यक्षम कर. माझ्या समान व व्यान या दोन वायूंना रक्षण कर. माझ्या उदान व व्यान या दोन वायूंचे रक्षण कर. तू केव्हाही क्षीण होणारा नाहीस. परलोकीही तू अक्षय रहावास यासाठीच मी तुला ऋत्विजांना देत आहे. इहलोकी व परलोकी माझ्या उपभोगाला तू क्षीणता आणू नकोस. (अनुवाक ३).

१ अनूयाजसंबंधी 'बर्हि' नामक देवाला अध्वर्यूकडून दिलेल्या समंत्रक आज्याहुतीने मी प्रजावान होईल. २ 'नराशंस' देवाला समंत्रक आज्याहुती दिल्याच्या योगाने मी 'पशुमान्' म्हणजे पशुसंपत्तीने युक्त होईन. ३ 'स्विष्टकृत्' नांवाच्या अग्निदेवाला समंत्रक आहुती दिल्याने मी दीर्घायुषी होऊन यज्ञाच्या योगाने समाजात प्रतिष्ठेला प्राप्त होईन. ४ 'आज्यभाग'संबंधी अग्निदेवाने आपला आज्यरूपी हविर्भाग सेवन केला व त्यायोगाने पुष्ट होऊन त्याने यज्ञविरोधी असुरांना पराभूत करून 'उज्जिति' म्हणजे उत्कृष्ट प्रकारचा जय मिळविला. अग्नीच्या त्या उज्जितीला अनुसरून मीही पापरूपी वैऱ्याचा पराभव करून उत्कृष्ट जयाला प्राप्त झालो आहे. ५ 'सोम' नामक देवाच्या 'उज्जितीला' म्हणजे त्याने मिळविलेल्या उत्कृष्ट जयाला अनुसरून मीही उत्कृष्ट जय मिळविला आहे. ६ अग्निनामक प्रधान देवाला जो जय मिळाला त्याला अनुसरून मी जय मिळविला आहे. ७ अग्नी व सोम या दोघांनी जो जय संपादन केला त्याला अनुसरून मीही जय संपादन केला आहे. ८ इंद्र व अग्नी या दोघांनी जी उज्जिती मिळविली म्हणजे जो जय मिळविला त्याला अनुसरून मीही जय मिळविला आहे. ९ इंद्रदेवाच्या उज्जितीला अनुसरून मीही उज्जितीला प्राप्त झालो आहे. १० महेन्द्रदेवाने जो जय संपादन केला, त्या जयाला अनुसरून मीही जय संपादन केला आहे. ११ स्विष्टकृत् नामक अग्नीने जो जय मिळविला त्यास अनुसरून मी देखील जय मिळविला आहे. १२ इंद्र देवाने अन्नाच्या उत्पत्तीकरिता मी अध्वर्यूकडून जुहु व उपभृत् नांवाच्या दोन स्रुचांवर उचलल्याच्या योगाने मला उत्कर्षाला प्राप्त केले आहे. त्याचप्रमाणे त्या दोन्ही स्रुचा पुन्हा खाली ठेवल्यामुळे इंद्राने माझ्या शत्रूंना पायाखाली तुडविले आहे. १३ देवांनी स्रुचा वर उचलणे व खाली ठेवणे या दोन्ही प्रकारचे कर्म वृद्धिंगत केले आहे. आता इंद्र व अग्नी इतस्ततः पळत असलेल्या माझ्या शत्रूंना ठार करोत. १४ या यज्ञासंबंधी असलेले फलप्रद आशीर्वाद मजजवळ येवोत. आम्हीही आयुष्यादि फलरूपी दुधाची धार काढण्याची इच्छा करणारे असल्यामुळे 'इंद्रवत्' म्हणजे फलप्रद इंद्राशी

संयुक्त होऊन त्याचे पूजन करीत आहो व त्या योगाने कामधेनूच अशा इंद्रदेवतेची धार काढून उत्कृष्ट प्रजा व अन्न, आयुष्य इत्यदिरूपी दुग्ध संपादन करीत आहोत. १५ हे प्रस्तर, अग्निदेव रोहित नामक अश्वावर बसवून तुला सूक्तवाकसंबंधी देवतेजवळ नेऊन पोचवो. इंद्रदेव 'हरी' नांवाचे दोन घोडे जोडलेल्या रथात बसवून तुला 'सूक्तवाक' संबंधी देवतेसन्निध नेऊन पोचवो. सूर्यदेव 'एतश' नांवाचे घोडे जोडलेल्या रथात बसवून तुला 'सूक्तवाक' संबंधी देवतेच्या जवळ नेऊन पोचवो. १६ हे अग्निदेवा, तू जणू काय अश्वच आहेस. तुझ्या शरीराला आवळलेला परिधीरूपी तंग मी सोडून टाकतो. तुझ्या मुखात अडकविलेला लगाम मी काढून टाकतो. तुला मेखेला बांधून टाकण्याची दोरी मी सोडून टाकतो. तुझ्यावरचे खोगीर मागे पुढे सरकू नये म्हणून त्याच्या मागच्या व पुढच्या बाजूस बांधलेल्या दोऱ्या मी काढून टाकतो. अशाप्रकारे सर्वतोपरी मोकळा केल्यामुळे संतुष्ट झालेला तू आमच्या ठिकाणी धन संपादन कर. शिवाय, अन्न, आच्छादन इत्यादि जे काही सुखप्रद असेल ते सर्व तू आम्हास दे. आमचे हविर्भाग भक्षण करणाऱ्या देवांच्या ठिकाणी त्यांना हविप्रदान करणाऱ्या आम्हाविषयी प्रशंसात्मक भाषण कर. १७ अनेक कार्यांत गुंतून राहणाऱ्या बृहस्पतिपुत्र 'शंयु' नामक देवाला दिलेल्या समंत्रक आहुतीच्या योगाने मी सर्वांगपूर्ण यज्ञाने मिळणाऱ्या प्रतिष्ठेला प्राप्त होईन. १८ 'सोम' देवाला दिलेल्या समंत्रक आज्याहुतीने मी प्रजोत्पादक अशा उत्कृष्ट रेताचे धारण करीन. १९ 'त्वष्टा' देवाला दिलेल्या समंत्रक आहुतीच्या योगाने मी पशूंचे स्वरूप पुष्ट करीन. २० देवांच्या पत्नी व 'गृहपति' नांवाचा अग्निदेव ही दोघे मिळून जणू यज्ञामधील जोडपे आहे. ह्या दोघांना दिलेल्या समंत्रक आज्याहुतीच्या योगाने मी कन्या व पुत्र अशा दोन्ही प्रकारच्या संततीने पुष्कळ वृद्धिंगत होईन. २१ हे वेद, तू 'वेद' हे नांव धारण करणारा आहेस. त्याचप्रमाणे तू द्रव्यसंपादनाचे साधन आहेस. तुझ्या प्रसादाने मी धन संपादन करीन. तू 'कर्म' असे नांव धारण करणारा आहेस. आणि म्हणूनच तू वेदी झाडणे इत्यादि कर्माचे साधन आहेस. तुझ्या योगाने मी वेदी झाडण्याचे काम करीन. तू 'सनि' म्हणजे धन हे नांव धारण करणारा आहेस. व उपासकांना धन देणारा आहेस. तुझ्या प्रसादाने मी ऋत्विजादिकांना धन देईन. 'वेद' हे नांव धारण करणाऱ्या तुझ्याकडून मला घृताने समृद्ध राहण्याकरिता अनेक गृहांनी युक्त, हजारो संख्येने मोजण्यास पात्र, सेवनीय अशा अन्नाने समृद्ध अशा प्रकारचे धन, व पुष्टी दिली जावो. (अनुवाक ४).

१ ज्याप्रमाणे सूर्याची स्त्री असलेल्या गोरूपधारिणी उषेची कांस दुधाने भरलेली असते त्याप्रमाणे यज्ञसंबंधी त्या त्या आहुती देवांना देण्याची इच्छा करणाऱ्या ऋत्विजांना अपेक्षित असेल तितक्या घृताने ही ध्रुवा तुडुंब भरलेली असो. भूमातेच्या मांडीवर स्थिर झालेली ध्रुवा तिच्या ठिकाणी पुन्हा पुन्हा सिंचित केलेल्या आज्यधारांच्या योगाने पृथ्वीप्रमाणे विस्तारिली जाऊन या यज्ञामध्ये उत्कृष्ट प्रकारे एकसारखी संवर्धित होत राहो. २ हे यजमानभागा, सृष्टिकर्त्या प्रजापतीचा म्हणजे त्याने निर्माण केलेला व यजमानांना विशेष भासमान होत असलेला असा 'विभान्' नामक जो लोक त्याच्या ठिकाणी मज यजमानासह मी तुला स्थापन करतो. ३ उदकपूर्ण अशा हे प्रणीता पात्रा तू स्वतःच्या कर्तृत्वामुळे सुशोभित आहेस. यास्तव तू मला यज्ञकर्माचे फल दिलेस म्हणजे मीही त्यायोगे सर्व समाजात सुशोभित होईन. तू सर्व दिशांना व्यापणारा आहेस. मंत्र म्हणून चारी दिशांना तुझे सिंचन केले म्हणजे मी देखील सर्व कार्यात व्यापून राहण्यास समर्थ होईन. तू उदकाने परिपूर्ण आहेस. तुझ्यापासून माझे सर्व कार्य मी परिपूर्ण करून घेणारा होईन. तू क्षयरहित आहेस. त्याचप्रमाणे मला केव्हाही क्षय प्राप्त न होवो. ४ हे प्रणीतोदका, देव आणि ऋत्विज पूर्व दिशेच्या ठिकाणचा प्रदेश तुझ्या प्रोक्षणाने शुद्ध करोत. ५ महिन्यांच्या अधिष्ठात्री देवता आणि पितर दक्षिणदिशेस असलेला प्रदेश तुझ्या प्रोक्षणाने स्वच्छ करोत. ६ घरे व पशू यांचे अधिपती असलेले देव पश्चिम दिशेच्या ठिकाणचा प्रदेश तुझे सिंचन करून शुद्ध करोत. ७ उदके, ओषधी व वनस्पती यांच्या अभिमानिनी देवता उत्तरेच्या बाजूस असलेला सर्व प्रांत तुझ्या प्रोक्षणाने पवित्र करोत. ८ यज्ञ, संवत्सराभिमानी देव व यज्ञपालक असलेला देव ऊर्ध्व दिशेच्या ठिकाणी असलेला प्रदेश तुझ्या सेचनाने पवित्र करोत. ९ हे प्रथम प्रक्रमा, तू जणू काय नरकप्रद अशा पातकांचा नाश करणाऱ्या विष्णूचे म्हणजे त्याने टाकलेले पहिलेच पाऊल आहेस. गायत्री छंदाच्या अभिमानी देवतेच्या अनुग्रहाने हा भुलोक आहे असे समजून या प्रदेशाचे ठिकाणी मी पहिले पाऊल टाकीत आहे. ज्याचा आम्ही द्वेष करतो त्या पातकी शत्रूला येथून हाकलून काढला आहे. १० हे द्वितीय प्रक्रमा, तू जणू काय दुसऱ्यांनी केलेल्या आरोपाचा नाश करणाऱ्या विष्णूचे दुसरे पाऊल आहेस. 'त्रिष्टुभ्' छंदाच्या अभिमानी देवतेच्या अनुग्रहाने हा अंतरिक्ष लोकच आहे असे मानून मी या ठिकाणी दुसरे पाऊल टाकीत आहे. ज्याचा आम्ही द्वेष करतो, त्या आम्हावर वृथा आरोप करणाऱ्या वैऱ्याला या ठिकाणातून काढून लावला आहे. ११ तृतीय प्रक्रमा, तू जणू काय दानरूपाने होणाऱ्या द्रव्यलाभाच्या आड येऊ इच्छिणाऱ्याचा

नाश करणाऱ्या विष्णूने टाकलेले तिसरे पाऊलच आहेस. जगतीछंदाच्या अभिमानिनी देवतेच्या अनुग्रहाने हा द्युलोकच आहे असे समजून या प्रदेशाचे ठिकाणी मी तिसरे पाऊल टाकीत आहे. त्याचबरोबर आम्ही ज्याचा द्वेष करतो त्या, आम्हाला दानरूपाने होणाऱ्या द्रव्यलाभाच्या आड येण्याची इच्छा करणाऱ्या आमच्या हितशत्रूला मी येथून हुसकून लावला आहे. १२ हे चतुर्थप्रक्रमा, जू जणू काय ठार मारण्याची इच्छा करणारालाच ठार करणाऱ्या विष्णूचे अर्थात् त्याने टाकलेले चौथे पाऊल आहेस. 'अनुष्टुभ्' छंदाच्या अभिमानी देवाच्या अनुग्रहाने हा सर्व दिशांचा समूहच आहे असे समजून मी या प्रदेशात चौथे पाऊल टाकीत आहे. याच क्षणी आम्ही ज्याचा द्वेष करतो, त्या, आम्हास ठार मारण्यास टपलेल्या आमच्या वैऱ्याला मी पार हाकून लावला आहे. (अनुवाक ५).

१ हे आहवनीय अग्निदेवा, आम्ही तुझ्या प्रसादाने कर्माचे फल भोगावयासाठी प्रथम स्वर्गलोकी जाऊ आणि नंतर तेथून मोक्षाचे जणू द्वारच अशा आदित्य लोकी जाऊ. यास्तव, तुझ्या कृपाकटाक्षापासून मी केव्हाही तुटक होणार नाही. तुझी कृपा संपादन करण्यासाठी आम्ही जे अनुष्ठानरूप तप करू त्या तुझ्यासाठी केलेल्या तपापासून तुझ्या कृपेने मी केव्हाही सुटून राहणार नाही. २ हे आदित्यदेवा, तू उत्कृष्ट प्रकाशाने उदय पावणारा आहेस. किरणयुक्त अशा चंद्रादिकांपेक्षा तू श्रेष्ठ आहेस. तू प्राणिमात्राच्या आयुष्याचा धारक आहेस. यास्तव, माझ्या ठिकाणी आयुष्य स्थापन कर. तू ब्रह्मतेजाने संपन्न आहेस. म्हणून माझ्या ठिकाणी ब्रह्मतेज धारण कर. ३ जो माझा वैरी माझा विरोध करून माझ्या खावयाच्या अन्नाचाही अपहार करतो, त्या ह्या अमुक नांवाच्या वैऱ्याला या पृथ्वीतून, या अंतरिक्षातून, या द्युलोकातून, या दशदिशांनी व्याप्त असलेल्या सर्व प्रदेशातून आणि या आमच्या सेवनीय अशा अन्नाच्या कोठारातून लौकरच मी हाकून लावतो. ज्याचा आम्ही द्वेष करतो, त्या, केव्हातरी आमचा विरोध करण्याचा संभव असलेल्या शत्रूला तर मी आताच हाकून लावला आहे. ४ मी सूर्याच्या प्रकाशाशी मिळून जाईन. ५ सूर्याच्या प्रदक्षिणेस अनुसरून मीही आपल्याभोवती प्रदक्षिणा करतो. ६ मी आपल्या प्रजेशी सुसंगत होईन व प्रजाही माझ्याशी सुसंगत होवो. मी भरपूर धनाशी सुसंगत होऊन राहीन आणि धनाचा भरपूर साठाही माझ्याशी सुसंगत होऊन राहो. ७ हे अग्निदेवा, समिधांनी प्रदीप्त झालेला तू माझ्यासाठीच प्रदीप्त होऊन रहा. हे अग्ने तुला प्रदीप्त करणारा मी तुझ्या कृपेने प्रदीप्त होईन. ८ हा यज्ञ तुझ्या कृपेने धनसंपन्न होवो. आणि मीही अत्यंत धनसंपन्न होईन. ९ हे अग्ने तू पुत्रपौत्रांनी युक्त अशा आमच्या आयुष्यांना पवित्र

करतोस. आम्हाला अन्न व दुग्धादि रस भरपूर दे. शत्रुसेनेला आमच्यापासून दूर कर. १० हे अग्निदेवा, तू स्वत: अत्यंत पवित्र होऊन आम्हाला पवित्र कर. माझ्या ठिकाणी ब्रह्मतेज, व्यवहारसामर्थ्य, पुष्टी आणि धन स्थापन कर. ११ हे गृहपालका अग्निदेवा, गृहपती अशा तुझ्या योगाने मी उत्कृष्ट गृहपती होईन. आणि गृहपती अशा माझ्या योगाने तू उत्तम गृहपती हो. शंभर हेमंत ऋतू उलटून जातील इतक्या दीर्घकालपर्यंत माझ्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या पुत्रांच्या कल्याणासाठी अत्यंत उज्वल अशा त्या तुझ्या आशीर्वादाची मी इच्छा करीत आहे. त्याचप्रमाणे विद्यमान असलेल्या माझ्या अमुक नांवाच्या पुत्रांना त्यांची बुद्धी प्रकाशित करणारा असा तो तुझा आशीर्वाद मिळण्याची मी इच्छा करीत आहे. १२ हे यज्ञा, जो प्रजापती अनुष्ठानरूपी गाड्याला तुला जुंपतो तोच आता तुला मोकळा करो. १३ हे व्रतपालका अग्निदेवा, यज्ञरूप व्रताचे मी आचरण केले आहे. ते व्रत पूर्ण करण्यास तुझ्या कृपेने मी समर्थ झालो आहे. ते माझे व्रत समृद्ध झाले आहे. १४ आताच अनुष्ठित केलेला हा यज्ञ समाप्त झाला आहे. तो मजकडून पुन्हा अनुष्ठित होवो. तो आम्हाला नीट ओळखीत आहे. आणि म्हणूनच तो आमच्या घरी पुन्हा पुन्हा अनुष्ठानाने संवर्धित होवो. तो यज्ञ आम्ही ज्याचे यजन करू त्या देवांचा पालक होवो आणि तोच आम्हाला अधिक अनुष्ठानाचे पालक करो. त्याच्या कृपेने आम्ही धनांचे पालक होऊ. १५ पुन्हा आमच्या हातून घडण्याविषयी ज्याची आम्ही प्रार्थना केली, तो यज्ञ पुष्कळ गाईंनी युक्त, पुष्कळ मेंढयांनी व घोड्यांनी युक्त, ऋत्विजांनी संपन्न, देवांचे सख्य संपादन केलेला, केव्हाही पराभूत न होणारा असा होवो. त्याचप्रमाणे प्राणवान् अशा हे अग्निदेवा, हा यज्ञ अन्न व प्रजा यांनी युक्त, धनसंपन्न, विस्तीर्ण असे बूड धारण करणारा आणि पुन्हा पुन्हा दीर्घकाळ चालू राहणारा व विद्वत्सभायुक्त होवो. (अनुवाक ६).

एकाच वसंत ऋतूत ज्याप्रमाणे अनेक यजमानांचे सोमयाग केले जातात, त्याचप्रमाणे 'दर्शपूर्णमास' नामक यज्ञ देखील एकाच पर्वदिवशी अनेक यजमानांच्याकडून केले जातात, हे उघडच आहे. परंतु त्यामुळे देव कोणत्या यजमानाच्या यज्ञात येतात व कोणत्या यजमानाच्या यज्ञात येत नाहीत, याविषयी संशय उत्पन्न होतो. एका यजमानाच्या दर्शपूर्णमास यज्ञात ज्या देवता यावयाच्या असतात, त्याच दुसऱ्या यजमानाच्या यज्ञातही यावयाच्या असतात. अर्थात् देवांना देखील कोणत्या यजमानाच्या यज्ञात जावे व कोणत्या यजमानाच्या यज्ञात जाऊ नये याविषयी मोठे संकट उत्पन्न होते. तथापि

या संकटाचा परिहार असा की, पुष्कळ यजमानांमध्ये जो यजमान सर्वांच्या पूर्वी देवतांचा परिग्रह करतो, म्हणजे देवतांना समंत्रक निमंत्रण करतो, त्याच्या इष्टिरूप यज्ञात देव येतात व तो यजमान दुसऱ्या दिवशी या देवतांचे यजन करतो. 'आहवनीय' नांवाचा जो अग्नी असतो तो देवांचे निवासस्थानच असतो. कारण त्या अग्नीच्या 'परिग्रह' मंत्रांत 'वसुरुद्रादि देव इंद्रासह वर्तमान या ठिकाणी मी बोलावतो' असा अर्थवाद व्यक्त झाला आहे. आहवनीय व गार्हपत्य यांच्यामध्ये असलेला प्रदेश हे पशूंचे निवासस्थान होय. कारण, त्यांच्या 'परिग्रह' मंत्रांत आहवनीय व गार्हपत्य यांच्या मधल्या जागेत पशू येवोत, असा अर्थवाद आला आहे. 'गार्हपत्य' अग्नी हे मनुष्यांचे निवासस्थान आहे. कारण तद्विषयक परिग्रह मंत्रांत 'या गार्हपत्याचे ठिकाणी सर्वप्रकारच्या प्रजा रममाण होवोत' असा भावार्थ आलेला आहे. अन्वाहार्यपचन म्हणजे दक्षिणाग्नी हा पितरांचे निवासस्थल होय. कारण त्या अग्नीच्या परिग्रहमंत्रांत हा पितरांचा अग्नी आहे, असे ध्वनित झाले आहे. यास्तव त्या त्या अग्नीला उद्देशून तो तो मंत्र म्हणून यजमानाने प्रत्येक अग्नीचा परिग्रह करावा. असे केल्याच्या योगाने स्वकीय म्हणजे त्या त्या देवतांना उचित अशा स्थानांच्या ठिकाणी देवतांचा परिग्रह केल्यासारखे अर्थात् त्यांना बोलावल्यासारखे होते. त्या त्या देवतांचे दुसऱ्या दिवशी तो यजमान यजन करतो. व्रत स्वीकारण्याचा पुढे सांगण्यात येणारा मंत्र पठण केल्याच्या योगाने व्रतपालक असा अग्नी याग करण्याला योग्य होतो. आणि यजमानही व्रत धारण करण्यास समर्थ होतो. व्रताचा स्वीकार करीत असतांना 'हे व्रतपालका अग्निदेवा मी यज्ञरूपी व्रताचे आचरण करितो' या अर्थाचा 'अग्ने व्रतपते व्रतं चरिष्यामि' हा मंत्र म्हणावा. कारण देवांमध्ये अग्नी हाच व्रतपती आहे. यास्तव, पूर्वोक्त मंत्र म्हटल्याने अग्नीला कळवूनच यजमानाने व्रताचा आरंभ केल्याप्रमाणे होते. पूर्णमासाचे ठिकाणी म्हणजे 'पौर्णमास' यागाचे प्रसंगी 'बर्हि' संज्ञक दर्भ कापून आणताक्षणीच व्रताचा स्वीकार करावा. आणि अमावास्येच्या दिवशी म्हणजे दर्शेष्टीच्या प्रसंगी 'वत्सापाकरण' म्हणजे गाईच्या पासून वासरांना दूर करताच व्रताचा स्वीकार करावा. कारण पूर्वोक्त दोन यागांविषयीच्या व्रतस्वीकाराला आता सांगितलेला कालच अनुक्रमे उचित आहे. पूर्वदिशेस असणाऱ्या आहवनीयाग्नीला व पश्चिमेस असणाऱ्या गार्हपत्याग्नीला 'उपस्तरण' करावे, असे विद्वान याज्ञिक म्हणत असतात. त्या म्हणण्याचा अर्थ असा की, आहवनीय व गार्हपत्य या दोन्ही अग्नींच्या भोवती दर्भांचे उपस्तरण करावे. म्हणजे दर्भ अंथरावेत. अशा प्रकारचे उपस्तरण म्हणजे जणू काय अग्नीला रहावयास करून दिलेले

तृणाच्छादित गृहच होय. अत्यंत दरिद्री अशी माणसे सुद्धा थंडीवाऱ्याचे निवारण होऊन आपल्यास सुखाने राहण्यासाठी तृणाच्छादित म्हणजे गवताने शाकारलेल्या गृहाची इच्छा करतात. मग महाप्रभावशाली देव तृणाच्छादित गृहाची इच्छा करीत असतात हे काय सांगावयास पाहिजे? यास्तव, देवांच्या इच्छेनुसार ज्याला जसे हवे असेल तसे 'उपस्तरण' रूपी नवीन गृह त्या त्या अग्नीच्या समीप यजमान निर्माण करतो. हे जाणणारा जो यजमान पूर्वी सांगितल्याप्रमाणे अग्नीच्या भोवती दर्भाचे 'उपस्तरण' करील त्या यजमानाच्या घरी, दुसऱ्या म्हणजे प्रतिपदेच्या दिवशी ज्यांचे यजन व्हावयाचे असते त्या सर्व देवता येऊन वस्ती करतात. यजमानाने 'ग्राम्य' व 'आरण्य' हे दोन्ही प्रकारचे पशू संपादन करावेत, असे विद्वान म्हणतात. गाई, घोडे, शेळ्या, मेंढ्या, निर्बुध्द पुरुष, गाढवे आणि उंट या सात प्रकारच्या पशूंना 'ग्राम्य' अशी संज्ञा असून द्विखुर श्वापद, पक्षी, सरपटणारे प्राणी, हत्ती, माकडे व नादेय म्हणजे जलचर या सात जातीच्या पशूंना 'आरण्य' असे म्हणतात. साळीचे तांदूळ, गहू इत्यादि 'ग्राम्य' धान्यांच्या पदार्थांचे भोजन केले तर यजमानाने 'ग्राम्य' पशूंचे संपादन केल्यासारखे होते. आणि जर यजमानाने नीवार, राजगिरा इत्यादि 'आरण्य' म्हणजे अरण्यात उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचे अन्न सेवन केले तर त्याने 'आरण्य' संज्ञक पशूंचेच जणू काय संपादन केल्यासारखे होते. यजमान जर काहीच न खाता राहील तर त्याचे ते व्रत पितृदेवांना प्रिय होईल. परंतु यजमानाने 'आरण्य' धान्याच्या अन्नाचे भोजन करावे हे युक्त होय. कारण 'आरण्य' धान्य इंद्रियांची शक्ती वाढविणारे आहे. यास्तव देवतापरिग्रहानंतर त्या दिवशी जो यजमान आरण्य धान्याच्या अन्नाचे भोजन करतो, तो जणू काय स्वत:च्या ठिकाणी इंद्रियशक्तीच धारण करतो. मुळीच काही न खाता यजमान उपवास करील तर तो भुकेने तळमळेल आणि जर काही खाईल तर रुद्रदेव त्याच्या पशूंचे हनन करील. यास्तव यजमानाने केवळ उदकपान करून रहावे. त्यायोगाने त्याने काही खाल्ल्यासारखेही होत नाही व न खाल्ल्यासारखेही होत नाही. अर्थात् तो भुकेनेही तळमळत नाही व रुद्रदेव त्याच्या पशूंचे हननही करीत नाही. यज्ञ हा 'वज्र'रूपच आहे. व क्षुधा ही खरोखर मनुष्याचा वैरी आहे. यास्तव यजमान जर काहीच न खाता केवळ उदकपान करून उपवास करील, तर त्याने जणू काय यज्ञरूपी वज्राने क्षुधारूपी साक्षात् वैऱ्याला ठार केल्यासारखे होते. (अनुवाक ७).

जो यजमान आपल्या अंत:करणात देवतादिकांच्या विषयी श्रध्दा न

ठेवता यज्ञाच्या अनुष्ठानाने देवतांचे यजन करण्याचा खटाटोप करतो, त्याच्या त्या यजनाविषयी देव आणि ऋत्विज हे श्रद्धा ठेवीत नाहीत. यास्तव यज्ञ करणाऱ्या यजमानाने उदकांचे 'प्रणयन' करावे म्हणजे 'प्रणीता' नामक पात्रात उदक भरून ते पुढे आहवनीय अग्नीच्या जवळ उत्तर बाजूस ठेवावे. कारण उदके ही श्रद्धारूप म्हणजे श्रद्धा उत्पन्न करणारी आहेत. अर्थात् उदकांचे प्रणयन केले असता श्रध्दा ठेवून केलेल्या यज्ञानुष्ठानाने देवतांचे यजन केल्यासारखे होते. व त्या यजमानाच्या यजनावर देव आणि मनुष्ये श्रध्दा ठेवतात. काही विद्वान याज्ञिक असे म्हणतात की, उदके ही शरीरवृत्तीचे अतिक्रमण करतात. आणि वाणीचेही अतिक्रमण करतात. मनाचे मात्र ही उदके अतिक्रमण करू शाकत नाहीत. यास्तव, पृथ्वीचे मनात ध्यान करून उदकांचे 'प्रणयन' करावे. मन हे जणू काय पृथ्वीरूप आहे. नदीमध्ये वगैरे असणारी उदके पृथ्वीचे अतिक्रमण करू शकत नाहीत. यास्तव, पृथ्वीचे ध्यान, मनन केल्याच्या योगाने पृथ्वीकडूनच उदकांचे 'प्रणयन' करविल्याप्रमाणे होते. पृथ्वीचे ध्यान केलेल्या मनाने उदकांचे प्रणयन करण्याचे महत्त्व जो जाणतो तो यजमान 'अस्कन्नहवि' होतो. म्हणजे त्याच्या यज्ञातील हविर्द्रव्य भूमीवर सांडत नाही. यज्ञाची साधने असलेल्या आयुधांचे संपादन करावे. म्हणजे ती यज्ञपात्रे एके ठिकाणी जुळवून पालथी मांडून ठेवावीत. यज्ञपात्रे ही देखील यज्ञरूपच होत. अर्थात् त्यांचे संपादन केल्याने यज्ञाचेच जणू काय संपादन केल्यासारखे होते. जर एक एक पात्र एकमेकापासून वेगवेगळे मांडले तर ती सर्व पात्रे पितृदेवतात्मक होतात. आणि जर एकाच ठिकाणी ढीग करून सर्व पात्रांची मांडणी केली तर ती मनुष्यस्वरूप होतात. यासाठी दोन दोन पात्रे जोडीजोडीने मांडावीत. त्यायोगाने जणू काय, 'याज्या पुरोनुवाक्या' या दोन मंत्रांच्या जोडीचेच स्वरूप त्या पात्रांना दिल्याप्रमाणे होते. जो यजमान यज्ञाच्या आरंभी यज्ञाला साधनभूत अशा दहा आयुधांना (पात्रांना) जाणतो, म्हणजे त्यांची मांडणी करण्याचे अनुसंधान ठेवतो, त्याचा यज्ञ निर्विघ्नपणे पार पडतो. स्फ्य आणि कपाले, अग्निहोत्रहवणी व शूर्प, कृष्णाजिन आणि शम्या, उलूखल व मुसल, दृषत् आणि उपला ही ती दहा यज्ञायुधे होत. यज्ञाच्या आरंभीच यांचे संपादन करावयाचे जो जाणतो त्या यजमानाचा यज्ञ उत्कृष्ट रीतीने पूर्णतेला प्राप्त होतो. जः यजमान 'मी तुमच्यासाठी हवन करतो' असे देवांना श्रुत करून यज्ञाचे यजन करतो, त्याचे हविर्द्रव्य देव सेवन करतात. यासाठी हविर्द्रव्यांचा निर्वाप करतेवेळी 'देवांना बोलावणाऱ्या त्या अग्नीला मी या यज्ञात बोलावतो' या अर्थाच्या 'अग्निं होतारमिह तं हुवे' या पूर्वोक्त मंत्राचे पठण

करून हविर्द्रव्याचे 'अभिमंत्रण' करावे. म्हणजे त्याला स्पर्श करावा. आता सांगितलेल्या मंत्राच्या शेवटी 'देव या यज्ञाच्या हविर्द्रव्याचे सेवन करोत' असा अर्थवाद स्पष्टच असल्यामुळे हविर्द्रव्याचे अभिमंत्रण केल्याने देवांना श्रुत केलेल्या यज्ञानेच त्यांचे यजन केल्याप्रमाणे होते, व त्या यजमानाच्या हविर्द्रव्याचे देव सेवन करतात, असे जे विधान केले ते युक्तच आहे. आता सांगितलेल्या मंत्राचा पठणरूप प्रयोग म्हणजे यज्ञस्वीकाररूपच होय. यास्तव पूर्वोक्त मंत्रपठणपूर्वक हविर्द्रव्याला स्पर्श करण्याचा प्रयोग केला म्हणजे जणू काय यजमानाने यज्ञसंबंधी 'ग्रह' ग्रहण करून केलेल्या यज्ञाने देवतांचे यजन केल्यासारखे होते. पूर्वोक्त अभिमंत्रणविषयक मंत्र पठण केल्यानंतर यजमानाने वाणीचे नियमन करावे. म्हणजे मौन धारण करावे. म्हणजे ते यज्ञाच्या धारणेला कारणभूत होते. शिवाय प्रजापतीने जसा एकाग्र मनाने यज्ञ केला त्याचप्रमाणे, यजमानाने एकाग्र मनाने त्या यज्ञाचे अनुष्ठान केल्यासारखे होते. काहीतरी बोलत राहिले म्हणजे यज्ञाचा बोभाटा होऊन यज्ञविरोधी अशा राक्षसांचा शिरकाव तेथे होण्याचा संभव असतो. यास्तव यजमानाने मौन धारण केले असता ते यज्ञाचा बोभाटा होऊ देत नाही. अर्थात् राक्षसांचा संचारही तेथे न होण्याला ते मौन कारणभूत होते. जो यजमान 'यज्ञयोग' संज्ञक मंत्र पठण करण्याची वेळ येईल तेव्हा न विसरता त्या मंत्राचे पठण करून यज्ञाला स्वत:च्या ठिकाणी नियुक्त करतो तोच यजमान यज्ञाला नियुक्त करणाऱ्या इतर यजमानांमध्ये योग्य वेळी यज्ञाचा 'नियोक्ता' म्हणजे स्वत:च्या ठिकाणी यज्ञाला नियुक्त करणारा, असे म्हणवून घेण्यास पात्र होतो. अकाली केलेले 'यज्ञयोग' मंत्राचे पठण करून न केल्यासारखे निरुपयोगी होय. जो प्रजापती तुज यज्ञाला यजमानाच्या ठिकाणी नियुक्त करतो, तोच माझ्या या यज्ञाला माझ्या ठिकाणी नियुक्त करो', अशा अर्थाचा 'कस्त्वा युनक्ति स त्वा युनक्तु' हा मत्र याग्य वेळी यजमानाने पठण करावा. प्रजापती हाच 'क' म्हणजे वाचादेव होय. यास्तव पूर्वोक्त मंत्र पठण केल्याच्या योगाने रथाला घोडा जोडावा त्याप्रमाणे प्रजापतिकडूनच जणू काय यजमानाने स्वत:च्या ठिकाणी यज्ञाला नियुक्त केल्यासारखे होते. अर्थात् तो यजमान 'योग्य वेळी यज्ञाला स्वत:च्या ठिकाणी नियुक्त करणारा' असे म्हणावयास पात्र होतो.(अनुवाक ८).

प्रजापतीने 'अग्निहोत्र' संज्ञक होम व 'अग्निष्टोम', 'पौर्णमासेष्टी' व 'उक्थ्य', अमावास्येष्टी' म्हणजे 'दर्शेष्टी' व 'अतिरात्र' या नांवाच्या यज्ञांच्या तीन जोड्या निर्माण केल्या. अर्थात् तीन जोड्या म्हणजे सहा यज्ञ होतात.

यांपैकी अग्निहोत्रहोम, पौर्णमासेष्टी व अमावास्येष्टी हे तीन लहान यज्ञ थोडक्या खर्चात, थोडक्या मंत्रांनी व थोडक्या क्रियांनी करणे शक्य असल्यामुळे अल्प फळ देणारे असून अग्निष्टोम, उक्थ्य व अतिरात्र हे मोठाले सोमयाग फार खर्चाचे, पुष्कळ मंत्रांनी व पुष्कळ क्रियांनी साध्य होणारे असल्यामुळे महत्फळ देणारे आहेत. वस्तुत: अल्पफळ देणारे यज्ञ व महाफळ देणारे यज्ञ यांची सारख्या योग्यतेने तुलना करणे योग्य नाही. तथापि पिता धाकट्या मुलावर अधिक प्रेम करतो, त्याप्रमाणे प्रजापतीने अल्पफळ देणाऱ्या अग्निहोत्रहोमादि लहान यज्ञांचे ठिकाणी विशेष प्रेमदृष्टी ठेवून त्यांना महाफळ देणाऱ्या अग्निष्टोमादि मोठ्या सोमयागांच्या बरोबरीचेच लेखले. यामुळे अग्निहोत्रहोम जितक्या योग्यतेचा आहे, तितक्याच योग्यतेचा 'अग्निष्टोम' आहे; पौर्णमासेष्टी जितक्या योग्यतेची आहे, तितक्याच योग्यतेचा 'उक्थ्य' यज्ञ आहे; त्याचप्रमाणे अमावास्येष्टी जितक्या योग्यतेची आहे, तेवढ्याच योग्यतेचा 'अतिरात्र' नामक सोमयाग आहे, हे उघड आहे. अशाप्रकारे अग्निहोत्रादि यज्ञांची व अग्निष्टोमादि सोमयागांची समान योग्यता जाणून जो यजमान अग्निहोत्रहोमाचे हवन करील, त्याला अग्निष्टोम यज्ञ केल्याने जितके फळ मिळावयाचे तितकेच फळ प्राप्त होईल. पौर्णमासेष्टीची व उक्थ्य यज्ञाची सारखीच योग्यता आहे असे जाणणारा जो यजमान पौर्णमासेष्टीचे अनुष्ठान करील, त्याला 'उक्थ्य' नामक यज्ञ केल्याने जेवढे फळ मिळावयाचे तेवढे फळ मिळेल. अमावास्येष्टी व अतिरात्र यज्ञ यांची योग्यता सारखीच आहे, हे समजणारा जो यजमान अमावास्येष्टीचे अनुष्ठान करील, त्याला अतिरात्र यज्ञ केल्याने जितके फळ प्राप्त व्हावयाचे तितके फळ प्राप्त होईल. परमोच्च अशा सत्यलोकी राहतो तो चतुर्मुख असा परमेष्ठी होय. पूर्व कल्पामध्ये तो यजमान असताना 'दर्शपूर्णमास' नामक यज्ञ त्याच्याकडून केला गेला आणि म्हणूनच दर्शपूर्णमाससंज्ञक यज्ञ हा परमेष्ठीचा म्हणजे परमेष्ठीने प्रचलित केलेला यज्ञ म्हणून प्रसिद्ध झाला. परमेष्ठीरूप यजमानाने परमेश्वरार्पण बुद्धीने दर्शपूर्णमास यज्ञाचे अनुष्ठान केल्यामुळेच त्याने परमावधीचे श्रेष्ठ असे 'परमेष्ठी' हे पद मिळविले. त्या परमेष्ठीने दक्ष प्रजापतीला दर्शपौर्णमासेष्टीचे अनुष्ठान करण्याचा उपदेश केला व त्याप्रमाणे दर्शपौर्णमासेष्टीचे अनुष्ठान करून तो दक्ष प्रजापतीही परमोच्च अशा मर्यादेला जाऊन पोचला. त्याने दर्शपौर्णमासेष्टीच्या अनुष्ठानाचा इंद्राला उपदेश केला व तदनुसार दर्शपौर्णमासेष्टीचे अनुष्ठान करून इंद्रही परमावधीच्या स्थानाला पोचला इंद्राने अग्नी व सोम या दोघांना उपदेश केला व त्याप्रमाणे ते दोघेही दर्शपौर्णमासेष्टीचे अनुष्ठान केल्याच्या योगाने परमोच्च स्थानाला जाऊन पोचले. दर्शपौर्णमासेष्टीचे

हे माहात्म्य जाणून जो दर्श व पौर्णमास नांवाच्या इष्टींचे अनुष्ठान करील तो यजमान निश्चयाने परमोच्च अशा स्थानाला, अर्थात् स्वर्गलोकाला प्राप्त होईल. जो यजमान अत्यंत विस्तारयुक्त अशा यज्ञाने देवांचे यजन करतो तो प्रजा व गाईबैल इत्यादि पशूंच्या जोड्यांनी विस्तृत होतो. त्याचा संसार विस्तारला जातो. संवत्सराचे बारा महिने असतात व दर्शपौर्णमाससंज्ञक यज्ञामध्येही कर्मांच्या बारा जोड्या असतात. अर्थात् कर्मांच्या दृष्टीने द्वादशमासात्मक संवत्सराशी संख्यासाम्य असणे हेच यज्ञाचे प्रसृतत्व म्हणजे विस्तृत स्वरूप होय. यास्तव दर्शपूर्णमास यज्ञामध्ये जी कर्मांची बारा 'द्वंद्वे' म्हणजे जोड्या आहेत, त्यांचे संपादन करावे असे विद्वान लोक म्हणत असतात. १) 'अयक्ष्माव: प्रजया' या मंत्राने वासराला बंधनमुक्त करून दूध पिण्यासाठी गाईच्या जवळ आणून सोडावे. दूध तापविण्याची स्थाली 'मातरिश्वन:' या मंत्राने गार्हपत्याग्नीवर ठेवावी. २) 'अव रक्षो' या मंत्राने साळींचे भात कुटावे. 'इषमा वद' इत्यादि मंत्रांनी दगडाच्या गोटीने किंवा 'शम्या' नांवाच्या काष्ठाने पाट्यादरवटयावर ठोके मारावेत. ३) 'देवस्य त्वा' या मंत्राने तांदूळ वाटण्यासाठी पाट्यावर घालावेत. 'ध्रुवमसि' इत्यादि मंत्रांनी पुरोडाश भाजण्यासाठी कपाले मांडावीत. ४) 'घर्मोऽसि विश्वायु:' या मंत्राने कपालांवर पुरोडाश ठेवावा. 'अग्निस्ते तेज:' हा मंत्र म्हणून तुपाची स्थाली आहवनीय अग्नीवर ठेवावी. ५) 'पृथिवि देयजननि' इत्यादि मंत्रांनी वेदीच्या जागेतील दर्भाचे तुकडे व मृत्कण उचलून घेऊन ते त्या त्या मंत्रांनी आग्नीध्राच्या हातावर टाकावेत.'अररुस्ते दिवं' हा मंत्र म्हणून दर्भतृणांचे तुकडे व मृत्कण 'उत्कर' नामक स्थानावर ओंजळीने दडपावेत. ६) 'वसवस्त्वा' इत्यादि मंत्राने वेदीची आखणी करून घ्यावी.'आशासाना' या मंत्राने पत्नीच्या कंबरेला मोळाची दोरी बांधावी. ७) 'ऋतसधस्थ' या मंत्राने स्फ्य नांवाच्या लाकडी तलवारीने ओढलेल्या रेघेवर पाण्याने भरलेली 'प्रोक्षणी' किंवा 'अग्निहोत्र हवणी' नांवाची स्रुची ठेवावी. 'अग्नेर्जिह्वासि' या मंत्राने पूर्वोक्त रेघेवर आज्यस्थाळी ठेवावी. याप्रमाणे चौदा कर्मांच्या सात जोड्या सांगितल्या आहेत. यामध्ये मागे सांगितलेल्या 'स्पन्य' इत्यादि यज्ञायुधांच्या पांच जोड्या मिळविल्या म्हणजे एकंदर बारा 'द्वंद्वे' म्हणजे बारा जोड्यांची भरती होते. दर्शपूर्णमाससंज्ञक दोन यज्ञांची हीच बारा द्वंद्वे होत हे जाणून जो यजमान त्यांचे संपादन करून दर्शपौर्णमासेष्टीचे यजन करतो त्याने प्रजात म्हणजे विस्तृत अशा यज्ञाने यजन केल्यासारखे होते आणि प्रजा व पशूंच्या जोड्यांनी त्याचा संसार खूप विस्ताराला प्राप्त होतो. (अनुवाक ९).

हे मध्यम परिधे, तू स्थिर आहेस, तुझ्या अनुग्रहाने माझ्या जातीच्या

लोकांत मी स्थिर होईन, अशा अर्थाचा 'वोऽसि ध्रुवोऽहं सजातेषु भूयासम्' हा मंत्र म्हणून आहवनीयाग्नीच्या पश्चिमेस घातलेल्या मध्यम परिधीचे 'अनुमंत्रण' करावे. म्हणजे त्या परिधीकडे अवलोकन करून हा मंत्र म्हणावा. म्हणजे स्वतःबरोबर स्वजातीतील लोकांनाही स्थिर करण्याविषयी यजमानाने मध्यम परिधीची प्रार्थना केल्यासारखे होते. 'तू उग्र आहेस, तुझ्या अनुग्रहाने माझ्या जातीच्या लोकांत मी उग्र होईन,' असा अर्थ असलेल्या उग्रोऽस्युग्रोऽहं सजातेषु भूयासम्' या मंत्राने आहवनीयाच्या दक्षिणबाजूस घातलेल्या परिधीचे यजमानाने अनुमंत्रण करावे. स्वतःच्या ठिकाणी उग्रता नसली म्हणजे स्वजातीतील आशिक्षित लोक तोंडावर उलट बोलू लागतात. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे अनुमंत्रण केले असता, यजमानाने जणू काय स्वजातीतील अशिक्षित लोकांना ते केव्हाही उलट बोलणार नाहीत असे केल्याप्रमाणे होते. 'तू शत्रूंचा पराभव करणारा आहेस, तुझ्या प्रसादाने मी स्वकीय ज्ञातीच्या लोकांमध्ये शत्रूंचा पराभव करणारा होईन', अशा अर्थाच्या 'अभिभूरस्यभिभूरहं सजातेषु भूयासम्' हा मंत्र म्हणून उत्तर बाजूच्या परिधीचे अनुमंत्रण करावे. असे केल्याच्या योगाने स्वकीय जातीपैकी जो कोणी यजमानाला प्रतिकूल होऊन त्याचे उच्चाटन करण्याची इच्छा करीत असेल, त्या मनुष्याचा यजमानाने जणू काय पराभव केल्यासारखे होते. 'देवयोग्य अशा मंत्राने मी तुला नियोजित करतो,' हा अर्थ असलेल्या 'युनज्मि त्वा ब्रह्मणा दैव्येन' हा मंत्र यजमानाने पठण करावा. या मंत्राचे पठण हाच अग्नीचा योग अर्थात् त्याचे यज्ञकर्माच्या ठिकाणी नियोजन होय. यास्तव, आता सांगितलेल्या मंत्राचे पठण केले असता त्याने जणू काय यज्ञकर्माच्या ठिकाणी अग्नीला नियुक्त केल्यासारखे होते. यज्ञाचे दोन प्रकार आहेत. 'एक समृद्ध व दुसरा व्युद्ध यथाशास्त्र अनुष्ठित केलेल्या यज्ञाला समृद्ध'अशी संज्ञा असून, तसा न झालेला तो 'व्यृध्द' यज्ञ होय. यज्ञाच्या समृध्दपणाच्या योगाने देव स्वर्गलोकाला प्राप्त झाले. व 'व्यृध्द' अशा यज्ञाने त्यांनी असुरांना पराभूत केले. यजमानाने ' हे अग्ने, माझ्या या यज्ञाचे जे अंग विस्मृतीमुळे करण्याचे राहून जाईल,' अशा अर्थाचा 'अग्ने अस्य यज्ञस्य रिष्यात्' हा मंत्र म्हणावा. त्या योगाने यज्ञाला समृद्धत्व येते. व त्या समृध्दत्वामुळे यजमान स्वर्गलोकाला प्राप्त होतो. 'त्या विस्मृत झालेल्या अंगभूत कर्माने अथवा भूमीवर सांडलेल्या आज्यादिकाने मी माझ्या शत्रूला मारीन,' असा अर्थ पूर्वोक्त मंत्राच्या उत्तरार्धात असल्यामुळे या उत्तरार्धाच्या पठणात वैऱ्यांचा पराभव व्यक्त केला जातो. व अशा प्रकारचे व्यक्तीकरण यज्ञाचे 'व्यृध्दत्व' सूचित करते. आणि

त्या व्यृध्दत्वाच्या योगाने यजमान जणू काय शत्रूंचा पराभवच करतो. भू:, भुव:, व सुव: या व्याहृति संज्ञक तीन मंत्रानी 'अग्निहोत्र' संबंधी अग्नीच्या आधानानंतर प्रथमच केल्या जाणाऱ्या होमाचे हविर्द्रव्य आहवनीयाच्या पश्चिमेस जमिनीवर ठेवावे. अग्न्याधान केल्यावर लागलीच अग्निहोत्र होम करावा लागतो. इतके त्याचे प्राधान्य आहे. अर्थात् 'अग्निहोत्र' संज्ञक होम हे सर्व यज्ञाचे जणू मुखच आहे. पूर्वोक्त तीन व्याहृती ह्या त्रैलोक्याचा आत्मा असलेल्या 'विराट्' नामक परब्रह्माच्या वाचक असल्यामुळे ब्रह्मरूपच आहेत. यास्तव त्यांचा उच्चार करून हविर्द्रव्य जमीनीवर ठेवल्याच्या योगाने यज्ञमुखरूप अग्निहोत्राच्या ठिकाणी 'ब्रह्म' स्थापन केल्यासारखे होते. अग्न्याधानानंतर प्रथमच केलेल्या अग्निहोत्राला एक वर्ष ज्या दिवशी पूर्ण होईल, त्या दिवशी या ब्रह्मरूप तीन व्याहृतीमंत्रांनीच अग्निहोत्रसंबंधी उपसादन करावे. म्हणजे आहवनीयाजवळ पश्चिमेस ठेवावे. सारांश, प्रत्येक संवत्सराच्या व शेवटच्या दिवशी व्याहृतीमंत्रांनी अग्निहोत्र होमाच्या हविर्द्रव्याचे उपसादन करावे असे केले असता ब्रह्माकडूनच संवत्सराचा आरंभ व समाप्ती या दोन्ही बाजूंनी परिग्रह केल्यासारखे होते. 'दर्शपूर्णमासेष्टि' व 'चातुर्मास्य' यागाचा प्रथमच आरंभ करताना ब्रह्मरूप अशा ह्या तीन व्याहृतींनीच हविर्द्रव्यांचे 'आसादन करावे. दर्शपूर्णमास व चातुर्मास्ये ही जणू अग्निष्टोमादि यज्ञांचे मुखच आहे. व व्याहृती ब्रह्मरूप आहेत. यास्तव दर्शपूर्णमास व चातुर्मास्ये या यागांच्या प्रथमारंभप्रसंगी व्याहृतिमंत्रांनी हवीचे आसादन केल्याच्या योगाने यज्ञमुखाच्या ठिकाणी ब्रह्माचीच जणू स्थापना केल्यासारखे होते. दर्शपूर्णमासेष्टींच्या प्रारंभानंतर वर्ष पूर्ण होईल. त्या दिवशीही अशाच प्रकारे व्याहृतिमंत्रांनी हवीचे आसादन करावे. अशाप्रकारे प्रत्येक संवत्सराच्या प्रारंभाच्या व शेवटच्या दिवशी व्याहृतिमंत्रांनी हविर्द्रव्यांचे आसादन केले असता ब्रह्माकडूनच संवत्सराला प्रारंभ व शेवट या दोन्ही बाजूंनी परिगृहीत केल्याप्रमाणे होते. यज्ञाचे 'बहिष्पवमान' इत्यादि जे अंग सामाने संपादन केले जाते, त्या योगाने त्या यज्ञाचे फल राष्ट्राला प्राप्त होते. अर्थात् राष्ट्रात धान्यादिकांची अभिवृध्दी होते. ऋङ्.मंत्राने जे यज्ञाचे अंग अनुष्ठित केले जाते त्या यज्ञाचे फळ प्रजेला प्राप्त होते. अर्थात् सर्व प्रजेच्या आयुरारोग्याची अभिवृध्दी होते. आणि असे झाले म्हणजे यज्ञकर्त्या ब्राह्मणाने फलरहित अशा यज्ञाने यजन केल्यासारखे होते. यास्तव अध्वर्यू 'इध्म' समिधा 'आहवनीय' अग्नीवर देत असता होत्याने 'प्रवोवाजा अभिद्यव:' इत्यादि 'सामिधेनी' संज्ञक ऋचा म्हणावयास आरंभ करण्यापूर्वीच पूर्वोक्त तीन व्याहृती पठण कराव्यात म्हणजे त्या योगाने ब्रह्मानेच सामिधेनींच्या

पठणास प्रारंभ केल्याप्रमाणे होऊन यजमानानेही सफळ अशा यज्ञानेच देवतांचे यजन केल्यासारखे होते. कोणा एखाद्या यजमानाविषयी मनात द्वेषभाव ठेवून एखादा होता या यज्ञाचे फळ यजमानाच्या शत्रूला मिळो अशी जर इच्छा करील, तर त्या यजमानाच्या यज्ञात होत्याने 'पुरोनुवाक्या' नामक ऋचा पठण करण्यापूर्वीच त्या पूर्वोक्त व्याहृतींचे पठण करावे. कारण 'पुरोनुवाक्या' ही शत्रुदेवतात्मक आहे. अर्थात्, व्याहृतिमंत्रपठणपूर्वक पुरोनुवाक्या होत्याने म्हटली असता, त्या यज्ञाचे फळ यजमानाच्या शत्रूलाच प्राप्त होते. पुष्कळ यजमान एकत्र होऊन जेव्हा यज्ञ करतात, तेव्हा त्या यज्ञाला 'सत्र' असे म्हणतात. अशा प्रकारच्या सत्ररूप यज्ञाच्या प्रसंगी या यज्ञाचे फळ सर्व यजमानांना सारखेच मिळावे अशा प्रकारची ज्या यजमानांना उद्देशून होता इच्छा करील, त्या यज्ञांतील इष्टींमध्ये ब्रह्मरूप अशा ह्या पूर्वोक्त व्याहृतींची योजना अशा प्रकारे करावी की, पुरोनुवाक्येची अर्धी ऋचा पुरी झाल्यावर म्हणजे त्या ऋचेचे उत्तरार्ध पठण कण्यापूर्वी पहिली, याज्येच्या आरंभापूर्वी दुसरी, आणि तिचे अर्ध पुरे झाल्यावर म्हणजे उत्तरार्धाच्या पूर्वी तिसरी व्याहृती पठण करावी. असे केले असता त्या यज्ञाचे फळ सर्व यजमानांना सारख्या प्रमाणाने प्राप्त होते. ज्याप्रमाणे सर्व बाजूंस पसरलेला मेघ कोणत्याही प्रकारचा पक्षपात न करता सर्व प्रदेशात सारख्याच रीतीने भरपूर धान्य उत्पन्न होईल अशी उत्कृष्ट पर्जन्यवृष्टी करतो, त्याचप्रमाणे आता सांगितल्याप्रमाणे व्याहृतींची योजना करून केलेला सत्ररूप यज्ञ सर्व यजमानांना सारख्याच प्रमाणाने उत्कृष्ट फल देतो. पर्जन्य चांगला पडला म्हणजे सर्व नद्या पाण्याने तुडुंब भरून चाललेल्या असतात. व अशाच प्रकारच्या एखाद्या नदीतून काढलेल्या पाटाच्या योगाने सर्व लोक उदक संपादन करीत असतात. त्याचप्रमाणे सर्व यजमान सर्वांना सारखेच फळ देणाऱ्या सत्ररूप यज्ञाचा परिग्रह म्हणजे स्वीकार करतात. 'तू जणू काय प्रजापतीने निर्माण केलेले मनच आहेस, प्रजापति निर्मित यज्ञ व तत्साधनभूत मन यांच्यासह तू माझ्या ठिकाणी समाविष्ट हो', असा अर्थ व्यक्त करणाऱ्या 'मनोऽसि प्राजापत्यं मनसा मा भूतेनाविश' हा मंत्र म्हणावा व स्त्रौवाघाराचे अनुमंत्रण करावे. कारण मन हे प्रजापतिदेवतात्मक आहे. आणि यज्ञ हा देखील प्रजापतीनेच निर्माण केलेला आहे. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे स्त्रौवाघाराचे अनुमंत्रण केले असता मन आणि यज्ञ यांची स्थापना यजमानाने स्वतःच्या ठिकाणीच केल्याप्रमाणे होते. 'तू शत्रूंचा नाश करणारी व इंद्राने व्याकरणशुद्ध केलेली जणू वाणीच आहेस, वाणी व इंद्राने निर्मिलेल्या नेत्रादि इंद्रियांच्या शक्तीसह तू माझ्या ठिकाणी रहा',

असा अर्थवाद असलेल्या 'वागस्यैंद्री सपत्नक्षयणी वाचा मेन्द्रियेणाविश' असा मंत्र म्हणून स्रुचाधाराचे अनुमंत्रण करावे. म्हणजे त्याच्याकडे पाहून मंत्र म्हणावा. वाणी ही इंद्रदेवतात्मक आहे. यासाठी आता सांगितलेल्या मंत्राने स्रुचाधाराचे अनुमंत्रण केल्याच्या योगाने यजमानाने जणू काय इंद्राने व्याकरणशुद्ध केलेल्या वाणीलाच आपल्या ठिकाणी धारण केल्यासारखे होते. (अनुवाक १०).

पुढे सांगण्यात येणाऱ्या सत्रा अक्षरांनी युक्त असा मंत्रसंघ प्रजापतीने निर्माण केला असल्यामुळे त्याला 'सप्तदश प्रजापती' अशी संज्ञा आहे. सर्व यज्ञांत समाविष्ट होणाऱ्या या सप्तदश प्रजापतीला जो जाणतो तो यजमान सर्वांगपरिपूर्ण अशा यज्ञाने समाजात प्रतिष्ठित होतो. आणि यज्ञापासून केव्हाही भ्रष्ट होत नाही. आता सूचित केलेल्या मंत्रसंघाचे स्पष्टीकरण असे की, या संघापैकी पहिला 'आश्रावय' हा मंत्र चार अक्षरांचा आहे. दुसरा 'अस्तु श्रौषट्' हा देखील चारच अक्षरांचा असून 'यज' असा तिसरा मंत्र दोन अक्षरांचा आहे. 'ये यजामहे' हा चौथा मंत्र पांच अक्षरांचा असून 'वौषट्' हा वषट्कारसंज्ञक पांचवा मंत्र दोनअक्षरी आहे. या पाच मंत्रांची एकंदर सत्रा अक्षरे होतात. 'सप्तदश प्रजापती' नांवाचा मंत्रसंघ तो हाच होय. व हाच सर्व यज्ञांत समाविष्ट होत असतो. या मंत्रसंघाला जो जाणतो, तो यजमान संपूर्ण अशा यज्ञाच्या योगाने प्रतिष्ठित होतो. व यज्ञापासून तो केव्हाही भ्रष्ट होत नाही. जो यजमान यज्ञाचा प्रारंभ, मध्य, व शेवट जाणतो तो प्रतिष्ठित व वैकल्यरहित अशा यज्ञाच्या योगाने फळप्राप्तीपर्यंतच्या स्थितीला प्राप्त होतो. 'आश्रावय' हा मंत्र म्हणजे यज्ञाचा प्रारंभ असून 'अस्तु श्रौषट्' 'यज' आणि 'ये यजामहे' हे तीन मंत्र म्हणजे यज्ञाचा मध्य होय. वौषट् हा 'वषट्कार' नामक मंत्र हा यज्ञाचा शेवट आहे. याप्रमाणे यज्ञाचा प्रारंभ, मध्य व अंत जो जाणतो तो यजमान प्रतिष्ठित, अर्थात् वैकल्यरहित यज्ञाच्या योगाने फलप्राप्ती पर्यंतच्या स्थितीला जाऊन पोचतो. सत्य, प्रिय, व सुसंस्कृत अशा वाणीला 'सूनृता' असे नांव आहे. सूनृतावाणीरूपी गाईची धार कशी काढावी, हे जो जाणतो तोच त्या सूनृणावाणीरूपी गाईची धार काढू शकतो. यज्ञ हीच सूनृतावाणीरूपी गाय होय 'आश्रावय' असे म्हणणे म्हणजे त्या यज्ञरूपी गाईला आव्हान केल्यासारखे होय. 'अस्तु श्रौषट्' हा मंत्र म्हटला अराता त्या यज्ञरूपी गाईच्याकडे तिचे वासरू तिला पिण्यासाठी जवळ आणल्याप्रमाणे होते. 'यज' या द्व्यक्षरी मंत्राचा उच्चार केला म्हणजे धार काढावयाचे भांडे वर उचलून घेतल्याप्रमाणे होत असून 'ये यजामहे' या पंचाक्षरी मंत्राच्या पठणामुळे धार काढणारा गाईच्या कासेजवळ जाऊन बसल्यासारखे होते.

'वौषट्' हा द्व्यक्षरी मंत्र पठण करणे म्हणजे त्या यज्ञरूपी गाईची धार काढणेच होय. एवं च सूनृतावाणीचा म्हणजे यज्ञरूपी गाईचा दोह किंवा धार काढण्याचा प्रकार तो हाच. ह्याला जो जाणतो तो यजमान यज्ञरूपी गाईची म्हणजे सुनृतावाणीची धार काढतो. देवांनी एकदा 'सत्र' केले. तेव्हा त्या सत्ररूप यज्ञात काही वैकल्य आल्यामुळे पाऊस पडेनासा झाला. आणि त्यांना सर्व दिशांच्या ठिकाणी असलेली पिकें वाळून शुष्क झालेली दृष्टीस पडली. या आपत्तीचा परिहार होऊन पर्जन्यवृष्टी कशी होईल याविषयी देवांनी पुष्कळ विचार केला तेव्हा त्यांना पर्जन्यवृष्टी होण्यास कारणभूत अशी पुढील पांच मंत्राची पंगत आढळली व तिचा त्यांनी उपयोग केला. 'आश्रावय' असा त्यांनी मंत्र म्हटला, त्याबरोबर पूर्व दिशेस पावसाळी वारा वाहू लागला. 'अस्तु श्रौषट्' हा मंत्र उच्चारताच आकाशात सर्वत्र मोठमोठे ढग उत्पन्न झाले 'यज' हा द्व्यक्षरी मंत्र पठण केल्याबरोबर वीज कडकडू लागली. 'ये यजामहे' हा पंचाक्षरी मंत्र म्हणतात खूप जोराने पाऊस पडू लागला आणि 'वौषट्' या वषट्कारसंज्ञक मंत्राचा उच्चार करण्याबरोबर जोराने वादळ घोंघावू लागले. तेव्हा देवाना चारी दिशांच्या ठिकाणी असलेली सर्व पिके टवटवीत होऊन वाढीस लागलेली दृष्टीस पडली. अशा प्रकारचे या मंत्राचे माहात्म्य जो जाणतो त्याला देखील सर्व दिशांना असलेली पिके उत्कृष्ट वाढलेली दृष्टीस पडतात. सप्तदशाक्षररूप अशा प्रजापतीला क्वचित् एखादाच जाणतो व त्या एखाद्या पुरुषावरच तो प्रजापती अनुग्रह करतो. प्रजापतीने अनुग्रह केलेला तो यजमान इतरांच्यापेक्षा उत्कृष्ट स्थितीला प्राप्त होतो. 'आश्रावय', अस्तु श्रौषट्', 'यज', 'ये यजामहे' हे चार व 'वौषट्' हा वषट्कारसंज्ञक पांचवा मंत्र मिळून होणारे जे सत्रा अक्षरांचे मंत्रपंचक' हाच चारही वेदांचे सारच असलेला सप्तदशाक्षरूप प्रजापती होय. ह्या प्रजापतीला जो जाणतो तो इतरांहून उत्कृष्टतेला प्राप्त होतो. ऋतूंपैकी 'वसंत' नांवाच्या ऋतुदेवतेला मी संतुष्ट करतो, असा अर्थ असलेल्या 'वसंतमृतूनां प्रीणामि' हा मंत्र पठण करून पहिल्या 'प्रयाज' संज्ञक आज्याहुतीचे अनुमंत्रण करावे. व याचप्रमाणे पुढच्या चार प्रयाजांच्या आहुतींचे त्या त्या आहुतीला उचित असा मंत्र पठण करून अनुमंत्रण करावे. कारण 'प्रयाज' हे जणू ऋतुरूपच आहेत. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे अनुमंत्रणपूर्वक त्यांचे यजन केले असता यजमानाने पांचही ऋतूंना संतुष्ट केल्यासारखे होते. आणि ते संतुष्ट झालेले सर्व ऋतू त्या यजमानाला वसंतऋतूत झाडांना फुले येणे, ग्रीष्म ऋतूत अत्यंत उन्हाळा होणे, वर्षा ऋतूत पाऊस पडणे, अशा प्रकारे ज्या ज्या ऋतूत जे जे

व्हावयास पाहिजे ते ते फल देतात. प्रयाजरूपी ऋतूंचे हे माहात्म्य जो जाणतो त्यालाही सर्व ऋतू अशा प्रकारेच फलद्रूप होत असतात. 'अग्नी व सोम यांना समंत्रक आज्याहुती देण्याने मी उत्कृष्ट अशा चक्षुरिंद्रियाने युक्त होईन' अशा अर्थाच्या 'अग्निषोमयोरहं देवयज्यया चक्षुष्मान् भूयासं', या मंत्राने आज्यभागसंबंधी दोन आहुतींचे अनुमंत्रण करावे म्हणजे अग्नी व सोम या दोघांच्या अनुग्रहाने यज्ञ चक्षुरिंद्रियसंपन्न होतो व यजमानानेही त्या दोघांच्या अनुग्रहाने आपल्या ठिकाणी उत्कृष्ट असे चक्षुरिंद्रिय धारण केल्यासारखे होते. पुरोडाशांची समंत्रक आहुती देऊन मी भरपूर अशा अन्नाने युक्त होईन, अशा अर्थाचा 'अग्नेरहं देवयज्ययान्नादो भूयासं' हा मंत्र म्हणून अग्निदेवासंबंधी प्रधानसंज्ञक यागाचे अनुमंत्रण करावे. कारण देवांमध्ये अग्नी हाच भरपूर अन्न सेवन करणारा आहे. यास्तव आता सांगितल्याप्रमाणे अनुमंत्रण केल्याने त्या अग्निदेवाकडून यजमानाने आपल्या ठिकाणी भरपूर अन्न संपादन केल्यासारखे होते. 'तू वैऱ्यांचा नाश करणारा आहेस, तुझ्या अनुग्रहाने मी शत्रूकडून अवध्य होईन व अमुक नांवाच्या शत्रूला मारीन असा अर्थ असलेल्या 'दब्धिरस्यदब्धो भूयासममुं दभेयं ' या मंत्राने उपांशुयाज संज्ञक यागाचे अनुमंत्रण करावे. वैऱ्याचा घात करणाऱ्या उपांशयाजरूपी आयुधानेच देवांनी असुरांचा नाश केला. अर्थात् याच आयुधाने यजमानही आपल्या वैऱ्याचा नाश करतो. 'अग्नी व सोम या दोघा देवांना समंत्रक अशी पुरोडाशाची आहुती अर्पण करण्याने मी शत्रूचा घात करणारा होईन', असा भावार्थ व्यक्त करणारा 'अग्नीषोमयोरहं देवयज्यया वृत्रहा भूयासं' हा मंत्र म्हणून अग्नी व सोम यांना उद्देशून केल्या जाणाऱ्या प्रधान यागाचे अनुमंत्रण करावे. अग्नी व सोम यांच्या साहाय्यानेच इंद्राने वृत्रासुराला मारले. अर्थात् आता सांगितल्याप्रमाणे अनुमंण केले म्हणजे यजमानाने जणू काय अग्नी व सोम या दोघा देवांच्या कडूनच आपल्या शत्रूचा नाश करविल्यासारखे होते. 'इंद्र व अग्नी यांना पुरोडाशाची समंत्रक आहुती दिल्याच्या योगाने मी उत्कृष्ट इंद्रियानी संपन्न व सेवनीय असे अन्न भक्षण करणारा होईन' अशा अर्थाचा 'इंद्राग्नयोरहं देवयज्ययेंद्रियावी भूयासं' हा मंत्र म्हणून इंद्राग्नींच्या साठी केल्या जाणाऱ्या प्रधान यागाचे अनुमंत्रण करावे. त्या योगाने यजमान उत्कृष्टइंद्रियसंपन्न व सेवनीय असे अन्न खाणारा होतो. 'इंद्र देवाला सान्नाय द्रव्याची म्हणजे एकत्र केलेल्या दुधादह्याची समंत्रक आहुती देण्याने मी इंद्रियसंपन्न होईन असा अर्थ असलेल्या 'इंद्रस्याहं देवयज्ययेंद्रियावी भूयासं' या मंत्राने इंद्रासाठी केलेल्या प्रधान यागाचे अनुमंत्रण करावे. म्हणजे इंद्राच्या अनुग्रहाने यजमान उत्कृष्ट इंद्रियसंपन्न होतो. 'महेंद्र देवाला सान्नायसंज्ञक द्रव्याची आहुती दिल्याच्या योगाने या जयशाली

होईन महनीय अशा पदवीला प्राप्त होईन', अशा अर्थाचा 'महेंद्रस्याहं देवयज्यया जेमानं महिमानं गमेयं' हा मंत्र म्हणून महेंद्रासाठी केल्या जाणाऱ्या प्रधानयागाचे सर्व कार्यांत अनुमंत्रण करावे. म्हणजे महेंद्राच्यां कृपेने यजमान विजयी होऊन महनीय अशा पदवीला प्राप्त होतो. 'स्विष्टकृत् नामक अग्निदेवाला, प्रधान देवतांना अर्पण करून शेष राहिलेल्या सर्व हविर्द्रव्यांची समंत्रक आहुती देऊन मी दीर्घायुष्याने युक्त व सर्वांगपरिपूर्ण अशा यज्ञाने प्रतिष्ठेला प्राप्त होईन', अशा अर्थाच्या 'अग्नेः स्विष्टकृतोऽहं देवयज्ययाऽयुष्मान् यज्ञेन प्रतिष्ठां गमेयम्' हा मंत्र म्हणून 'स्विष्टकृत्' संज्ञक यागाचे अनुमंत्रण करावे. म्हणजे स्विष्टकृत् नामक अग्नीच्या प्रसादाने यजमान दीर्घायुष्याने युक्त होऊन सर्वांगपूर्ण अशा यज्ञाच्या योगाने प्रतिष्ठेला प्राप्त होतो. (अनुवाक ११).

१ हे ऋत्विज आणि यजमान हो, तुमच्या पुत्रपौत्रादि जनांच्या कार्यसिध्दीसाठी सर्व जगाच्या वर उत्कृष्टत्वाने स्थित असणाऱ्या इंद्रदेवाला आम्ही बोलावीत आहोत. तो इंद्र इतरांच्याहून आम्हालाच अधिक प्रिय मानणारा असो. २ अग्निचयनाचे अनुष्ठान करणारे यजमान अग्न्यादि देवांच्याबरोबर अर्ध्या हविर्भागाचे धारण करण्याकरता इंद्राला बोलावीत असतात. ज्या अर्थी विटांची विशेष रीतीने मांडणी करून त्यांवर स्थापित केलेल्या अग्नीचे ठिकाणी अग्निष्टोमादि सोमयागांचे अनुष्ठान पार पाडण्यास समर्थ असलेले यजमान तद्विषयक अशा आपल्या बुद्धी एकाग्र करतात, त्या अर्थी त्यांनी इतर देवांच्या बरोबर अर्धा हर्विभाग सेवन करण्याकरिता इंद्राला बोलावणे साहजिकच आहे. हे इंद्रा तू शूर, मनुष्यांना धन देणारा व आमच्या बलाचे संवर्धन करणारा होऊन आम्हाला गाई, म्हशी, बैल इत्यादि पशूंनी गजबजलेल्या संघाच्या ठिकाणी प्रामुख्याने स्थापन कर. ३ शंभर अश्वमेध यज्ञ करणाऱ्या हे इंद्रदेवा, निषादासह ब्राह्मणादि पांच वर्णांच्या लोकांच्या ठिकाणी तुझ्या कृपेनेच जी सामर्थ्य आहेत, ती सर्व सामर्थ्ये हे इंद्रा, तुझ्या कृपेने मी आपल्याजवळ ग्रहण करतो. ४ यजनीय अशा हे इंद्रदेवा, सर्वांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ असलेल्या तुला, तुझ्या ठिकाणी असलेल्या वृत्रासुरवध, क्षत्रिय जातीचा अभिमान, अपरिमित बळ, वैऱ्याचा तिरस्कार करण्याचा स्वभाव इत्यादि गुणांना अनुसरून म्हणजे ते गुण लक्षात घेऊन सत्ररुप यज्ञामध्ये सर्व हविर्द्रव्य अग्न्यादि देवांच्या बरोबर यथानुक्रमे पुन्हा पुन्हा देत असतात. ५ इशाऱ्याची वाट न पाहता आत बसणाऱ्याच्या इच्छेनुसार रथ ओढणारे सात घोडे ज्याच्या ठिकाणी सज्ज असतात, आणि जो स्वतः अतींद्रियज्ञानी, त्रिभुवनकीर्ती व देदीप्यमान आहे तो आदित्य अतिथी होऊन ज्या इंद्राच्या घरी येतो, त्या इंद्राचा

महिमा किती म्हणून वर्णावा? ६ हे इंद्रा तू फळे न लागलेल्या वृक्षांच्या ठिकाणी उत्कृष्ट पर्जन्यवृष्टी करून परिपक्क अशी फळे निर्माण केली आहेस. ब्रह्मांडाभोवती फिरण्याचे सामर्थ्य देऊन तू सूर्याला द्युलोकावर चढविला आहेस. हे यजमान हो, तुम्ही 'हम्' असे म्हणून अतिशय भक्तीने गाइलेल्या सामांनी 'घर्म' संज्ञक हविर्द्रव्य तापवितात, त्याप्रमाणे इंद्राला प्रिय असे पुरोडाशादि हविर्द्रव्य भाजून तयार करा. गोड अशा शब्दांनी स्तवनीय अशा इंद्रासाठी स्तुतिरुपी मंत्रवाणीचा उच्चार करा. ७ सामगान करणाऱ्या उद्गात्यांनी 'बृहत्' सामाने इंद्राचेच स्तवन केले. ऋचांचे पठण करणाऱ्या हौत्रकांनी योग्य अशा ऋचा पठण करून इंद्राची स्तुती केली. 'यजु' म्हणजे गद्य मंत्र पठण करणाऱ्या अध्वर्युप्रभृति ऋत्विजांनी गद्य मंत्रांनी इंद्राचेच स्तवन केले. ८ शंभर अश्वमेध केलेल्या हे इंद्रदेवा, गायत्रादिसामांचे गान करणारे उद्गाते तुला उद्देशूनच साम गातात, ऋचा पठण करणारे होते ऋङ्.मंत्र म्हणून तुझेच अर्चन करतात. ब्रह्मा, अध्वर्यू इत्यादि ऋत्विज, गृहस्थलोक कुलाचारादिकांनी आपला वंश वाढवितात त्याप्रमाणे, अनेक प्रकारे तुझ्या गुणाचे वर्णन करून तुझी कीर्ती वृद्धिंगत करतात. ९ तुझी स्तुती करणारे आम्ही वणव्याने दग्ध झालेल्या भूप्रदेशावर, पर्जन्यवृष्टी करणाऱ्या आणि पापापासून मुक्त करणाऱ्या तुलाच संतोषित करावे अशा प्रकारची एकनिष्ठ मनीषा बाळगून आहोत. हे इंद्रा, ह्या हविर्द्रव्याचा स्वीकार कर. यजमानाचे मनोरथ तुझ्या कृपेने सफल होवोत. १० ज्या बुध्दीमध्ये इंद्राने आम्हाला पापातून तारले अशी भावना आहे ती बुद्धी माझ्या ठिकाणी जेव्हा प्रादुर्भूत झाली तेव्हापासून मी सुबुध्द झालो आहे. आणि म्हणूनच ज्या दिवशी मला मरण येईल त्या दिवसापर्यंत इंद्र देवालाच मी स्तुतींनी आळवीत राहीन. ज्याप्रमाणे नावेत बसून फिरणाऱ्या नावाड्याला नदीच्या दोन्ही तीरावरचे लोक आम्हाला घेऊन चल, आम्हाला घेऊन चल. अशाप्रकारे हांका मारीत असतात, त्याप्रमाणे पापापासून मुक्त झालेल्या आम्हाला संस्कृतिरूपी नदीच्या दोन्ही तीरावरचे लोक 'आम्हालाही तुमच्या मार्गाने घेऊन चला', अशा प्रकारे हांका मारीत असतात ११ हे ऋत्विजहो, उत्कृष्ट शोभणारा, यज्ञांचा मुख्यदेव, पापमुक्त करणारा, यज्ञफलाचा वर्षाव करणारा, उदकांत न बुडू देणारा व उपासकाला ऐश्वर्याला प्राप्त करून देणारा असा जो इंद्र त्याला अखड भजत जा. हे अश्विनीकुमारहो, या यजमानाचे ठिकाणी इंद्रियांची क्षमता व बल स्थापन करा. १२ हे इंद्रा, आमच्या शत्रूंना विशेषत्वाने मारून टाक. आमचा नाश करण्याकरिता सैन्य जमा करण्याच्या नादात असलेल्या शत्रूंना अधोगतीला नेऊन त्यांना पश्चात्ताप

होईल असे कर. आमचा घात करण्याला आणखी जो कोणी शत्रू टपला असेल त्यालाही आमच्या पाया पडावयास लाव. १३ हे इद्रंदेवा अभिलषणीय, दु:खापासून रक्षण करू शकणारे असे आमचे बल आमच्या ठिकाणी संपादन करण्यासाठी तू उत्पन्न झाला आहेस.मनुष्यांच्या पेक्षा वरिष्ठ असणाऱ्या हे इंद्रदेवा, तू इच्छित फलांचा वर्षाव करणारा आहेस. आमच्याशी शत्रुत्व करण्याची इच्छा असलेल्या मनुष्याला तू दूर केले आहेस. देवांना हविर्द्रव्य समर्पण करणाऱ्या यजमानांच्या साठी विस्तीर्ण असे उपभोगस्थान तू निर्माण करून ठेवले आहेस. १४ हे इंद्रदेवा, भयंकरप्राणिभक्षणासारखे कुत्सित आचरण करणाऱ्या पर्वतवासी सिंहाप्रमाणे अत्यंत दूरच्या प्रदेशातून आमच्या विरोधकाचा नाश करण्यासाठी तू आला आहेस. यास्तव शत्रूच्या शरीरात भसकन् शिरणारे व तीक्ष्ण असलेले तुझे वज्र पुन:एकदा धार लावून पाजळ आणि त्या वज्राने आमच्या शत्रूला खूप जखमी कर.आमच्याशी लढणाऱ्या शत्रूंना आमच्यापासून अत्यंत दूर घालवून दे. १५ हे इंद्रदेवा, शत्रूंना विशेषत: दूर कर. आमच्याशी लढणाऱ्या योध्यांनाही नष्ट कर. वृत्राची हनुवटी भग्न कर. तू अत्यंत क्रुद्ध होऊन आमच्यावर घाला घालणाऱ्या शत्रूंचा गर्व भग्न करून टाक १६ मी शृंखलाबंधनापासून रक्षण करणाऱ्या इंद्रदेवाला बोलावितो. मी योध्यांच्यापासून होणाऱ्या अडथळ्यापासून रक्षण करणाऱ्या इंद्राला बोलावितो. प्रत्येक हवनाचे प्रसंगी सुखाने बोलावून आणण्यास शक्य, सर्व कार्यांविषयी शक्तिमान् आणि अनेक यजमानांनी निमंत्रित केलेल्या इंद्राला मी बोलावितो. धनवान इंद्रदेव आम्हाला अखंड सुख देवो. १७ हे बलवान् इंद्रदेवा, आमच्या रक्षणासाठी आम्ही करीत असलेल्या इष्टीमध्ये आम्हाकडून कसल्याही प्रकारचे वैकल्य उत्पन्न होण्यास आम्ही प्रवृत्त न होऊ असे कर. हरीसंज्ञक अश्वांनी युक्त अशा हे इंद्रदेवा तुझी अवज्ञा करण्यास आम्ही केव्हाही प्रवृत्त होणार नाही. तू हिंसकप्राणिरहित अशा घरांच्या योगाने आमचे रक्षण कर. विद्वान अशा यजमानांमध्ये आम्ही तुला प्रिय होऊ. १८ पुष्कळ यजमानांकडून आमंत्रित झालेल्या इंद्रदेवा घोडे जोडण्यासाठी तुझा रथ तज्ञ मनुष्ये तासून नीटनेटका करोत. कारागीर असलेला त्वष्टा देव तुझे धगधगीत वज्र घासून पुसून पाजळून ठेवो. अध्वर्युप्रभृती ऋत्विज तुझ्या अर्चनास साधनीभूत अशा मंत्रांनी तुझे पूजन करीत असतां, महायज्ञाच्या प्राप्तीला विरोध करणाऱ्या पातकांचा तू अवश्य नाश करावास म्हणून तुज इंद्रदेवाची यश व कीर्ती वृद्धिंगत करोत. १९ हे इंद्रदेवा इच्छित फलांचा वर्षाव करणाऱ्या तुझ्या संतोषासाठी अनुष्ठान करण्यास योग्य व

इच्छित फलाची वृष्टी करणाऱ्या यागाला दगडी पाटे -वरवंटे जेव्हा अलंकृत करतात, त्यावेळी वेदिरूपी पृथ्वी तुझ्याशी समानत्वाने प्रीती करणारी होवो. इंद्राने फेकलेली जी वज्रतुल्य आयुधे असतील ती आयुधे रथ व अश्व यांची अपेक्षा न धरता महायज्ञप्राप्तीला प्रतिबंध करणाऱ्या असुरांच्यावर नेम धरून त्यांचा नाश करण्यास प्रवृत्त होवोत (अनुवाक १२).

प्रपाठक ७.

जो आहिताग्नी म्हणजे औपासन नामक अग्नीची उपासना करणारा यजमान 'पाकयज्ञ' करील त्याला गाई म्हशी इत्यादि पशूंची प्राप्ती होते. देवांना अर्पण केल्या नंतर उरलेल्या हविर्द्रव्यापैकी काही भाग राखून ठेवून बाकीचा जो 'इडा' अशी संज्ञा असलेला भाग ऋत्विजांना भक्षण करावयास दिला जातो, तो त्यांनी भक्षण करणे हाच 'पाकयज्ञ' होय. जो यजमान अशा प्रकारचा हव्यभक्षणरूप 'पाकयज्ञ' करतो त्यालाही पशू प्राप्त होतात. यजमानाच्याकडून फलप्राप्तीचे साधन म्हणून केल्या जाणाऱ्या यज्ञामध्ये 'प्रयाज' व 'अनुयाज' यांच्या यजनांच्या मधल्या अवकाशात ही 'इडा' ऋत्विजांना देण्यात येते. ती 'इडा' अध्वर्यू जवळ आणीत असतांना यजमानाने तिचे 'अभिमंत्रण' करावे, म्हणजे तिला स्पर्श करून 'रूपाने सुंदर घृताचा वर्षाव करणाऱ्या आणि उत्कृष्ट शुभ्र वर्णाच्या इडारूपी देवा माझ्याजवळ ये' अशा अर्थाचा आरंभ असलेला 'सुरूपवर्ण वर्णन' हा मंत्र म्हणावा. 'इडा' ही पशुरूप आहे. अर्थात् आता सांगितल्याप्रमाणे इडेचे अनुमंत्रण केले असता यजमानाने गोमहिष्यादि सर्व पशूंना आपल्या जवळ बोलावल्यासारखे होते. देवांनी यज्ञाचे दोहन करून त्याच्या ठिकाणचे फलरूपी दुग्ध काढून घेऊन त्याला रिकामा केला. आणि यज्ञाने असुरांचे दोहन करून त्यांच्या ठिकाणी असलेल्या बलरूपी दुग्धाचा त्याने अपहार केला व त्यांना रिकामे केले. तेव्हा ते यज्ञाने दोहन करून रिकामे केलेले असुर पराभव पावले. देवांनी यज्ञाला रिक्त म्हणजे रिकामे केले व यज्ञाने असुरांना रिक्त केले हे जाणणारा जो यजमान यजन करतो तो दुसऱ्या यजमानाचे दोहन करून त्याच्या ठिकाणचे फलरूपी दुग्ध काढून त्याला रिकामा करण्यास समर्थ होतो. 'सा मे सत्याशीरस्य यज्ञस्य भूयात्' म्हणजे ती इडारूपी गाय यज्ञाचा आशीर्वाद माझ्या ठिकाणी खरा करणारी होवो, असे म्हणणे हाच यज्ञाचा दोह होय. यास्तव 'सा मे सत्याशीः' हा मंत्र म्हटला असता यजमानाने यज्ञाचे दोहनच जणू केल्यासारखे होते. वासराला चाटून जिच्या स्तनांना पान्हा फुटलेला असतो ती गाय

दुधाची धार देते त्याचप्रमाणे इडारूपी गाय पान्हवल्यानंतर यजमानाला फलरूपी दुधाची धार देते. 'इडोपहूता' इत्यादि होत्याकडून पठण केले जाणारे मंत्रभाग हेच त्या इडारूपी गाईचे स्तन असून वायुदेव हा त्या गाईचा वत्स होय. होता जेव्हा 'इडोपाह्वान' करील म्हणजे इडारूपी गाईला आपल्या जवळ बोलावील त्या वेळेस यजमानाने होत्याकडे पाहून मनात वायुदेवतेचे ध्यान करावे म्हणजे त्याने इडारूपी गाईच्या जवळ तिच्या वायुरूप वत्साला पाजण्यासाठी आणल्यासारखे होते. मनूसह सर्व देव संपूर्ण अशा दर्शपूर्णमास यज्ञाच्या योगाने स्वर्गलोकी जाण्याला उद्युक्त झाले. त्या देवांपैकी मनू हा पाकयज्ञाचे अनुष्ठान करून करून श्रमित झाला. म्हणजे मनूने 'इडोपाह्वान' यज्ञकर्माचे तात्पर्य जाणण्याचे फार श्रम केले. तेव्हा इडोपाह्वानाचे तात्पर्य जाणणाऱ्या त्या मनूजवळ इडारूपी गाय प्रसन्न होऊन आली. त्या इडेला पाहून देवांनी व असुरांनी एकमेकांना कळू न देता तिला आपल्याजवळ बोलावले 'इडोपहूता' अशा प्रकारे 'उपहूता' या शब्दापूर्वी 'इडा' या शब्दाचा उच्चार करून म्हणजे आपल्याकडे मुख. करून येणाऱ्या इडारूपी धेनूला देवांनी जवळ बोलाविले आणि 'उपहूतेडा' अशा प्रकारे म्हणजे 'उपहूता' या शब्दानंतर 'इडा' शब्द उच्चारून म्हणजे आपल्याकडे पाठ केलेल्या अर्थात् पाठमोऱ्या इडारूपी गाईला असुरांनी आपल्या जवळ बोलावले. संमुख येणाऱ्या इडेला देवांनी बोलावल्यामुळे ती त्यांच्या जवळ आली आणि पराङ्.मुख म्हणजे पाठमोरी असलेल्या इडेला असुरांनी बोलावल्यामुळे ती त्यांच्याविषयी असंतुष्ट होऊन त्यांच्याजवळ आली नाही. पशू देखील इडारूप असल्याने ते देखील देवांना प्राप्त झाले. अर्थात् असुरांच्या जवळचे पशूही त्यांना सोडून गेले. आपला यजमान पशुरहित व्हावा असे ज्या होत्याला वाटत असेल त्याने असुरांप्रमाणे पाठमोऱ्या इडेचे 'उपाह्वान' करावे म्हणजे त्याचा तो यजमान पशुरहितच होतो. आणि आपल्या यजमानाला पशू प्राप्त व्हावे असे ज्या होत्याला वाटेल त्याने त्या यजमानाच्या इष्टीमध्ये देवांच्या प्रमाणे 'संमुख' अशा इडेचे उपाह्वान करावे. म्हणजे तो यजमान पशुसंपत्तीने युक्त होतो. वेदार्थाचा विचार करणारे विद्वान असे म्हणतात की, जो यजमान 'इड एह्यदित एहि' इत्यादि मंत्राने इडेचे उपाह्वान करून त्या इडेच्या ठिकाणी आपल्या आत्म्याची योजना करतो, त्यानेच इडेचे यथाशास्त्र उपाह्वान केल्यासारखे होते. 'तू आम्हाला प्रिय, शत्रूंचा नाश करणारी व आम्हाला धन देणारी हो'अशा अर्थाच्या 'सा नः प्रिया सुप्रतूर्तिर्मघोनी' ह्या मंत्राने पठण करून इडेचे उपाह्वान करतो तोच त्या इडेचे ठिकाणी स्वतःच्या आत्म्याची योजना करतो असे समजावे. प्रयाज व अनुयाज यांच्या

मध्यंतरीच्या अवकाशात पुरोडाशाचा इडाभागरूप काही अंश ऋत्विज भक्षण करतात व उदकाचा काही अंश आपल्या मस्तकावर 'मनो ज्योतिर्मा जुषतां' हा मंत्र म्हणून मार्जनरूपाने सिंचन करतात. परंतु असे करणे म्हणजे यज्ञाच्या क्रियेला विच्छिन्न केल्याप्रमाणे होते. कारण, प्रयाज व अनुयाज हे यागरूप आहेत. व या दोहोंच्या मध्ये याग नसलेल्या इडाभक्षण व मार्जन या दोन क्रिया केल्या जाणे हाच यज्ञाचा विच्छेद होय. प्रयाज व अनुयाजांच्यामध्ये इडाभक्षण व मार्जन केल्यामुळे असुर अनुयाज याग करावयाचा अजीबात विसरून गेले. अर्थात् त्यांच्या यज्ञाचा विच्छेद झाला. देवांनी मात्र सावधपणा राखून एका पूज्य ब्राह्मणाकडून एकमेकापासून विच्छिन्न झालेले म्हणजे तुटले गेलेले यज्ञविभाग पुन्हा एकत्र जोडून घेतले व यज्ञविच्छेदाची आपत्ती टाळली 'बृहस्पती आमच्या या यज्ञाला विस्तृत करो' अशा अर्थाचा 'बृहस्पतिस्तनुतामिमं नः' हा मार्जन मंत्राचा भाग यजमानासह ऋत्विजांनी पठण करावा. देवांचा गुरु असल्यामुळे बृहस्पती हाच पूज्य ब्राह्मण होय. अर्थात् आता सांगितल्याप्रमाणे मंत्रविभाग पठण केला असता पूज्य अशा बृहस्पतिनामक देवांच्यामधील पूज्य अशा ब्राह्मणाकडून विच्छिन्न झालेल्या यज्ञाचे भाग पुन्हा एकत्र जोडल्यासारखे होते. 'विच्छिन्नं यज्ञं समिमं दधातु' असा मार्जन मंत्राचा दुसरा चरण असून 'विच्छिन्न झालेल्या यज्ञाला पुन्हा एकत्र जोडून सुसंघटित करो' हा त्या चरणाचा अर्थ आहे. यास्तव, या चरणाचे पठण केले असता ते यज्ञाचे सातत्य कायम ठेवण्याला कारणभूत होते. 'विश्वेदेवा इह मादयंतां' हा पूर्वोक्त मंत्राचा चौथा चरण असून 'सर्व देव या यज्ञाचे ठिकाणी तृप्त होवोत' असा या चरणाचा अर्थ आहे. हा चरण म्हटला म्हणजे सातत्ययुक्त अर्थात् पुन्हा सुसंघटित केलेला यज्ञच देवांना समर्पण केल्यासारखे होते. यजमान यज्ञामध्ये जी गोरूप किंवा 'अन्वाहार्य'संज्ञक चरुरूप दक्षिणा ऋत्विजांना देतो तिच्या मागोमाग त्या यजमानाचे सर्व पशू जातात आणि तो यज्ञकर्ता यजमान पशुरहित होतो. यासाठी, आपण दिलेले दक्षिणाद्रव्य तर ऋत्विजांच्या ठिकाणी राहील आणि पशू आपणापासून दूर न जाता आपणासन्निधच रमून राहतील असा काहीतरी उपाय यजमानाने केला पाहिजे, असे वेदवेत्ते विद्वान् म्हणतात. तो उपाय हाच की, 'ब्रध्न पिन्वस्व' म्हणजे 'हे ब्रध्ना, आम्हाला व ऋत्विजांना संतुष्ट कर', अशा अर्थाचा प्रारंभ असलेला मंत्र म्हणावा. कारण 'ब्रध्न' म्हणजे यज्ञपुरूषच होय. अर्थात् हा मंत्र म्हटल्याने यजमानाने जणू काय यज्ञालाच पूजारूपाने प्रोत्साहन दिल्यासारखे होते व त्याच्या अनुग्रहाने दिलेले दक्षिणाद्रव्य ऋत्विजांच्या

ठिकाणी व पशू स्वतःच्या ठिकाणी राहणे ही दोन्ही कार्ये यजमानाने संपादन केल्याप्रमाणे होते. 'ददतो मे मा क्षायि' असा या मंत्राचा दुसरा भाग असून 'दक्षिणा देणाऱ्या यजमानाचा धनक्षय होऊ नये' असा त्या भागाचा अर्थ आहे. या भागाचे पठण केले म्हणजे यजमान द्रव्याच्या अक्षयत्वाला प्राप्त होतो. त्याच्या धनाचा क्षय होत नाही. 'यज्ञ करणाराचे सामर्थ्य क्षीण न होवो' अशा अर्थाचा पूर्वोक्त मंत्राचा 'कुर्वतो मे मोप दसत्' हा तिसरा भाग पठण करावा. त्या योगाने यजमानाला पुष्कळ सामर्थ्य प्राप्त होते. (अनुवाक १).

'सुवर्चनस्' नांवाच्या ऋषीचा पुत्र 'संश्रवा' हा 'उपोदित' नामक ऋषीचापुत्र 'तुमिंज' याला म्हणाला, 'सत्र' संज्ञक यज्ञानुष्ठान करणारांमध्ये जेव्हा तू 'होता' नांवाचा ऋत्विज झाला होतास, तेव्हा तू कोणत्या गुणाने युक्त असलेल्या इडेचे उपाह्वान केलेस? तुमिंजाने असे उत्तर दिले की, जी प्राणाने देवांचे, व्यानाने मनुष्यांचे आणि अपानाने पितरांचे धारण करते त्या इडेचे मी उपाह्वान केले. संश्रव्याने पुन्हा असा प्रश्न केला की, तू ज्या इडेचे उपाह्वान केलेस ती गोरूप इडा, तिचा दक्षिणारूपाने प्रतिगृह करणाऱ्या ऋत्विजांचा नाश करते की नाश करीत नाही? तुमिंज म्हणाला, होय ती नाश करते. यावर संश्रवा पुन्हा म्हणाला, 'तुमिंजा, तर मग तू जे केलेस ते इडेच्या बाह्य शरीराचे उपाह्वान होय. मुख्य इडारूप देवतेचे नव्हे'. श्रुतिवचनाचा अभिप्राय असा की, गाय हेच इडेचे शरीर आहे, व शरीरभूत अशा इडारूप गाईला अनुलक्षूनच संश्रवा व तुमिंज हे दोघे प्रश्नोत्तररूपाने बोलले. यज्ञामध्ये दक्षिणा म्हणून दिलेल्या गाईच्या योगाने देव संतुष्ट होतात. ते तिचे दूध काढीत नाहीत अथवा तिला मारीत नाहीत. अर्थात् निःस्वार्थीपणाने देव संतोष मानीत असल्याने ती गाय प्राणाने म्हणजे प्राणसमान अशा उत्तम वृत्तीने देवांचे धारण करते. दक्षिणा म्हणून दिलेल्या ज्या गाईच्या योगाने मानव आपले जीवनयापन करतात, म्हणजे तिचे दूध काढून ते पिऊन जगतात पण तिला मारीत नाहीत, ती गाय प्राणापानांच्या मध्यवर्ती असलेल्या व्यान-समान अशा मध्यम वृत्तीने मनुष्यांचे धारण करते.'अष्टका'नांवाच्या श्राध्दात पितरांच्यासाठी गाय मारतात. यास्तव ती गाय अपानाने म्हणजे मारणरूप अशा वृत्तीने पितरांचे धारण करते. दक्षिणारूपाने दिल्या जाणाऱ्या गाईचे देवादिकांना धारण करण्याचे हे कार्य जो मर्मपूर्वक जाणतो तो पशुमान् होतो. तुमिंज म्हणाला, जी इडा प्रभुत्वाने युक्त अशी प्रजा प्राप्त करून देते व त्या प्रजांच्याकडे अनुकूलत्वाने लक्ष ठेवते त्या इडेचे मी 'उपाह्वान' केले असे समज. त्यावर

संश्रवा पुन्हा त्याला म्हणाला 'अरे, तू तर मग इडेच्या ठिकाणच्या अन्नाचेच ते उपाह्वान केलेस, मुख्य इडेचे नव्हे. कारण धान्ये हेच त्या इडारूपी गाईचे अन्न होय. धान्येच अन्नरूपाने प्रजांना प्रभुत्वाने युक्त करतात व त्यांच्या घरी पुष्कळ मनुष्यांना भोजन मिळाले म्हणून पुन्हा उत्पन्न होऊन त्यांच्या जवळ येऊन राहतात. सारांश ओषधी म्हणजे धान्ये हेच इडारूप धेनूचे अन्न आहे. आणि हे जो जाणतो तो पुष्कळ अन्न सेवन करणारा होतो'. तुमिंज म्हणाला, 'पराभवाला प्राप्त होणाऱ्या प्रजांना पराभवापासून वाचवून त्यांच्यावर अनुग्रह करणारी आणि पराभवाला प्राप्त होणाऱ्या प्रजांना त्यांना अपेक्षित असलेले स्थान देऊन त्यांचा स्वीकार करणारी जी इडा तिचे मी उपाह्वान केले'. संश्रवा तुमिंजाच्या ह्या म्हणण्याचेही निराकरण करून त्यास म्हणाला की, हे देखील मुख्य इडेचे उपाह्वान नव्हे. इडेला आधारभूत अशा पृथ्वीचेच ते तू उपाह्वान केलेस. पृथ्वी हीच इडेची प्रतिष्ठा म्हणजे आधारभूत स्थान आहे. पृथ्वीच पराभवाला प्राप्त होऊ पाहणाऱ्या प्रजांवर अनुग्रह करते व अशा प्रकारच्या प्रजांना अपेक्षित असे स्थान देऊन त्यांचा स्वीकार करते. पृथ्वी ही इडेचे आधारस्थान असल्याचे जो जाणतो, तो पृथ्वीचे ठिकाणी प्रतिष्ठित होतो. तुमिंज म्हणाला, 'हे संश्रव्या, ज्या वृष्टिरूपी इडेचा खाली जमिनीवर वर्षाव झाला असता तिच्या पासून निष्पन्न उदकावर प्रजा उपजीवन करतात व ते उदक पितात, त्या वृष्टिरूपी इडेचे मी उपाह्वान केले. संश्रव्याने त्याला असे विचारले की, ही वृष्टीरूपी इडा कोणाचा नाश करते की नाश करीत नाही? तुमिंज म्हणाला, 'नाही, वृष्टिरूपी इडा कोणाचाही नाश करीत नाही. इतकेच नव्हे तर ती तिचा प्रतिग्रह करणाऱ्यासाठी धान्यादिकांची उत्पती करते.' तेव्हा संश्रवा म्हणाला, 'हे मात्र तू मुख्य इडेचे उपाह्वान केलेस. एवं च, पर्जन्यवृष्टी हीच खरोखर इडा आहे. वृष्टिचाच खालच्या जमिनीवर वर्षाव झाला म्हणजे तिच्यापासून प्राप्त होणाऱ्या उदकांपासून प्रजा आपले उपजीवन करतात व त्या उदकाचे पान करतात. वृष्टिरूप इडेचे हे महत्त्व जो जाणतो तो प्रजावान् व सेवनीय असे अन्न खाणारा होतो. (अनुवाक २).

यजमान अप्रत्यक्ष रीतीने ज्यांचे यजन करतात ते देव वेगळे आणि प्रत्यक्ष ज्यांचे यजन करतात ते देव वेगळे. अग्नी, इंद्र इत्यादि देवता प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळे त्यांच्यासाठी केले जाणारे जे यजन ते अप्रत्यक्ष यजन असून ऋत्विजरूपी देव प्रत्यक्ष दिसत असल्यामुळे त्यांना जे काही दिले

जाते ते प्रत्यक्ष यजन होय. अप्रत्यक्ष रीतीनेच ज्यांचे यजन केले जाते त्या अग्न्यादि देवांचेच यजन चरुरूपी आज्यादि द्रव्यांच्या आहुती देऊन यजमान करीत असतो. 'अन्वाहार्य'संज्ञक चरूचे जे दान ऋत्विजांना यजमान करतो, त्या योगाने जो जणू काय प्रत्यक्ष दिसणारे जे ऋत्विज म्हणून नियोजित केलेले ब्राह्मणरूपी देव, त्यांचेच यजन करून त्यांना संतुष्ट करतो. 'अन्वाहार्य' चरूचे दान ही त्या ऋत्विजांना दिलेली दक्षिणाच होय. ही दक्षिणा यज्ञाचे छिद्र म्हणजे व्यंग झाकून टाकते. यज्ञाचे जे कर्मरूपी अंग अधिक झाले असेल, आणि जे कमी झाले असेल ते सर्व अन्वाहार्य चरूच्या दानाने बरोबर-जसे पाहिजे तसे केल्याप्रमाणे होते. अनु आहार्यते म्हणजे कमिजास्त झालेल्या कर्माला अनुकूल केल्याने बरोबर होणें, हेच त्या अन्वाहार्य चरूचे 'अन्वाहार्यत्व' म्हणजे स्वभावधर्म होय. यज्ञात नियुक्त झालेले जे हे ऋत्विज असतात, ते जणू देवांचे दूत होत. यास्तव, त्यांना जे अन्वाहार्य चरूचे दान केले जाते त्या योगाने यजमानाने त्या ऋत्विजरूपी देवदूतांना संतोषित केल्याप्रमाणे होते. प्रजापतीने अग्न्यादि देवांना यज्ञ वाटून दिले. नंतर आपण आता यज्ञरहित झालो असे प्रजापतीला वाटू लागले. तेव्हा त्याने देवांना न दिलेला 'अन्वाहार्य' चरू पाहिला आणि तो आपला यज्ञभाग म्हणून आपल्याजवळ राखून ठेवला. तेव्हापासून जो 'अन्वाहार्य' चरू शिजविला जातो, तो 'प्राजापत्य' म्हणजे प्रजापतीचा भाग म्हणून ठरला गेला. हे जाणणाऱ्या ज्या यजमानाच्या यज्ञात 'अन्वाहार्य' चरूचे संपादन केले जाते, त्या यजमानाने प्रत्यक्ष प्रजापती देवाचेच संपादन केल्याप्रमाणे होते. अन्वाहार्य चरू मोजक्या म्हणजे अगदी बेताने मापून घेतलेल्या तांदुळाचा न करता अपरिमित म्हणजे पुष्कळ तांदुळाचा करावा. कारण प्रजापती हा सर्व देवांचा स्वामी असल्याने अपरिमित अशा सामर्थ्याने युक्त आहे. अर्थात् अपरिमित म्हणजे प्रमाणरहित असे पुष्कळ तांदूळ घेऊन त्यांचा शिजविलेला 'अन्वाहार्य' चरू यजमानाला प्रजापतीची प्राप्ती होण्याला कारणभूत होतो. देवांनी यज्ञामध्ये जे जे केले ते ते असुरांनी केले. परंतु देवांनी असुरांना ठाऊक नसलेला हा प्रजापतिदेवात्मक 'अन्वाहार्य' चरू आपल्याला विजय प्राप्त करून देणारा आहे, असे विचार दृष्टीने पाहिले, आणि तो चरू शिजवून त्याचे ऋत्विजांना दक्षिणारूपाने दान दिले. त्या योगाने देव विजयी झाले आणि असुर पराभव पावले. हा वृत्तांत जाणणाऱ्या यजमानाच्या यज्ञात 'अन्वाहार्य' चरू शिजवून ऋत्विजांना दिला जातो तो आपल्या स्वतःच्या उन्नतीला प्राप्त होत असून त्याचा शत्रू पराभव पावतो. श्रौतकर्माला 'इष्ट' व विहीर, धर्मशाळा

इत्यादि लोकोपयोगी स्मार्त कार्याला 'पूर्त' असे म्हणतात. दर्शपूर्णमासेष्टीमध्ये अग्न्यादि देवतांच्यासाठी केल्या जाणाऱ्या यागाने 'इष्ट' संज्ञक कर्माची फळसंपत्ती व अन्वाहार्य चरू शिजविल्याने 'पूर्त' कर्माची फळसंपत्ती प्राप्त होते. ह्या संबंधीचे ज्ञान असलेल्या यजमानाच्या दर्शपूर्णमास यज्ञात अन्वाहार्य चरू शिजविला जातो, तोच इष्ट व पूर्त ही दोन्ही कर्मे केल्यासारखा होतो. म्हणजे इष्ट व पूर्त ह्या दोन्ही प्रकारच्या कर्मांचे फळ त्याला प्राप्त होते. 'प्रजापतेर्भागोसि' ह्या मंत्राने अन्वाहार्य चरूचे 'अभिमंत्रण' करावे. 'प्रजापतेर्भागोऽसि' हा या मंत्राचा प्रथम चरण असून तू प्रजापतीचा भाग आहेस' हा त्या चरणाचा अर्थ आहे. हा प्रथम चरण म्हटला म्हणजे यजमानाने उचित असा भाग समर्पण करून प्रजापती देवालाच समृद्ध केल्यासारखे होते. 'ऊर्जस्वान् पयस्वान्' हा या मंत्राचा दुसरा चरण असून 'तू बलवान व बलोत्पादक अशा दुग्धाने युक्त आहेस' असा त्या भागाचा अर्थ आहे. ह्याचे पठण केले असता प्रजापती त्या यजमानाचे ठिकाणी बल व दुग्धरस यांचे धारण करतो. 'माझे प्राण व अपान या दोन वायूंना सुरक्षित ठेव आणि माझ्या समान आणि व्यान या दोन वायूंचेही तू रक्षण कर' असे तात्पर्य असलेला 'प्राणापानौ मे पाहि समानव्यानौ मे पाहि' असा या मंत्राचा तिसरा भाग आहे. ह्या भागाचे पठण केल्याच्या योगाने या मंत्रात व्यक्त केलेल्या फलप्राप्ती-विषयी प्रजापतीचीच प्रार्थना यजमानाने केल्याप्रमाणे होते. 'अक्षितोऽस्यक्षित्यै त्वा मा मे क्षेष्ठा अमुत्रामुष्मिंल्लोके' असा या मंत्राचा अंतिम भाग यजमानाने पाठ करावा. 'तू क्षयरहित आहेस, परलोकी माझा अक्षयवास व्हावा म्हणून मी ऋत्विजांना तुझे दान करीत आहे,' असे त्या अंतिम भागाचे तात्पर्य आहे. इहलोकी केलेल्या दानाने संपादित केलेल्या अन्नावरच स्वर्गलोकी राहणारे लोक आपले उपजीवन करीत असतात. कारण स्वर्गलोकात अन्नाचा क्षयच असतो. ती कर्मभूमी नसल्याने अन्नसाधनभूत असे कर्म करून अन्न संपादन करणे स्वर्गलोकात शक्यच नसते. सारांश, पूर्वोक्त 'अक्षितोऽसि' इत्यादि अंतिम भागाने यजमानाने जर 'अन्वाहार्य' चरूचे अभिमंत्रण केले तर ते त्याला अक्षय्यत्वाला नेऊन पोचविते. अर्थात् त्याला स्वर्गलोकी अन्नाचा तुटवडा मुळीच पडत नाही. (अनुवाक ३).

'बर्हि' नामक देवाला अध्वर्यूच्या हस्ते समंत्रक आज्याहुती दिल्याच्या योगाने मी 'प्रजावान' होईन असा अर्थ असलेल्या 'बर्हिषोऽहं देवयज्यया प्रजावान् भूयासम्' या मंत्राने पहिल्या अनुयाजाचे यजमानाने अनुमंत्रण करावे. 'बर्हि' देवतेला दिलेल्या आहुतीचे अनुमंत्रण करूनच प्रजापतीने प्रजा उत्पन्न

केल्या. त्याचप्रमाणे 'बर्हि' देवाच्या अनुग्रहाने यजमान आपल्या ठिकाणी प्रजा निर्माण करतो. 'नराशंस नांवाच्या देवाला अध्वर्यूच्या द्वारा समंत्रक आज्याहुती दिल्याच्या योगाने मी 'पशुमान' होईन या अर्थाच्या 'नराशंसस्याहं देवयज्यया पशुमान् भूयासम्' या मंत्राने दुसऱ्या अनुयाजाचे अनुमंत्रण करावे. कारण 'नराशंस' देवाला दिलेल्या आहुतीचे 'अनुमंत्रण' करूनच प्रजापतीने पशू उत्पन्न केले. त्याप्रमाणेच आता सांगितल्याप्रमाणे अनुमंत्रण केले असता नराशंस देवाच्या अनुग्रहाने यजमान आपल्याजवळ पशू उत्पन्न करतो. 'स्विष्टकृत्' संज्ञक अग्नीला समंत्रक आज्याहुती दिल्याने मी आयुष्मान् होऊन यज्ञाच्या योगाने प्रतिष्ठेला प्राप्त होईन, असा अर्थ असलेल्या 'अग्नेःस्विष्टकृतोऽहं देवयज्ययायुष्मान् यज्ञेन प्रतिष्ठां गमेयम्' हा मंत्र म्हणून तिसऱ्या अनुयाजाचे 'अनुमंत्रण' करावे. म्हणजे त्या योगाने यजमान दीर्घायुषी होऊन यज्ञाच्या योगाने प्रतिष्ठेला प्राप्त होतो. 'दर्शपूर्णमास' संज्ञक दोन यज्ञांच्या उत्कर्षाला अनुसरूनच देव उत्कर्षाला प्राप्त होऊन विजयी झाले. सर्वांगपरिपूर्ण अशा दर्शपूर्णमास यज्ञांच्या योगानेच देवांनी असुरांना दूर हाकून लावले. यास्तव 'अग्नीदेवाच्या उत्कर्षाला अनुसरून मी उत्कर्षाला प्राप्त होईन,' अशा अर्थाच्या 'अग्नेरहमुज्जितिमनुज्जेषम्' या मंत्राने अग्नीला दिलेल्या पुराडाशाहुतीचे यजमानाने 'अनुमंत्रण' करावे. अशा प्रकारे ज्या ज्या प्रधान देवतांना आहुती दिल्या जातील त्या त्या आहुतींचे त्या त्या मंत्रांनी अनुमंत्रण करावे. सांग अशा दर्शपूर्णमास यज्ञांच्या उत्कर्षाला अनुसरून देवांचा उत्कर्ष झाला, त्याप्रमाणेच यजमानही उत्कर्षाला प्राप्त होतो आणि दर्शपूर्णमास यज्ञांच्या योगानेच तो आपल्या शत्रूंना दूर हाकून लावतो. 'वाजस्य मा' इत्यादि 'वाजवती' म्हणजे 'वाज' शब्दाने युक्त अशा दोन ऋचांनी अध्वर्यू जुहू व उपभृत नामक दोन स्त्रुचांचे 'व्यूहन' म्हणजे पृथक्करण करीत असतांना त्या स्त्रुचांचे अनुमंत्रण करावे. 'वाजस्य मा' या मंत्राच्या दोन चरणांचा उच्चारच यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होतो. यज्ञाचे मंत्रस्वरूप दोन 'दोह' जाणणारा जो विद्वान् दर्शपूर्णमासांचे यजन करतो तो यजमान त्या त्या यज्ञाचे दोन बाजूंनी म्हणजे पूर्वी व नंतर असे दोनदा दोहन करतो. आता पुढे सांगितला जाणारा 'एमा अग्मन्' हा एक दोह वेगळा आणि पूर्वी 'इडा'ग्रहणाचे वेळी प्रदर्शित केलेला 'सा.मे सत्याशीः' इत्यादि मंत्रपाठरूप असा हा एक दोह वेगळा. 'सूक्तवाक' संज्ञक मंत्राचे पठण करीत असतांना 'होता' जेव्हा यजमानाचे नांव घेईल तेव्हा यजमानाने 'एमा अग्मन्नाशिषो दोहकामाः' म्हणजे हे आशीर्वाद सफल होऊन मजकडे येवोत, आम्ही आयुष्यादि फळांचे दोहन करण्याची इच्छा करणारे

आहेत, इत्यादि अर्थाचा प्रारंभ असलेला मंत्र म्हणून सूक्तवाकाचे अनुमंत्रण करावे. म्हणजे त्या योगाने यज्ञाच्या अग्न्यादि देवतांचे स्तवन होऊन त्यांचे दोहन केल्यासारखे होते. शिवाय पूर्वीचा इडाग्रहणाच्या वेळचा व आता सांगितलेला अशा प्रकारे दोन दोहांच्या योगाने दोन्ही बाजूंनी यजमानाने यज्ञाचे दोहन केल्याप्रमाणे होते. 'रोहित नांवाच्या अश्वाच्या योगाने म्हणजे त्या घोड्यावर बसवून अग्निदेव तुला 'सूक्तवाक' मंत्रात व्यक्त झालेल्या देवतेच्या सन्निध नेऊन पोचवतो', असा अर्थ असलेल्या 'रोहितेन त्वाग्निर्देवतां गमयतु ' या मंत्राचे पठण करून प्रस्तराचे अनुमंत्रण करावे. 'रोहित' इत्यादि नांवे असलेले अश्व हे देवांचे अश्व आहेत व यागसाधनभूत असा प्रस्तर जणू यजमानरूप आहे. यास्तव, 'रोहितेन त्वा' इत्यादि मंत्राने जर अग्नीचे ठिकाणी प्रस्तराचे हवन केले गेले तर तो प्रस्तर देवांच्या अश्वांच्यावर बसवून यजमानाला स्वर्गलोकी पोंचवितो. 'अश्वाच्या पाठीवर ठेवलेले खोगीर न हलावे म्हणून त्याच्या वरुन आवळलेल्या तंगाप्रमाणे व घोड्याच्या तोंडाजवळ त्याला हातात धरून नेण्यासाठी बांधलेल्या दोरीप्रमाणे तुझ्या भोवती घातलेले हे परिधी काढून घेऊन मी तुला मोकळा करतो', असा अर्थ व्यक्त करणाऱ्या 'वि ते मुंचामि रशना वि रश्मीन्' हा मंत्र म्हणून अध्वर्यू परिधी काढून घेत असताना त्यांचे अनुमंत्रण यजमानाने करावे. 'अग्नेर्विमोकः' म्हणजे 'अग्नीची मुक्तता' नांवाचा हा मंत्र आहे. यास्तव, या मंत्राच्या पठणाने यजमानाने अग्नीला परिधिरूप बंधनापासून मुक्त केल्यासारखे होते. व्यापनशील असा बृहस्पतिपुत्र जो 'शंयु' त्या देवाला समंत्रक आहुती दिल्याच्या योगाने मी यज्ञ केल्याने मिळणाऱ्या प्रतिष्ठेला प्राप्त होईन; असे तात्पर्य असलेल्या 'विष्णोः शंयोरहं देवयज्यया यज्ञेन प्रतिष्ठां गमेयम्' हा मंत्र म्हणावा व होता पठण करीत असलेल्या 'शंयुवाक' मंत्राचे अनुमंत्रण करावे. यज्ञ हाच खरोखर 'विष्णु' म्हणजे व्यापनशील आहे. यासाठी आता सांगितल्याप्रमाणे अनुमंत्रण केले असता यजमान यज्ञसमाप्तीनंतर त्याच्या ठिकाणी प्रतिष्ठित होतो. अर्थात् यज्ञाचे फळ संपादन करतो. 'सोम' हा गर्भाचे ठिकाणी रेताचे धारण करणारा देव आहे. 'सोमस्याहं देवयज्यया सुरेता रेतो धिषीय' म्हणजे सोमाला दिलेल्या समंत्रक आज्याहुतीने मी उत्कृष्ट रेताने युक्त होऊन रेताचे धारण करीन,' अशा अर्थाच्या ह्या मंत्राने पहिल्या 'पत्नीसंयाज' संज्ञक यागाचे अनुमंत्रण करावे. म्हणजे त्या योगाने यजमान स्वतःचे ठिकाणी प्रजोत्पादक अशा रेताचे धारण करतो. त्वष्टा नांवाचा देव पशूंची स्त्रीपुरुषात्मक रूपे निर्माण करतो. यास्तव 'त्वष्टा देवाला दिलेल्या समंत्रक आज्याहुतीच्या योगाने मी पशूंची

स्त्रीपुरुषात्मक रूपे पुष्ट करीन', असा अर्थ असलेल्या 'त्वष्टुरहं देवयज्यया पशूनां रूपं पुषेयम्' या मंत्राने दुसऱ्या पत्नीसंयाजाचे अनुमंत्रण करावे. तसे केल्याने यजमानाने आपल्या ठिकाणी स्त्री व पुरुष अशा दोन्ही प्रकारच्या पशूंच्या स्वरूपाचे धारण केल्यासारखे होते. म्हणजे त्याला पुष्कळ पशू मिळतात. 'देवांच्या पत्नी व बृहस्पती नांवाचा अग्नी ही देवांपैकी स्त्रीपुरुषरूप जोडी होय. या दोघांना दिलेल्या समंत्रक आहुतीने मी स्त्री व पुरुष अशा उभयरूपात्मक पशूंच्या प्राप्तीने प्रगतीला प्राप्त होईन', अशा अर्थाचा 'देवानां पत्नीरग्निर्गृहपतिर्यज्ञस्य मिथुनं तयोरहं तेवयज्यया मिथुनेन प्रभूयासं' हा मंत्र म्हणून तिसऱ्या व चौथ्या पत्नीसंयाजाचे अनुमंत्रण करावे. देवस्त्रिया व गृहपतिनामक अग्नी या देवांतील जोडीपासूनच प्रजापतीने स्त्री व पुरुष अशा उभयरूपात्मक प्रजा निर्माण केल्या. यास्तव, पूर्वोक्त अनुमंत्रण केल्याच्या योगाने देवपत्न्या व अग्नी या जोडीच्या अनुग्रहाच्या योगाने यजमान स्त्रीपुरुषात्मक म्हणजे कन्या व पुत्र या उभय रूपांनी प्रजा आपल्या ठिकाणी उत्पन्न करणारा होतो. 'वेदोऽसि वित्तिरसि विदेय' असा प्रारंभ असलेल्या मंत्राचे पठण करून 'वेदा' चे अभिमंत्रण करावे म्हणजे त्याला स्पर्श करून हा मंत्र म्हणावा. 'हे दर्भमय वेदा, तू वेद नांव धारण करणारा व द्रव्याच्या प्राप्तीचे साधन आहेस. तुझ्या प्रसादाने मी द्रव्य संपादन करीन', या अर्थाचा पूर्वोक्त मंत्राचा प्रारंभ आहे. वेदाने जमिनीची झाडलोट करीत असतांनाच असुरांनी कोठे कोठे जमिनीत पुरून ठेवलेले व त्यांच्या हाती पडण्याचा संभव असलेले धन देवांनी संपादन केले. धनाचा लाभ करून देणें हेच त्या वेदाचे 'वेदत्व' म्हणजे स्वभावधर्म होय. आपल्या वैऱ्याची घरदार, जमीन इत्यादि जी जी वस्तू आपल्याला मिळावी अशी तीव्र इच्छा ज्याला होईल त्या यजमानाने 'वेदोऽसि' या पूर्वोक्त मंत्रामध्ये वैऱ्याच्या त्या त्या वस्तूचे नांव घेऊन नंतर 'विदेय' पदाचा उच्चार करावा 'घृतवंत कुलायिन रायस्पोषं सहस्त्रिणं वेदो ददातु वाजिनम्, असा पूर्वोक्त मंत्राचा अंतिम भाग असून 'घृतादिरसांनी युक्त, रहावयास योग्य अशा घरांनी समृद्ध, हजारांनी मोजता येणारे, आणि भरपूर अन्नाने समृद्ध असे भरपूर धन वेद मला देवो', असे त्या अंतिम भागाचे तात्पर्य आहे. यास्तव, यजमानाने त्याचे पठण केले असता त्याला हजारो पशूंची प्राप्ती होते. 'वेदोऽसि वित्तिरसि' या संपूर्ण मंत्राचा अर्थ जो जाणतो त्याच्या संततीमध्ये भरपूर अन्न संपादन करणारा पुत्र निपजतो. (अनुवाक ४).

आज्याहुती देता देता ध्रुवा नामक स्रुचीतील आज्य संपून ती रिकामी

झाली म्हणजे तिला फळाच्या दृष्टीने यज्ञही रिकामा होतो. तो अपूर्ण झाल्यामळे फल देण्यास समर्थ होत नाही.अर्थात् यजमान यज्ञफलरहित होतो व त्यामुळे त्याच्या प्रजाही सेवनीय अशा अन्नाने रहित होतात. आणि ध्रुवेला आप्यायन केले, म्हणजे आज्याने पुन्हा तिचे पूरण केले असता यज्ञाला पूर्णता येते. यज्ञ संपूर्ण झाला म्हणजे यजमानाला त्याचे फल मिळते, आणि फलसंपन्न अशा यजमानाला अनुसरून त्याच्या प्रजाही सेवनीय अशा अन्नाने समृद्ध होतात. यासाठी, 'घृताच्या योगाने ध्रुवा परिपूर्ण होवो' असे तात्पर्य असलेला 'आप्यायतां ध्रुवा पूर्ण झाली म्हणजे यज्ञ पूर्ण होतो. यज्ञ पूर्ण झाला म्हणजे यजमान फलसंपन्न होतो, व त्याबरोबर त्याच्या प्रजाही भरपूर अन्नाने समृद्ध होतात. प्रजापतीचा विभान् नांवाचा जो लोक आहे त्याच तिकाणी मज यजमानासह मी तुला स्थापन करतो, अशा अर्थाचा 'प्रजापतेविंभान्नाम लोकस्तस्मिंस्त्वादधामि सह यजमानानेन' या मंत्राचे यजमानाने पठण करावे. ही भूमी म्हणजेच प्रजापतीचा 'विभान्' नामक लोक होय. यास्तव, या मंत्रपठणाच्या योगाने यजमानाने जणू काय स्वतःसह आपल्या हविर्भागाला त्या भूरूप 'विभान्' नामक लोकाच्या ठिकाणी स्थापन केल्यासारखे होते. पुरोडाशादि द्रव्यांनी देवांचे जे हे यजन केले जाते त्यामुळे यजमान रिकामाच राहतो. म्हणजे त्याच्या वाटणीला काहीच हविर्भाग येत नाही. यास्तव, 'प्रजापते:' इत्यादि पूर्वोक्त मंत्र म्हणून यजमानान हविर्द्रव्याचा भाग भक्षण केला असता त्याने जणू काय स्वतःच्या आत्म्यालाच संतुष्ट केल्यासारखे होते. यजमानभाग जेवढा आहे. तेवढाच यज्ञभाग यजमानाला उपयुक्त होतो. कारण बाकीचा सर्व यज्ञ म्हणजे तत्संबंधी हविर्भाग देवता आणि ऋत्विज यांनी भक्षण केलेला असतो. यज्ञाच्या स्वामित्वामुळे यजमान यज्ञस्वरुप आहे. यासाठी आता सांगितल्याप्रमाणे यजमान जर यजमानभागाचे भक्षण करील तर त्याने यज्ञाच्या ठिकाणी यज्ञ प्रतिष्ठित केल्याप्रमाणे होते. वेदीमध्ये हविर्द्रव्य ठेवली जात असल्याने ती जणू काय यजमानाचे स्थानच आहे. हे स्थान उत्कृष्ट अशा दर्भरूप तृणाने आच्छादित केलेले व 'प्रणीता' पात्रातील उदकाने युक्त असे असते. यास्तव, उदकपूर्ण असे प्रणीतापात्र यजमान जर वेदीत ओतील तर त्याने जणू काय स्वतःचेच स्थान उत्कृष्ट तृणाने व उत्कृष्ट उदकाने समृध्द केल्यासारखे होते. प्रणीतापात्र वेदीत ओतताना यजमानाने त्या उदकाकडे पाहून 'हे उदका, तू शोभनरूप आहेस. यास्तव, यज्ञाचे फल देऊन तू मलाही शोभनरूप करणारा हो' असा अर्थ असलेला 'सदसि सन् मे भूया:' हा मंत्र म्हणावा. प्रणीतापात्रात साठवून ठेवलेले उदक यज्ञाचे साधन असल्यामुळे यज्ञरूप आहे आणि उदक हे जीवनोपयुक्त असल्यामुळे आपल्याही...

यासाठी पूर्वोक्त मंत्र म्हटल्याने यजमानाने स्वतःच्या ठिकाणी यज्ञरूपी अमृताचेच जणू धारण केल्यासारखे होते. यमानाने यज्ञरूप व्रताचे धारण केले म्हणजे त्यास अनुसरून देव, पितर इत्यादि सर्व भूते यज्ञव्रताचे धारण करतात. यास्तव प्रणीतापात्रातील उदक पूर्व दिशेस शिंपडतांना 'प्राच्यां दिशि देवा ऋत्विजो मार्जयन्तां' म्हणजे देव आणि ऋत्विज पूर्व दिशेकडील प्रदेश उदकमार्जनाने शुद्ध करोत', अशा अर्थाचा मंत्र म्हणावा. ऊर्ध्व दिशेसह पूर्व इत्यादि चार दिशांना प्रणीतोदकाचे यजमानाने सिंचन करणे हेच दर्शपूर्णमास यज्ञाचे 'अवभृत' होय. यासाठी, त्या त्या मंत्राने पूर्व इत्यादि दिशांचे ठिकाणी प्रणीतोदक सिंचन केले म्हणजे यज्ञरूपी व्रत धारण केलेली देव, पितर इत्यादि जेवढी भूते असतील त्यांच्यासहवर्तमान यजमान 'अवभृत' कर्माला प्राप्त होतो. म्हणजे दर्शपूर्णमास यज्ञाचे 'अवभृत' करतो. विष्णुप्रमुख सर्व देवांनी छंदोभिमानी देवांच्यासह इतरांना जिंकता येण्यास अशक्य असे हे तिन्ही 'लोक' जिंकले. यासाठी 'विष्णुक्रम' संज्ञक मंत्र पठण करून यजमानाने जर पावले टाकली तर त्याने जणू काय स्वतःच विष्णुरूप होऊन छंदाच्या अभिमानी देवांच्यासह इतरांना जिंकण्यास अशक्य अशा ह्या तीन्ही लोकांना व दिशांना जिंकल्यासारखे होते. यजमानाने पहिले पाऊल टाकतांना 'तू शत्रूंचा नाश करणाऱ्या विष्णूचेच पहिले पदाक्रमण आहेस,' असा अर्थ असलेला 'विष्णोःक्रमोस्यभिमातिहा' इत्यादि मंत्र म्हणावा. याचप्रमाणे ते ते मंत्र म्हणून यजमानाने आणखी तीन पावले टाकावीत. गायत्री छंदाची देवता भूलोकाची स्वामिनी असून त्रिष्टुभ् छंदाची देवता अंतरिक्ष लोकाची स्वामिनी आहे. जगती छंदाची अभिमानिनी देवता द्युलोकाची आणि अनुष्टुभ् छंदाची देवता दिशांची स्वामिनी आहे. सारांश, आता सांगितल्याप्रमाणे ते ते मंत्र म्हणून यजमानाने पावले टाकली असता त्या त्या छंदाभिमानिनी देवतांच्या अनुग्रहाने यजमानाने जणू काय इतरांना जिंकण्यास अशक्य अशा तिन्ही लोकांना व सर्व दिशांना उत्कृष्ट प्रकारे जिंकल्यासारखे होते. (अनुवाक ५).

'कर्माचे फल भोगण्यासाठी आम्ही प्रथम स्वर्गलोकाला जाऊ आणि नंतर तेथून मोक्षाचे द्वार असलेल्या आदित्यलोकी जाऊ', असा अर्थ असलेल्या 'अगन्म सुवः सुवरगन्म' हा मंत्राचा पूर्वभाग पठण करून यजमानाने आहवनीय अग्नीचे उपस्थान करावे. या मंत्रविभागात सुवः व अगन्म या शब्दांची उलटपालटरूपाने द्विरुक्ती होत असल्यामुळे स्वर्गलोकी जाण्याविषयी यजमानाचा विशेष आदर व्यक्त झाल्यासारखे होऊन यजमान निश्चयाने स्वर्गलोकाला प्राप्त होतो. 'तुझ्या कृपाकटाक्षापासून मी केव्हाही दूर होणार नाही, तुझ्या कृपेसाठी आम्ही जे कर्मानुष्ठान करू त्या अनुष्ठानरूप तपापासूनही मी केव्हाही दूर राहणार

नाही', अशा अर्थाचा 'संदृशस्ते मा छित्सि यत्ते तपस्तस्मै ते मा वृक्षि' या मंत्रविभागाचा उच्चार करावा. म्हणजे त्यात व्यक्त केलेली इच्छा सफल होण्याविषयी आहवनीयाग्नीची प्रार्थना केल्यासारखे होते. 'तू उत्कृष्ट प्रकाशाने उदय पावणारा आहेस, किरणयुक्त अशा चंद्रादिकांपेक्षा तू श्रेष्ठ आहेस, तू प्राणिमात्राच्या आयुष्याचा धारक आहेस, यास्तव, तू माझ्या ठिकाणी आयुष्य स्थापन कर,' असा अर्थ असलेला 'सुभ्रूरसि श्रेष्ठो रश्मीनामायुर्धा अस्यायुर्मे धेहि' हा मंत्र म्हणून आदित्य देवाचे उपस्थान करावे. 'विष्णुक्रम' संज्ञक मंत्राचे पठण करून जो यजमान पदाक्रमण करतो तो यजमान या भूलोकापासून च्युत होतो. कारण स्वर्गलोकी जाण्याकरिताच 'विष्णुक्रम' मंत्र म्हणून यजमान पावले टाकीत असतात. वेदाच्या अर्थाचा विचार करणारे विद्वान असे म्हणतात की, जो यजमान आपल्या वैऱ्याने संपादन केलेले तिन्ही लोक त्या वैऱ्याला हाकून लावून संपादन करतो, म्हणजे 'विष्णुक्रम' संज्ञक मंत्राच्या प्रभावाने स्वर्गारोहण केल्यानंतर पुन्हा ह्या मनुष्येलोकावर परत येऊन उतरुन राहतो, तोच 'विष्णुक्रम' संज्ञक मंत्रांनी पदाक्रमण करण्यात चतुर आहे असे समजावे. 'इदमहममुं भ्रातृव्यमाभ्यो दिग्भ्योऽस्यै दिवः' या मंत्राचे पठण करणे हेच त्या यजमानाचे या भूलोकावर परत उतरून राहणे होय. 'जो माझा वैरी माझा विरोध करून माझ्या अन्नादिकांचा अपहार करतो, त्या अमुक नांवाच्या वैऱ्याला यां दशदिशांनी व्याप्त अशा प्रदेशातून व या द्युलोकातून मी आता हाकून लावतो,' असे या मंत्राचे तात्पर्य आहे. यास्तव, या मंत्राचे पठण केले असता यजमानाने जणू काय वैऱ्याला हाकून लावून ह्या स्वर्गादि लोकांचे संपादन करुन त्यांच्या ठिकाणी आरोहण केल्यानंतर पुन्हा या मनुष्यलोकावर येऊन उतरल्याप्रमाणे होते. 'संज्योतिषाऽभूवम्' म्हणजे मी सूर्याच्या ज्योतीशी म्हणजे प्रकाशाशी मिळून जाईन, अशा अर्थाचा मंत्र म्हणून यजमानाने आपल्या हृदयाला स्पर्श करावा. असे केल्याच्या योगाने या भूलोकाचेच ठिकाणी तो प्रतिष्ठित होतो. 'सूर्याच्या प्रदक्षिणेस अनुसरून मीही आपल्या भोवती प्रदक्षिणा करतो', असे तात्पर्य असलेल्या 'एन्द्रीमावृतमन्वावर्ते' या मंत्राच्या हाताने आपल्याभोवती प्रदक्षिणाकार फिरावे. परम ऐश्वर्यसंपन्न असा हा आदित्य म्हणजे इन्द्र होय. त्याच्या प्रदक्षिणेस अनुसरूनच यजमानाने आपल्या भोवती प्रदक्षिणा केल्यासारखे होते. यजमानाने आपल्या उजव्या हाताकडून वळून प्रदक्षिणा करावी. म्हणजे आपणाभोवतीच फिरावे. असे केल्याच्या योगाने स्वतःच्या सामर्थ्यास अनुलक्षूनच प्रदक्षिणा केल्याप्रमाणे होते. पुरुषशरीराच्या उजव्या बाजूतच विशेष सामर्थ्य असते. म्हणूनच पुरुषाच्या उजव्या हाताला विशेष

जोर असतो. यास्तव, उजव्या हाताकडून वळून प्रदक्षिणा केली असता यजमानाने आपल्या विशेष सामर्थ्याला अनुसरूनच आपणाभोवती प्रदक्षिणा केल्यासारखे होऊन शिवाय भगवान् आदित्याचेच अनुकरण करून प्रदक्षिणा केल्याप्रमाणे होते. मी आपल्या प्रजेशी मिळून मिसळून वागेन व माझी प्रजाही माझ्याशी मिळून मिसळून वागो, असा अर्थ असलेल्या 'समहं प्रजया सं मया प्रजा' या मंत्राने आहवनीयाचे उपस्थान करावे. म्हणजे इच्छित फलप्राप्तीचा हा आशीर्वादच यजमानाने आहवनीयाजवळ मागितल्याप्रमाणे होते. 'समिध्दो अग्ने मे दीदिहि समेध्दा ते अग्ने दीद्यासम्' म्हणजे 'समिधांनी प्रदीप्त झालेला तू माझ्यासाठीच प्रदीप्त होऊन रहा, तुला प्रदीप्त करणारा मीही तुझ्या कृपेने प्रदीप्त म्हणजे तेजस्वी होईन', अशा अर्थाच्या पूर्वोक्त मंत्राने आहवनीय अग्नीचे ठिकाणी एक समिधा द्यावी. त्या योगाने मंत्रार्थात व्यक्त झाल्याप्रमाणे यजमान तेजस्वी होतो. 'हा यज्ञ धनसंपन्न होवो, तुझ्या कृपेने मीही धनसंपन्न होईन,' अशा अर्थाचा 'वसुमान् यज्ञो वसीयान् भूयासम्' हा मंत्र म्हणून आहवनीयाचे उपस्थान करावे. म्हणजे मंत्रात व्यक्त केलेल्या फलाची प्राप्ती व्हावी अशा प्रकारचा आशीर्वादच यजमानाने आहवनीयाजवळ मागितल्याप्रमाणे होते. 'गार्हपत्य' अग्नीच्या सन्निध यजमानाकडून पापमिश्र असे पुष्कळ होमादि कर्म केले जात असते. होमादि कर्माचे वेळी होणाऱ्या हालचालीमुळे दुधासारखे हविर्द्रव्य अग्नीवर तापवितांना वगैरे अनेक प्रकारचे किडामुंगीसारखे सूक्ष्म जीव यजमानाकडन नकळत मरण्याचा संभव असतो. यास्तव 'अग्न आयूंषि' इत्यादि 'अग्निपावमानी' म्हणजे पवमानसंज्ञक अग्निदेवतात्मक अशा दोन ऋचांनी यजमानाने गार्हपत्याग्नीचे उपस्थान करावे. म्हणजे त्या अग्नीला व स्वतःला यजमानाने शुद्ध केल्यासारखे होऊन शिवाय पूर्वोक्त दोन ऋचा पठण केलेले उपस्थान यजमानाच्या प्रतिष्ठेलाही कारणीभूत होते. नंतर 'अग्ने गृहपते' इत्यादि मंत्र म्हणून गार्हपत्याचेच पुन्हा उपस्थान करावे. म्हणजे त्या मंत्रात प्रदर्शित केलेल्या फलाची प्राप्ती होण्याविषयी त्या अग्नीची प्रार्थना केल्यासारखे होते. 'शतं हिमाः' जसा जो पूर्वोक्त मंत्राचा अंश उच्चारला जातो, त्या योगाने शंभर हेमंत ऋतू उलटून जातील इतक्या दीर्घ कालपर्यंत तुला आम्ही समिधादिकांनी प्रज्वलित करीत राहू, असेच जणू काय यजमान गार्हपत्याग्नीला म्हणत असल्याप्रमाणे होते. उपस्थानात विद्यमान असलेल्या प्रत्येक पुत्राचे नांव घ्यावे. म्हणजे यजमानाने जणू काय त्या त्या पुत्राला सेवनीय अशा अन्नाचा उपयोग करणारा असा केल्याप्रमाणे होते. 'तामाशिषमा शासे तंतवे ज्योतिष्मतीं' म्हणजे 'माझ्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या पुत्रासाठी कल्याणप्रद अशा तुझ्या उज्वल आशीर्वादाची मी आशा

करीत आहे,' अशा अर्थाचा मंत्रभाग, ज्याला अद्याप पुत्र झाला नसेल अशा यजमानाने म्हणावा. म्हणजे त्या गार्हपत्याग्नीच्या कृपेने त्या यजमानाला तेजस्वी, वेदाध्ययनजन्य अशा कांतीने युक्त असा पुत्र होतो. 'तामाशिषमा शासेऽमुष्मै ज्योतिष्मतीम्' या मंत्रभागाचे, ज्याला पुत्र झाला आहे त्या यजमानाने, आपल्या पुत्राचे नांव घेऊन पठन करावे. 'माझ्या विद्यमान असलेल्या प्रत्येक पुत्रासाठी मी कल्याणप्रद व उज्ज्वल अशा तुझ्या आशीर्वादाची इच्छा करीत आहे. असा त्या मंत्राचा सारांश आहे. अर्थात् उपर्युक्त मंत्रभाग पठन करून गार्हपत्याचे उपस्थान केले असता त्या यजमानाच्या प्रत्येक पुत्राचे ठिकाणी गार्हपत्यअग्नी वेदाध्ययनजन्य शरीरकांती उत्पन्न करतो. जो कोणी यजमान यज्ञाचा प्रयोग करून म्हणजे त्याला अनुष्ठानरूप बंधन घालून अनुष्ठान संपल्यावर त्याला त्या बंधनातून मोकळा करीत नाही त्या यजमानाचा तो यज्ञ 'अप्रतिष्ठान' म्हणजे निराधार होतो. यास्तव, यज्ञकर्त्या यजमानाने 'जो प्रजापती तुला अनुष्ठानरूपी गाड्याला जुंपतो तोच तुला आता त्या अनुष्ठानरूप गाड्यापासून मोकळा करो,' असे तात्पर्य असणाऱ्या 'कस्त्वा युनक्ति स त्वा विमुंचतु' ह्या 'यज्ञविमोचक' संज्ञक मंत्राचे पठन करावे. कारण प्रजापती हाच 'क' नांवाचा देव होय. यास्तव, पूर्वोक्त मंत्र म्हटल्याने यजमानाने प्रजापतीकडून यज्ञाला अनुष्ठानरूपी गाड्याला प्रथम बांधून (जुंपून) नंतर त्याच्या कडूनच त्याला मोकळा केल्यासारखे होते. शिवाय, अशा प्रकारचे उपस्थान त्या यजमानाच्या प्रतिष्ठेला कारणभूत होते. जे यज्ञरूप व्रत यजमानाने ग्रहण केले त्याचे जर त्याने विसर्जन केले नाही, तर ते व्रत संतप्त होऊन यजमानाला दग्ध करण्यास समर्थ होते. यास्तव, 'अग्ने व्रतपते व्रतमचारिषम्' म्हणजे 'हे व्रतपालका अग्निदेवा, यज्ञरूप व्रताचे मी आचरण केले आहे,' इत्यादि अर्थाचा प्रारंभ असलेला मंत्र म्हणावा म्हणजे यजमानाकडून गृहीत केलेल्या व्रताचे विसर्जन केल्यासारखे होते. व त्यामुळे यज्ञरूपी व्रत शांत होते व ते यजमानाला दग्ध करण्यास प्रवृत्त होत नाही. यज्ञरूपी व्रताचे यजमानाने विसर्जन केले म्हणजे यज्ञ यजमानाकडे पाठ फिरवून निघून जातो. तो पुन्हा त्याच्याकडे माघारा येत नाही. यास्तव, जो यजमान 'पुनरालंभ' संज्ञक मंत्राचे पठन करतो त्या यजमानाजवळ यज्ञ पुन्हा परत येतो. अर्थात्, तो यजमान यज्ञाचे पुन्हा अनुष्ठान करतो. 'अनुष्ठान केलेला यज्ञ आताच समाप्त झाला आहे, तो मजकडून पुन्हा अनुष्ठित केला जावो', अशा अर्थाचा 'यज्ञो बभूव स आबभूव' इत्यादि जो मंत्र तोच यज्ञाचा 'पुनरालंभ' म्हणजे पुन्हा आरंभ नांवाचा मंत्र होय. या मंत्राचा यजमानाने पाठ केला असता,

तो यजमान यज्ञाचा पुन्हा प्रारंभ करतो. एखादा यजमान जर आहिताग्नी म्हणजे स्थापन केलेल्या गार्हपत्यादि तीनही अग्नींची उपासना करणारा असूनही सभारहित असेल तर त्या यजमानाला विद्वान् लोकांच्या एकत्र समूहाने विशेषत्वाने शोभणारी सभा केव्हाही आपल्या स्वाधीन करून घेत नाही. यागाच्या वेळी ज्या यजमानाच्या यज्ञशाळेत विद्वतसभा भरत नाही, तो सभारहित होतो. आणि म्हणूनच अशा सभारहित यजमानाला लौकिक कार्याचा विचार करण्यासाठी भरणाऱ्या मोठ्या विद्वत्सभेचा लाभ केव्हाही होत नाही. ज्या सभेत यज्ञकार्याविषयीची मुख्यत: चर्चा होत असते अशी विद्वान पंडितांनी भरगच्च असलेली व प्रदर्शनरूपाने गाई,बैल, घोडे, इत्यादि यज्ञोपयुक्त अशा पशूंनी गजबजलेली अशी सभाच अग्निहोत्री ब्राह्मणाला उचित होय. यासाठी, यज्ञाचे अनुष्ठान पूर्ण झाल्यावर पूर्व दिशेस उडी मारून 'गोमान् अग्ने आविमान् अश्वी यज्ञ:' हा मंत्र म्हणावा म्हणजे तो यजमान विद्वत्सभेचे संपादन करतो. त्याला हजारो पशू प्राप्त होतात, व त्याच्या संततीमध्ये भरपूर अन्नसंपादन करणारा पुत्र यज्ञपुरुषाच्या अनुग्रहाने उत्पन्न होतो. (अनुवाक ६).

१ सर्वांच्या अंतर्यामी प्रेरणा करणाऱ्या हे सवितृदेवा, आमच्या वाजपेय यज्ञाचा प्रारंभ कर. यज्ञाचा पालक अशा यजमानाला वाजपेय यज्ञाच्या अनुष्ठानरूप ऐश्वर्याकरता प्रवृत्त कर. द्युलोकात राहणारा जो गंधर्व सवितादेवाच्या अनुग्रहाने प्राण्यांच्या ज्ञानशक्तींना शुद्ध करतो तो आमची वाजपेय यज्ञविषयक शक्ती शुद्ध करो. सविता देवाची अनुज्ञा मिळालेला वाचस्पती देव आम्हाकडून पठण केली जाणारी मंत्ररूपी वाणी शुद्ध रीतीने वदवो. २ हे रथा, इंद्राचे वैरिघातक वज्रच जणू तू आहेस. ३ तुझ्या सारख्या सहकाऱ्याच्या साहाय्याने हा यजमान आपल्या शत्रूंचा वध करो.अन्नाची उत्पत्ती होण्यासाठी अन्न निर्माण करणाऱ्या, महनीय आणि अखंडनीय अशा पृथ्वीलाच आम्ही स्तुतिरूप मंत्रवाणीने संतुष्ट करीत आहोत. ज्या पृथ्वीवर ही सर्व भूते वस्ती करून राहतात तिच्या ठिकाणीच आमचे धारण होण्याविषयी सवितादेव अनुज्ञा देवो. ४ उदकांमध्ये अपमृत्युविनाशक असे अमृत असते. त्याचप्रमाणे उदकांमध्ये रोगनिवारक औषधच असे सार असते. अन्नवंत अशा हे अश्वांनो, उदकांचे ठिकाणी असणाऱ्या अमृतत्वादि गुणांविषयी व अशाच प्रकारच्या आणखी काही गुणाविषयी ज्या प्रशंसा केल्या जातात त्यांच्या ठिकाणी तुम्ही संबध्द झाले आहात. ५ रथाला जोडण्याला योग्य अशा तुज अश्वाला वायूने रथास जोडले आहे. त्याच प्रमाणे मनूनेही तुला रथाला जोडले आहे. पंचवीस गंधर्वांनी देखील तुला रथाला जोडले आहे. याप्रमाणे सत्तावीस भरतील असे जे पुरुष आता

उल्लेखिले त्या सर्वांनीच पूर्वी रथाच्या ठिकाणी तुज अश्वाला जोडले आहे. वायू इत्यादि सर्वांनीच या अश्वाच्या पाठीवरून हात फिरवून त्याच्या ठिकाणी वेग उत्पन्न केला आहे. ६ खोल पाण्यातून जात असताना वर बसणाराला पाण्यात बुडू न देणाऱ्या व तीव्र वेगाने चालणाऱ्या हे अश्वा, उदकामध्ये उत्पन्न झालेली बैलाच्या वशिंडासारखी उंच,पाण्यात बुडी मारल्याने होणाऱ्या उपद्रवाचे निवारण करणारी जी लाट तुझ्या पाठीला चिकटून चाललेली आहे, तिच्याकडून आम्हाला अन्न मिळेल असे कर. ७ मी पुढे टाकलेल्या हे पहिल्या पाउला, तू जणू काय सर्वव्यापी व सर्वेश्वर अशा त्रिविक्रमावतारधारी विष्णूचेच पहिले पाऊल आहेस. म्हणजे विष्णूने पहिले पाऊल टाकून जिंकलेला भूलोकच आहेस. ८ हे माझ्या दुसऱ्या पाउला, तू जणू काय विष्णूचे दुसरे पाऊल आहेस, म्हणजे विष्णूचे दुसरे पाऊल टाकून आक्रमण केलेला जणू अंतरिक्ष लोकच आहेस. ९ हे माझ्या तिसऱ्या पाउला, तू जणू काय विष्णूचे म्हणजे त्याने टाकलेले तिसरे पाऊल आहेस. अर्थात् त्याने तिसरे पाऊल टाकून जिंकलेला जणू द्युलोकच आहेस. १० ज्या रथाच्या दोन्ही बाजवा मजबूत बनविलेल्या आहेत व ज्या रथाची दोन्ही बाजूची चाके धाड् धाड् असा आवाज करीत वायूलाही मागे टाकून रस्त्यावरुन धावत जातील अशा उत्कृष्ट बनावटीने बनविलेली आहेत, अशा प्रकारच्या उत्तम बाजवांनी व उत्कृष्ट चाकांनी सज्ज केलेल्या रथात बसून धावत जाणाऱ्या आम्हाला दूरेहेति, इंद्रियावान् व पतत्री अशी नांवे धारण करणारे जे मनोरथपूरक अग्नी आहेत, ते तिन्ही अग्नी नियमीत केलेल्या मर्यादेच्या पार करोत. (अनुवाक ७).

१ सर्वप्रेरक अशा सविता देवाच्या अनुज्ञेने अन्नसंपादनाचे कामी विजय मिळवून देणाऱ्या बृहस्पतीने अनुग्रह केलेला मी अन्न जिंकून आणीन. २ सविता देवाच्या प्रेरणेने अन्नसंपादनकार्यात जय मिळवून देणाऱ्या बृहस्पतीने अनुग्रह केलेला मी अत्यंत उंच अशा स्वर्गलोकावर आरोहण करीन. ३ हे सभ्य ब्राह्मण हो, तुम्ही यज्ञानुष्ठानरूपी परम ऐश्वर्याने संपन्न झालेल्या यजमानरूपी इंद्राकरिता आशीर्वादात्मक मंत्रवाणीचा उच्चार करा. यजमानरूपी इंद्राला अन्नप्राप्तीचे कामी विजय मिळवून द्या. हा यजमानरूपी इंद्र अन्न जिंकून आणो. ४ हे चाबुका, अश्वांच्या पाठीवर तडाखे देणारा, विजयपूर्वक अन्न प्राप्त करून देणारा व अश्वांची गती वाढविणारा तू अन्न संपादन कण्यासाठी होणाऱ्या युध्दाच्या ठिकाणी अश्वांना घेऊन जा. ५ हे अश्वा, तू 'अर्वा' नामक जातीचा आहेस. ६ हे अश्वा, तू 'सप्ति' नांवाच्या जातीचा आहेस.

हे अश्वा, तू 'वाजी' नामक जातीचा आहेस. ८ हे अश्व हो, अन्न मिळविण्याकरता त्वरेने धावत चला. मरुतांची आज्ञा होताच अन्न जिंका. अनेक योजने लांबीचा पल्ला थोड्या योजनेच्या अंतरावर आहे असे भासवा. म्हणजे पुष्कळ योजने लांबीचा रस्ता शक्य तितक्या लवकर गांठता येईल अशी दौड करा. तुमच्या शीघ्र गतीने रस्ते उखळून टाका. आणि ठरलेल्या मर्यादेच्या टोकाला अत्यंत वेगाने जाऊन भिडा. ९ हे अश्व हो, अन्न संपादन करण्याचा जो जो प्रसंग येईल, अथवा धन संपादन करण्याचा जो जो प्रसंग येईल त्या त्या सर्व प्रसंगी तुम्ही आमचे रक्षण करा. ब्राह्मणाप्रमाणे शुद्ध, मरणरहित आणि जेथे जावयाचे आहे त्या प्रदेशाचे बरोबर ज्ञान असणाऱ्या हे अश्वाभिमानी देवहो, तुम्ही ह्या नीवार धानाच्या भाताचा मधुर रस प्या आणि हर्षभरित व्हा. नंतर तृप्त झालेले तुम्ही, देव जातात त्या मार्गांनी ठरलेल्या मर्यादेपर्यंत धावत चला. १० कुशलतेने चालणारे, आमचा इषाऱ्याचा शब्द ऐकणारे आणि अन्नवंत असे हे सर्व अश्व आमचा इषाऱ्याचा शब्द ऐकोत. ११ मोठ्या लांबीची मजल अल्प वेळात चालून जाणारे, हजारो अन्नराशी मिळवून देणारे, यज्ञाचा प्रसंग आणून देणारे व आम्हाला द्रव्य मिळवून देणारे जे अश्व रणसंग्रामाचे ठिकाणी शत्रूचे अधिकात अधिक असे रत्नादि मौल्यवान धन लुटून आणतात ते अश्व आमच्या इषाऱ्याच्या शब्दांवर लक्ष ठेऊन आम्हाला सुख होईल अशा प्रकारे दौड करणारे होवोत. १२ देवांना पूज्य मानणारे, अत्यंत लांबीचा पल्ला थोड्या वेळात चालून जाणारे व शीघ्रगतित्वामुळे उत्कृष्ट निगा राखण्यास पात्र, असे हे अश्व सर्पासारखे व लांडग्यासारखे राक्षसांना दंश करीत व दाढांखाली चुरडीत चालले आहेत. आणि त्यांनी फारच थोड्या वेळात रोगांना आमच्या पासून दूर केले आहे. १३ मान, दोन्ही काखा व तोंड इतक्या ठिकाणी दोऱ्यांनी बांधून रथाला जुंपलेला असून देखील रस्त्यात अडथळा करणाऱ्या दगडगोट्यांना ओलांडून, हांकणाऱ्याच्या इषाऱ्यास अनुलक्षून चालण्याचे अनुसंधान राखून, आणि मार्गातील खांचखळगे, व चढण असलेला प्रदेश अथवा वाकडातिकडा व सरळ रस्ता क्रमाने आक्रमण करीत असलेला हा अश्व सारथ्याच्या हातातील चाबूक त्वरेने हालचालीच्या रूपाने सारथ्याकडून इषारा मिळण्याची एकसारखी अपेक्षा करीत आहे. १४ आणखी असे की, वेगाने दौडत असतांनाच ठरलेला मर्यादेचा पल्ला गाठण्याची आकांक्षा बाळगणारा, आकाशात भरारी मारणाऱ्या ससाण्याप्रमाणे पर्वतावरून देखील वेगाने अतिक्रमण करणारा, ऊर्जा म्हणजे तीव्र बलासह अनेक अडचणीतून तरून जाणारा अशा या अश्वाच्या अंगावर घातलेला श्रृंगारसाज आकाशात

उडणाऱ्या पक्ष्यांचे पंख जसे वरखाली झालेले दिसावेत त्याप्रमाणे अश्वाच्या शरीराच्या हालचालीस अनुसरून खालीवर झालेला व धांवत चालल्या सारखा दिसत असतो. १५ अन्नाची उत्पत्ती मजकडे येवो. अखिल जगाला सुख व्हावे अशी इच्छा बाळगणारी द्युलोक व पृथ्वी ही दोघेही मजकडे येवोत. माझी माता व माझा पिता मला चिरायू करण्यासाठी माझ्याजवळ येवोत. शिवाय अमृतत्वाचा जन्म म्हणजे देवत्व मला प्राप्त करून देण्याकरिता सोमदेवही मजजवळ येवो. १६ हे अश्व हो, अन्नवंत, अन्न जिंकून आणण्यासाठी सदा उत्कंठित व अन्न जिंकून आणण्यासाठी वेगाने धावत जाणारे आणि अन्न जिंकणारे तुम्ही बृहस्पतीचा भाग असलेला हा भात हुंगा. १७ हे अश्व हो, अन्नवंत, अन्न जिंकून आलेले, अन्नसंपादन करून धावत आलेले, व अन्नसंपादनाचे कामी विजयी झालेले तुम्ही बृहस्पतीचा भाग असलेल्या भाताचे ठिकाणी अवघ्राण करून शुद्ध व्हा. १८ हे अश्व हो, जी प्रतिज्ञा इंद्राच्या अनुग्रहाने तुम्ही धारण केली होती, ती तुमची ही ठरलेल्या मर्यादेपर्यंत धांवत जाण्याची प्रतिज्ञा आता खरी झाली आहे. १९ वनस्पतीविकार अशा हे दुंदुभींनो, यज्ञरूपी ऐश्वर्याने युक्त अशा यजमानरूपी इंद्राला अन्नसंपादनाचे कामी जसा मिळावयास पाहिजे तसा जय तुम्ही मिळवून दिला आहे. यास्तव, तुम्ही जेथे बांधल्या गेला होता तेथून तुम्ही आता मोकळ्या व्हा. (अनुवाक ८).

१ हे तार्प्य वस्त्रा तू क्षत्रिय राजाच्याच ठिकाणी असलेल्या ह्या यजमानरूपी गर्भाला वेष्टून असणारे 'उल्ब' नांवाचे जल आहेस. २ हे दर्भमय वस्त्रा, तू जणू काय क्षत्रियवर्णी राजपत्नीच्या ठिकाणी असलेले शरीराला थंडी न लागू देणारे असे उबदार वस्त्र आहेस. ३ हे जाये, हे स्त्रिये ये, आपण दोघेजण स्वर्गलोकावर आरोहण करू. ४ करू, खरोखरच आपण दोघेजण स्वर्गलोकावर आरोहण करू. ५ मी आपणा दोघांनाही स्वर्गलोकावर चढवीत आहे. ६ 'वाज' अशी संज्ञा असलेला चैत्रमास व त्याची अधिष्ठात्री देवता संतुष्ट होवो ही आहुती त्या दोघांना अर्पण असो. ७ 'प्रसव' असे नांव असलेला वैशाखमास व त्याची अधिष्ठात्री देवता संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना समर्पण असो. ८ 'अपिज' असे नांव असलेला ज्येष्ठ महिना व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना अर्पण असो. ९ 'ऋतु' ही संज्ञा असलेला आषाढ मास व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना समर्पण असो. १० 'सुवः' हे नांव असलेला श्रावणमास व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर

संतुष्ट असो. ही आहुती त्या दोघांना समर्पण असो. ११ 'मूर्धा' ही संज्ञा असलेला भाद्रपद महिना व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना अर्पण असो. १२ 'व्यश्रिय' असे नांव असलेला आश्विन मास व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना समर्पण असो. १३ 'आंत्यायन' ही संज्ञा असलेला कार्तिक मास व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट असो. ही आहुती त्या दोघांना समर्पण असो. १४ 'अंत्य' असे नांव धारण करणारा मार्गशीर्ष मास व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना अर्पण असो. १५ 'भौवन' हे नांव असलेला पौष महिना व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना समर्पण असो. १६ "भुवन" अशी संज्ञा असलेला माघ मास व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना समर्पण असो. १७ 'अधिपति' असे नांव धारण करणारा फाल्गुन मास व त्याची अधिष्ठात्री देवता मजवर संतुष्ट होवो. ही आहुती त्या दोघांना समर्पण असो. १८ मी करीत असलेल्या यूपारोहणरूप यज्ञाच्या योगाने माझे आयुष्य स्वकार्यक्षम होवो. १९ मी करीत असलेल्या यूपारोहणात्मक यज्ञाने माझा प्राणवायू स्वकार्यक्षम होवो. २० मी करीत असलेल्या यूपारोहण यज्ञाच्या योगाने माझा 'अपान' वायू स्वकार्यक्षम होवो. २१ मी करीत असलेल्या यूपारोहणात्मक यज्ञाच्या योगाने माझा 'व्यान'वायू स्वकार्यक्षम होवो. २२ मी करीत असलेल्या यूपारोहणात्मक यज्ञाच्या योगाने माझे चक्षुरिंद्रिय स्वकार्यक्षम होवो. २३ माझ्या या यूपारोहणात्मक यज्ञाने माझे श्रवणेंद्रिय स्वकार्यक्षम होवो. २४ माझ्या यूपारोहणरूप यज्ञाने माझे मन स्वकार्यक्षम होवो. २५ मी करीत असलेल्या यूपारोहणरूप यज्ञाने माझी वाणी स्वकार्यक्षम होवो. २६ मी करीत असलेल्या या यज्ञाने माझा 'आत्मा' स्वकार्यक्षम होवो. २७ मी करीत असलेल्या यूपारोहणरूपी यज्ञाने माझा यज्ञ स्वकार्यक्षम म्हणजे फलप्रद होवो. २८ आम्ही स्वर्गलोकावर राहणाऱ्या देवांच्या जवळ येऊन पोचलो आहोत. आणि देवरूप झालो आहोत. आणि म्हणूनच प्रजापतीच्या प्रेमातील प्रजा होऊन ह्या भूलोकी यज्ञानुष्ठानात तत्पर झालो आहोत. २९ मी आपल्या प्रजेशी सुसंगत होऊन राहीन. माझी प्रजाही माझ्याशी सुसंगत होऊन राहो. मी भरपूर धनाशी संलग्न होऊन राहीन व भरपूर धनही माझे ठिकाणी संलग्न होऊन राहो. ३० हे यजमान, सामान्य जनांना खाण्यास योग्य अशा अन्नासाठी मी तुला आसपुटांनी ताडन करतो. ३१ राजासारख्या श्रीमान् लोकांनी खावयास योग्य अशा अन्नासाठी मी आसपुटांनी

तुला ताडन करतो. ३२ हे यजमान, अपूप म्हणजे अनरसेप्रभृति विशिष्ट अन्नासाठी मी आसपुटांनी तुला ताडन करतो. ३२ हे यजमान, सर्व प्रकारच्या अन्नाच्या संपादनासाठी मी तुला आसपुटांनी मारतो. ३४ हे सुवर्णा, तू अखंड टिकणारे आहेस. ३५ हे बस्ताजिन तू पुष्टिरूप आणि पुष्कळ अपत्यांचे उत्पादक आहेस. (अनुवाक ९).

१ अन्नाचा उत्पादक असलेल्या परमेश्वराने ओषधींच्या व उदकांच्या ठिकाणी ह्या वल्लीरूप सोमराजाला सृष्टीच्या आरंभीच निर्माण केले. सोमराजाचे जन्मस्थानच अशा त्या ओषधी आणि उदके आमच्यासाठी माधुर्ययुक्त होवोत. आम्ही या राष्ट्रामध्ये यागानुष्ठानादि सर्व कार्यात पुरोगामी होऊन राष्ट्रकल्याणाविषयी सदैव जागरूक होऊ. २ अन्नांचा उत्पादक अशा परमेश्वरानेच हे आम्ही करणार असलेले यज्ञकर्म उत्पन्न केले. त्याचप्रमाणे ही सर्व भूते सर्व ठिकाणी उत्पन्न केली. तो परमेश्वर आमच्या प्रजा व पुष्टी यांचे वर्धन करणारा व आमच्या मनांतील अभिप्राय जाणणारा होऊन आम्ही हविर्भागरूपाने देवांना अर्पण करणार असलेले अन्न आम्हाकडे सर्व बाजूंनी प्राप्त करो. ३ अन्नांचा निर्माता असलेल्या परमेश्वराने या द्युलोकाचा आणि या सर्व भुवनांचा आश्रय केला. म्हणजे या सर्वांच्या ठिकाणी तो समाविष्ट होऊन राहिला. तो परमेश्वर सर्वांचा राजा होऊन देवांना हवी प्रदान करण्याची इच्छा न करणाऱ्या माझ्या बुद्धीला प्रेरणा करून मला देवांना हवी प्रदान करण्यास प्रवृत्त करो. आणि नंतर पराक्रमी पुत्र इत्यादिकांनी युक्त असे ऐश्वर्य व धन आम्हाला नियमितपणे देत राहो. ४ हे अग्निदेवा, ह्या यज्ञकर्मामध्ये तू आम्हासमोर बसून आम्हाला हितप्रद असा बोध कर. आमच्याविषयी तू करुणार्द्रचित्त हो. हे भूपते, ज्या अर्थी तू आमचा धनदाता आहेस, त्या अर्थी आम्हाला भरपूर धन दे. ५ अर्यमा देव आम्हाला धन देवो. भग नांवाचा देव आम्हाला धन देवो. बृहस्पती आम्हाला धन देवो. इतर देव आम्हाला धन देवोत. त्याचप्रमाणे सत्य, प्रिय आणि सुसंस्कृत अशा वाणीची देवता आम्हाला धन देवो. सर्व प्रकारच्या वाणीची अधिष्ठात्री देवता आम्हास धन देवो. ६ हे ईश्वरा, आम्हाला धन देण्याविषयी अर्यमा, बृहस्पती, इंद्र, सुसंस्कृत वाणीची देवता, विष्णू, सामान्य वाणीची देवता, सविता व अन्नांचा अधिपती या सर्व देवांना प्रेरणा कर. ७ सोमराजा, वरुण, अग्नी, बारा आदित्य, विष्णू, सूर्य, ब्रह्मा व बृहस्पती या यज्ञकर्मारंभक देवांचे आम्ही प्रथम स्मरण करून नंतर आमच्या ह्या यज्ञकर्मांचा आम्ही आरंभ करीत आहोत. यास्तव, हे सर्व देव आमच्यावर अनुग्रह करोत. ८ सर्वप्रेरक अशा सविता देवाच्या प्रेरणेने, अश्विनीकुमारांच्या

बाहूंनी, पूषादेवांच्या हातांनी, आणि सुसंस्कृत वाणीची देवता, सामान्य वाणीची देवता व यंतृ शब्दाने व्यक्त होणारा अग्नी ह्या देवतांच्या अनुज्ञेने मी साम्राज्याच्या निमित्ताने तुला अभिषेक करतो. ९ देवाधिपती इंद्राच्या आणि १० देवगुरु बृहस्पतीच्या आज्ञेने तुला साम्राज्य प्राप्त व्हावयासाठी मी तुला अभिषेक करतो. (अनुवाक १०).

१ अग्नीने एकाक्षरी मंत्राने वाणीला जिंकून तिला वश केले. २ दोघा अश्विनीकुमारांनी द्व्यक्षरी मंत्राच्या जपप्रभावाने प्राण व अपान या दोन वायूंना जिंकले आणि त्यांना आत्मवश केले. ३ भगवान विष्णूने त्र्यक्षरी मंत्राच्या पठणाने तिन्ही लोकांना जिंकून ते आपल्या स्वाधीन करून घेतले. ४ सोमाने चारअक्षरी मंत्राने चतुष्पाद अशा सर्व पशूंना जिंकले व त्यांना वश केले. ५ पूषा देवाने पंचाक्षरी मंत्राच्या प्रभावाने पांच अक्षरी चरण असलेल्या पंक्ति नामक छंदाला जिंकले व त्याला आत्मसात केले. ६ धाता देवाने षडक्षरी मंत्राच्या पठणाने वसंतादि सहा ऋतूंना जिंकून त्यांना आपलेसे केले. ७ मरुतांनी सातअक्षरी मंत्राच्या प्रभावाने सात अक्षरांचा चरण असलेल्या 'शक्करी' नामक छंदाला जिंकले व त्याला आत्मसात केले. ८ देवगुरु बृहस्पतीने अष्टाक्षरी मंत्राच्या जपाने आठ अक्षरांचा एक एक चरण असलेल्या गायत्री छंदाला जिंकून त्याला आत्मवश केले. ९ जगन्मित्र अशा सूर्यदेवाने नऊ अक्षरांच्या मंत्राचा जप केला व 'त्रिवृत्' नांवाचा स्तोम जिंकला व आपलासा केला. १० वरुणाने दशाक्षरी मंत्राच्या योगाने दहा अक्षरांचा एक एक चरण असलेल्या 'विराट्' नामक छंदाला जिंकले व तो आपलासा केला. ११ देवांचा राजा असलेल्या इंद्रदेवाने एकादशाक्षरी मंत्राने अकरा अक्षरी चरण असलेल्या 'त्रिष्टुप्' छंदाला जिंकून त्याला आपल्या स्वाधीन केले. १२ विश्वेदेवांनी द्वादशाक्षर मंत्राच्या जपप्रभावाने बारा बारा अक्षरांचा एक एक चरण असलेल्या 'जगती' छंदाला जिंकून तो आत्मवश केला. १३ अष्टवसूंनी त्रयोदशाक्षरी मंत्राच्या सामर्थ्याने 'त्रयोदश' नांवाचा स्तोम जिंकला व त्याला स्वाधीन करून ठेवला. १४ अकरा रुद्रदेवांनी चवदा अक्षरांच्या मंत्राने 'चतुर्दश' नामक स्तोम जिंकून तो आपलासा केला. १५ बारा आदित्यांनी पंचदशाक्षरात्मक मंत्राच्या प्रभावाने 'पंचदश' नांवाचा 'स्तोम' जिंकला व त्याला वश केला. १६ अखंडनीय अशा भूदेवाने 'षोडशी' म्हणजे सोळाअक्षरी मंत्राच्या जपप्रभावाने 'षोडश' संज्ञक 'स्तोम' जिंकून जय मिळविला व त्या सोमाला स्वाधीन करून घेतले. १७ ब्रह्मांड निर्माण करणाऱ्या प्रजापतिदेवाने सतराअक्षरी मंत्राचा जप करून त्याच्या प्रभावाने 'सप्तदश' नामक स्तोमावर जय मिळवून

त्याला वश करून घेतले. (अनुवाक ११).

१ हे पहिल्या 'अतिग्राह्य' ग्रहा, तू पृथ्वीपासून उत्पन्न होणाऱ्या लाकडाच्या बनविलेल्या 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. मनुष्ये, वनस्पती व सर्व भुवने यांच्या ठिकाणी स्वामित्वाने राहणाऱ्या व इंद्राला प्रिय अशा तुझे मी ग्रहण करतो. २ हा 'खर' नांवाचा ओटा तुझे निवासस्थान आहे. इंद्राला अर्पण करावयासाठी मी तुला येथे ठेवतो. ३ हे दुसऱ्या 'अतिग्राह्य' ग्रहा तू 'उपयाम' पात्रात भरून घेतला गेला आहेस. उदके व घृत वगैरे रस यांच्या ठिकाणी स्वामित्व करून राहणारा आणि श्रीमंतीच्या थाटात हत्ती, घोडे यांच्यावर बसणाऱ्या व इंद्राला प्रिय अशा तुला मी ग्रहण करतो. ४ हा 'खर' नांवाचा ओटा, हे तुझे रहावयाचे ठिकाण आहे. यास्तव या ठिकाणी मी इंद्राला अर्पण करण्यासाठी तुझी स्थापना करतो. ५ हे तिसऱ्या 'अतिग्रह्य ग्रहा, तू उपयाम पात्रात भरुन घेतला गेला आहेस. पृथ्वी, अंतरिक्ष व दुःखरहित अशा स्वर्गलोकाच्या ठिकाणी स्वामित्वाने राहणाऱ्या व इंद्राला प्रिय अशा तुज ग्रहाचे मी ग्रहण करतो. ६ हे तुझे निवासस्थल आहे. इंद्राला अर्पण करण्याकरिता मी तुला येथे ठेवतो. ७ जे 'अतिग्राहय' संज्ञक 'ग्रह' ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व निषाद या पांच वर्णांच्या लोकांच्या कल्याणासाठीच भरून घेतले जातात व ज्यांच्यामध्ये 'आग्नेय','ऐन्द्र' व 'सौर्य' हे तीन ग्रह मुख्य आहेत, शिवाय ज्यांच्या प्रभावाने द्युलोकात असलेला मेघ पर्जन्य रूपाने अधोमुख केला जातो, त्या ओठांच्या आकारांची अग्रे असलेल्या ग्रहांचे पूरण करिण्याकरता अन्नसदृश व बलप्रद अशा सोमरसाचे मी ग्रहण करतो. ८ हे चौथ्या 'अतिग्राह्य ग्रहा' हा रवर नांवाचा ओटा तुझे निवासस्थान आहे. इंद्राला तृप्त करण्यासाठी मी तुला येथे ठेवतो. ९ हे 'अतिग्राह्य' संज्ञक ग्रह हो, उदकांचा सारभूत, जीवनाला कारणभूत, सूर्यकिरणांच्या द्वारा धान्यांना परिपक्व करणारा, गायत्रीने द्युलोकातून जपून आणलेला आणि उदकांच्या सारभूत रसाचाही सारभूत अशा सोमरसाने भरलेल्या तुमच्या मधील ह्या पांचव्या म्हणजे शेवटच्या ग्रहाचे मी ग्रहण करीत आहे. १० हे पांचव्या अतिग्राह्य ग्रहा, हा 'रवर' नांवाचा ओटा तुझे राहण्याचे स्थान होय. यास्तव, तुला मी या ठिकाणी ठेवतो. ११ हा प्रजापती विशेषेकरून येथे राहून ही यज्ञकर्मे संपादन करीत असतो. ज्या अर्थी, तो प्रकाशमान होऊन श्रेष्ठ अशा कर्मफलाच्या प्राप्तीचा मार्गदर्शक होतो आणि ज्या अर्थी तो स्वकीय अशा शरीराचे ठिकाणी आमचे शरीर एकरूपतेला प्राप्त करतो त्या अर्थी तो प्रजापती मधुर अशा कर्मफलाचा धारक होऊन माझ्या सन्निध

उल्लसित वृत्तीने येऊन पोचतो. १२ हे 'प्राजापात्य' संज्ञक ग्रहा तू उपयाम पात्रात भरून घेतला गेला आहेस. प्रजापतीला प्रिय अशा तुझे मी ग्रहण करतो. १३ 'रवर' संज्ञक ओटा हे तुझे निवासस्थल आहे. म्हणून मी तुला येथे ठेवतो. (अनुवाक १२).

१ चैत्रादि मासांच्या देवता आमच्या ह्या यज्ञकर्मात प्रादुर्भूत होणाऱ्या इंद्राला अनुसरून आमच्यावर अनुग्रह करण्यासाठी येथे येऊन पोचल्या आहेत. वनांच्या अधिष्ठात्री देवताही प्रादुर्भूत होणाऱ्या इंद्राला अनुसरून येथे आल्या आहेत. ओषधी देवता या यज्ञात प्रादुर्भूत होणाऱ्या इंद्राला अनुसरून या ठिकाणी आलेल्या आहेत. पर्वतांचे अधिष्ठाते देव प्रादुर्भूत होणाऱ्या इंद्राला अनुसरून येथे आले आहेत. आमच्याविषयी सदिच्छा करणाऱ्या द्युलोक व पृथ्वी यांच्या अधिष्ठात्री देवताही आमच्या ह्या यज्ञकर्मात प्रादुर्भूत होत असलेल्या इंद्राला अनुसरून आमच्यावर अनुग्रह करण्यासाठी या ठिकाणी आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे उदकांच्या अभिमानिनी देवता देखील येथे प्रादुर्भूत होणाऱ्या इंद्राला अनुसरून या ठिकाणी आमच्यावर कृपा करण्याकरता येऊन पोचल्या आहेत. २ याजनीय अशा हे इंद्रदेवा, सर्व देवांमध्ये श्रेष्ठ असलेल्या तुला 'सत्र' संज्ञक यज्ञामध्ये वृत्रवधानंतरही तुझे बल वृद्धिंगत व्हावे म्हणून, आणि तुझ्या ठिकाणी असणारा क्षत्रिय जातीचा अभिमान, तुझे अतुल सामर्थ्य, वैऱ्याविषयी तुझ्या ठिकाणी असलेली तिरस्कारबुद्धी, इत्यादि तुझ्या गुणांना अनुलक्षून सर्व प्रकारचे हविर्द्रव्य अग्न्यादि देवतांच्या बरोबरच अनुक्रमाने तुला दिले जाते. ३ देवस्त्रियांमध्ये सैन्याचे नियंत्रण करणारी इंद्रपत्नी इंद्राणी हीच एक श्रेष्ठ अशी पतिव्रता आहे, असे मी ऐकले आहे. हिच्या तोडीची दुसरी पतिव्रता एकही नाही. त्या इंद्राणीचा पती जरेने केव्हाही मरत नाही. ४ हे इंद्राणीदेवी, ज्या मज यजमानाचे उदकांमध्ये तयार झालेले हे सोमरस, पुरोडाश इत्यादि हविर्द्रव्य देवांच्या ठिकाणी समर्पण केले जाते तो मी, तुला प्रिय असलेल्या इंद्राखेरीज इतर कोणत्याही देवाचे गुणवर्णन करीत नाही. ५ ज्या देवाने उत्पन्न होताक्षणीच सर्व देवांमध्ये मुख्यत्व संपादन केले आणि अत्यंत धैर्यशाली होऊन वृत्रवधासारख्या अद्भुत कर्माने अग्न्यादि देवांना मागे टाकले, इतकेच नव्हे तर ज्याचे बल पाहून द्युलोक व पृथ्वी भयभीत होतात; हे जनहो, तो इंद्रदेव स्वकीय बलाच्या माहात्म्याने तुमचे रक्षण करो. ६ स्वभावाने उग्र असणाऱ्या हे इंद्रदेवा, आमच्या सभोवती असलेले तुझे रक्षण अत्यंत महनीय आहे. आमच्या पाठीशी असलेल्या तुझ्या संरक्षणशक्तीच्या जोरावर आमच्या सेना शत्रूविषयी क्रोधविष्ट होऊन यत्किंचितही

खेळत न राहता एकसारख्या बेफिकीरपणे शत्रूंवर तूटून पडत असतात. मनुष्यहितकारी अशा हे इंद्रा, तुझ्या दोन्ही हातांतील खड्गादि आयुधांची चमक सर्वत्र पसरत असते. तुझे मन आमच्या संरक्षणाखेरीज इतर अनेक कार्यांकडे उन्मुख होतो. ७ हे इंद्रदेवा, आम्हाला व आमच्या प्रजांना परस्परांमध्ये कलह करण्याविषयी केव्हाही प्रवृत्त करू नको. आणि अगत्यपूर्वक, हविर्द्रव्य तुला अर्पण करणाऱ्या यजमानाला देण्याकरता तुझ्या जवळ जे भरपूर धन साठविलेले असेल ते आण आणि आम्हाला दे. हे इंद्रदेवा, तुला हविर्द्रव्य प्रदान करण्यास साधनीभूत व प्रशस्त अशा ह्या नूतन यज्ञकर्मामध्ये तुझ्याविषयीच्या पठण केल्या जाणाऱ्या 'उक्थ' संज्ञक मंत्रसंघाचे ठिकाणी तुझीच स्तुती करणारे आम्ही आमची इच्छा सफल करण्याविषयी तुझी मनःपूर्वक प्रार्थना करीत आहो. ८ हे इंद्रदेवा, तू आम्हाला देण्याकरता धन घेऊन येच. हे तू आणलेले धन आमच्याखेरीज इतरत्र न राहो. इतर कोणाच्या हाती न पडो ज्या अर्थी आम्ही तुलाच सर्व धनिकांपेक्षा श्रेष्ठ असा धनाधिपती समजतो, त्या अर्थी तू आम्हाला देण्यासाठी धन घेऊन ये. हे इंद्रा, तुझ्याजवळ महनीय व देण्याला योग्य असे धन असेल ते धन हे 'हरी' संज्ञक दोन घोडयांच्या रथात बसणाऱ्या इंद्रदेवा, तू आम्हाला दे. ९ आपल्या भक्तांना सढळ हाताने धन देणाऱ्या इंद्राला, त्याला देण्यासाठी तयार केलेल्या हविर्द्रव्याने युक्त असे आम्ही बोलावीत आहो. हे इंद्रा तू आपले दोन्ही हात धनाने भरून घे आणि नंतर माझ्या समोर येऊन तू आपल्या उजव्या हातातील धन मला दे; तसेच डाव्या हातातीलही धन मला देऊन टाक. १० हे इंद्रदेवा, सढळ हस्ताने दान करणारा, वज्रधारी, इच्छित धनांचा वर्षाव करणारा, शत्रूंचा सत्वर पराभव करणारा, बलवान, देदीप्यमान, वृत्रासुराचा वध केलेला व सोमपान करणारा असा तू या यज्ञामध्ये वेदीत पसरलेल्या दर्भांवर नीट बैस आणि नंतर यज्ञकर्त्या यजमानाला सुखकर व अनिष्टनिवारक हो. ११ हा इंद्रदेव, आपल्या उपासकांचे उत्कृष्ट रक्षण करणारा, धनसंपन्न, रक्षण साधनांच्या योगाने आम्हाला सुखकर आणि आम्ही अनुष्ठानरूपाने करीत असलेल्या सर्व सेवा जाणणारा होवो. आम्हाला त्रास देणाऱ्या वैऱ्यांचा द्वेष्टा असा तो इंद्रदेव आम्हाला शत्रूंच्यापासून निर्भय करो. त्याच्या प्रसादाने आम्ही शत्रूचा पराभव करण्यास योग्य अशा सामर्थ्यांचे पालक होऊ. १२ आम्ही यज्ञयोग्य अशा त्या इंद्रदेवाच्या अनुग्रहयुक्त अंतःकरणाचे ठिकाणी संलग्न होऊन राहू. आणि मग परम मंगल अशा मनाच्या समाधानरूप अवस्थेत सदैव सुखोपभोग घेणारे होऊ. १३ ज्या उदकांच्यासहवर्तमान आम्ही इंद्राचे स्तवन करून आनंदित होऊ ती धनसंपन्न, आमच्याशी हर्षयुक्त

असणारी, भरपूर अन्नाने परिपूर्ण आणि वज्ररूप अशा 'शक्करी' छंदात्मक याज्या मंत्राने उत्पन्न होणाऱ्या दोहाचे शमन करणारी उदके आमचा स्वामी असलेल्या इंद्राचे ठिकाणी आम्हाला सुख देण्यासाठी राहोत. १४ ह्या इन्द्रदेवाच्या रथाच्या पुढे उभे राहून हे लोक हो, त्याच्या बलाचे मनःपूर्वक व उत्कृष्ट अशा प्रशंसेच्या रूपाने पूजन करा. देवांचा राजा असा हा इंद्रदेव वैऱ्यांचा नाश करणारा असून रणसंग्रामामध्ये शत्रुपक्षाकडील योध्यांच्याशी संयोग झाला असता घात करण्याविषयी अनावर इच्छा धारण करणाऱ्या शत्रूच्या विरुध्द छातीठोकपणाने लढत राहातो. रणांगणातून केव्हाही पळून जात नाही. असे प्रशंसात्मक भाषण करणे हेच त्याच्या बलाचे पूजन होय. अशा प्रकारे ज्याच्या बलाचे पूजन झाले आहे असा तो इंद्रदेव इतरांना बाजूस ठेवून आम्हालाच प्रेरणा करणारा होऊन आमच्या कल्याणाविषयी सर्वदा सावध राहणारा होवो. क्षुद्र अशा वैऱ्यांच्या धनुष्यांवर ताणलेल्या भिकार दोऱ्या ताडकन् तुटून जावोत. (अनुवाक १३).

प्रपाठक ८

'अनुमति' देवतेसाठी आठ कपालांच्या गटावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा याग करावा. आणि त्याच्या सांगतेसाठी ऋत्विजांना दक्षिणा म्हणून गाय द्यावी. पुरोडाशासाठी तांदूळ वाटीत असताना पाट्याच्या खाली आधार म्हणून ठेवलेल्या 'शम्या' नामक दंडाच्या पश्चिमेस जे तांदुळाचे पीठ पडले असेल, त्या पिठाचा निर्ऋति देवतेला उद्देशून पुरोडाश तयार करून तो एकाच कपालावर भाजावा. आणि त्याचे यजन करावे. व तत्सांगतेसाठी काळ्या रंगाचे व तशाच रंगाच्या दशा असलेले वस्त्र दक्षिणा म्हणून ऋत्विजांना द्यावे. 'वीहि स्वाहा, हुतिं जुषाणः' म्हणजे ' हे गार्हपत्याग्ने, मी अर्पण केलेल्या आहुतीचे सेवन करून तू 'निर्ऋति' देवतेला हवी प्रदान करण्याकरिता दक्षिण दिशेस जात असलेल्या आम्हांपासून दूर रहा. आपल्या जागेवरून उठून आम्हास उपद्रव देऊ नकोस', या अर्थाच्या मंत्राने गार्हपत्याग्नीवर एक आज्याहुती द्यावी. नंतर 'एष ते निर्ऋते भागो भूते हविष्मत्यसि मुंच इमं अंहसः' म्हणजे 'हे निर्ऋति नांवाच्या पापदेवते, हा पुरोडाशरूप हविर्भाग तुझा आहे. आमच्या ऐश्वर्याला कारणभूत होणारी तू आता हविर्द्रव्ययुक्त झाली आहेस. यास्तव, या यजमानाला पापापासून मुक्त कर', ह्या अर्थाचा हा मंत्र म्हणून खारी माती असेल अशा जागी अथवा आपोआप भेगाळलेल्या जागी नर्ऋतिदेवतेला 'पुरोडाश' अर्पण करावा. नंतर घरी परत आल्यावर

'स्वाहा नमो य इदं चकार' म्हणजे 'ज्या गार्हपत्याग्नीने आमच्या प्रार्थनेस अनुसरून [illegible] केले त्याला ही आहुती आणि नमस्कार समर्पण असो' अशा अर्थाचा मंत्र पठण करून गार्हपत्याग्नीवर आज्याहुती द्यावी. 'आदित्य देवासाठी भात शिजवून त्याचा याग करावा. या यागाच्या सांगतेसाठी 'वर' म्हणजे श्रेष्ठ अर्थात् उंच व धष्टपुष्ट असा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. अग्नी व विष्णू या दोघांना मिळून अर्पण करावयासाठी अकरा कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून त्याचा याग करावा. आणि ओझे वाहण्यास समर्थ व ठेंगणा बैल दक्षिणा म्हणून ऋत्विजांना द्यावा. अग्नी व सोम या दोघा संयुक्त देवांना उद्देशून अकरा कपालांच्या गटावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे. व त्याच्या सांगतेसाठी सुवर्णाची दक्षिणा द्यावी. इंद्र देवतेच्या उद्देशाने अकरा कपालांच्या गटावर भाजलेल्या पुरोडाशाचे यजन करून, तत्सांगतार्थ एक ओझे वाहणारा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. अग्नीसाठी आठ कपालांच्या गटावर भाजलेला पुरोडाश व इंद्रासाठी दही हविर्भागरूपाने समर्पण करावे. आणि सांगतेकरता ओझे वाहणारा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. इंद्र व अग्नी या दोघांना मिळून बारा कपालांच्या समूहावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा आणि विश्वेदेवांना शिजविलेल्या भाताचा हविर्भाग द्यावा व त्याची सांगता म्हणून गाईला झालेले पहिलेच अपत्य असा 'गोऱ्हा' दक्षिणा म्हणून द्यावा. सोमदेवतेला उद्देशून साव्याच्या तांदूळाचा भात हविर्भागरूपाने अर्पण करावा व त्याची सांगता 'वस्त्ररूप दक्षिणा देऊन करावी. सरस्वती व सरस्वान् या दोघा देवांच्या उद्देशाने दोन ठिकाणी भात शिजवून त्याचा हविर्भाग उभयतांना अनुक्रमे समर्पण करावा. गाय व बैलाची एक जोडी ऋत्विजांना दक्षिणा म्हणून देऊन त्या यागाची सांगता करावी. (अनुवाक १).

'अग्नि'देवतेला उद्देशून आठ कपालांच्या समूहावर पुरोडाश भाजून तयार करावा. त्याचप्रमाणे 'सोम' देवासाठी शिजविलेला भात, 'सविता' देवासाठी बारा कपालांवर भाजलेला पुरोडाश, 'सरस्वती' देवतेकरता शिजविलेला भात, 'पूषा' देवतेकरिता शिजविलेला भात, 'मरुत्' नांवाच्या देवासाठी सात कपालांच्या गटावर भाजलेला पुरोडाश, 'विश्वेदेव' नांवाच्या देवांच्यासाठी 'आमिक्षा' म्हणजे कडकडीत तापलेल्या दुधात दही ओतल्यावर ते दूध नासून त्यामध्येच दह्यासारखा जो घट्ट पदार्थ बनतो तो आणि 'द्यावापृथिवी' या दोन संयुक्त देवतांच्यासाठी एकाच कपालावर भाजून तयार केलेला पुरोडाश अशा प्रकारच्या हविर्द्रव्यांनी अग्न्यादिदेवतांचे अनुक्रमाने यजन करावे. (अनुवाक २).

'ऐंद्राग्न' म्हणजे इंद्र व अग्नी या दोघांच्यासाठी अकरा कपालांच्या

गटावर भाजलेला पुरोडाश, 'मरुत्' नांवाच्या देवांच्याकरिता आमिक्षा, 'वरुण' नांवाच्या देवाकरिता आमिक्षा, आणि 'क' नांवाच्या देवाकरिता एकाच कपालावर भाजलेला पुरोडाश, याप्रमाणे हविर्द्रव्ये करून त्यांच्या योगाने इंद्राग्नी इत्यादि देवतांचे यजन करावे.

१ उपासकांना जखडलेले वरुणदेवाचे फास तोडून टाकून त्यांना बंधमुक्त करण्याची हौस असलेले, यज्ञाचे निर्वाहक आणि यजमान व पत्नी या दोघांनी अर्पण केलेल्या 'करंभ' नांवाच्या हविर्द्रव्याचे सेवन करून परस्परांवर सारखेच प्रेम करणारे अशा 'मरुत्' नामक देवांना आम्ही बोलावतो. २ हे इंद्रदेवा, आम्हाला रणसंग्रामामध्ये जाण्याला केव्हाही प्रवृत्त करू नको. शत्रूच न उत्पन्न झाल्यामुळे रणांगणावर पाऊल टाकण्याचे कारणच न पडणे हे खरोखर सुखकारक आहे. ज्या अर्थी, हे बलवंता, पर्जन्यवृष्टी करण्यास समर्थ अशा तुज इंद्रदेवाच्या प्रसादाने आमची विस्तीर्ण जमीन सातू, साळीचे भात इत्यादि सर्व प्रकारचे धान्य पिकविण्याला योग्य होते, त्या अर्थी तुझ्या प्रसादाने आमचे सर्व प्रकारचे अनिष्ट सदैव नष्ट होवो. आमची स्तुतिरूप वाणी आमच्याकडून हविर्द्रव्यरूपाने अर्पण केल्या गेलेल्या 'करंभ' पात्रांच्या योगाने तृप्त झालेल्या तुझ्या सहकारी असणाऱ्या 'मरुत्' नामक देवांना वंदन करीत आहे. ३ हे करंभपात्रसमूहा, आम्ही गावात राहत असतांना नोकर-चाकरांना अथवा इतर लोकांना निष्कारण त्रास देण्याचे जे पाप केले, अरण्यात संचार करतांना निरुपद्रवी पशूंना मारण्याचे जे पाप केले, सभेमध्ये बसलो असतां विद्वान् लोकांच्याशी मत्सर करण्याचे जे पाप केले, इंद्रियांच्या द्वारा अभक्ष्यभक्षण अथवा अगम्यागमन इत्यादि जे पाप केले, शूद्र जातीच्या लोकांना तुच्छत्वाने वागविण्याचे जे पाप केले, वैश्यांच्याशी अथवा इतर पूज्य अशा लोकांच्याशी अप्रामाणिक वर्तन करण्याचे जे पातक केले आणि एखाद्या प्रेमळ दंपत्यामध्ये वितुष्ट आणण्याचे जे विशेष पातक आम्ही केले, त्या सर्व प्रकारच्या पातकांचा तू नाश करणारा आहेस. यास्तव, तुझी ही आहुती आम्ही वरुण देवाला अर्पण करतो. ४ अध्वर्युप्रभृति - यजमानपत्नीसुध्दा सर्व अनुष्ठानकर्त्यांनी सुखप्राप्तीच्या इच्छेने मंत्ररूप वाणीच्या उच्चारासह करंभपात्राच्या होमापर्यंतचे सर्व कर्म पूर्ण केले आहे. 'देवांना उत्तम प्रकारे हवी प्रदान करणाऱ्या हे अध्वर्युप्रभृतिकार्यकर्ते हो, देवांच्यासाठी हे कर्म पार पाडलेले तुम्ही आता आपापल्या घरी जा. (अनुवाक ३).

'अग्निरनीकवान्' म्हणजे सैन्यासह असणाऱ्या देवतेसाठी आठ कपालांवर

भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा भाग सकाळी सूर्योदय होत असतांना करावा. अनिष्टाचे निवारण करणाऱ्या 'मरुत्' नामक देवाच्या करता साळीच्या तांदुळाचा भात शिजवून दुपारी म्हणजे बरोबर मध्यावर सूर्य येत असतांना त्याचा याग करावा. गृह आणि यज्ञ या दोहोंचे पालन करणाऱ्या मरुतांना संतुष्ट करण्याकरता यजमानाच्या घरी जितक्या गाई असतील तितक्या सर्वांचे दूध काढून त्या दुधात शिजविलेल्या चरूचा सायंकाळी सूर्यास्त समयी याग करावा.

हे दर्वि, तू दुधात शिजविलेल्या भातावरील काढलेल्या घट्ट सायीने पूर्ण भरली गेल्यावर इंद्राजवळ जाऊन पोच. आणि त्याच्या प्रसादाने प्राप्त झालेल्या बलरूपी धनाने तू चांगली परिपूर्ण झालीस म्हणजे आमच्याकडे परत ये. शंभर यज्ञ करणाऱ्या हे इंद्रदेवा, आपण दोघे परस्परांमध्ये वस्तुरूपी धनानेच विक्री करू म्हणजे वस्तूंची देवघेव करू. एखादा माणूस आपल्या जवळचे द्रव्य दुसऱ्यास देऊन त्याच्या जवळ असलेले तांदूळ वगैरे पदार्थ विकत घेतो, त्याप्रमाणे तुला शिजलेल्या भातावरील घट्ट साय देऊन मी तुझ्या पासून अन्न व बल विकत घेईन. २ हे इंद्रदेवा, जे मला हवे असेल ते तू मला दे व तुला जे हवे असेल ते मी तुला देतो. तू मला देशील ते मजपाशीच कायम ठेव व मी तुला देईन ते तुजजवळच कायम ठेवीन. अशाच प्रकारे मला हवे असेल ते तू वरचेवर मला आणून देत जा आणि तुला हवे असेल ते मी तुला वरचेवर आणून पोचते करीन. नृत्यरूपाने क्रीडा करणाऱ्या 'मरुत्' नामक देवांच्यासाठी सात कपालांच्या गटावर भाजलेल्या पुरोडाशाचा सूर्योदयाबरोबर याग करावा. नंतर 'अग्नि' देवतेकरता आठ कपालांवर भाजलेला पुरोडाश, 'सोम' देवतेसाठी 'चरू' म्हणजे शिजलेला भात, 'सविता' देवतेकरिता बारा कपालांवर भाजलेला पुरोडाश, 'सरस्वती' देवतेसाठी शिजविलेला चरू, 'पूषा' देवतेसाठी चरू, इंद्र व अग्नी या दोघांच्यासाठी अकरा कपालांवर भाजलेला पुरोडाश, 'इंद्र' देवतेसाठी चरू आणि 'विश्वकर्मा' देवतेकरता एकाच कपालावर भाजलेला पुरोडाश, या प्रमाणे तयार केलेल्या हविर्द्रव्यांनी अग्न्यादि आठ देवतांचे यजन करावे. (अनुवाक ४).

पितरांचा स्वामी असलेल्या 'सोम' देवासाठी सहा कपालांच्या समूहावर भाजलेला पुरोडाश, वेदीत पसरलेल्या दर्भांवर बसणाऱ्या पितरांच्या करता, 'धाना' म्हणजे भाजलेले सातू, आणि अयज्ञनिष्ठ अशा पितरांच्यासाठी 'मंथ'

म्हणजे जिचे वासरू मेलेले आहे अशा गाईच्या दुधात कालविलेले भाजक्या सातूंचे पीठ, अशा प्रकारे हविर्द्रव्ये तयार करून सोमादि तीनही देवांचे यजन करावे.

१ हे परमपूज्य पितृदेवा, तुला हा भाताचा हवि:शेषरूपी अन्नाचा पिंड मी दिला आहे. त्याचप्रमाणे तुझ्या अनुयायांनाही हाच पिंड दिला आहे. २ हे पितामह, तुला आणि तुझ्या अनुयायांना हा पिंड मी दिला आहे. ३ हे प्रपितामह, तुला आणि तुझ्या अनुयायांना हा पिंड मी दिला आहे. ४ हे पितरहो, तुम्हाला दिलेल्या पिंडांच्या ठिकाणचा अंश यथाविभाग सेवन करून तृप्त व्हा. ५ हे धनवंता अग्निदेवा, उत्कृष्ट अशा कृपाकटाक्षाने आमच्याकडे पाहणाऱ्या तुला आम्ही तृप्त करीत आहो. तू देखील आम्ही अर्पण केलेल्या अन्नाने आपला रथ भरून आम्ही स्तुती केल्यानंतर तुला इच्छेस येईल त्या ठिकाणांना अनुलक्षून निघून जाशील. हे इंद्रदेवा, तुझे घोडे तुझ्या रथाला जोडलेलेच आहेत. ६ पितरांनी आपला हविर्भाग सेवन केला आहे व त्या योगाने ते हर्षित झाले आहेत. आणि म्हणूनच आमच्याविषयी प्रेमाने सद्गदित होऊन ते आपली मस्तकादि अंगे खालीवर डोलवीत आहेत. स्वत:च्या तेजाने प्रकाशमान होणारे व ब्राह्मणाप्रमाणे हविर्द्रव्यरूपी अन्नाचे भोजन करून तृप्त झालेल्या पितरांनी नवोदित अशा स्फूर्तीने ‘फार उत्तम’ ! अशा प्रकारच्या भाषणांनी आम्ही अर्पिलेल्या हविर्द्रव्याची पुष्कळ प्रशंसा केली आहे. हे इंद्रा, हिरव्या रंगाचे तुझे दोन्ही घोडे तुझ्या रथाला जोडून सज्ज आहेत. ७ पितरांनी हविर्भाग सेवन केला आहे. पितर तृप्त झाले आहेत व पितरांनी आम्हालाही तृप्त केले आहे. पितरांनी आम्हास पवित्र केले आहे. ८ शांतचित्त अशा हे पितरांनो, अन्नपाण्याची सोय असलेल्या व पूर्वीपासून वाहत असलेल्या प्रशस्त मार्गांनी तुम्ही परत जा. आणि त्या पितृलोकाचे ठिकाणी जे पितर यमराजासह त्याच्याच बैठकीवर बसून आनंदित होत असतात, त्या पितृलोकातील सर्व वृत्तांत जाणणाऱ्या पितरांच्या सन्निध जाऊन पोहोचा. ९ मनुष्यांची प्रशंसा करण्यास योग्य अशा वाक्यसमूहाने आणि पितरांनाही मननीय वाटतील अशा वाक्यांनी पितरांच्याच अनुष्ठानांत गढून राहिलेल्या मनाला आम्ही आमच्या ठिकाणी लौकर बोलावीत आहो. १० यज्ञकर्माच्या अनुष्ठानांसाठी, ते तें अनुष्ठान करण्यास पुरेसे सामर्थ्य संपादन व्हावे म्हणून, आणि चिरकाल जीवन व चिरकाल सूर्यदर्शन यांचा लाभ व्हावा म्हणून आमचे मन आमच्याकडे पुन्हा परत येवो. ११ हे पितर हो, देवांच्याशी संबद्ध असलेला जनसमूह आमचे कर्मानुष्ठानतत्पर असे मन आम्हाला पुन: पुन: परत देवो. आम्ही तुमच्या

कृपेने अनेक संवत्सरांच्या संघातरूपाने असणाऱ्या दीर्घकालपर्यंत जीवनाचा उपभोग घेऊ. १३ पृथ्वी अंतरिक्ष व द्युलोक या तिन्ही लोकांत राहणारांना त्रास होईल अशा प्रकारचे कृत्य करण्याची जर मी आपल्या मनाने इच्छा केली असेल, अथवा माझी माता व पिता यांना दुःख होईल असे काही करण्याची जर मी आपल्या मनाने इच्छा केली असेल, तर त्या पापापासून अग्निदेव मला पूर्ण मुक्त करो. या शिवायही जी काही पातके मी केली असतील त्या सर्व पातकांपासून तो मला मुक्त करून पापरहित करो. (अनुवाक ५).

आपल्या घरात जितकी मनुष्ये असतील त्यांपेक्षा एक अधिक इतके पुरोडाश एकाच कपालावर भाजून तयार करावे. आणि त्यांचा याग करावा ते 'त्र्यंबक' नांवाच्या रुद्रदेवाला समर्पण करावेत.

१ आमच्या घरात आम्ही जितकी मनुष्ये राहत आहो, तितक्या सर्वांना सुखकर होईल असे हे कर्म आम्ही केले आहे. २ हे मूत तू जणो पशूंचे मूर्तिमंत सुखच आहेस. यास्तव, तू यजमानाला सुख दे व मज अध्वर्यूलाही सुख दे. ३ 'रुद्र' नांवाचा या जगात एकच देव आहे. दुसरा कोणीही नाही. ४ हे रुद्रदेवा, उंदीर हा तुझा आवडता पशू आहे. त्या पशूचे तू सेवन कर. ५ हे रुद्रदेवा, हा पात्रात भरून घेतलेला पुरोडाशांचा अंशरूप हविर्भाग तुझा आहे. भगिनीप्रमाणे तुझे हित करणाऱ्या पार्वतीसह तुला अर्पण केलेल्या त्या भागाचे सेवन कर. ६ हे रुद्रदेवा, माझ्या गाईला, घोड्याला व कुटुंबातील प्रत्येक मनुष्याला व मला स्वतःला तात्कालिक अथवा दीर्घकालिक रोगापासून मुक्तता होईल असा औषधोपाय करण्याची प्रेरणा करून आम्हा सर्वांना आरोग्यसंपन्न कर. ७ उत्कृष्ट आरोग्य जेणे करून होईल असे करून माझ्या ओझे वाहणाऱ्या मेंढयाला व मला दूध देणाऱ्या बकरीला ती दोघे रोगरहित होऊन सुखाने हिंडू फिरू लागतील असे कर. ८ हे पार्वतीमाते, क्रुध्द स्वभावाच्या व त्रिनेत्रधारी रुद्रदेवाला अर्पण करण्यासाठी पुरोडाशाचे हे अवदान मी भरून घेतले आहे. या पुरोडाशावदानाचा स्वीकार करून तो भगवान रुद्र जेणे करून आम्हाला सर्वतोपरी श्रेष्ठ करील, जेणे करून आम्हाला धनयुक्त करील, जेणे करून आम्हाला गोमहिष्यादि पशुसंपत्तीने संपन्न करील आणि जेणे करून तो आम्हाला शास्त्रार्थाविषयी निश्चित अशा बुद्धीने युक्त करील अशा प्रकारे तू त्याला आमच्या विषयी प्रेरणा कर. ९ सुगंधयुक्त असे शरीर असलेला व पुष्टिवर्धक अशा त्रिनेत्रधारी रुद्रदेवाचे

मी यजन करतो. वाळुक अथवा त्यासारखे दुसरे एखादे फळ पूर्ण परिपक्व झाल्यानंतर देठापासून आपोआप मुक्त होते त्याप्रमाणे मी त्र्यंबक देवाच्या कृपेने मृत्यूपासून मुक्त होईन. स्वर्गलोकापासून मात्र केव्हाही मुक्त होणार नाही. १० हे रुद्रदेवा, ह्या उंच वृक्षांच्या खांदीवर दर्भतृणांच्या मुढ्यात भरून बांधून ठेवलेला पुरोडाशसमूहरूपी हविर्भाग तुझा आहे. याचे सेवन कर. हा भाग तुझे 'पाथेय' म्हणजे वाटेने जातानाची क्षुधा निवारण करणारे खाद्यच आहे असे समज. आणि या पाथेयासह तू मजवत् नांवाचा पर्वत ओलांडून पलिकडे जा. ११ हा 'पिनाक' नांवाचे धनुष्य धारण करणारा व हत्तीचे कातडे पांघणारा रुददेव आमचा विरोध करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी आपल्या धनुष्याला बाण लावून सदैव सज्ञ असो. (अनुवाक ६).

'ऐन्द्राग्र' म्हणजे इंद्र व अग्नी या दोन देवांना मिळून बारा कपालांच्या समूहावर भाजलेला पुरोडाश, 'विश्वेदेव' नांवाच्या देवांच्या करता शिजविलेला भात, वायू व सूर्य या दोघांच्यासाठी असणाऱ्या इंद्रासाठी बारा कपालांच्या गटावर भाजलेला पुरोडाश, वायुदेवतेकरता गाईचें दूध आणि सूर्यदेवासाठी एकाच कपालावर भाजलेला पुरोडाश, याप्रमाणे हविर्द्रव्ये तयार करून त्यांच्या योगाने इंद्राग्नी इत्यादि देवांचे यजन करावे. या कर्माच्या सांगतेसाठी बारा बैल जोडले जाणारा नांगर ऋत्विजांना दक्षिणा म्हणून द्यावा. अग्निदेवतेकरता आठ कपालांवर भाजलेला पुरोडाश, रुद्र देवतेसाठी 'गवीधुक' नांवाच्या अरण्यात उत्पन्न होणाऱ्या धान्याचा शिजलेला भात, इंद्रदेवतेसाठी दही आणि वरुण देवतेसाठी सातूंचा चरू म्हणजे शिजलेला भात, अशा प्रकारे हविर्द्रव्य तयार करून त्यायोगाने अग्न्यादि देवतांचे यजन करावे. आणि तत्सांगतार्थ ओझे वाहणारी गाय दक्षिणा म्हणून द्यावी.

१ पूर्व दिशेस राहणारे अग्निप्रमुख जे देव आहेत, २ दक्षिण दिशेस राहणारे यमप्रमुख जे देव आहेत, ३ पश्चिम दिशेस राहणारे सविता आदिकरून जे देव आहेत, ४ उत्तर दिशेस राहणारे वरुणप्रमुख जे देव आहेत, ५ आणि उर्ध्व दिशेस राहणारे बृहस्पतिप्रमुख असे जे राक्षसांचा नाश करणारे देव आहेत ते राक्षसांचा नाश करून आमचे रक्षण करोत. त्याचप्रमाणे कर्मानुष्ठानानेही आमचे रक्षण करोत. त्या देवांना नमस्कार असो. त्या देवांनाही आज्याहुती अर्पण असोत. ६ मला प्रतिकूल असलेले राक्षस - त्यांचा नाश करण्याकरिता मी एकत्र जुळविले आणि जाळून खाक केले. आता मी जाळून टाकलेल्या राक्षसांचे आजूबाजूस राहणारे अनुयायीही जाळून खाक करतो. ७ राक्षसनाशक

...आहुती समर्पण असो. ८ राक्षसांचा नाश करणाऱ्या यमदेवाला ही आहुती समर्पण असो. ९ राक्षसांचा नाश करणाऱ्या सवितादेवाला ही आहुती अर्पण असो. १० राक्षसांचा नाशक अशा वरुण देवाला ही आहुती अर्पण असो. ११ उपासकाकडून सेवा घेतलेल्या व राक्षसांचा नाश करणाऱ्या बृहस्पतिदेवाला ही आहुती समर्पण असो. या कर्माच्या सांगतेसाठी तीन घोडे जोडले जाणारा रथ दक्षिणा म्हणून द्यावा. १२ सर्वप्रेरक सविता देवाच्या आज्ञेने अश्विनीकुमारांच्या बाहूंनी व पूषा देवाच्या हातांनी राक्षसांचा वध व्हावा म्हणून मी आहुती देत आहे. राक्षस मारला राक्षसाचा वध केला.

या कर्माच्या सांगतेसाठी यजमानाने आपले राहते घर दक्षिणा म्हणून द्यावे. (अनुवाक ७).

'धाता' देवतेसाठी बारा कपालांच्या समूहावर भाजलेला पुरोडाश, 'अनुमति' देवतेकरिता चरू, त्याचप्रमाणे 'राका', 'सिनीवाली' व 'कुहू' या तीन देवतांच्यासाठी प्रत्येकी वेगवेगळा चरू याप्रमाणे हविर्द्रव्ये तयार करून 'धाता' इत्यादि देवांचे यजन करावे. सांगतासिध्यर्थ गायबैलांची जोडी ऋत्विजांना दक्षिणा द्यावी. अग्नी व विष्णू या दोन देवतांना मिळून अकरा कपालांवर भाजलेला पुरोडाश, इंद्र व विष्णू या दोन देवतांना मिळून अकरा कपालांवर भाजलेला पुरोडाश आणि 'विष्णू' या देवतेसाठी तीन कपालांच्या समूहावर भाजलेला पुरोडाश, याप्रमाणे हविर्द्रव्ये तयार करून 'अग्निविष्णू' इत्यादि देवांचे यजन करावे. सांगतेसाठी ओझे वाहणारा ठेंगणा बैल ऋत्विजांना दक्षिणा म्हणून द्यावा. अग्नी व सोम या दोन देवतांना मिळून अकरा कपालांच्या गटावर भाजलेला पुरोडाश, इंद्र व सोम या दोन देवतांना मिळून अकरा कपालांच्या गटावर भाजलेला पुरोडाश व 'सोम'देवतेसाठी चरू याप्रमाणे हविर्द्रव्ये तयार करून अग्निसोमप्रभृति देवतांचे यजन करावे. सांगतेसाठी कपिलवर्णाचा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. सोम व पूषा या दोन देवतांना मिळून एक चरू, इंद्र व पूषा या दोन देवतांना मिळून एक चरू आणि पूषा देवतेसाठी चरू अशी हविर्द्रव्ये तयार करून सोम व पूषा इत्यादि देवतांचे यजन करावे. सांगतेसाठी श्यामवर्ण बैल ऋत्विजांना दक्षिणा म्हणून द्यावा. बारा कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून त्याचा 'वैश्वानर' देवतेसाठी याग करावा. सांगतार्थ सुवर्णाची दक्षिणा द्यावी. 'वरुण' देवतेसाठी सातूचा भात शिजवून त्याचा याग करावा. ऋत्विजांना एक घोडा दक्षिणा म्हणून द्यावा. (अनुवाक ८).

राजाने 'ब्रह्मा' नामक ऋत्विजाच्या घरी जाऊन 'बृहस्पति'देवतेसाठी

चरू शिजवावा आणि त्याचे यजन करावे. पाठीवर पांढरा रंग असलेला बैल त्या इष्टीची दक्षिणा म्हणून द्यावा. क्षत्रिय जातीच्या कोणा मनुष्याच्या घरी जाऊन राजाने 'इंद्र' देवतेसाठी इष्टी करावी. म्हणजे अकरा कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून तयार करून इंद्रदेवतेसाठी त्याचे यजन करावे. सांगतेसाठी एक चांगला बैल ऋत्विजांना दक्षिणा म्हणून द्यावा. अभिषिक्त अशा मुख्य राणीच्या मंदिरात जाऊन 'अदिति' देवतेच्या उद्देशाने चरू शिजवून त्या हविर्द्रव्याने 'अदिति' देवतेचे यजन करावे. एक गाय दक्षिणा द्यावी. प्रीती नसलेल्या राजस्त्रियेच्या घरी राजाने जावे आणि 'निर्ऋति' देवतेच्या उद्देशाने चरू शिजवून त्याचा याग करावा. मात्र निर्ऋति देवतेसाठी भात शिजवावयाचा तो काळसर रंगाचे साळीचे भात घेऊन त्याच्या प्रत्येक दाण्यावरील टरफल नखांनी सोलून तयार केलेल्या तांदुळाचा असावा. या इष्टीच्या सांगतेसाठी काळ्या रंगाची व शिंगे मोडलेली एक गाय दक्षिणा म्हणून द्यावी. सेनापतीच्या घरी जाऊन आठ कपालांच्या समूहावर पुरोडाश तयार करावयाचा. अग्निदेवतेच्या उद्देशाने त्याचे यज़न करावे. सांगतेसाठी सुवर्णाची दक्षिणा द्यावी. राजाने सारथ्याच्या घरी जाऊन 'वरुण' देवतेसाठी दहा कपालांच्या समूहावर पुरोडाश तयार करून त्याचे यजन करावे. या इष्टीचे सांगतेसाठी अंड बडविलेला एक बैल ऋत्विजांना दक्षिणा म्हणून द्यावा. ग्रामाधिकाऱ्याच्या घरी जाऊन सात कपालांच्या गटावर भाजलेल्या पुरोडाशाने 'मरुत्' नामक देवांचे यजन करावे. तत्सांगतार्थ पांढरा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. हातात काठी घेऊन अंतःपुराचे संरक्षण करणाऱ्या अधिकाऱ्याच्या घरी जाऊन राजाने बारा कपालांवर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचा 'सविता' देवतेसाठी याग करावा आणि त्याच्या सांगतेसाठी अनेक रंगांची मिसळ असलेला बैल दक्षिणा म्हणून द्यावा. कोषाध्यक्षाच्या घरी जाऊन दोन कपालांवर भाजलेल्या पुरोडाशाने उभयतां अश्विनीकुमारांच्यासाठी याग करावा. एकाच गाईची दोन वासरे दक्षिणा म्हणून द्यावीत. प्रजेकडून उत्पन्नाचा सहावा भाग 'कर' म्हणून वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याच्या घरी जाऊन 'पूषा' देवतेसाठी चरू शिजवावा आणि त्याचे यजन करावे. सांगता म्हणून श्यामवर्णाचा एक बैल ऋत्विजांना दक्षिणा म्हणून द्यावा. द्यूतकाराच्या म्हणजे पैज लावून खेळण्याचा छंद करणाराचे घरी जाऊन 'चरू' शिजवावा आणि त्याचा 'रुद्र' देवतेला उद्देशून याग करावा. चित्रविचित्र रंगाचा व शेपूट लांब असलेला एक बैल सांगतेसाठी दक्षिणा म्हणून द्यावा. राजाने आपल्या घरच्या अग्निहोत्रशाळेत उपासकाचे उत्कृष्ट पालन करणाऱ्या 'इंद्र'देवासाठी व पापापासून मुक्त करणाऱ्या 'इंद्र' देवासाठी अकरा कपालांच्या

गटावर एक एक पुरोडाश भाजून तयार करावा आणि त्याचे यजन करावे. 'स्विष्टकृत्' यागापूर्वी अध्वर्यूने 'अयं नो राजा' या मंत्राचे पठन करावे.

१ हा आमचा राजा शत्रूचा संहार करणारा राजा होऊन शत्रूचा वध करो मित्र व बृहस्पती या दोन देवतांच्या उद्देशाने 'मैत्राबार्हस्पत्या' अशी संज्ञा असलेली (दीक्षणीया) इष्टी करावी. आतल्या बाजूने आंबट फुलांच्या किंवा फळांच्या रसाचा लेप केलेल्या कातड्याचे पिशवीत किंवा बुधलीत, पांढऱ्या रंगाचे वासरू असलेल्या पांढऱ्या गाईचेच दूध काढावे. म्हणजे ते विरजण न घालता विरजले जाते व दह्यासारखे घट्ट बनते. मग त्यात 'बोर' ठेचून त्याचे कूट मिसळले म्हणजे ते ताकासारखे विरघळते. या पदार्थास 'स्वयंमथित आज्य' म्हणजे आपोआप बनलेले आज्य अशी संज्ञा आहे. भात करण्याकरिता जे तांदूळ घ्यावयाचे असतील ते निवडावेत आणि त्यात जे अखंड म्हणजे ज्यांची टोके कायम आहेत, कण्या झालेल्या नाहीत असे तांदूळ वेगळे करावेत व ज्या तांदुळांच्या कण्या झाल्या आहेत ते वेगळे करावेत. वाऱ्याने मोडून पडलेल्या पिंपळाच्या फांदीच्या लाकडाचे चौकोनी पात्र तयार करून त्या पात्रात पूर्वोक्त आज्य ओतावे आणि त्यामध्ये अखंड तांदूळ घालून 'मित्र' देवतेसाठी भात शिजवावा. नंतर पांढऱ्या रंगाचे वासरू असलेल्या पांढऱ्या गाईच्या दुधात मोडक्या म्हणजे कण्या झालेल्या तांदुळांचा भात 'बृहस्पति' देवतेसाठी शिजवावा व अनुक्रमे दोन्ही देवतांचे यजन करावे. या यजनासाठी उद्हनन म्हणजे खणावयाचा शास्त्रीय संस्कार न केलेली वेदी असावी. त्याचप्रमाणे शास्त्रोक्त विधीने न कापलेले, अर्थात् मंत्र न म्हणता कापलेले 'बर्ही' म्हणजे दर्भ असावेत. 'इध्म' संज्ञक समिधाही मंत्र न म्हणताच बांधून घेतलेल्या असाव्यात. या भागाच्या सांगतेसाठी ज्या गाईचे दूध काढले तीच पांढरी व पांढऱ्या रंगाचेच वासरू असलेली गाय दक्षिणा म्हणून द्यावी. (अनुवाक ९).

काळ्या रंगाच्या साळीच्या भाताचे तांदूळ करून त्या तांदुळांचा भात आठ कपालांच्या समूहावर शिजवावा आणि गृहपतिसंज्ञक अग्नीच्या उद्देशाने त्याचे यजन करावे. 'वनस्पति' अशी संज्ञा असलेल्या सोमदेवतेसाठी साव्यांच्या तांदुळांचा भात, सत्याची प्रेरणा करणाऱ्या 'सत्यप्रसव' ही संज्ञा असलेल्या सवितादेवासाठी साठ दिवसात पिकणाऱ्या भाताच्या तांदुळांचा बारा कपालांच्या समूहावर शिजविलेला भात, पशुपतिसंज्ञक देवतेकरिता वन्य गव्हापासून तयार केलेला चरू, बृहस्पतिसंज्ञक वाचस्पतीसाठी नीवारसंज्ञक धान्याचा चरू, ज्येष्ठ ही संज्ञा असलेल्या इंद्रासाठी जाड्या तांदुळांच्या पिठाचा अकरा कपालांवर

भाजलेला पुरोडाश, 'सत्य' ही संज्ञा असलेल्या मित्रदेवतेसाठी 'आंब' या नांवाच्या धान्याचा भात, व 'धर्मपती' अर्थात् धर्मपालक अशी संज्ञा असलेल्या वरुणदेवतेसाठी सातूंचा चरू, याप्रमाणे हविर्द्रव्ये तयार करून वनस्पतिसंज्ञक सोम इत्यादि देवतांचे अनुक्रमे यजन करावे.

१ हे यजमान, सर्वप्रेरक असा सवितादेव तुला तुझ्या सर्व नोकरांचा तू अधिपती व त्यांना आज्ञा करणारा आहेस असे समजो. अग्नी सर्व गृहस्थाश्रम पालन करणारांचा तू अधिपती आहेस असे तुला समजो सोम तुला वनस्पतींच्यावर आधिपत्य करणारा,रुद्र तुला पशूंच्यावर आधिपत्य करणारा बृहस्पती हा तुला स्वतःच्या व इतरांच्या वाणीवर आधिपत्य करणारा, इंद्र तुला श्रेष्ठ अशा मांडलिक राजांवर आधिपत्य करणारा, मित्र तुला सत्य भाषण करणारांच्यावर आधिपत्य करणारा आणि वरुण तुला स्वधर्माचे पालन करणारांचे आधिपत्य करणारा तू आहेस असे समजो. हे देव हो, जे जे तुम्ही यजमानाला सर्व कार्याविषयी प्रेरणा करणारे आहात ते ते सर्व ह्या देवदत्ताच्या पुत्राला व यज्ञदत्ताच्या नातवाला शत्रू उत्पन्न न होईल अशा क्षत्रिय कुलाचे तो संरक्षण करील, महनीय व निष्प्रतिबंध अशा प्रकारे सर्वांचे तो नियमन करील आणि समुद्रवलयांकित अशा पृथ्वीवरील सर्व लोकराज्यांचे तो आधिपत्य करील अशा प्रकारे त्याला प्रेरणा करा. २ हे भरतखंडनिवासी क्षत्रियवैश्यादि जातीतील धनिक लोक हो, हा तुमचा राजा असो. ३ मात्र आम्हा ब्राह्मणांचा 'सोम' हाच राजा असो. ४ यजमानाला अपेक्षित असे समुद्रवलयांकित अशा सर्व पृथ्वीचे, सर्वांनी वाखाणण्यास योग्य असे हे राज्य वरुणाने त्याच्या ठिकाणी प्रतिष्ठित केले आहे. वरुणाने स्वकीयत्वाने यजमानाच्या शरीराचा आश्रय केला आहे. आम्ही देखील अत्यंत शुद्ध अशा अग्न्यादि देवतांच्या अनुज्ञेने स्वकर्तव्य करण्यास समर्थ झालो आहोत. आणि म्हणूनच अग्न्यादि देवतांची अनुज्ञा संपादन केलेले आम्ही महनीय अशा राजसूय यज्ञाचे नांव ध्यानात ठेवीत आहो. ५ आम्ही सर्व ऋत्विज वरुणस्वरूप अशा यजमानाच्या अनुज्ञेचे आपआपले कर्तव्य पार पाडण्यास योग्य झालो आहोत. सर्वांचा मित्र असलेल्या सूर्यदेवाने आमच्या संरक्षकत्वाच्या नात्याने आमच्याकडे येऊन आम्ही आमच्या वैऱ्यांचे अतिक्रमण करू म्हणजे आम्ही त्यांना पराभूत करू असे सर्व घडवून आणले आहे. यज्ञात गुंतलेल्या ऋत्विजांनी यज्ञाचे रक्षण केले आहे. ब्राह्मणादि त्रैवर्णिक यज्ञांमध्ये ज्याचा विस्तार करतात त्या अग्निदेवाने वृध्दापकालामुळे आम्हाला शैथिल्य प्राप्त होईल अशा प्रकारे दीर्घायुषी केले आहे. ६ मी पुढे टाकलेल्या हे पहिल्या पाऊला, तू जणू

काय [illegible] व सर्वेश्वर अशा त्रिविक्रमावतारधारी विष्णूचेच पहिले पाऊल आहेस. म्हणजे विष्णूने पहिले पाऊल टाकून जिंकलेला भूलोकच आहेस. ७ हे माझ्या दुसऱ्या पाऊला, तू जणू काय विष्णूचे दुसरे पाऊल आहेस. म्हणजे विष्णूने, दुसरे पाऊल टाकून आक्रमण केलेला जणू अंतरिक्षलोकच आहेस. ८ हे माझ्या तिसऱ्या पाऊला, तू जणू काय विष्णूचे म्हणजे त्याने टाकलेले तिसरे पाऊल आहेस. अर्थात् त्याने तिसरे पाऊल टाकून जिंकलेला तू जणू काय द्युलोकच आहेस. (अनुवाक १०).

१ हे सरस्वतीनदीतील उदकांनो, तुम्ही यज्ञाच्या उद्देशाने येणारी आहात. २ हे समुद्रा, तू उदकांचा अधिपती आहेस. ३ पलीकडे असणाऱ्या लाटेकडे वाहत जाऊन तिच्यावर आदळणाऱ्या लाटेच्या रूपाने असणाऱ्या हे उदका, तू सेचन करणारे म्हणजे जवळच्या वस्तूस भिजवणारे आहेस. ३ पलीकडे असलेल्या लाटेकडे वाहत जाऊन तिच्यावर आदळणाऱ्या लाटेच्या रूपाने असणाऱ्या हे उदका, तू सेचन करणारे म्हणजे जवळच्या वस्तूस भिजविणारे आहेस. ४ अलीकडे असलेल्या लाटेकडे वाहत येऊन तिच्यावर आदळणाऱ्या लाटेच्या रूपाने असणाऱ्या हे उदका, तू सेचनसमर्थ अशा जलराशिरूप सेनेला धारण करणारे आहेस. ५ विहीरीमध्ये असणाऱ्या हे उदकांनो, एखादा वैश्य पुष्कळ मनुष्यवस्ती असलेल्या निवासयोग्य अशा नगरात राहतो त्याप्रमाणे पुष्कळ झऱ्यांनी युक्त असलेल्या व निवासयोग्य अशा विहिरीत तुम्ही राहणारी आहांत. ६ वाऱ्याच्या आघाताने स्वस्थानापासून पुढे पुढे वाहत जाणाऱ्या बुडबड्यांच्या रूपाने असणाऱ्या हे उदकांनो, तुम्ही जणू मरुतांचे बलच आहात. ७ ऊन्ह पडलेले असतांना पर्जन्यवृष्टीच्या रूपाने जमिनीवर पडणाऱ्या हे उदकांनो, तुम्ही सूर्याप्रमाणे तेजस्वी आहात. ८ सूर्यादिकांचे प्रतिबिंब ग्रहण करणाऱ्या हे उदकांनो, तुम्ही जणू काय सूर्याची त्वचाच आहात. ९ एकाच जागी स्थिर राहणाऱ्या हे उदकांनो, तुम्ही मन्दरूप आहात. १० धुक्याने वेष्टित झालेल्या हे उदकांनो, तुम्ही जाणाऱ्या मनुष्याला विरोध करणारे नसून वश्य होणारे आहांत. ११ गाईच्या गर्भाला वेष्टून असणाऱ्या बारिक त्वचेच्या आत राहणाऱ्या हे उदकांनो, तुम्ही गाईच्या गर्भाचे रक्षण करण्यास समर्थ आहात. १२ दुधामध्ये अंशरूपाने राहणाऱ्या हे उदकांनो, तुम्ही सर्व विश्वाचे पोषण करणारे आहात. १३ दह्यामध्ये अंशरूपाने राहणाऱ्या हे उदकांनो, तुम्ही सर्व जनांचे पोषण करणारे आहात. १४ तुपाप्रमाणे तुळतुळीत दिसणाऱ्या हे उदकांनो, तुम्ही जणू काय, अग्नीचे मूर्तिमंत तेजच आहात. १५ मधाप्रमाणे घट्ट दिसणाऱ्या उदकांनो, तुम्ही उदकांचा व ओषधींचा सारभूत असा रस

आहात. १६ हे उदकांनो ज्यांच्या योगाने पूर्व काळी मित्रावरुणांना अभिषेक केला गेला व ज्यांनी शत्रूंने अतिक्रमण करून इंद्राला पार नेले अशा प्रकारच्या मधूर व बलोत्पादक अशा तुम्हा उदकांचे,'राजसूर्य' यज्ञाचे चिंतन करणाऱ्या ऋत्विजांनी ग्रहण केले आहे. १७ हे उदकांनो, तुम्ही राष्ट्र संपादन करून देणारी आहात. यास्तव, ह्या यजमानाला राष्ट्र मिळवून द्या. १८ हे उदकांनो, तुम्ही राष्ट्रप्रद आहात म्हणून अमुक नावाच्या राजाला राष्ट्र मिळवून द्या. (अनुवाक ११).

१ हे देवतारूपी उदकांनो, निरनिराळ्या पात्रांमध्ये भरून घेतलेली अत्यंत मधुर असे तुम्ही क्षत्रियराजाला महनीय असे तेज देणारी होऊन मधुर अशी इतर उदकांशी मिसळून जा. २ हे उदकांनो, कोणाकडूनही तिरस्कृत न होणारी व सारभूत अशा रसाने संपन्न असलेली तुम्ही या क्षत्रियराजाला महनीय असे तेज देणारी होऊन या ठिकाणी बसा. ३ हे हिरण्या, तू कोणाकडूनही तिरस्कृत होणारे नाहीस. आदरणीय अशा वाणीचा तू जणू बंधूच असून संतप्त अशा अग्नीपासून जन्मलेले आहेस आणि सोमवल्ली विकत घेण्याकरता तू मोबदला म्हणून दिले गेले आहेस. ४ हे उदकांनो, देदीप्यमान चंद्राप्रमाणे आल्हादजनक व अमृताप्रमाणे चवदार आणि 'स्वाहा' असे म्हणून ज्यामध्ये होम केला जातो त्या राजसूय यज्ञासाठी संपादन केलेल्या अशा तुम्हाला कांतिमान्, चंद्राप्रमाणे आल्हाददायक व अमृताप्रमाणे अविनाशी अशा हिरण्याने उत्कृष्ट प्रकारे शुद्ध करतो. ५ स्वतःच्या ठिकाणी अंतर्भूत होऊन राहिलेल्या वरुणाला हर्ष देणारी, दीप्तिमंत, बलोत्पत्तीला कारणभूत होणारी, सातूसारख्या धान्याप्रमाणे भाजण्यास अयोग्य व यज्ञकर्माची इच्छा करणारी अशी ही उदके, वस्त्राप्रमाणे आच्छादन करून उदकांचा जणू पुत्रच अशा वरुणराजाने मातेप्रमाणे प्रेम करणाऱ्या उदकांना राहण्यास योग्य अशा घराप्रमाणेच मानून त्यांच्या अंतर्भागी वसती केली. ६ हे तुपात भिजवून वाळविलेल्या वस्त्रा, तू जणू काय क्षत्रियवर्णाच्या ह्या यजमानरूपी गर्भाला वेढून असणारी बारीक (तलम) त्वचा आहेस. ७ पागोटे या संज्ञेने ओळखल्या जाणाऱ्या शिरोभूषणवस्त्रा, तू जणू काय, क्षत्रियवर्णाच्या ह्या यजमानाचे जन्मस्थानच आहेस. ८ अग्निदेवाने आता 'गृहपतित्व' संपादन केले आहे. ९ इंद्रदेवाने आता लांबवर पसरणारी कीर्ती संपादन केली आहे. १० पूषादेवाने आता विविध प्रकारचे ज्ञान संपादन केले आहे. ११ मित्र व वरुण या दोघा देवांनी आता सत्यवचनाची वृध्दी संपादन केली आहे. १२ द्युलोक व पृथ्वी यांनी आता नियमाने स्वकर्तव्य करण्याचे व्रत संपादन केले आहे.

१३ देवमाता अदितिदेवीने सर्व देवांच्या शरीराशी तादात्म्य संपादन केले आहे. १४ हा सर्वांच्या समोर असलेला राजा (नरसिंहवर्मा) (राजेंद्रवर्म्याचा) पुत्र (अथवा नातू) या प्रजेच्या व ह्या राष्ट्राचे ठिकाणी महनीय असे क्षात्रतेज, महनीय असे आधिपत्य व महनीय असे 'जानराज्य' म्हणजे लोकच्छंदानुवर्ती असे राज्य चालविण्याला यथायोग्य झाला असून त्याने ह्या सर्व गोष्टींना आवश्यक अशा गुणांचे संपादन केले आहे. १५ हे धनिक लोक हो, हा आता तुमचा राजा झाला आहे. १६ आम्हा ब्राह्मणांचा नक्षत्रराज चंद्रच राजा असो. १७ हे धनुष्या, तू जणू काय इंद्राचे वृत्रासुराचा घात करणारे वज्रच आहेस. यासाठी, तुझ्या योगाने हा राजा आपल्या शत्रूचा वध करो. १८ हे बाण हो, तुम्ही शत्रूंना पीडा करणारे आहात. १९ हे माझ्या बाणांनो, शत्रूकडून मजवर बाणांचा आघात होत असतांना मी आपला बचाव करण्यासाठी पाठमोरा होईन त्या वेळी, आडवा होईन त्या वेळी, खाली वाकेन त्या वेळी, माझे रक्षण करा. चारही दिशांकडून मजवर बाणवृष्टी होत असतांना माझे रक्षण करा. २० शत्रूचे निवारण करणाऱ्या हे यजमानाच्या डाव्या हाता, आणि शत्रूंना मारक अशा हे उजव्या हाता, लोखंडाच्या खांबाप्रमाणे अत्यंत कणखर असलेले तुम्ही प्रत्येक दिवशी उष:कालाचा प्रकाश उत्पन्न झाल्यावर व सूर्योदयानंतरचा प्रकाश उत्पन्न झाला असतांना तुम्ही रथाच्या मेघडंबरीवर आरोहण करा व तेथून यत्किंचित् फूट न पडता एकवटून खड्या असलेल्या स्वकीय सेनेची अनुग्रहदृष्टीने, आणि एकमेकापासून फुटून इतस्तत: पळ काढीत असलेल्या शत्रुसेनेची निग्रहदृष्टीने पाहणी करा. (अनुवाक १२).

१ हे यजमान, तू पूर्व दिशेस गमन कर. छंदांपैकी 'गायत्री' छंद तुझे रक्षण करो. 'त्रिवृत्' नांवाचा स्तोत्र, 'रथंतर' नांवाचे साम व अग्निनामक देवता तुझे रक्षण करो. ब्राह्मणसमुदाय तुझे द्रव्य रक्षण करो. २ हे यजमान तू उग्र स्वभावाच्या यमाने अधिष्ठित असलेल्या दक्षिण दिशेस जा.छंदांमधील 'त्रिष्टुप्' नांवाचा छंद तुझे रक्षण करो.त्याचप्रमाणे 'पंचदश' स्तोम,बृहत् साम व इंद्र देवता तुझे रक्षण करो. क्षत्रिय ज्ञाती तुझे धन रक्षण करो. ३ हे यजमान, तू वरुणाने पालन केलेल्या व म्हणूनच उत्कृष्ट अशा धान्यांच्या पिकांनी विशेष शोभिवंत दिसणाऱ्या पश्चिम दिशेस जा. छंदांपैकी जगता नांवाचा छंद,स्तोमांपैकी 'सप्तदश' नामक नांवाचा 'स्तोम',सामांपैकी 'वैरूप' नांवाचे साम व देवातांमधील 'मरुत्' नामक देवता तुझे रक्षण करो. वैश्य वर्ग तुझ्या द्रव्याचे रक्षण करो. ४ हे यजमान, तू उत्तर दिशेकडे जा. छंदांपैकी 'अनुष्टुप्' छंद, 'एकविंश' स्तोम, 'वैराज' साम व 'मित्रावरुण' देवता तुझे रक्षण

करो. त्याचप्रमाणे तुझ्या ठिकाणी असलेले बल तुझे द्रव्य रक्षण करो. ५ हे यजमान, तू ऊर्ध्व दिशेस गमन कर. छंदांपैकी 'पंक्ति' नामक छंद, 'त्रिणव' व 'त्रयस्त्रिंश' नांवाचे दोन स्तोम, शक्वर व रैवत नांवाची दोन सामे व बृहस्पतिदेवता तुझे रक्षण करो. तुझे ब्रह्मतेज तुझ्या द्रव्याचे रक्षण करो. ६ हे प्रथम कपाल, तू जणू काय 'ईदृङ्.' नांवाचा 'मरुत्' आहेस. ७ हे द्वितीय कपाल, तू जणू काय 'अन्यादृङ्.' नांवाचा मरुत् आहेस. ८ हे तृतीय कपाल, तू जणू काय 'एतादृङ्.' नांवाचा मरुत् आहेस. ९ हे चतुर्थ कपाल, तू जणू काय 'प्रतिदृङ्.' नांवाचा मरुत् आहेस. १० हे पंचम कपाल, तू 'मित' नांवाचा मरुत् आहेस. ११ हे षष्ठ कपाल, तू जणू 'संमित' नांवाचा मरुत् आहेस. १२ हे सप्तम कपाल, तू जणू 'सभरा' नांवाचा मरुत् आहेस. १३ हे अष्टम कपाल, तू जणू काय 'शुक्रज्योति' नांवाचा मरुत् आहेस. १४ हे नवम कपाल, तू जणू काय 'चित्रज्योति' नांवाचा मरुत् आहेस. १५ हे दशम कपाल, तू जणू काय 'सत्यज्योति' नांवाचा मरुत् आहेस. १६ हे एकादश कपाल, तू जणू काय, 'ज्योतिष्मान्' नांवाचा 'मरुत्' आहेस. १७ हे द्वादश कपाल, तू जणू काय 'सत्य' नांवाचा मरुत् आहेस. १८ हे त्रयोदश कपाल, तू जणू काय 'ऋतपा' नांवाचा मरुत् आहेस. १९ हे चतुर्दश कपाल, तू जणू काय 'अत्यंहा' नांवाचा मरुत् आहेस. २० 'अग्नि' देवतेला ही आहुती समर्पण असो. २१ 'सोम' देवतेला ही आहुती अर्पण असो. २२ 'सविता' देवतेला ही आहुती समर्पण असो. २३ 'सरस्वती' देवतेला ही आहुती समर्पण असो. २४ 'पूषा' देवतेला ही आहुती समर्पण असो. २५ 'बृहस्पति' देवतेला ही आहुती समर्पण असो. २६ 'इंद्र' देवतेला ही आहुती समर्पण असो. २७ 'घोष' देवतेला ही आहुती समर्पण असो. २८ 'श्लोक' नामक देवतेला ही आहुती अर्पण असो. २९ 'अंश' नांवाच्या देवतेला ही आहुती अर्पण असो. ३० 'भग' देवतेला ही आहुती अर्पण असो. ३१ क्षेत्राचे पालन करणाऱ्या 'क्षेत्रपती' देवतेला ही आहुती समर्पण असो. ३२ 'पृथिवी' देवतेला ही आहुती अर्पण असो. ३३ 'अंतरिक्ष' देवतेला ही आहुती अर्पण असो. ३४ 'द्यु' नामक देवतेला ही आहुती अर्पण असो. ३५ 'सूर्य' देवतेला ही आहुती समर्पण असो. ३६ 'चंद्रमा' देवतेला ही आहुती अर्पण असो. ३७ नक्षत्रदेवतांना ही आहुती समर्पण असो. ३८ उदकदेवतांना ही आहुती समर्पण असो. ३९ ओषधिदेवतांना

ही आहुती समर्पण असो. ४० वनस्पतिदेवतांना ही आहुती समर्पण असो. ४१ 'चराचर' नामक देवतेला ही आहुती समर्पण असो. ४२ 'परिप्लव' नामक देवतांना ही आहुती समर्पण असो. ४३ 'सरीसृप' नामक देवतांना ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १३).

१ हे शार्दूलचर्म, तू जणू काय चंद्राची कांतीच आहेस. यास्तव, तुझ्याप्रमाणेच माझ्या शरीराची कांती चंद्रासारखी होवो. २ हे हिरण्य, तू अविनाशी, अर्थात् अखंड टिकणारे आहेस. मृत्यूपासून तू माझे रक्षण कर. ३ अत्यंत प्रकाशमान असणाऱ्या व शंभर छिद्रांनी युक्त असलेल्या हे सुवर्णपात्रा, तू माझे रक्षण कर. ४ चावा घेऊन लोकांना पीडा करणारे सर्प नष्ट केले आहेत. ५ ताम्रधातूच्या रूपाने असलेले हे नमुचिनामक असुराचे मस्तक दूर फेकून दिले. ६ हे यजमान, 'सोम' राजा 'वरुण' राजा आणि धर्म जाणणारे असे, जे आणखी देव असतील ते तुझ्या वाणीला योग्य असे भाषण करण्याची प्रेरणा करोत. ते तुझ्या प्राणवायूला स्वकर्तव्याची प्रेरणा करोत. ते तुझ्या नेत्रांना सूक्ष्म रीतीने सर्वत्र अवलोकन करण्याची प्रेरणा करोत. ते तुझ्या कानांना प्रजाजनांची योग्य अशी गाऱ्हाणी ऐकण्याची प्रेरणा करोत. ७ हे यजमान, नक्षत्रराज चंद्राच्या कांतीने, अग्नीच्या दिव्य तेजाने, सूर्याच्या दीप्तीने, इंद्राच्या इंद्रियशक्तीने, मित्र व वरुण यांच्या सामर्थ्याने व मरुतांच्या बलोत्पादक शक्तीने मी तुला अभिषेक करतो. ८ हे यजमान, तू सर्व क्षत्रियांचा व त्यांच्या क्षत्रिय तेजाचा अधिपती व पालक आहेस. ९ हे यजमान, स्वपराक्रमाने चमकणाऱ्या इतर सर्व राजांना मागे टाकून तूच सर्व पृथ्वीचे पालन कर. १० आत्मीय म्हणून मानलेल्या ह्या यजमानाच्या राज्यातील जमीन पर्जन्यवृष्टीच्या रूपाने सिंचित करणारी व झऱ्यांच्या रूपाने अनेक ठिकाणी प्रादुर्भूत होणारी जी उदके, आम्ही यजमानाला अभिषेक करीत असतांना त्याच्या शरीराच्या अधोभागी, ऊर्ध्वभागी जाऊन पोचली, अर्थात् त्याच्या मस्तकापासून पायांच्या अग्रभागापर्यंत पसरली ती उदके पुन्हा वाफेच्या रूपाने सूर्यकिरणांकडून आकर्षिली जाऊन पर्वताप्रमाणे भासणाऱ्या व पर्जन्याचा वर्षाव करणाऱ्या मेघांच्या पृष्ठभागावर नावेप्रमाणे संचार करीत असतात. ११ हे रुद्रा, तुझे जे परम उत्कृष्ट व जप करणारांना फलप्रदानाने वश करणारे असे 'शिव व पशुपति' इत्यादि नांव आहे, त्या नांवाला अभिषेक करून पात्रात उरलेले हे

उदक समर्पण असो. त्याचप्रमाणे हे उदक 'यम' देवतेला प्रिय असो. १२ हे प्रजापते, या जगात उत्पन्न झालेल्या ह्या ज्या वस्तू आहेत त्या सर्व वस्तू निर्माण करणारा तुझ्याखेरीज दुसरा कोणीही झाला नाही. आम्ही ज्या फलाची इच्छा धरून तुझे यजन करीत आहो, तें फल आम्हाला प्राप्त होवो. तुझ्या अनुग्रहाने आम्ही सर्व प्रकारच्या धनांचे पालक होऊ. (अनुवाक १४).

१ हे रथा, तू जणू काय, इंद्राचे वृत्रासुराचा नाश करणारे वज्रच आहेस. तुझ्या योगाने हा यजमान आपल्या शत्रूचा वध करो. २ हे अश्वा, सर्वांना आज्ञा करणाऱ्या मित्र व वरुण या दोन देवांच्या आज्ञेने व यज्ञाच्या निमित्ताने मी तुला रथाच्या उजव्या बाजूस जोडतो. ३ हे रथा, तू जणू विष्णूचे पहिले पाऊल आहेस. म्हणजे त्याने पहिले पाऊल टाकून आक्रमण केलेला भूलोकच आहेस. ४ हे रथा, तू जणू विष्णूचे दुसरे पाऊल आंहेस. म्हणजे त्याने दुसरे पाऊल टाकून आक्रमण केलेला अंतरिक्ष लोकच आहेस. ५ हे रथा तू जणू काय, विष्णूचे तिसरे पाऊल आहेस, म्हणजे त्याने तिसरे पाऊल टाकून जिंकलेला द्युलोकच आहेस. ६ मरुतांची आज्ञा होताक्षणीच मी शत्रूंच्या वर जय मिळवीन. ७ माझे मन मला अनुकूल असे झाले आहे. ८ माझ्या हस्तपादादि इंद्रियांच्या सामर्थ्याशी मी सुसंगत झालो आहे. ९ हे उपानहा, तू डुकराच्या कातड्याचा बनविलेला आहेस. अर्थात् तू पशूंचा जणू मूर्तिमंत क्रोधच आहेस. यासाठी तुझ्याप्रमाणेच माझेही स्वरूप शत्रूंच्या विषयी क्रोधयुक्त होवो. १० पृथ्वीमातेला नमस्कार असो. मी भूमातेला यत्किंचितही पीडा देणार नाही. व भूमाताही मला पीडा न देवो. ११ हे राजत मणे, तू एवढ्याच प्रमाणाचा आहेस. तू आयुःस्वरूप आहेस. यास्तव, मला आयुष्य दे १२ हे ताम्र मणे, तू बलरूप. आहेस. म्हणून मला बल दे. १३ हे सुवर्ण मणे, तू धारण करण्याला योग्य आहेस. व कांतिमान् आहेस. यास्तव, मला तुझ्यासारखी कांती दे. १४ माझ्या गृहाचे पालन करणाऱ्या 'गृहपती' नामक अग्नीला ही आहुती समर्पण असो. १५ वनस्पतिरूपी सोमराजाला ही आहुती अर्पण असो. १६ इंद्राच्या बलाला ही आहुती अर्पण असो. १७ मरुतांच्या बलोत्पादक शक्तीला ही आहुती समर्पण असो. १८ चालत असतांना पृथ्वीला धक्के देणारा हा रथ शुचिर्भूत अशा यज्ञभूमीचे ठिकाणी व 'रथवाहन' संज्ञक गाड्यावर राहणारा आहे. हा आपल्या ठिकाणी

यजामानाला बसवून घेणारा व मोकळ्या मैदानात राहणारा आहे. 'होता' नामक ऋत्विजांप्रमाणे हा वेदीमध्ये बसत असतो. एखाद्या अतिथीप्रमाणे ज्याला वाहून नेतो त्याच्या घरी जाऊन बसतो. मनुष्यांत श्रेष्ठ अशा राजादिकांच्या समुदायात हा बसत असतो. यज्ञामध्ये हा वरुण असून सूर्याला वाहून नेतांना हा आकाशातही संचार करतो. उदकापासून उत्पन्न झालेल्या अश्वांच्या योगाने हा जोडला जात असून 'गो' शब्दाने व्यक्त होणाऱ्या वज्रापासून हा उत्पन्न झालेला आहे. यज्ञाकरिताच हा उत्पन्न झालेला असून पाषाणासारख्या कणखर अशा लाकडांच्यापासून ज्याची बनावट झाली आहे असा हा रथ अत्यंत मोठ्या अशा या राजसूय यज्ञाला संपादन करो. (अनुवाक १५).

१ हे दक्षिणबाहो, तू जणू काय, इष्ट अशी वस्तू देणारा मित्रच आहेस. हे वामबाहो, तू अनिष्ट निवारण करणारा जणू वरुणच आहेस. २ मी सर्व देवांच्याशी संलग्न होऊन जाईन. ३ हे चर्ममय वस्त्रा, तू या क्षत्रिय राजाला बसावयास योग्य असे मध्यस्थानच आहेस. ४ या क्षत्रिय राजाला मातेप्रमाणे धारण करणारे असल्यामुळे तू जणू काय त्याचे जन्मस्थानच आहेस. ५ हे माझ्या शरीरा, सुखकर अशा या आसंदीवर म्हणजे घडवंचीवर बैस. ६ ही घडवंची तुला पीडा न करो व तुझा स्वामी असलेल्या मलाही पीडा न करो. ७ हा यजमान, यज्ञरुपी व्रताचा स्वीकार केलेला व अनिष्टाचे निवारण करणारा होऊन ह्या घडवंचीवर बसला आहे. पुष्कळशा वैऱ्यांच्या घरात शिरून, त्यांचा नाश करून विजयी होऊन परत आलेला हा राजा साम्राज्य चालविण्यास अवश्य अशा शुभ संकल्पाने युक्त होवो. ८ हे ब्रह्म-स्वरुपा, हे राजा, तूच ब्राह्मण आहेस. कारण तू ब्राह्मणधर्माचे पालन करून आम्हाला अनुष्ठान करण्याविषयी आज्ञा देणारा व सत्य अशा कार्याकडे आम्हास प्रवृत्त करणारा आहेस. ९ हे ब्रह्मस्वरूपा, हे राजा, तू मोठा महात्मा आहेस. १० तू परमऐश्वर्याने युक्त असा इंद्रच आहेस. ११ तू सत्यौजा म्हणजे अमोघवीर्य आहेस. १२ हे ब्रह्मस्वरूपा, हे राजा, शिष्टाचार पालन करणारा तू मित्र म्हणजे देवांचा मित्रच आहेस. १३ तू सुशेव म्हणजे सर्वांच्याकडून सेवा करण्यास योग्य असा आहेस. हे ब्रह्मस्वरूपा, हे राजा, तू ब्रह्माप्रमाणेच सर्ववंद्य आहेस. १४ अनिष्टांचे निवारण करणारा तू जणू वरुणदेवच आहेस. १५ तू सत्यधर्मा म्हणजे शास्त्रीय धर्माचे आचरण करणारा आहेस. १६ हे स्फ्य, तू जणू काय इंद्राचे वृत्रासुराला मारणारे वज्रच

आहेस. या कारणाने मला जे अनिष्ट पण इतरांना इष्ट असे द्यूतस्थानांचा नाश करणे इत्यादि, तसेच मला जे इष्ट ते साधणें, हे माझ्यासाठी कर. १७ हा यजमान ऊर्ध्व दिशेसह पांचही दिशांच्या ठिकाणी राजा झाला आहे. १८ हे कोषाध्यक्ष, तू स्तुती करण्यास पात्र हो. १९ प्रजाजनांकडून यथान्याय कर वसूल करणाऱ्या हे अधिकारी पुरुषा, हे भागदुघा, तू सुमंगल म्हणजे राजा व प्रजा या दोघांनाही सुखकर असे काम करणारा हो. २० हे अंत:पुररक्षका, हे क्षत्या, तू सर्व अंत:पुररक्षकांचा सत्ताधीश आहेस. अंत:पुररक्षणाचे कार्य तू सत्याला स्मरून करणारा हो. २१ उदकांमध्ये केव्हाही बुडू न देणाऱ्या 'अपांनपात्' नांवाच्या अग्निदेवतेला ही आहुती अर्पण असो. २२ बलाचे पालन करणाऱ्या अग्निदेवाला ही आहुती अर्पण असो. २३ 'गृहपती' नामक अग्नीला ही आहुती समर्पण असो. (अनुवाक १६).

'राजसूय' यज्ञ करणाऱ्या यजमानाने दररोज एक याप्रमाणे अनुक्रमे दहा दिवस 'संसृप' अशी संज्ञा असलेल्या हविर्द्रव्यांनी निरनिराळ्या देवतांचे यजन करावे. प्रकाशात्मक अशा अग्निदेवतेला उद्देशून आठ कपालांच्या समूहावर पुरोडाश तयार करून त्याने इष्टी करावी. सांगतार्थ सुवर्णाची दक्षिणा द्यावी. साळीच्या तांदुळाचा 'चरू' शिजवावा व त्याने वाणीला प्रवृत्त करणाऱ्या 'सरस्वती' देवतेचे यजन करावे. थानतुटी म्हणजे जी आपल्या आईचे स्तनपान आता करीत नाही अशी कालवड सरस्वती देवतेच्या इष्टीची सांगता होण्यासाठी दक्षिणा म्हणून द्यावी. सर्व कार्यांमध्ये योग्य ती प्रेरणा करणाऱ्या 'सविता' नामक देवासाठी बारा कपालांवर भाजलेल्या पुरोडाशरूपी हविर्द्रव्याने इष्टी करावी व तिचे सांगतेकरिता उपध्वस्त (अनेकवर्णी) बैल दक्षिणा म्हणून द्यावा. पशूंचा अधिपती असलेल्या 'पूषा' देवतेच्या उद्देशाने चरू शिजवून त्याचा याग करावा. श्यामवर्ण बैल दक्षिणा म्हणून द्यावा. ब्राह्मणांच्या अभिमानी असलेल्या बृहस्पती या देवतेकरिता चरू शिजवून त्या हविर्द्रव्याने यजन करावे, व तत्सांगतार्थ पांढऱ्या रंगाची पाठ असलेला बैल दक्षिणेसाठी द्यावा. अकरा कपालांच्या गटावर भाजलेल्या पुरोडाशाने प्रकाशात्मक अशा इंद्रदेवासाठी यजन करून एक चांगला बैल दक्षिणा म्हणून ऋत्विजांना द्यावा. वरुणदेवतेच्यासाठी दहा कपालांवर पुरोडाश भाजून त्याचे यजन करावे. 'महानिरष्ट' बैलाची इष्टीच्या ब्राह्मणांना दक्षिणा द्यावी. सोमदेवतेला उद्देशून चरू शिजवावा व त्याची इष्टी करावी. पिंगट रंगाचा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. अनेक प्रकारची

रूपे निर्माण करणाऱ्या 'त्वष्टा' नामक देवाला संतुष्ट करण्याकरता आठ कपालांच्या समूहावर भाजलेल्या पुरोडाशाचा याग करावा आणि त्याच्या सांगतेकरता सर्व शरीर पांढरे शुभ्र असलेला बैल दक्षिणा म्हणून द्यावा. यज्ञाधिदैवत 'विष्णू' देवतेकरिता तीन कपालांच्या समूहावर भाजलेल्या पुरोडाशाने यजन करावे. सांगतेसाठी ठेंगणा बैल दक्षिणा म्हणून ऋत्विजांना द्यावा. (अनुवाक १७).

'संसृप' संज्ञक हविर्द्रव्यांनी दहा दिवस दहा इष्टी करण्याचे विधान मागील अनुवाकात सांगितले आहे. आता 'दशपेय' नामक सोमयागाचे विधान सांगण्यात येत आहे. या सोमयागाची 'दीक्षा' म्हणजे 'दीक्षणीय' नांवाची इष्टी ज्या दिवशी केली जाईल त्याच दिवशी सोमवल्ली विकत घेण्याचा विधी करावा. 'अग्निष्टोम' यज्ञात दीक्षणीयेष्टी झाल्यावर यजमानाने उदकांमध्ये स्नान करण्याचा विधी करावयाचा असतो. तो न करता त्याऐवजी बारा कमलपुष्पे ओंवलेली माळ यजमानाने आपल्या गळ्यात घालावी. जे खोंड आपल्या मातेचे स्तनपान करीत नाहीसे झाले आहेत, असे थानतुटे दहा अंडिल खोंड किंमतीदाखल देऊन 'सोमवल्ली' विकत घ्यावी. या सोमयज्ञात अग्निष्टोमात सांगितलेल्या चमसभक्षणाखेरीज चौकोनी व दांडा असलेल्या 'चमस' नामक दहा लाकडी पात्रात भरलेला सोमरस ब्राह्मणांनी प्यावा लागतो म्हणून या सोमयागास 'दशपेय' अशी विशिष्ट संज्ञा आहे. एकेका चमस पात्रातील सोमरस दहा दहा ब्राह्मणांनी, याप्रमाणे दहा चमसांतील सोमरस एकंदर शंभर ब्राह्मणांनी प्राशन करावा. या यज्ञात जे जे 'स्तोत्र' म्हणजे 'साम' गावयाचे असेल ते ते 'सप्तदश' स्तोमात्मक करून गावे. म्हणजे तीन ऋचांच्या विशिष्ट पध्दतीने आवृत्ती करून त्यांची एकंदर संख्या सतरा होईल अशा प्रकारे त्याचे गान करावे. या यज्ञामध्ये सुवर्णाच्या चौकटीत काच बसविलेले दोन आरसे अध्वर्यूला द्यावेत. सामगायक उद्गात्याला सोन्याची कंठी द्यावी. वर्तुळाकार सुवर्णपदक ज्यामध्ये आहे असा सुवर्णालंकार होत्याला द्यावा. प्रस्तोता व प्रतिहर्ता या दोघांना मिळून एक घोडा द्यावा. लहान वयाच्या गाभण्या बारा गाई 'ब्रह्मा' नामक ऋत्विजाला द्याव्यात. मैत्रावरुणाला वांझ गाय द्यावी. नेष्टा व पोता या दोघा ऋत्विजांना धोतरजोड्या द्याव्यात. सातूंनी भरलेला एक गाडा 'अच्छावाक' नांवाच्या ऋत्विजाला द्यावा. गाडा ओढणारा एक बैल आग्नीध्राला द्यावा. या यज्ञात 'होता' नांवाचा जो ऋत्विज असेल

तो 'भृगु' गोत्रात उत्पन्न झालेला असावा. प्रकृतिभूत अग्निष्टोम यज्ञात 'गायत्र' नांवाचे साम ब्राह्मणाच्छंसीने 'आज्य' संज्ञक 'शस्त्र' पठण करावयाच्या पूर्वी सामगायकांनी गावयाचे असते. त्याऐवजी या यज्ञात 'श्रायन्त इव' या ऋचेमध्ये निष्पन्न होणारे 'श्रायंतीय' नामक सामाचे गान करावे. त्याचप्रमाणे 'अग्निष्टोम' संज्ञक सामाच्या ऐवजी 'वारवंतीय' नांवाचे साम गावे. आणि प्रकृतिभूत अग्निष्टोमात कोणत्याही उदकप्रवाहातून 'वसतीवरी' संज्ञक उदके भरून आणावयाची असतात त्याऐवजी या यज्ञात 'सरस्वती' नदीच्या प्रवाहातील उदके भरून आणावीत. (अनुवाक १८).

'दशपेय' नांवाचा 'सोमयाग' गेल्या अनुवाकात सांगितला. या अनुवाकात 'दिशामवेष्टय:' अशी संज्ञा असलेल्या इष्टी नंतर दोन पशुयाग आणि नंतर 'सात्यदूत' नामक हवींचा याग सांगण्यात येत आहे.

'अग्नि'देवतेच्या उद्देशाने आठ कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून तयार करावा व त्याचे यजन करावे. सांगतार्थ 'हिरण्य' दक्षिणा द्यावी. 'इंद्र' देवतेला उद्देशून अकरा कपालांच्या गटावर भाजून तयार केलेल्या पुरोडाशाचे यजन करावे. एक बैल दक्षिणा म्हणून द्यावा. 'विश्वेदेव' देवतेसाठी चरू शिजवून त्याचा याग करावा. पिंगल वर्णाची गाय दक्षिणा द्यावी. 'मित्रावरुण' देवतेसाठी 'आमिक्षा' तयार करावी व तिचा याग करावा. वांझ गाय दक्षिणा म्हणून द्यावी 'बृहस्पति' देवतेसाठी चरू शिजवून त्याचा याग करावा. सांगतेसाठी पांढऱ्या रंगाची पाठ असलेला व बाकीचे अंग इतर रंगाचे असलेला बैल दक्षिणा म्हणून द्यावा. 'अदिति' देवतेसाठी गळ्याशी स्तन लोंबत असलेली व गर्भिणी अशी शेळी आणि 'मरुत्' देवतेकरिता पांढऱ्या रंगाची शेळी मारून त्यांच्या अंगांचा अनुक्रमे याग करावा. उभयता अश्विनीकुमार व पूषा या देवतांना मिळून बारा कपालांच्या समूहावर पुरोडाश भाजून तयार करावा. सत्यवाक् सरस्वत् नामक देवतेसाठी चरु व 'सत्यप्रसव सविता' देवतेकरता बारा कपालांच्या गटावर पुरोडाश भाजून तयार करावा आणि अशा प्रकारच्या हविर्द्रव्यांनी अनुक्रमे अश्विनीकुमारादि देवतांचे यजन करावे. या यागाच्या सांगतेसाठी तीन बाणांसह धनुष्य व त्या धनुष्यावर चढविण्याची शुष्क दोरी दक्षिणा म्हणून द्यावी. (अनुवाक १९).

या अनुवाकात दोन दिवसात पूर्ण होणाऱ्या 'प्रयुज' नामक हवींच्या

यागाचे निरूपण करण्यात येत आहे. 'अग्नि' देवतेसाठी आठ कपालांवर भाजलेला पुरोडाश, 'सोम' देवतेसाठी शिजविलेला चरू, 'सविता' देवतेकरिता बारा कपालांवर भाजलेला पुरोडाश, 'बृहस्पति' देवतेला उद्देशून शिजविलेला चरू 'त्वष्टा' देवतेकरता आठ कपालांवर भाजलेला पुरोडाश आणि 'वैश्वानर' देवतेकरिता बारा कपालांवर भाजलेला पुरोडाश, याप्रमाणे हविर्द्रव्ये तयार करून अनुक्रमे अग्न्यादि देवतांचे यजन करावे. 'रथवाहन' म्हणजे ज्याच्यावर रथाच्या दांड्यांची टोके टेकवून ठेवलेली असतात त्या गाड्याला उजव्या बाजूला जुंपला जाणारा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. दुसऱ्या दिवशी 'सरस्वती', 'पूषा', 'मित्र', 'वरुण' 'क्षेत्रपती' व 'आदित्य' या सहा देवतांच्यासाठी निरनिराळे सहा चरू शिजवावेत आणि त्यांचा अनुक्रमे 'सरस्वती' इत्यादि सहा देवतांना उद्देशून याग करावा. तत्सांगतार्थ 'रथवाहन' नामक गाड्याच्या डाव्या बाजूस जोडला जाणारा बैल दक्षिणा म्हणून द्यावा. (अनुवाक २०).

१ हे सुरे, स्वादिष्ट, उग्र असा वास येत असलेल्या व अमृताप्रमाणे पुष्टिकारक अशा तुला स्वादिष्ट, उग्र वास येणाऱ्या व अमृताप्रमाणे पुष्टिकारक अशा सोमसदृश साळीच्या भाताचे व सातूंचे कोवळे अंकुर व फार उंच न वाढणाऱ्या गवताचे तुकडे यांच्याशी संमिश्र करतो. हे सुरे, तू जणू काय सोमरस आहेस. उभयता अश्विनीकुमारांच्यासाठी तू वृद्धिंगत हो. 'सरस्वती' देवतेसाठी तू वृद्धिंगत हो. भक्ताचे उत्तम प्रकारे संरक्षण करणाऱ्या इंद्रदेवाकरता तू वृद्धिंगत हो. २ हे इंद्रदेवा, सूर्याची जणू काय कन्याच अशी त्याची दीप्ती द्रवीभूत व सोमरसस्थानापन्न अशा सुरारूपी द्रव्याला दृढ आणि विस्तीर्ण अशा लोकरीच्या पवित्रकाने म्हणजे गाळण्याचे शुद्ध करो. ३ लोकरीच्या गाळण्याने गाळला जाऊन शुध्द झालेला जणू काय सोमरसच असा हा सुरारस वायूप्रमाणे शीघ्रगामी झाला व खाली ठेवलेल्या पात्रात अधोमुख होऊन झटकन गळून गेला. सोमरसाच्या जागी मानलेला हा सुरारस म्हणजे संगती करण्यास योग्य असा इंद्राचा मित्रच होय. ४ अत्यंत प्रिय अशा हे अश्विनीकुमारादि देवतांनो, ज्याप्रमाणे सातूंची भरपूर लागवड ज्यांनी केली आहे, असे शेतकरी सर्व शेत सातूच्या पिकाने अगदी भरास आले आहे, असे लक्षात येताच त्यातील 'तण' क्रमाने दूर करून त्या पिकाची भराभर कापणी करतात आणि सर्व धान्य आपल्या घरी आणतात,त्याचप्रमाणे तुम्ही देखील हा श्रध्दाळू व हा नास्तिक अशा प्रकारे निवड करून जे यजन

करणारे यज्ञ व तदंगभूत नमस्कार करण्याचे केव्हाही टाळीत नाहीत अशा श्रध्दाळू यजमानांच्या घरी निरनिराळ्या हविर्द्रव्याचे पुन:पुन्हा भोजन करा.

'सौत्रामणि' यागामध्ये अश्विनीकुमारांच्यासाठी मळकट पांढऱ्या रंगाचा म्हणजे धूम्रवर्ण असा पशू (बोकड), 'सरस्वती' देवतेसाठी मेंढा व इंद्रदेवते-करता बैल याप्रमाणे पशूंचे हनन करून त्यांच्या वपेने व अंगांनी अनुक्रमे अश्विनीकुमारांचे यजन करावे. नंतर इंद्रदेवतेसाठी अकरा कपालांच्या समूहावर भाजलेला पुरोडाश, 'सविता' देवतेकरिता बारा कपालांवर भाजलेला पुरोडाश व 'वरुण' देवतेसाठी दहा कपालांच्या गटावर भाजलेला पुरोडाश, अशाप्रकारे हविर्द्रव्ये तयार करून त्यांच्या योगाने इंद्रादि देवतांचे अनुक्रमे यजन करावे. ५ हे सोमप्रमुख पितरांनो, या सुराशेषाचे पान करून तृष्णा पूर्ण होवो.

सौत्रामणियज्ञाच्या सांगतेसाठी एक घोडी दक्षणा म्हणून ऋत्विजांना द्यावी. (अनुवाक २१).

१ हे अग्नाविष्णू हो, सर्व यजमानांच्या घरोघर घृताची जी आज्य, सर्पी इत्यादि गुह्य अशी नांवे निरनिराळ्या मंत्रांतून उच्चारली जात असतात, ती तुम्ही ऐकता. हे तुमचे माहात्म्य खरोखर मोठेच आहे. रत्नाप्रमाणे चमकणाऱ्या सात ज़्वाला धारण करणारी तुमची जिव्हा प्रत्येक घृताजवळ जाऊन त्याचे पूर्णपणे भक्षण करो. २ हे अग्नाविष्णू हो, तुमचे अत्यंत आवडते असे यज्ञशालारूपी स्थान मोठे पूजनीय आहे. यजमानांच्या घरोघरी आपली स्तुती वृध्दींगत करणारे तुम्ही घृताचे सार सेवन करून पुरोडाशादि भक्षण करता. तुमची जिव्हा प्रत्येक घृताहुतीच्या सन्निध जाऊन तिचे उत्कृष्ट रीतीने भक्षण करो. ३ अन्नप्रद अशी सरस्वती देवी अन्नांच्या योगाने आमचे पूर्णपणे रक्षण करो. ४ यजनीय अशी सरस्वती देवी आमच्या यज्ञाला द्युलोकातून खाली उतरून येवो. मेरूसारख्या अत्यंत उंच व विस्तीर्ण अशा पर्वतावरून उतरून येवो. आमच्या निमंत्रणास मान देणारी व घृताचे सेवन करणारी अशी आमच्या यज्ञाला आलेली ती सरस्वती देवी सुख प्राप्त करणारी अशी आमची स्तुतिरूपी वाणी मनापासून श्रवण करो. ५ हे बृहस्पते, आमची हविर्द्रव्ये तू सेवन कर. सर्व देवांचे हित करणाऱ्या हे देवगुरो, तुला हवी प्रदान करणाऱ्या यजमानाला रत्ने दे. ६ आणि हे बृहस्पते, उपासकांचे पित्याप्रमाणे पालन करणाऱ्या, सर्व देवांचा गुरू व इच्छित फलांचा वर्षाव कणाऱ्या अशा तुला यज्ञांनी, नमस्कारांनी व हविर्द्रव्यांनी संतुष्ट करून आम्ही तुझी सेवा करू.

तुझ्या प्रसादाने आम्ही उत्कृष्ट प्रजेने व शूर अशा वीरपुरुषांनी युक्त होऊन धनांचे अधिपती होऊ. ७ हे बृहस्पते, राजा जे धन इतरांना मागे टाकून स्वत: भोगण्याची इच्छा करतो, जे धन आम्हा अमात्यादि लोकांमध्ये अलंकारादिकांच्या रूपाने प्रकाशित होत असते, आणि यज्ञ करणाऱ्या लोकांमध्ये यज्ञाचे मुख्य साधन म्हणून प्रसिध्दीस येते, इतकेच नव्हे तर जे धन आमच्यासाठी जीव देणाऱ्या सैन्याच्या रूपाने प्रकट होत असते, ते आश्चर्यजनक असे नानाप्रकारचे धन, सत्य अशा परमात्म्यापासून देवगुरूच्या रूपाने उत्पन्न झालेल्या हे बृहस्पते, आमच्या ठिकाणी स्थापन कर. ८ हे मित्रावरुण हो, आमच्या गाईंच्या कळपावर चोहोबाजूंनी पर्जन्योदकाचे खूप सिंचन करा. हे सत्कर्म करणाऱ्या मित्रावरुणहो, आमच्या जमिनीतील रज:कणांना मधुर अशा पर्जन्योदकाने भिजवून चिंब करा. ९ हे मित्रावरुण हो, आमच्या संरक्षणासाठी धनांनी पूर्ण अशा हातांनी आमच्याजवळ या. व आल्यानंतर आमच्या गाईंच्या कळपावर पर्जन्योदकाने वर्षाव करा. परस्परांशी संलग्न असणारे तुम्ही दोघेही ब्राह्मणादि जनसमुदायात आम्हाला प्रख्यातीस आणा. हे मित्रावरुण हो, माझे हे आव्हान म्हणजे तुम्हाला करीत असलेले निमंत्रण लक्षपूर्वक ऐका. १० यागसमाप्तीपर्यंत मी तुम्हा अष्टवसूंमध्ये प्रथम उत्पन्न झालेल्या सर्वांना अत्यंत प्रिय व मित्राप्रमाणे आमच्या क्षेत्राचे साधन करणाऱ्या अग्निदेवाचे वैदिक वाणीने स्तवन करतो. ११ काही काही रणसंग्रामांच्या ठिकाणी अत्यंत अभिनिवेशाने लढणाऱ्या शूरवीराच्या रथाप्रमाणे देवांना हवी प्रदान करण्याच्या बुद्धीने प्रेरित झालेल्या यजमानाचा मनोवृत्तिरूपी रथ अत्यंत त्वरेने पुढे पुढे धांव घेत असतो. जो यजमान देवांचे पूजन करण्याची मनात इच्छा धारण करतो, तोच यजमान यज्ञ न करणाऱ्या लोकांना पराभूत करण्यास समर्थ होतो. १२ हे यजमान, तू दर्शपूर्णमास याग केल्यानंतर केव्हाही नाश पावणार नाहीस. सोमयज्ञामध्ये सोमरसाचे यजन करणाऱ्या हे यजमाना, तू केव्हाही नाश पावणार नाहीस. आणि पाकयज्ञांच्या योगाने देवांना तृप्त करणाऱ्या हे यजमाना, तू देखील कधीही नाश पावणार नाहीस. १३ ह्या यजमानाच्या ठिकाणी उत्कृष्ट सामर्थ्य व शीघ्रगामी अशा अश्वांच्या योगाने प्राप्त होणारी उत्तम प्रकारची शक्ती सदैव राहो. १४ यज्ञकर्मात गढून राहणाऱ्या ह्या यजमानाचा, राक्षस इत्यादि कोणी नाश न करो. यज्ञाला विरोध करणारा पापी माणूस यजमानाशी केव्हाही लगट न करो. सुविचारी यजमानही अशा प्रकारच्या

पाप्याशी स्नेहभावाने लगट कधीच करणार नाही. १५ नदीप्रमाणे सुख देण्याची इच्छा करणाऱ्या गाई पूर्वी यज्ञ केलेल्या व आता यज्ञ करणाऱ्या पुरुषाजवळ येऊन त्याला भरपूर दूध देतात. यज्ञकर्मामध्ये देवांना अर्पण करण्यासाठी 'जुहू' नांवाचे पात्र हविर्द्रव्याने भरीत असलेल्या व भरणार असलेल्या यजमानाला श्रवण करण्याची इच्छा करीत असल्याप्रमाणेच जणू काय घृताच्या धारा त्याच्या सन्निध सर्व बाजूंनी येऊन पोहचतात. १६ जी रोगरूपी निर्ऋती राक्षसी आमच्या घरात शिरली आहे, तिला हे सोमरुद्र हो, ती अनेक दिशांच्या ठिकाणी पळून जाईल अशाप्रकारे तिला आमच्या घरातून उखडून टाका. आमच्याकडे पाठ करून चालत्या होणाऱ्या त्या निर्ऋतीला दूर नेऊन तुम्ही खूप त्रास द्या. त्या निर्ऋती राक्षसीने निर्माण केलेले आमच्या शरीराचे ठिकाणी जे जखडून राहिलेले रोगरूपी पाप आहे ते आमच्यापासून दूर करा. १८ हे सोमा, हे पूषन्, धनांची उत्पती करणारे, द्युलोकाला निर्माण करणारे व पृथ्वीला उत्पन्न करणारे तुम्ही दोघेही जन्मापासूनच सर्व त्रैलोक्याचे पालन करणारे झाला आहात. हे देव हो, अमृताप्रमाणे अविनाशी अशा यज्ञकर्माच्या फलाचे बंधन आमच्या ठिकाणी निर्माण केले आहे. १९ सर्व देव यज्ञमंडपात प्रादुर्भूत होणाऱ्या सोम व पूषा नामक दोघा देवांचीच सेवा करतात. हे दोघे देव आमच्या ठिकाणी प्रादुर्भूत होणारी, आम्हास अप्रिय अशी बुध्दिमांद्ये नष्ट करोत. इंद्रदेव ह्या सोम व पूषा नामक दोघा देवांच्याकडून तरुण अशा गाईच्या कासेत परिपक्व असे दूध निर्माण करवितो. (अनुवाक २२).